म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३१३६

सत्विचार चिंतनी

चिंतक- डॉ. गजानन श्री. खैर
एम.ए., पीएच.डी.

भाग ४ था

REFBK-0024796

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, से न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे ादा वर्गणी भरावी लागेल.

2 FEB 1986

6 FEB 1986


9 MAR 1986

9 MAR 1986

5 JUN 1986

(कृ. मा. पहा)
५०००-३-८४


संदर्भ निबंध
३१७६
२४७८६
१११११८६



सदाचार-चिंतनी

भाग चौथा

व्यवहारातील अनुभवांवर
चिंतनाने सुचलेले
विचार व आचार


REFBK-0024796

चिंतनिक
डॉ. गजानन श्री. रैवर
एम. ए., पीएच्. डी.

मूल्य दहा रुपये फक्त



प्रकाशक

प. भ. कुलकर्णी

एम्. एस्सी./इंजि./एफ्.टेक्./लंडन.

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाकरिता
१७८६ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती	नोव्हेंबर १९७६
पुनर्मुद्रण	ऑक्टोबर १९८२ (विजयादशमी)

मुद्रक

म. द. कश्यप एम्. ए.

महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना
१७८६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

– अनुक्रमणिका –

अ	आत्मप्रतिमा	(५)
आ	जगाची दृष्टी	१२४
१	योगी परुळेकर	१
२	जगी सर्वदुःखी असा कोण आहे ?	४
३	रॉंग नंबर, रॉंग पर्सन	५
४	आपल्या मुलामुलींचे विवाह	६
५	तडजोडी-शिवाय संसार नाही	८
६	क्रीडांगणावर गीता	१०
७	असमाधान व फसवे समाधान	१२
८	ययाती, नचिकेत, याज्ञवल्क्य	१३
९	पूर्ण पुरुष विरळा	१५
१०	बिलंदर बाबा अन् बावळट भक्त	१७
११	मुलांचा जग-प्रवेश	१९
१२	कसोटीच्या क्षणी किंमत ठरते	२१
१३	सवयी आणि जाणीव	२३
१४	प्राणघातक अज्ञान	२४
१५	आहार आणि आकार	२६
१६	जवळची माणसे दुखवू नका	२८
१७	ग्रामीण जीवनात ध्येयवाद	३०
१८	तीच तत्त्वे पण भाषा नवी	३२
१९	'माझे' विश्व केवढे आहे ?	३४
२०	मातृ-पितृ वाणीचे सामर्थ्य	३६
२१	प्रथम द्या – मग अपेक्षा करा	३७
२२	भौतिक संस्कृती – मानसिक विकृती	३९
२३	निष्काम कर्म का निष्कर्म काम !	४१
२४	वाईट माणसांची चांगली कृती	४३
२५	पुतळे शिवाजीचे अन् चाळे संभाजीचे !	४५
२६	भ्रष्टाचार : कारणे व उपाय	४७
२७	स्वतंत्रते भगवती ! निराशा येई मम चित्ती !	४९
२८	आनंदाला विरजण	५१
२९	मुलांची भांडणे, थोरांचे वैर	५२
३०	कष्ट, काटकसर व काटकपणा	५४
३१	व्यासांचा मानवाला संदेश	५६
३२	तुमचा स्वभाव कसा आहे ?	५८
३३	प्रगतीचे चार पैलू	५९

३४	व्यसनांच्या सार्वत्रिक सोयी	६१
३५	विश्वासघात केव्हा होतो ?	६३
३६	अनेक भ्रष्टाचार – एक उपाय	६४
३७	कीड मारण्याचे दोन प्रकार	६६
३८	राक्षस – पौराणिक व आधुनिक	६७
३९	चाकू – सर्जनचा आणि गुंडाचा	६८
४०	बदनाम नाती व वर्ग	६९
४१	हे जनते, तुझ्याकडून अपेक्षा	७१
४२	असामान्य जीवनाचे रहस्य	७३
४३	आपण माणसे मिजासखोर होत चाललो	७५
४४	केवळ पारायण नको, मननही हवे	७६
४५	सत्संगी रती वाढो	८०
४६	हे महिलांचे वर्ष आहे	८१
४७	तडजोड आणि मध्यस्थ	८३
४८	पुरुषार्थ व दैव यांचे गणित	८५
४९	श्रीमंतांचाही उद्धार आवश्यक	८७
५०	संस्कार टाळून पदवी	८९
५१	औट घटकांचे राजे – आपण	९०
५२	माता – पिता – गुरू, उशीरा ओळख	९२
५३	धन आणि साधन	९३
५४	दुराचारी आईबाप – बिचारी मुले	९५
५५	संधी, श्रेय व कर्तबगारी	९६
५६	पहिल्या श्रेणीतील विद्यार्थ्यांची स्वप्ने	९८
५७	साहित्यातील पुरुषोत्तम	१०१
५८	कुटुंबातील दुरावा	१०२
५९	शुद्ध जीवनाची तत्त्वे	१०४
६०	शताब्दी पचवून स्वार्थाचे ढेकर	१०६
६१	हे नवे गुरू ! पारखून घ्या	१०८
६२	कलमी कार्यक्रमाची व्यापक कल्पना	११०
६३	जीवनातील आणीबाणीचा क्षण	११२
६४	दृष्टी रक्षणाचे वर्ष	११४
६५	संपत्ती येते, संस्कृती रेंगाळते	११६
६६	वानर आहेत, राम हवेत	११८
६७	चोरांच्या चालीरीती बदलल्या	१२०
६८	मंगळाचे मंगल	१२०
६९	आजचे शिक्षण आणि पालक	१२२



आत्म-प्रतिमा

प्रसिद्धी :- प्रसिद्ध होणे हे पुष्कळ अंशी वृत्तपत्रांच्या व बातमीदारांच्या कृपेवर अवलंबून असते. उल्लेखाने चढवणे किंवा अनुल्लेखाने मारणे दोन्हीही क्रिया होऊ शकतात. मला मात्र पुष्कळ प्रमाणात पहिल्याच प्रकारचा अनुभव आला आहे. मी केलेल्या सर्व चांगल्या गोष्टींना नियतकालिकांनी, संस्थांनी व समाजाने चांगला प्रतिसाद दिला. अमेरिका आणि युरोप या देशातील प्रवासांची सकाळमधील बातमीपत्रे वाचकांनी जिज्ञासेने वाचली. 'जगातील समाजक्रांती व हिंदुस्थान', 'जपानची जीवन क्रांती' हे ग्रंथ आणि त्यावरील व्याख्याने अत्यंत लोकप्रिय झाली. त्या वेळेपासून म्हणजे १९३४ पासून १९७६ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या माझ्या सर्व ग्रंथांनी व त्यावर दिलेल्या व्याख्यानांनी मला अपेक्षेबाहेर प्रसिद्धी मिळाली.

जीवनातील प्रेरणा :- प्रेरक शक्ती, निष्ठा आणि गुरुकृपा यांपैकी पहिल्या दोन गोष्टी माझ्या जीवनात स्वयंसिद्ध आहेत. गुरुकृपेचा मला फारसा अनुभव नाही; कारण मी त्या मार्गातला नाही; अध्यात्माच्या बाबतीत मी स्वावलंबी आहे. श्रेय द्यायचेच झाले तर ते मी परिस्थितीला देईन. योग्य वेळी योग्य शिक्षण, योग्य विचार, योग्य ग्रंथ, योग्य मित्र, योग्य कार्यक्षेत्र यांचा लाभ होणे हे पुष्कळ अंशी परिस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे माणसामाणसांना मिळालेल्या यशापयशात कमीजास्त तफावत दिसते. मला माझ्या ठिकाणच्या गुणांचा योग्य विकास व उपयोग करण्याकरिता अनुकूल परिस्थिती जेव्हा मिळत गेली त्या वेळी मला यश आले. प्रतिकूल परिस्थितीत अपयश आले. पण कार्यनिष्ठा व प्रयत्नवाद सतत होता.

जीवनाचे तत्त्वज्ञान :- वयातील विशीच्या उंबरठ्यावर असतानाच भगवद्गीतेसारखा ग्रंथ माझ्या हातात पडला. दिवसातून दोन वेळा सकाळ-संध्याकाळ त्याचे वाचन, मनन व अर्थचिंतन केले. त्यामुळे माझ्या जीवनातील तत्त्वज्ञानाला आकार आला. जीवनात जे अनुकूल अथवा प्रतिकूल प्रसंग आले त्यांना मी धैर्याने व निष्ठेने तोंड देऊ शकलो. दुःख, निराशा, वैताग किंवा विरोध यांना शरण गेलो नाही. प्रयत्नवादाच्या आधाराने प्रत्येक प्रसंगाचा, अनुभवाच्या व शिक्षणाच्या दृष्टीने उपयोग करून घेऊन स्वतःच्या विकासाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले. प्रतिकूल प्रसंगाचा उपयोग शिक्षणाचे दृष्टीने मी करून घेतो.

दुःखे व अपुरी स्वप्ने :– माझे सर्व बालपण दुःखातच गेले आहे. वाढत्या वयात पुरेसा पोषक आहार मिळाला नाही, त्यामुळे प्रकृती दुर्बल राहिली. परंतु दुःख भोगताना आपण दुःख भोगत आहोत अशी जाणीव कधीच झाली नाही. बालवयात कमरेला केवळ एक लंगोटी लावून उघड्या शरीराने उन्हाळा, पावसाळा, हिवाळा अशा तिन्ही ऋतूंत पन्नास-साठ घरची मधुकरी मागून आणून वेळीप्रसंगी उपाशी पोटी शाळेत जाऊन शिक्षण घेतले; ही एक कठोर तपश्चर्याच केली, असे आता वाटते. पुढे प्रौढ वयात, प्राप्त झालेल्या सुखदुःखांना समान मानावे हे मला गीतेने शिकविले. त्यामुळे माझी जीवनाविषयी काहीच तक्रार नाही. 'समाधानी आहे. आता अपुरी अशी स्वप्ने खूपच आहेत. मनुष्य मोठा होतो तसतशी ज्ञानाची अनेक क्षितिजे दिसू लागतात आणि अद्याप किती अनुभवायचे व शिकायचे राहिले आहे, याची जाणीव होते. भाषा-शास्त्र, वाङ्मय, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, विविध धर्म इत्यादी कितीतरी क्षेत्रांचा अभ्यास करायचा राहिला आहे. गायन, चित्रकला व बाग-बगीचा याही विषयांची आवड असून त्यांचे शास्त्रोक्त शिक्षण घेण्याला सवड झालेली नाही. अशी अनेक अपुरी स्वप्ने आहेत; आणि ती तशी आहेत म्हणूनच ऐंशीची झुळूक लागली असली तरी अजून खूप जगावे, शिकावे, पहावे, ऐकावे, अनुभवावे असे वाटते.

कार्याची परंपरा :– पुणे अ. वि. गृह हे माझ्या जीविताचे मुख्य कार्य. संस्थेच्या माजी विद्यार्थ्याने आजीव सेवक होऊन कार्याची परंपरा चालू ठेवावी असा पायंडा प्रथम न कळत मी पाडला. माझ्या माजी विद्यार्थ्यांनी तोच पुढे चालू ठेवला आहे. त्यामुळे माझ्या या कार्याची परंपरा दोनतीन पिढ्या तरी निश्चितपणे टिकेल. पुढचे कुणी सांगावे ?

माझ्यासंबंधी गैरसमज :– गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडात शैक्षणिक, सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात कामे करीत असता कधी कधी काही लोकांचे गैर-समज झाले ही गोष्ट खरी. परंतु गैरसमज करून घेणाऱ्या व्यक्तीला मी कधी शत्रू मानले नाही. अशा व्यक्तींना शक्य तर समक्ष भेटून त्यांची बाजू ऐकून घ्यावी, आपली समजावून सांगावी व शत्रुत्वाचे मित्रत्वात रूपांतर करावे असा माझा प्रयत्न असतो. वाद वाढवण्यापेक्षा तो कमी कसा होईल या दृष्टीने मी पहातो. त्यामुळे माझ्याशी मतभेद असणाऱ्या व्यक्ती आहेत. परंतु गैरसमज असणाऱ्या व्यक्ती नसाव्यात असे मला वाटते. 'आमच्यावर टीका करणारे हे कोण शिक्षणतज्ज्ञ आहेत ! यांना कोणी शिक्षणतज्ज्ञ केले ?' 'संस्थेतलेच पैसे स्वतःच्या खिशात जमा करून घेऊन तेच पैसे संचयदानाच्या रूपाने दिले असतील !' 'भगवद्गीतेचे तीन लेखक

आहेत असले अनावश्यक संशोधन करून यांनी आमची श्रद्धा उडवण्याचा प्रयत्न चालविला आहे,' अशा टीका माझ्यावर त्या त्या प्रसंगी झाल्या. त्यासंबंधी राग न मानता टीकाकारांचा गैरसमज दूर करून त्यांना मित्र करण्याचा मी प्रयत्न केला.

स्वभावातील गुणदोष :– शांतमनाने आत्मनिरीक्षण करून आपल्या गुणांचा व दोषांचा विचार करण्याची सवय वयाच्या पंचविशीतच मी लावून घेतली. तिचा मला जीवनात फार उपयोग झाला. सामान्य माणसाच्या ठिकाणी जे काम, क्रोध, लोभ, भीती, न्यूनगंड, उतावीळपणा इत्यादी विकार असतात ते माझ्या ठिकाणीही प्रकर्षाने होते व आहेत. दिवसातून दोन वेळा आणि सवड मिळेल तेव्हा या दोषांतून आपणास मुक्त व्हावयाचे आहे ही जाणीव व हा ध्यास रात्रंदिन मनात बाळगून व्यवहार केल्यामुळे माझ्यात सतत सुधारणा होत गेली व होत आहे. पन्नास वर्षापूर्वीचा मी आज तसा राहिलो नाही. माझ्या हाताखालून गेलेल्या पहिल्या पिढीतील साठीच्या वयात आलेले विद्यार्थी, पूर्वीचे अण्णा व आजचे अण्णा यांत जमीन अस्मानाचे अंतर आहे, असे शिफारसपत्र मला देतात. आमच्या विवाहाला ५२ वर्षे होऊन गेली. गृहलक्ष्मीला अनुभवास आलेला पूर्ववयातील माझा तापटपणा पुढे पुढे खूप कमी झाला, असा अभिप्राय त्याही देतील. हा बुद्धीपुरस्सर घडवून आणलेला विकास आहे. काळामुळे व वयामुळे घडून आलेला हा परिणाम नाही. गुणविकासाचे दृष्टीने आपण वर्धिष्णू असावे, वृद्ध म्हणजे वाढ खुंटलेला असू नये, अशी माझी दृष्टी आहे.

विशिष्ट ठसा :– मला असे वाटते की, माझी कार्यपद्धती, प्रत्यक्ष कार्य व माझे विद्यार्थी यांच्यावर निदान दोन गोष्टींचा तरी संस्कार झालेला दिसावा. पैसा, सत्ता, मानसन्मान किंवा मोठेपणा इ. गोष्टी मिळविण्याकरता येणाऱ्या मोहांना बळी न पडता शुद्ध चारित्र्य आणि निर्व्यसनता टिकवणे हा मी पाळलेला आणि इतरांना दिलेला प्रमुख संस्कार असावा. त्यामुळे माझ्या कामात, विचारात, भाषणात व लेखनात चारित्र्यसंवर्धन आणि सद्गुण-विकास या गोष्टींना प्राधान्य दिलेले दिसेल. अधिकारी व्यक्तीने सहकारी आणि कनिष्ठ व्यक्तींशी वागताना त्यांचे विचार व भावना लक्षात घेऊन पुढचा मार्ग आखावा ही लोकशाही वृत्ती मी कुटुंबात, वर्गात, संस्थेत, सभास्थानी व समाजात वागताना अनुसरली आहे.

लाभलेले सहकार्य :– वर वर्णन केलेल्या लोकशाही तत्त्वाच्या माझ्या वृत्तीमुळे मी ज्या ज्या ठिकाणी कामे केली, त्या सर्व ठिकाणी मला चांगले सहकार्य मिळाले. स्वार्थ व अहंकार बाजूला ठेवून प्रत्येकाला त्याच्या त्याच्या कामाचा मोठेपणा व श्रेय द्यावे हे माझे धोरण असल्यामुळे असूया आणि मत्सर यांना फारसा वाव रहात नसे. त्या दृष्टीने मी सुखी आहे. मला सतत उत्तम सहकार्य व सहकारी मिळत आलेले आहेत; संस्थेत आणि सार्वजनिक कार्यक्षेत्रात, सर्वत्र.

संतापाचे विषय :– संताप हा दुर्गुण मी पूर्ववयातच आटोक्यात आणला आहे. संतापामुळे मनुष्य स्वतः जळतो आणि इतरांना त्यामुळे इष्ट असा आनंद देतो. जगात चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही गोष्टी या राहाणारच. चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन द्यावे, आणि वाईट गोष्टीत सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा, असे माझे धोरण असते. सहिष्णु वृत्तीमुळे संतापाला आळा बसला.

अनुभवाची शिकवण :- आपण विद्यार्थ्यांना किंवा समाजाला आचार-विचाराचे दृष्टीने जे शिकवण्याचा प्रयत्न करतो ते कौतुकाने व आदराने ऐकून घेतले जाते; परंतु प्रत्यक्ष आचरणात दहाबारा टक्के इतकेच येते, हे मी शिकलो. जी गोष्ट समाजाच्या बाबतीत तीच सरकारच्याही बाबतीत. हा अनुभव गृहीत धरल्यामुळे मी अपेक्षाच थोडचा ठेवल्या आणि त्या सफल झाल्या. फाजील अपेक्षा ठेवल्या नाहीत, त्यामुळे निराशेचा प्रसंगही आला नाही. व्यक्तीला व समाजाला त्यांचे मानसशास्त्र आहे. ते लक्षात घेतले की, माणसाचा हिशोब फारसा चुकत नाही.

तरुण पिढीला सांगणे :– तरुण पिढीशी मी मित्रत्वाचे नात्याने वागतो. श्रेष्ठत्वाची भूमिका ठेवीत नाही, त्यामुळे माझ्या सांगण्याला संदेश, उपदेश असे महाशब्द मी वापरीत नाही. तरुण पिढीला तिचेही मन आहे, अनुभव आहेत, प्रश्न आहेत, अडचणी आहेत. त्या सर्व लक्षात घेऊन मित्रत्वाचे नात्याने व सहानुभूतीने जे काय सांगायचे ते मी सांगतो. नियमित व्यायाम करून आपले शरीर व आरोग्य शंभर वर्षे टिकेल असे ठेवा. सद्गुण संपादन करून आपले चारित्र्य निर्मळ ठेवा. हे तुमचे फार मोठे भांडवल आहे. अधिकाधिक विद्या संपादन करा. अज्ञानी राहून कोणाचीही प्रगती होणार नाही. शत्रूंनाही मित्र करण्याचे धोरण ठेवा, अधिकाधिक मित्र जोडा, माणसे तोडू नका. सतत काही तरी समाजोपयोगी काम करीत रहा. एवढे केले तर तुमचाही अमृतमहोत्सव आनंदाने साजरा होईल. तथास्तु।

रुद्रवाणी पाक्षिकामधून]

इतरांना काय वाटते ते शेवटच्या पाच पानात पहा. १२४ ते १२८

3936
२४७९६
२१।१।८६

स दा चा र-चिं त नी

भाग ४ था

१. योगी परुळेकर

मराठी वृत्तपत्रसंस्थेला एका नव्या युगात आणून सोडणारा संपादक अनंतात विलीन झाला. माझे विद्यार्थिदशेपासूनचे स्नेही डॉ. ना. भि. परुळेकर, जे महाराष्ट्रात आजचे नानासाहेब म्हणून प्रसिद्ध झाले, त्यांचे दि. ८।५।७३ रोजी देहावसान झाले. चाळीस वर्षांपूर्वी त्यांनीच स्थापन केलेल्या पुण्याच्या सकाळमध्ये त्यांच्या मृत्यूचे वृत्त वाचून वृत्तपत्रसृष्टीतील कार्यकर्त्यांना, विचारवंतांना आणि सामान्य जनतेला दुःखाचा धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. हमालापासून पुढाऱ्यांपर्यंत, आणि गृहिणीपासून संशोधकापर्यंत, सर्वांच्या जीवनात डॉ. नानासाहेब आणि सकाळ यांनी एक आदराचे स्थान मिळविले आहे. सर्व वयाच्या सुशिक्षित नागरिकांना त्यांचे जीवन एक आदर्श आहे.



कै. ना. भि. परुळेकर

'सकाळ' दैनिकाचा उपयोग करून डॉ. नानासाहेबांनी जीवनाच्या सर्व अंगांचा परामर्श घेण्याचे शिक्षण महाराष्ट्रीय वाचकांना दिले. दरवर्षी नवनवीन योजना, उपक्रम, आणि कल्पना 'सकाळ' मधून प्रसिद्ध होत गेल्या. 'सकाळ' वृत्तपत्र निघाले त्या वेळी वृत्तपत्राचे प्रधान स्वरूप राजकीय होते. डॉ. नानासाहेबांच्या 'सकाळ'ने कोणत्याही पक्षाचा गंडा बांधून न घेता राजकारणाचा

परामर्श घेतला. तो घेताना त्यांनी पक्षातीत दृष्टी ठेवली. सत्य आणि समाजहित या दोन ध्येयांशी प्रामाणिक राहून राजकारणाचा विचार त्यांनी वाचकांपुढे मांडला. तो मांडताना सत्ताधारी, शासन आणि बहुमत यांच्या विरोधाची पर्वा केली नाही. 'सकाळ'च्या सुरक्षिततेपेक्षा त्यांनी सत्याची आणि प्रामाणिक मताची सुरक्षितता व परंपरा कायम टिकवली.

राजकारणाव्यतिरिक्त, समाजाला उपयोगी अशा अनेक विभागांचा समावेश त्यांनी आपल्या वर्तमानपत्रात केला. शिक्षण, उद्योगधंदे, आरोग्य, कला, साहित्य अशा अनेक अंगांचा परामर्श घेण्याचे काम वृत्तपत्राचेच आहे हे डॉ. परुळेकरांनी शिकविले. अमेरिकेत ते वृत्तपत्र-व्यवसाय शिकून आले, पण त्यांनी भारतात आणलेल्या विद्येला संपूर्णपणे भारतीय स्वरूप दिले. पाश्चिमात्त्य देशांची निव्वळ नक्कल केली नाही.

मुधोळ संस्थानातील एका लहान खेड्यात राहणारा, शेतकऱ्याच्या कुटुंबातला नारायण नावाचा विद्यार्थी पासष्ट वर्षांपूर्वी आपला गाव सोडून विद्येच्या शोधार्थ एकटाच पुण्यास निघाला. खिशात पैसे नव्हते. पायी चालत गेलो म्हणजे आपण पुण्याला पोहोचू असा त्याचा विचार. पाय दमल्यावर रेल्वेचा आश्रय घेतला आणि पुण्याला पोहोचला. पुण्यात माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेऊन पदवीधर झाला. विद्यार्थिदशेत त्या वेळची देशाप्रेमाने प्रेरित झालेली वर्तमानपत्रे वाचून सामाजिक ध्येयवाद उराशी बाळगणारा हा तरुण, आपल्या भावी कार्याला परदेशातील शिक्षणाचा उपयोग होईल म्हणून १९२३ साली अमेरिकेत गेला. तेथे एम. ए., पीएच. डी. ही पदवी संपादन केली. जनतेच्या शिक्षणाच्या कामी वृत्तपत्रांचा उपयोग होईल म्हणून वृत्तपत्र-विद्येचा व व्यावसायाचा तेथे अभ्यास केला आणि प्रत्यक्ष अनुभव मिळविला. त्या सर्व विद्येचा आणि अनुभवाचा उपयोग त्यांनी आपल्या देशाला, समाजाला करून दिला.

डॉ. नानासाहेब परुळेकर ज्या काळात विद्यार्थी होते, तो कालखंड लोकमान्य टिळकांच्या, आणि त्यानंतर महात्मा गांधींच्या विचारसरणीने भारलेला होता. निष्काम देशसेवा आणि स्वार्थत्याग या दोन तत्त्वांचा मूर्तिमंत आदर्श लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी घालून दिलेला होता. या ध्येयवादाचा प्रभाव डॉ. नानासाहेबांच्या जीवनावर व विचारसरणीवर पडलेला होता. संपत्ती, सत्ता, अधिकार, कीर्ती, प्रसिद्धी यांचा त्यांनी कधी लोभ धरला नाही. लोकसेवा, समाजहित आणि ज्ञानाचा प्रसार या ध्येयांना त्यांनी सतत प्राधान्य दिले. ती ध्येये साध्य करण्याकरता अखेरच्या क्षणापर्यंत ते कार्य करीत राहिले.

एक वर्षापूर्वी डॉ. नानासाहेब एका गंभीर शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात राहिले होते. आम्ही त्यांना भेटावयास गेलो त्या वेळी एकही शब्द बोलण्याचे

सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हते. आम्ही व त्यांनी परस्परांना पाहिले, आणि आम्ही परत फिरलो. दोन आठवड्यांनी पुन्हा त्यांच्या भेटीसाठी दवाखान्यात गेलो, त्या वेळी ते खोलीत नव्हते ! चौकशी केली तेव्हा कळले की ते फिरावयास गेले आहेत ! दोन आठवड्यांत बाहेर फिरावयास जाण्याइतकी ताकद संपादन करू शकणारी प्रकृती आणि इच्छाशक्ती त्यांच्याजवळ होती. पण शेवटी शरीरालाही काही मर्यादा आहेत. डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्यास सांगितले, परंतु त्यांचा धडपड करणारा पिंड त्यांना आडवा आला. बरे वाटू लागल्यावर ते पूर्ववत उत्साहाने कामाला लागले. आजारी असताना त्यांच्या मनाला सतत टोचणी लागली होती. त्यांच्या मनाला खंत वाटत होती की देशात, जगात, एवढ्या मोठ्या उलाढाली चालल्या आहेत, आणि मी येथे बिछान्याला खिळून राहिलो आहे. येथून बाहेर पडून कामाला केव्हा लागेन असे त्यांना झाले होते. स्वतःच्या प्रकृतीची काळजी करण्यापेक्षा देशाच्या आणि समाजाच्या प्रकृतीची काळजी त्यांना जास्त लागली होती.

डॉ. नानासाहेबांनी केवळ सकाळ'चेच हित कधी पाहिले नाही. मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांनी 'सकाळ' ला राबविले. 'सकाळ' वरही अनेक आपत्ती आल्या; पण 'सकाळ' च्या आपत्तीपेक्षा नानासाहेबांचे लक्ष समाजाच्या आपत्तीकडे अधिक प्रमाणात होते. पानशेतचा पूर येऊन गेला होता. 'सकाळ' कचेरीचे तळघर पाण्याने भरलेले होते. सर्वत्र चिखल झाला होता. मशिनरी बंद पडली होती. अशा वेळी नानासाहेबांच्या मनात विचार काय चालले होते ? पुराने उध्वस्त आणि निराधार झालेल्या कुटुंबांना मदत करण्याकरिता संघटना कशी निर्माण करावी याचा विचार त्यांच्या डोक्यात घोळत होता. समाजाची प्रत्येक आपत्ती त्यांनी आपली आपत्ती मानली. भूकंप, पूर, दुष्काळ अशा प्रत्येक आपत्तीचे प्रसंगी डॉ. परुळेकरांनी आपल्या वृत्तपत्राचा, बुद्धीचा आणि लोकप्रियतेचा उपयोग निःस्वार्थीपणाने केलेला आहे.

डॉ. परुळेकरांनी आपल्या वाचकांना प्रत्येक प्रश्नाकडे पाहण्याची नवीन दृष्टी दिली. पाश्चिमात्त्य देशांतील विज्ञान आणि पुरोगामी विचारसरणी यांचे त्यांना महत्त्व वाटत होते. परंतु त्याचबरोबर भारतीय संस्कृतीची चिरंतन मूल्ये आणि त्यांचे संगोपन करणाऱ्या संस्था यांविषयीही त्याना जिव्हाळा वाटत होता. आधुनिक विज्ञान, यंत्रशास्त्र, विचार यांचा अभ्यास करण्याकरिता अनेक देशांत तरुण जावेत म्हणून त्यांनी अमेरिका, इंग्लंड, जर्मनी इत्यादी देशांतील संस्थांकडून शिष्यवृत्त्या मिळविल्या, आणि निवडक विद्यार्थ्यांना तिकडे पाठविले. ही परंपरा कायम राखण्याकरिता त्यांनी 'इंडिया फाऊंडेशन' सारखी संस्था स्थापन केली संस्कृत विद्या, वेदशास्त्रे, कीर्तने, पुराणे या परंपरागत संस्थांचेही मूल्य कसे टिक-

विता येईल याचा त्यांनी विचार केला. केवळ भारतीय अथवा केवळ पाश्चिमात्य अशी एकांगी दृष्टी त्यांनी ठेवली नाही. दोन्ही विचारसरणींची सांगड घातली. स्वत:च्या जीवनात आणि समाजाला दिलेल्या शिक्षणात डॉ. परुळेकरांनी तरुण पिढीला दिलेला हा अमोल वारसा आहे. त्यांच्या विचारांची व कार्याची परंपरा तरुण पिढी जिवंत ठेवील आणि त्या स्वरूपात डॉ. नानासाहेब चिरंजीव रहातील.

[८-५-७३

२. जगी सर्वदु:खी असा कोण आहे ?

दु:खाचे प्रसंग सर्वांवर मधून मधून येतच असतात. असा एखादा प्रसंग आला म्हणजे त्या व्यक्तीला वाटते, माझ्याच वाट्याला हे दु:ख का यावे ? मीच असे काय पाप केले आहे ? माझे एक स्नेही एकदा एका गंभीर शस्त्रक्रियेनंतर दवाखान्यात काही दिवस होते. त्यांना मी भेटायला गेल्यावर त्यांनी मला अगदी आव्हानपूर्वक विचारले, 'तुम्ही एवढी गीता सांगता! मी कधी कोणाचे वाईट केले नसताना मला हे दु:ख का आले ते सांगा.' दु:खी माणसाचे सांत्वन करणे कठीण असते. ते विचारपूर्वक ज्याचे त्यानेच करून घ्यायचे असते. आपल्या जीवनाकडे आणि जगाकडे उघड्या डोळ्यांनी पाहायची सवय ठेवली आणि थोडे अंतर्मुख झाले की सुख-दु:खाचे तत्त्वज्ञान ज्याचे त्याला बसवता येते. ते बसवणे आवश्यकच आहे.

दु:खाची जाणीव केव्हा होते ? सुखाचा प्रवाह काही वेळ बंद झाला म्हणजे ती होते. म्हणजे प्रत्येकाने दु:खापूर्वी सुख भोगलेले असते, त्याचा आपण विचार करीत नाही. मी सुखी का ? मलाच इतके सुख का ? असा प्रश्न कधी माणूस स्वत:ला विचारीत नाही आणि जगाच्या दु:खाकडे पहात नाही. म्हणून त्याला कधीकधी आलेले दु:ख फार मोठे वाटते. सुख गृहीत धरले जाते. सुखावर आपला हक्क आहे व ती नैसर्गिक स्थिती आहे असे वाटते. हीच आपली चूक होते.

भारतीय तत्त्वज्ञान असे शिकवते की जगात सुखदु:खे दोन्ही आहेत. ती घेऊनच माणूस जन्माला येतो. ती येतात आणि जातात. दोन्हीही भोगण्याची तयारी ठेवावी. विचारी माणसाचे लक्षण हे की तो दु:खाची वास्तवता जाणतो. 'वास्तवता दु:खांची, मृत्यू-वार्धक्य-रोग विसरू नये.' जन्म-मृत्यु-जरा-व्याधि-दु:ख-दोषानुदर्शनम्' हे गीतेने ज्ञानाचे एक लक्षण म्हणून सांगितले आहे. (अ. १३)

इतरांच्या दु:खाशी आपण आपल्या दु:खाची तुलना करावी म्हणजे दु:खातही काही समाधान मिळते. चांगला डॉक्टर मिळणे, औषधपाण्याची सोय होणे, शुश्रूषेस मनुष्यबळ असणे, सहानुभूतीचे मित्र असणे या सर्व अनुकूल गोष्टी सर्वच आजारी

माणसांना मिळत नाहीत. त्यांच्यापैकी एखादी जरी आपल्याला उपलब्ध असली तरी ती एक समाधानाची बाब मानली पाहिजे. हे जसे आजाराच्या दुःखाचे झाले तसेच इतर दुःखांचेही आहे.

जगात दुःखांचे प्रकारही अनंत आहेत, इकडे आपले कधी लक्ष जात नाही. प्रत्येक जण आपापल्याच सुखदुःखात मशगुल असतो. इतरांच्या अनेक दुःखांकडे पाहिले म्हणजे तुलनेने आपल्या सुखाची कल्पना येते.

जन्मतःच शारीरिक व्यंग घेऊन आलेली, अपघातात सापडलेली, पूर-भूकंप-युद्ध यांमुळे संसाराला मुकलेली, प्रिय व्यक्तीचा विरह भोगणारी, निःपुत्रिक असणारी, बहुपुत्रिक असणारी, उपासमार होणारी, अन्न असून अग्निमांद्यामुळे अर्धपोटी राहणारी, कृतघ्न पुत्र असणारी, अशी अगणित दुःखे भोगणारी माणसे जगात आहेत. पण त्या त्या दुःखातही काही तरी सुख आहे म्हणून त्यांना जगावेसे वाटते व ती जगतात. असा व्यापक विचार केला म्हणजे लक्षात येईल की आपण सर्वस्वी दुःखी नाही. जगात सर्वस्वी दुःखी असा कोणी नाही. दुःखांची मोजदाद करता तशी आपल्या सुखांचीही करा म्हणजे कळेल की—

जगी सर्वदुःखी असा मीही नाही.

[१९–६–७२

३. राँग नंबर, राँग पर्सन

बेजबाबदार माणसावर जबाबदारीचे काम सोपवू नका. पश्चाताप होईल. ज्या कामावर अनेक माणसांचे, देशाचे, कारखान्याचे, संस्थेचे, संघटनेचे, पक्षाचे भवितव्य अवलंबून असते अशा कामावर फक्त जबाबदार व्यक्तीचीच निवड करा. त्याभुळे त्या व्यक्तीची कर्तबगारी दिसेल आणि योग्य कामाला योग्य माणूस निवडल्याचा तुम्हांला आनंद होईल. नियोजक आणि नियोज्य दोघांचेही कल्याण होईल.

एखादे महत्त्वाचे काम यशस्वी होण्याकरता अनेकांचे हात लागत असतात. या माणसांच्या बुद्धीचा, कामाचा व कर्तव्यनिष्ठेचा उपयोग झाला तरच कार्य यशस्वी होते. सामुदायिक कामात प्रत्येक व्यक्ती एखाद्या यंत्रभागाप्रमाणे असते. तो यंत्रभाग लहान का असेना, बिघडला की यंत्र थांबते. काम बंद पडते. म्हणून माणसे निवडताना जबाबदारीची जाणीव व कर्तव्यनिष्ठा या गुणांना अग्रक्रम आहे. थोडा कमी बुद्धीचा व शिक्षणाचा माणूसही कर्तव्यनिष्ठेने वरच्या पद्दावर जाऊन बसू शकतो असा अनुभव अनेक कारखान्यांत व संघटनांत येतो.

रेल्वेची कामे पहा. स्टेशनमास्तर, गार्ड, ड्रायव्हर, सिग्नलरपासून तो गेटपाशी ठेवलेल्या रखवालदारापर्यंत सर्वांची कामे कर्तव्यनिष्ठेने झाली तरच गाडीचा प्रवास

वेळेवर व सुखरूप होतो. यातील एकाही व्यक्तीने बेजबाबदारीने काम केले की गाडीला अपघात होऊन अनेकांचा मृत्यू होतो. अनेक कुटुंबांवर वैधव्य, पोरकेपणा, दारिद्र्य यांची आपत्ती येते. अपयशाला, अपघाताला, युद्धातील पराभवाला, संघटना बुडायला, संस्था मोडाय्ला, कारखाना बंद पडायला एकच बेजबाबदार माणूस पुरा असतो. यश मिळवायला मात्र अनेक जबाबदार कर्तव्यदक्ष व्यक्ती लागतात.

माणसे बेजबाबदारीने का वागतात ? त्याला अनेक कारणे असू शकतात. काहींची बुद्धी आणि कुवतच कमी असते. त्यांच्या दोषापेक्षा त्यांना कामाला जुंपणाराचा, नियोजकाचा हा दोष असतो. कामाचे महत्त्व न समजणे व समजाऊन न सांगणे हे एक कारण असू शकते. काम देताना त्याचे महत्त्व व दूरगामी परिणामही सांगितले पाहिजेत. काम करणाराचा आळस, विस्मरण, चालढकल वृत्ती ही नेहमीची कारणे आहेत. व्यसनाधीनता आणि सुखाची लालूच हेही एक फार मोठे कारण आहे. सामुदायिक हितापेक्षा वैयक्तिक सुखाला, हिताला, सोयीगैरसोयींना अधिक महत्त्व देणाऱ्या व्यक्ती बेजबाबदार असतातच पण अप्रामाणिकही असतात. स्वार्थाकरता सामुदायिक हितावर तिलांजली द्यायला त्या कमी करणार नाहीत.

जबाबदारीची जाणीव, कर्तव्यनिष्ठा हा गुण वैयक्तिक आणि सामाजिक प्रगतीला फार आवश्यक आहे. स्वतःच्या ठिकाणी आणि इतरांच्या ठिकाणीही त्याचे संगोपन करा. काम सोपवताना, नियुक्ती करताना योग्य माणूस निवडा. नाहीतर टेलीफोनवर जसा रॉंग नंबर निघाल्यावर निराशा होते तशीच रॉंग पर्सनच्या नेमणुकीने तुमची निराशा व फसगत होईल. शाकुंतल नाटकात कालिदासाने याविषयी एक श्लोक घातला आहे तो सुंदर आहे.

सिद्धयन्ति कर्मसु महत्स्वपि यन्नियोज्याः
संभावनागुणमवेहि तमीश्वराणाम् ।
किं वा भविष्यदरुणस्तमसां विभेत्ता
तं चेत् सहस्रकिरणो धुरि ना करिष्यत् ।।

यांत नियोजक आणि नियोज्य अशा दोघांच्याही बुद्धीला महत्त्व दिले आहे.

[११-१२-७२

४. आपल्या मुला-मुलींचे विवाह

आपला समाज एका अभूतपूर्व संक्रमणावस्थेमधून जात आहे. दोन विरोधी विचारांच्या संस्कृतींचा परिणाम पालकांवर आणि त्यांच्या मुलांमुलींवर होत आहे त्यात बहुसंख्य पालक परंपरागत संस्कृतीबद्दल कदर बाळगणारे आहेत, तर आजच्या नवीन पिढीचे विचार त्यांच्या दृष्टीने पुरोगामी, सुधारणावादी, स्वातंत्र्यप्रधान असे

आहेत. या संघर्षाच्या यातना भोगणारे पालक आहेत तसेच तरुण-तरुणीही आहेत. आज यांचे प्रमाण अल्प असले तरी ते वाढते आहे.

मुला-मुलींनी स्वतः निवडलेले जोडीदार काही पालकांना पसंत नसतात.शिक्षण, रूप, आर्थिक स्थिती, सामाजिक दर्जा, भिन्न जात, भिन्न धर्म, स्वभाव इत्यादी कारणांवरून पालकांत व तरुणांत मतभेद होतात. त्याच्या मानसिक यातना दोघांनाही भोगाव्या लागतात. कालांतराने काही पालक प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेतात व आपल्या समाधानाला मुरड घालतात. परंतु काही पालक जहाल असहकारितेचे धोरण स्वीकारून नव्या पिढीशी कायमचे संबंध तोडून टाकतात.

पालकांच्या संमतीने अथवा त्यांना नाखूष करून झालेल्या विवाहांतही अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. विवाहानंतर थोड्याच अवधीत या नव्या दांपत्यात वितुष्ट येऊन त्यांचे संसार प्रारंभावस्थेतच उधळलेले दिसतात. त्याला अनेक कारणे आहे. आर्थिक अपेक्षा पुरी न होणे, उभयतांचे अथवा एकाचे पूर्व प्रेमसंबंध असणे, किंवा ते चालू रहाणे, स्वभावभिन्नता, तडजोडवृत्तीचा अभाव, अशा अनेक कारणांनी नवे विवाह अयशस्वी झालेले दिसतात. म्हणजे अविवाहित, विवाहित आणि छिन्नविवाहित असे तीन प्रकार आपल्याभोवती दिसू लागले आहेत.

विवाहाविषयी आईबापांच्या कल्पना अनुभवावर आधारलेल्या असतात. मुलामुलींच्या सांस्कृतिक व नैतिक पार्श्वभूमीकडे त्यांचे अधिक लक्ष असते किंवा असावे. एकदा झालेला विवाह हा मोडण्याकरता नसून आजन्म संसार करण्याकरता आहे ही त्यांची भावना असते. ही दोन्ही धोरणे योग्य असल्याचे अनुभवाने सिद्ध झालेले आहे. या कल्पनांवर आधारलेले बहुसंख्य विवाह यशस्वी झाले आहेत

उलट मुलामुलीचे विचार हे पुष्कळसे कल्पनासृष्टीतले असतात. लघुकथा इ. वाङमय, चित्रपट, नाटके, पाश्चिमात्त्य वाङमयातील व चित्रपटातील नवमत-नवपद्धतीवाद यांच्या आधाराने त्यांनी आपल्या भावी भागीदाराचे व वैवाहिक आयुष्याचे काल्पनिक चित्र मनात उभे केलेले असते. सामाजिक सुधारणेच्या वातावरणातील काही योग्य, काही अयोग्य अशा विचारांचाही परिणाम तरुणांवर झालेला असतो. अशा प्रकारे पालक आणि तरुण पिढी यांची विचारविश्वे भिन्न भिन्न झालेली आहेत असे दिसते. हे दोन पिढ्यांतील अंतर कापून सर्वांचेच जीवन सुखी समाधानी कसे करता येईल हा मोठा प्रश्न अनेक कुटुंबांत निर्माण झाला, होत आहे, आणि होईल. याला कोणीही अपवाद नाही. यावर उपाय कार्य ?

अलीकडे नवीन निर्माण झालेल्या परिभाषेत 'डायलॉग' हा इंग्रजी अन्वर्थक शब्द फार रूढ झाला आहे. डायलॉग म्हणजे परस्परांशी मोकळेपणे केलेला विचारविनिमय; एका शब्दात 'संवाद' म्हणता येईल. आज नव्या जुन्या पिढीत हा संवाद नष्ट झाला

आहे. तो पूर्वीही फारसा नव्हता. कालमानाप्रमाणे तो निर्माण व्हायला पाहिजे तो आपण निर्माण केला नाही. आई-बाप, मुले-मुली यांची विचारविश्वे अगदी निरनिराळी आहेत. त्यांच्यात देवघेव करण्याची प्रथा आपल्या कुटुंबात पडलेली नाही. ही प्रथा निर्माण करण्याची आज फार मोठी गरज आहे. आईवापांचे अनुभव व विचार मुलांनी ऐकावेत, मुलांचेही विचार आईबापांनी शांतपणे न चिडता ऐकावेत. या संवादातून एकमेकांचे विचार, अनुभव व अपेक्षा एकमेकांना समजतील. त्यांचा जो परिणाम होईल तो होऊ देण्यापलीकडे उभयतांच्या हातात काही नाही. आपले विचार एकमेकांना परिचित आहेत हे जाणून प्राप्त परिस्थितीत समाधान मानून घेतले पाहिजे.

अशा संवादामुळे पालकांत व मुलांत कधी मतैक्य होईल, कधी मतभेद होतील. मतैक्य झाल्यास उत्तमच. मतभेद झाल्यास तरुणांना त्यांच्या त्यांच्या निर्णयांचे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. शेवटी जोडीदाराशी जन्म त्यांना काढायचा आहे. त्या निवडीचो बरीवाईट फळे त्यांनाच भोगायची आहेत ही स्पष्ट जाणीव असावी. तुमचे तुमच्या आपत्त्यावर प्रेम आहे ना ? मग त्या प्रेमाखातर कधी कधी आपल्या विचारांना व मतांना मुरड घालायचा त्याग करायला हवा. तरुण-तरुणींनीही आईबापांना दुःख न देता कसा मार्ग काढावा ते पहावे. विवाह झाल्यावर, ते प्रेमविवाह असले तरी, स्वभावभिन्नता नडतेच. तडजोड आणि परस्परांच्या स्वभावाशी जुळवून घेणे हे कोणालाच सुटत नाही. तसे केल्यास आपल्या निवडीने केलेला विवाह यशस्वी झाला असे इतरांना दाखवता येईल.

| २०-१२-७२

५. तडजोडीशिवाय संसार नाही

वैवाहिक जीवनाच्या यशापयशाचे बाबतीत गेल्या साठसत्तर वर्षांच्या काळात फारच संक्रमण झाले आहे. १९५० वर्षापूर्वीचा कालखंड निराळा, त्यानंतरचा निराळा. जगातील आर्थिक, सामाजिक, वैज्ञानिक आणि वैचारिक संक्रमणाचा परिणाम भारतावर व आपल्या समाजावर झालेला आहे.

पंचवीस वर्षांपूर्वीच्या कालखंडात वैवाहिक जीवनातील प्रश्न फारसे गुंतागुंतीचे नव्हते. विवाहित व्यक्तींनी जन्मभर एकत्र राहायचे आहे, त्याकरता एकमेकांशी जमवून घेतले पाहिजे, वेळप्रसंगी कमीपणा घेऊनही संसार करावा अशी वृत्ती होती. पुरुषांपेक्षा स्त्रियांचे शिक्षण कमी आणि अर्थार्जन करणारा पुरुषही त्या काळात वस्तु-

स्थिती होती. पती-पत्नींच्या परस्परांपासूनच्या अपेक्षाही मानवी सामर्थ्याच्या आटोक्याबाहेरच्या नव्हत्या.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात परिस्थिती बदलली आहे. स्त्रियांचे शिक्षणात वाढ झाली आहे. त्यांच्यापैकी अनेकींना नोकऱ्या मिळून आर्थिक क्षमता वाढली. वाङ्मय, चित्रपट, मंडळे, वादविवादचर्चा इत्यादी मार्गांनी वैवाहिक जीवनातील भागीदाराकडूनच्या अपेक्षाही वाढल्या. सौंदर्य, शिक्षण, चुणचुणीतपण, स्वभाव, व्यवसायात सहकार्य अशा अनेक गोष्टींत परस्परांकडून अपेक्षिलेल्या गुणांत खूप वाढ झाली. वातावरणातील संस्कारांनी निर्माण केलेल्या आपल्या कल्पनाराज्यातील पती (हीरो) किंवा पत्नी (हीरॉईन) आपल्याला असावी व ती भूमिका जोडीदाराने पार पाडावी असे उभयतांना वाटू लागले. हे सर्व मानसशास्त्राला व वस्तुस्थितीला सोडून आहे. त्यामुळे वैवाहिक जीवनातील असंतोषाचे व अपयशाचे प्रमाण वाढत आहे. मार्गदर्शन करणाऱ्या वडील माणसांचा अभाव असलेले राजाराणींचे अननुभवी जीवन हेही एक महत्त्वाचे कारण आहे.

कोणत्याही दोन व्यक्तींचे स्वभाव परस्परांशी पुरेपूर जुळतील असे क्वचित असतात. प्रत्येकाने आपापल्या स्वभावाला मुरड घातल्याशिवाय भागीदाराशी जमत नाही. सहकार्य म्हणजे तडजोड, संसार म्हणजे तडजोड. तडजोड म्हणजे तोड आणि जोड. आपल्या स्वभावातील काही पैलू घासले पाहिजेत, काही नवीन जोडले पाहिजेत. दोन्ही भागीदारांनी थोडीशी स्वभावातील तडजोड केली तर संसार यशस्वी होऊ शकतात. माणसे आपल्या स्वभावात बदल करायला तयार नसतात ही खरी गोम आहे. वयाच्या वीसपंचविशीपर्यंत जो स्वभाव, आनुवंशिकता, शिक्षण आणि परिस्थिती यांमुळे बनला असेल तो आपला कायमचा असेच बहुतेक लोक धरून चालतात. नव्हे, त्याचा ते अभिमान बाळगतात. हे बनलेले स्वभाव, स्वभावात लवचिकपणाचा अभाव आणि आपण स्वतः किती गुण-दोषसंपन्न आहोत हे न पहाता आपल्या जोडीदाराने मात्र सर्वगुणसंपन्न असावे अशी अव्यावहारिक अपेक्षा, या गोष्टी नवविवाहितांच्या असमाधानाला कारणीभूत होतात.

सुदैवाने असे असमाधानी विवाह फार थोडे आहेत, पण त्यांची संख्या वाढत चालली आहे. लग्नानंतर पहिल्या पाच वर्षातच बेबनाव झालेल्या संसाराची उदाहरणे प्रत्येकाच्या नातेवाईकात आणि परिचितमंडळीत थोडीतरी असतातच. हे प्रमाण वाढत राहाणार आहे. कारण अपेक्षा, स्वप्ने आणि काल्पनिक जोडीदार यांना चेतना देणारे वातावरण भोवताली आहे. यावर उपाय काय ? उपाय ज्याच्या त्याच्या हातात आहे. आपले स्वभाव बदलले पाहिजेत. आपल्या जोडीदाराच्या सुखाकरिता आपल्या काही अपेक्षांचा, सवयींचा त्याग करायची मनाला सवय लावली पाहिजे. हे एकानेच करून उपयोगी नाही. उभयतांनी परस्परांकरता करायला पाहिजे. हेच खऱ्या

प्रेमाचे, निःस्वार्थी भावनांचे लक्षण आहे. जमणाऱ्या व न जमणाऱ्या स्वभावांचे कोष्टकच करायचे झाले तर ते असे करता येईल.—

स्त्री	पुरुष	परिणाम
१. आग्रही +	आग्रही =	कलह, काडीमोड
२. आग्रही +	सौम्य. =	एकतर्फी तडजोड, असमाधानी संसार
३. सौम्य +	आग्रही =	,, ,, ,, ,,
४. सौम्य +	सौम्य =	समन्वय, तडजोड, सुखी संसार

जुन्या नव्या सर्वच दांपत्यांच्या जोडपा वरीलपैकी एका साच्यात बसणाऱ्या असतील.

सुखी संसारात उभयतांना मनःशांती मिळते. मुलामुलींवर चांगले संस्कार होतात. समाजाला चांगले नागरिक मिळतात.

६. क्रीडांगणावर गीता

क्रिकेट, टेनिस, हॉकी, फुटबॉल, कबड्डी, खो-खो अशा कोणत्याही खेळाचे सामने असले तरी कळत न कळत तेथे गीतेतील तत्त्वज्ञानाचा प्रत्यय येतो. कारण गीता ही रणांगणावरच सांगितली आहे. ती क्रीडांच्या, युद्धाच्या, संसाराच्या, राजकारणाच्या समाजकार्याच्या सर्वच क्षेत्रात उपयोगी पडते इतकी व्यापक आहे.

लाभालाभ, जयाजय, सुख-दुःखादिक समान बघशील । होशील सज्ज समरा, तरि दोषातूनि मुक्त होशील ॥ (२.३८) हा समत्ववृत्तीचा गीतेचा संदेश जीवनात हरघडी उपयोगी पडतो.

१९७३ च्या फेब्रुवारीतील प्रसंग. इंग्लंडच्या एम्. सी. सी. विरुद्ध भारताच्या संघाचा क्रिकेटचा सामना चालू होता. अनेक वर्षांनी प्रथमच विजय भारताच्या जवळ आला होता. त्या वेळी वातावरण अगदी उत्सुकतेने आणि उत्साहाने भारून गेले होते. पाच-सहा धावा काढल्या की भारताचा विजय जाहीर होऊन हलकल्लोळ माजणार होता. अशा वेळी भारताच्या संघाचा मार्गदर्शक हेमू अधिकारी प्रत्येक खेळाडूजवळ गेला आणि म्हणाला '('डोंट शो ऑफ. बी मॉडेस्ट'.) चढेलपणा न दाखवता विनयाने विजयाचे प्रदर्शन करा.' आणि संघनायक वाडेकर शांत झोपला होता ! (फास्ट अस्लीप) गीतेत सांगितलेला जीवनाचा योग हाच होय. शांत रहा. 'इष्ट अनिष्ट घडो तरि चित्ताची शांति नित्य कामा ये''॥ अ. १३

आता याच्या उलट दुसरा प्रसंग. १९७५ एप्रिल दि. २७ रोजी भारत–पाकिस्तान यांच्यातला अंतिम हॉकीचा सामना होता. क्वालालांपूर येथे तीनचार वर्षांनंतर

भारताने विजयाचा कप हस्तगत केला होता. तो स्वीकार करण्याच्या प्रसंगी संघप्रमुख विजय फिलिप्स हा हर्षातिरेकाने इतका बेभान झाला होता की कप हातात घेतल्याबरोबर मूर्च्छा होऊन तेथेच खालो पडला. 'उस विजयको प्रसन्नताको बदश्ति न कर पाये और बेहोश हो गये.' असा वृत्तांत छापून प्रसिद्ध झाला होता. सुख-दुःखांच्या दोन्हीही प्रसंगी चित्ताची शांती टिकवतो तो खरा योगी. तो क्रिकेट –हॉकी खेळणारा असेल किंवा इतर क्षेत्रातील कामे करणारा असेल, त्याला योगी ही संज्ञा आहे. योगी म्हणजे जोगी नव्हे. तुमच्या माझ्यासारखाही माणूस योगी होऊ शकतो.

आता टेनिसच्या खेळातील एक प्रसंग पहा. जानेवारी १९७४ मधील घटना आहे ही. प्रेमजित लाल आणि शशी मेनन यांच्यात टेनिसचा सामना चालला होता. लाल हा शशीपेक्षा किती तरी श्रेष्ठ खेळाडू. पण एका पॉइंटवर पंचांनी दिलेल्या निकालावर तो इतका चिडला व रागावला की क्रोधातिरेकाने त्याच्या मनाचो एकाग्रता ढळली आणि शेवटी उत्कृष्ट खेळाडू असून त्याचा पराभव झाला. 'काम-क्रोध-भयादी ओसरता भाव बुद्धि स्थिर राही ।।' जीवनात मन शांत,स्थिर, समतोल, काम-क्रोध-भयापासून मुक्त असेल तर कोणत्याही कामात निर्विकार 'मनाने निर्णय घेता येतात.

क्रीडांगणावरचे हे गीतेचे तत्त्वज्ञान आपल्या शाळा-कॉलेजातील तरुण पिढीला शिकवायला हवे. क्रीडांगणावर तरुणांचे स्वभाव बनत असतात. इंग्लंडमधील उत्कृष्ट शिक्षणसंस्था क्रीडांगणावरील शिक्षण आणि शिस्त यांना फार महत्त्व देतात. सामना आपल्याविरुद्ध गेल्याबरोबर मारामारी आणि दंगल करणे हे प्रकार आपल्याकडे नित्याचे आहेत. समाजाला शिक्षण देण्याचे हेच प्रसंग असतात. यश वा अपयश, सुख वा दुःख, मित्र वा शत्रू, ही जीवनातील द्वन्द्वे समतोल मनाने स्वीकारा.

इंग्लंडमधल्या भारत विरुद्ध एम. सी. सी. च्या कसोटी सामन्यात एकदा विश्वनाथने अत्यंत कौशल्यपूर्ण आणि प्रेक्षणीय खेळ करून ११३ धावा काढल्या (१९७३). त्याचे शतक पूर्ण झाल्याबरोबर विरोधी पक्षातील टोनी ग्रे या खेळाडूने मोठ्या कौतुकाने आणि आनंदाने त्याला मिठी मारून वर उचलले! विश्वनाथ लहान बांध्याचा, टोनी ग्रे उंचापुरा अशा देहाचा. शत्रू आणि मित्र समान माना असे गीता सांगते हा उपदेश या खेळाडूने आत्मसात केला होता, न कळत, न वाचता.

मानवी जीवन हे धर्मक्षेत्र आहे, कुरुक्षेत्र आहे, क्रीडाक्षेत्रही आहे.

[७–२–७३



७. असमाधान व फसवे समाधान

शान्ती, समाधान आणि आनंद ही जीवनाची फलश्रुती असावी. जीवनातील आपले सर्व व्यवहार मोजण्याला काहीतरी मोजमाप, फूटपट्टी किंवा तराजू हवा. तो नसला तर हेतूरहित जीवन होते आणि माणूस व्यर्थ राबत राहातो. हे मी कशाकरता करतो याचा मनात वारंवार विचार करावा. यातून मी सुखी होईन का? सुख कशावर अवलंबून आहे? असा मागे मागे विचार करीत आपण गेलो तर शेवटी आपल्या स्वतःच्या मनापाशी येऊन थांबतो. संपत्ती, कीर्ती, सत्ता, सुखभोग, आरोग्य, यश, सर्व मिळवले तरी त्यामुळे मनाला जर समाधान आणि शांतता लाभत नसेल तर काय उपयोग? आपण संपत्ती मिळवली नसून संपत्तीने आपल्याला विकत घेऊन गुलाम केले असे होईल. तसेच इतर गोष्टींबाबतही होईल.

आपण समाजात वावरत असतो. इतरांकडे पाहून आपण आपल्याला मोजीत असतो. आपले स्वतःचे असे मापन फार थोडचांना असते. आपल्यापेक्षा वरच्या पातळीच्या लोकांकडे पाहून आपण तेथपर्यंत पोचलो नाही म्हणून मनात खंत करणारे, असमाधानी राहाणारे, अनुकूल परिस्थितीतही दुःखी राहाणारे, अनेक जीव असतात. नेहमी शेजाऱ्याशी तुलना, इतराशी तुलना त्यांना काय आहे आणि आपल्याला ते नाही ही चुटपूट मनाला पोखरीत असते. त्यामुळे भोवताली सहज उपलब्ध असलेल्या सुखांचाही उपभोग अशी माणसे घेऊ शकत नाहीत. सुख असून दुःखी, साधने असून असमाधानी आणि केवळ असाध्य पातळी साध्य झाली नाही म्हणून झुरणारे हे प्राणी कधीच सुखी होत नाहीत. इतरांना बाह्यतः ते सुखात दिसत असले तरी यांचे मने असमाधानी, अशान्त, दुःखी असतात.

याच्या उलट दुसरा एक वर्ग असतो. हे लोक आपल्यापेक्षा कमी पातळीच्या लोकांकडे पाहातात आणि यांच्यापेक्षा आपण फारच चांगल्या स्थितीत आहोत म्हणून समाधान मानतात. पण हे समाधान त्यांच्या कर्तबगारीला, प्रगतीला, यशाला मारक असते. ते आपल्या बुद्धीचा आणि कर्तबगारीचा पुरेपूर उपयोग करू शकत नाहीत. जन्मभर एका खालच्या पातळीवर राहातात. बौद्धिक, सामाजिक, आर्थिक, सर्वच बाबतीत ही माणसे अगदी सामान्य पातळीवर राहतात.

अगदी दुर्गम्य अशा वरच्या पातळीकडे पाहून सतत असमाधानी राहाणे वाईट; तसेच अगदी खालच्या पातळीकडे पाहून खोटे समाधान मानणे व प्रगती न करणे हेही वाईटच आहे. वर आणि खाली दोहीकडे माणसाने अवश्य पहावे. पण आपली अधिकाधिक कमाल पातळी काय आहे आणि ती आपण गाठतो का नाही याचा विचार करावा. बुद्धी, कर्तबगारी, साधने, परिस्थिती इ. बाबतीत माणसे निर-

निराळ्या पातळ्यांवर जन्माला येतात. यामुळेच समाजात विविध दर्जाची माणसे दिसतात. सर्वच सारखे बुद्धिमान किंवा कर्तबगार नसतात. अत्यंत बुद्धिमंद आणि कर्तृत्वहीन माणसापासून अलौकिक बुद्धी आणि कर्तबगारी असलेल्या व्यक्ती समाजात असतात; आणि या दोन टोकांमध्ये प्रत्येकजण कुठे तरी असतो. ही आपली जागा, पातळी, किंवा श्रेणी माणसाने शोधून काढावी आणि तिच्यापर्यंत पोचण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. यामुळे प्रयत्नशीलता राहील, सतत प्रगती करायला काही ध्येय राहील आणि निराशेचा प्रसंग यणार नाही.

आपली कमाल पातळी गाठण्याकरता सतत प्रयत्नही हवा. तिच्याकडे आपली वाटचाल होत आहे का नाही याचे सिंहावलोकन करण्याकरता आपल्या प्रगतीचा मागला आलेख डोळ्यापुढे पाहिजे. आपली प्रसुप्त बुद्धी आणि कर्तबगारी जागृत करता येते, काही पातळीपर्यंत वाढवताही येते. त्याकरता आपल्या स्वतःच्या पूर्वपातळीशी आपली तुलना करावी. पंचेचाळीस टक्के गुण मिळवणारा प्रयत्नाने पंचावन्न टक्के गुण मिळवू शकेल, आणि पासष्ट टक्के मिळवणारा पंचाहत्तर–ऐंशी टक्के मिळवू शकेल. हे जसे बौद्धिक प्रगतीत तसेच इतर क्षेत्रातही आहे. आपले कामाचे तास, व्यवस्थितपणा, जबाबदारीची जाणीव, लोकसंग्रह, इत्यादींच्या प्रत्येक क्षेत्रात कालच्यापेक्षा आज पुढे जाता येईल, आजच्यापेक्षा उद्या वर जाता येईल. उत्क्रांतीची प्रक्रिया प्रत्येकाने आपापल्या पातळीवरून चालू ठेवली पाहिजे. सांगल्या गोष्टींचे अनुकरण करण्याकरता इतरांकडे अवश्य पहावे पण असमाधानी राहू नये. आपण आपल्या कुवतीप्रमाणे अधिकाधिक प्रयत्न करीत रहावे आणि त्यातून जी फलप्राप्ती होईल ती शांत, समाधानी, आनंदी वृत्तीने स्वीकारावी. यामुळेच खरे सुख प्राप्त होईल.

[२७–३–७३

८. ययाती, नचिकेत, याज्ञवल्क्य

मानवी जीवनात ज्या महत्त्वाच्या समस्या निर्माण होतात त्यांचा विचार करून प्राचीन विचारवंतांनी आपापल्या परीने विविध उत्तरे दिली आहेत. सर्वसामान्य लोकांना ती सहज कळावीत म्हणून ती कथांच्या स्वरूपात ग्रंथित केलेली आहेत. या कथा कदाचित खऱ्या असतील, कदाचित काल्पनिकही असतील. त्यांत सुचवलेली तत्त्वे महत्त्वाची आहेत. ती सत्य आहेत.

मानवाचे ऐहिक जीवन महत्त्वाचे का पारलौकिक जीवन महत्त्वाचे हा प्रश्न अनेक शतके विचारी मानवापुढे आहे. बाह्य जीवन आणि आंतरिक जीवन असे दोन प्रकारचे मानवी जीवन आहे. व्यक्ती, समाज, देश किंवा संस्कृती यांमध्ये

जी विविधता दिसते ती, या प्रश्नाला कोणते उत्तर देते त्यावर अवलंबून आहे. कोणी ऐहिक जीवनालाच अंतिम ध्येय मानतात, कोणी पारमार्थिक जीवन हाच जीवनाचा एकमेव हेतू मानतात, कोणी या दोहोंचा समन्वय करतात. ईश उपनिषदात लेखकाने हाच प्रश्न उपस्थित केला आहे, आणि त्याचे उत्तरही देऊन ठेविले आहे. भारतीय विचारवंतांचे व तत्त्वज्ञानाचे हे प्रातिनिधिक उत्तर आहे, असे मानायला हरकत नाही.

ईश उपनिषदाचे ऋषींनी सांगितले की ऐहिक जीवन म्हणजे अविद्या व पारलौकिक जीवन म्हणजे विद्या, ही दोन्ही एकाच तत्त्वाची, म्हणजे ईश्वराची रूपे आहेत, ती दोन्ही मानवाला आवश्यक आहेत. ऐहिक जीवन नीतीने जगावे म्हणजे तीच पारलौकिक जीवनाची तयारी होते. त्यात विरोध नाही.

विद्यां च अविद्यां च यः तद् वेद उभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्यया अमृतम् अश्नुते ॥ ईश

या तत्त्वाचे स्पष्टीकरण करण्याकरता प्राचीन वाङ्मयात तीन गोष्टी आहेत, त्यांत या प्रश्नाची दोन टोके आणि त्यांतून काढलेला मधला मार्ग यांची चांगली कल्पना येते.

एक कथा आहे ययातीची. याला ऐहिक सुखांची इतकी ओढ होती की कितीही वर्षे उपभोग घेतला तरी त्याची तृप्ती होईना. म्हणून एक तारुण्य संपल्यावर त्याने आपल्या मुलाचे तारुण्य मागून घेतले आणि यथेच्छ भोग भोगले. तरीही तृप्ती होईना. मग त्याने निष्कर्ष काढला की ऐहिक जीवनाची तृप्ती केवळ उपभोग घेऊन होत नाही. उपभोगाने ती वाढतच जाते. भोगांच्या इच्छेवर आपल्या मनाने मर्यादा घातलीच पाहिजे.

न जातु कामः कामानाम् उपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मा इव भूयः एव अभिवर्धते ॥
(जातु–खरोखर. हविषा–आहुतीने. कृष्णवर्त्मा–अग्नी. भूयः–अधिक)

दुसरी कथा कठ उपनिषदातील नचिकेताची आहे. हा यमाकडे गेला आणि मृत्यूनंतर मानवी जीवनाचे काय होते हा अध्यात्मज्ञानाचा प्रश्न त्याने विचारला. यम म्हणाला, या ज्ञानाशिवाय काय वाटेल ते माग, मी तुला देतो. हजारो गायी, सुवर्ण, सुंदर स्त्रिया, दीर्घ आयुष्य इत्यादीपैकी वाटेल ते व वाटेल तितके देतो, पण अध्यात्मज्ञान मागू नकोस. नचिकेत म्हणाला या सर्व वस्तू क्षणभंगुर आहेत, त्या घेऊन मी काय करू? मला ऐहिक ऐश्वर्य नको. अध्यात्मज्ञानच हवे.

तिसरी गोष्ट याज्ञवल्क्यांची. याज्ञवल्क्य हा भारतीय तत्त्ववेत्त्यांचा मुकुटमणी असे म्हणायला प्रत्यवाय नाही, त्याचे बृहदारण्यक उपनिषद् हे आत्मज्ञानाचे एक

भांडारच आहे. एकदा जनकराजाने एक तत्त्ववेत्त्यांची सभा बोलवून आत्मज्ञानाच्या चर्चेची योजना केली. वादविवादांत जो उत्कृष्ट तत्त्वज्ञानी ठरेल त्याला मोठी दक्षिणा ठेवली होती. गायीच्या दोन्ही शिंगांना सोन्याची नाणी बांधलेली; अशा शंभर गायींचे दान श्रेष्ठ तत्त्वज्ञान्याला देऊ केले होते. विद्वानांची सभा भरली. आत्मज्ञानाचा प्रश्न निघाल्यावर कोणीच काही बोलेना. तेव्हा याज्ञवल्क्य आपल्या शिष्यांना म्हणाला –" जो श्रेष्ठ ब्रह्मवेत्ता असेल त्याला माझा नमस्कार. या सर्व गायी घेऊन आपल्या आश्रमाकडे चला." ते मौल्यवान दान घेऊन तो जाऊ लागला तेव्हा इतर विद्वानांनी त्याला हटकले. " याज्ञवल्क्या, चाललास कोठे. आधी वाद-विवाद करून तुझी श्रेष्ठता प्रसिद्ध कर." तेव्हा याज्ञवल्क्य म्हणाला – "विचारा प्रश्न, मी उत्तरे देतो." मग तो प्रत्येकाच्या अध्यात्मविषयक प्रश्नाला समर्पक उत्तरे देऊन आणि दक्षिणा घेऊन आश्रमात गेला. अध्यात्मज्ञान आणि ऐहिक वैभव यांत विरोध नाही हे त्याने या गोष्टीत सिद्ध केले. पण पुढे काही वर्षांनी या सर्व ऐहिक वैभवाचा त्याग करून ब्रह्मज्ञान चिंतनाकरता अरण्याचा रस्ता धरला. भोग आणि त्याग यांची सांगड त्याने आपल्या जीवनात घातली. भोग सोडलेही नाहीत पण त्यांत फार आसक्तही राहिला नाही.

मानवाचा दीर्घकालचा अनुभव म्हणून या गोष्टींचा विचार करा. व्यक्ती, समाज, देश व संस्कृती या सर्वांना तो अतिशय महत्त्वाचा आहे. अनेक पिढ्यांच्या मानवी अनुभवातून निघालेले तत्त्वज्ञान हे अल्पकाळातील एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या अनुभवापेक्षा श्रेष्ठ आहे. बिल डंचूरांट या विचारवंताचे असे उद्‌गार आहेत ते लक्षात ठेवण्यासारखे आहेत—

'Man is greater than any man.'

[३–५–७३

१. पूर्ण पुरुष विरळा

पुराणकालात, इतिहासात आणि आधुनिक कालात अनेक मोठमोठी माणसे होऊन गेली. त्यांची चरित्रे प्रसिद्ध होतात. चरित्रलेखक आणि वाचक त्या थोर लोकांच्या जीवनांचे मूल्यमापन करितात. त्यात त्यांनी जगाकरता किंवा समाजाकरता काय केले हा एक भाग असतो आणि वैय्यक्तिक गुण–दोषांचे मूल्यमापन हा दुसरा भाग असतो. ते लेखकाने काळजीपूर्वक केले असले तरी वादग्रस्त स्वरूपाचेही असते आणि लेखकाचा पक्षपातही एखादे वेळी दिसून येतो. गुणांची अतिशयोक्तो आणि दोषांवर पांघरूण किंवा त्यांचा अनुल्लेख असाही प्रकार होतो. लेखकाने चरित्रनायकाचे न दाखवलेले गुणदोष अधिक स्पष्ट करून

टीकाकारही कधी कधी दाखवतात. अशा बाबतीत सामान्य माणसांनी काय धोरण ठेवावे हा प्रश्न आहे.

जगात पूर्णतेला पोचलेल्या व्यक्ती फार थोड्या असतात. पूर्णपुरुष म्हणून ज्यांना संबोधले जाते त्यांच्या जीवनातील काही घटनाही वादग्रस्त ठरतात. प्रत्येक थोर पुरुषाच्या जीवनातील काही प्रसंग व स्वभावातील काही पैलू हे दोषांच्या सदरात पडण्यासारखे असतात. चरित्रलेखकाने किंवा चरित्रनायकाच्या चाहत्यांनी कितीही बौद्धिक कसरत करून दोषांचे समर्थन केले तरी दोष ते दोषच आहेत हे मान्य करणे प्रामाणिकपणाला धरून होईल. त्या दोषांमुळे व्यक्तीच्या कामाचे मूल्य कमी होत नाही. थोर माणसे त्यांच्या दोषांसह आपण स्वीकारली पाहिजेत.

प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावात गुण असतात तसे दोषही असतात. त्याने केलेले कार्य चांगले असते पण त्याचे काही निर्णय विवाद्य किंवा सदोषही असतात. श्रीराम हा पूर्णपुरुष, पण त्याने केलेला शंबूकवध किंवा सीतात्याग यांचे समर्थन करणे म्हणजे एक शाब्दिक कसरतच होते. पण तरीही तो ईश्वराचा अवतार मानून आपण त्याचा जन्मदिन पाळतो आणि चरित्रे गातो. ही भारतीयांची सहिष्णुवृत्ती आणि थोर पुरुषांकडे पाहण्याची दृष्टी स्वीकारणीय आहे. बाजीरावाने मस्तानीचे प्रकरण निर्माण केले नसते तर त्याच्या चरित्राला मोठाच उठाव आला असता. पण माणूस परिपूर्ण नसतो हे सत्य पुन्हा पुन्हा आपल्या प्रत्ययाला येते. दोषांना सद्गुणांचे स्वरूप देणे हे फाजील अंधभक्तीचे लक्षण आहे, तसेच दोषांची अतिशयोक्ती करणे हेही फाजील असहिष्णुतेचे लक्षण आहे. दोषांचा अनुल्लेख हा बौद्धिक अप्रामाणिकपणा आहे. अलीकडे जी थोर पुरुषांची चरित्रे प्रसिद्ध होत आहेत ती पाहून मला हे विचार सुचले आहेत.

थोर व्यक्तीच्या जीवनातील बौद्धिक निर्णय हे विवाद्य या सदरात पडू शकतील. परंतु नैतिक आणि चारित्र्य-विषयक दोष हे दुर्गुणच आहेत. ते तसे आहेत असे म्हणायला पाहिजे, नाहीतर सामान्य लोक त्या दुर्गुणांचेच अनुकरण करण्याला प्रवृत्त होतील. सत्याकडे धीटपणाने पहाणे पण अंतःकरण सहिष्णुतेचे ठेवणे ही आपली प्रवृत्ती असावी.

थोरपणाचे घटक तरी काय आहेत ? प्रत्येक जण आपापल्या परीने आपल्या आदर्श पुरुषाला कसोटी लावील. मी मोठ्या माणसाचे मोजमाप करताना तीन दृष्टींनी त्याच्याकडे पाहीन. पहिली—त्याचे वैयक्तिक खाजगी जीवन शुद्ध, निर्मल असावे. शील, चारित्र्य, नैतिक गुणांची पूर्णता या गुणाला मी प्रथम क्रम देतो. दुसरी—त्याचे सार्वजनिक जीवन. हे देखील निर्मल, संशयातीत,

लोकादराला पात्र व लोकांना अनुकरणाला पात्र असे असावे. तिसरी—त्याच्या स्वतःच्या कार्यक्षेत्राचा जगाला, समाजाला व देशाला होणारा उपयोग. अशी क्षेत्रे अनेक असू शकतात. बौद्धिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयात्मक, उपदेशात्मक, संशोधनात्मक, समाजसेवाविषयक इत्यादी. या तिन्ही कसोट्यांना उतरतो तो पूर्ण आदर्श, उत्तम माणूस. यांपैकी एकाही कसोटीत कमी भरणारा माणूस मोठा असेल, पण आदर्श असणार नाही. मी त्याला मान देईन, पण पूजा करणार नाही. पायाला हात लावणार नाही. पायांशी बसणे तर दाजूलाच. हा अहंकार नव्हे, स्वभाव.

इतरांकडून पूर्णतेची अपेक्षा करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे, असाही विचार प्रत्येकाने करावा. आपण स्वतः सद्गुणाचे पुतळे आहोत काय ? प्रत्येक व्यक्ती गुणदोषांच्या निरनिराळ्या पातळीवर जन्माला आलेली असते. जीवनात ती पातळी उंचावण्याचा प्रयत्न किती झाला ही महत्त्वाची गोष्ट आहे. ती आपण करावी व त्याकरिता थोर पुरुषांच्या जीवनातील चांगल्या पैलूंचा उपयोग करून घ्यावा.

बहुसंख्य थोर पुरुषही अपूर्णच असतात. अगदी पूर्णतेला पोचलेल्या व्यक्ती विरळाच, हे मानवी जीवनातील सत्य आहे.

[१७-३-७३

१०. बिलंदर बाबा अन् बावळट भक्त

साधुसंतांनी आणि सत्पुरुषांनी आपल्या उपदेशाने आणि आदर्श आचाराने समाजाला नैतिक मार्गावर ठेवण्याचा सतत प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे माणसांची पारमार्थिक जिज्ञासा आणि तळमळ त्यांनी शांत केली. हे सत्पुरुष महाराष्ट्रात आणि भारतात झाले नसते तर आपली संस्कृती अत्यंत निकृष्ट अवस्थेला पोचली असती. किंबहुना ती जिवंतच राहिली नसती. संतांचे हे समाजावर फार मोठे उपकार आहेत. मी त्यांना विनयाने आणि आदराने सतत वंदन करतो. त्यांनी समाजाला सुसंस्कृत केले (दे सिव्हिलाईज्ड अवर सोसायटी).

त्या सत्पुरुषांपैकी अनेक व्यक्ती बाह्य जीवनात अगदी चारचौघांसारख्या, सामान्य माणसासारख्या राहात. त्यांचे संतपण त्यांच्या विचारात आणि आचारात व्यक्त होत असे. परंतु कालमानाला अनुसरून, अथवा आपापल्या पंथाची बंधने असल्याने, काही सत्पुरुषांनी आपल्या बाह्य जीवनात अलौकिकपणा, इतरांपेक्षा निराळेपणा ठेवला होता. कफनी, माळा, भगवी वस्त्रे, दाढी, जटा, किंवा संपूर्ण

केशवपन, संपूर्ण अथवा अंशतः वस्त्रत्याग, अंगावर व हातात विशिष्ट पंथदर्शक वस्तू—अशा प्रकारचे बाह्यवेश धारण करणारे अनेक खरेखुरे साधु –सत्पुरुष होऊन गेले. परंतु बाहय जीवनातील त्यांच्या या अलौकिकपणाचा पुढे पुढे समाजात फार दुरुपयोग झाला. अनेक स्वार्थी, कामासक्त, लबाड, कावेबाज, द्रव्यलोभी, विलासप्रिय अशा दुर्जनांनी यां अलौकिक बाह्य राहाणीच्या जोरावर समाजातील दुःखार्त, परमार्थप्रिय अशा लोकांना फसवायला सुरुवात केली. संत तुकारामांच्या काळातही हे चालू होते. अशा लोकांची तुकारामांनी कडकडून निंदा केली आहे. साधु–सत्पुरुष एक झाला तर त्याच्या केवळ बाह्यजीवनाचे अनुकरण करून, अंगी वैराग्य, नीतिमत्ता, सात्त्विकता नसताना अज्ञान शिष्यांचा मेळावा जमवून, त्यांचे द्रव्यशोषण आणि अनेक वेळा शीलहरणही, करायला प्रारंभ केला. ही प्रथा आजतागायत, आजच्या बुद्धियुगातही चालू आहे याची मनाला खंत आणि किळस आल्यावाचून राहात नाही.

या भक्तगणांत काही सुशिक्षित बुद्धिमान डोळस असतात पण बहुसंख्य अज्ञानी, भोळेभाबडे किंबहुना बावळटही असतात. अज्ञान आले की तेथे अज्ञान व्यक्तींना फसवणारे नराधमही (व्हिलन्स) येतातच. या जगात अज्ञान, भोळाभाव आणि बावळटपणा यांना क्षमा नाही. समाजातील खलपुरुषांच्या स्वार्थाला ते बळी पडणारच. या खलपुरुषांतील अनेक लोक साधु-संत सत्पुरुषाचा बाहेरचा वेश व आचार स्वीकारून समाजाला फसवतात.

बहिरंग निराळे आणि अंतरंग निराळे. बाह्यतः जटादाढी, कफनी, रुद्राक्षमाळा वापरणारा किंवा दुसऱ्या टोकाला जाऊन विक्षिप्तपणे राहाणारा, किंवा सामान्य राहणीचाही त्याग करणारा माणूस, अंतरंगात निर्मल, सत्त्वयुक्त, नीतिमान, त्यागी, लोकहितदक्ष, माणूसकीचा असेलच असे नाही. पण अंतरंगातील दोष व दारिद्र्य सामान्य नेत्रांना दिसत नाहीत. साधुसंतांची बाह्यवेशात नक्कल करणारा बुवा–गुरू अंतरंगातही साधुसंत असेल असे त्यांना वाटते, अन् ते फसतात, व कालांतराने पस्तावतात; पण फार उशिरा.

सांप्रदायिक पद्धतीने राहणाऱ्या साधुसंतांत सज्जन, आदर्श शीलाची, दयाळू मनाची, लोकहितदक्ष अनेक माणसे आजही आहेत. पण असा एक खरा, तर बाह्यतः नाव–रूपांनी त्याची नक्कल करणारे नव्याण्णव ढोंगी साधुसंत आहेत. सामान्य माणसे बहिरंग पाहून अंतरंगाची कल्पना करतात. म्हणून आधुनिक काळातील साधु-संतांनी या बाह्य उपाधींचा त्याग करावा. त्यांच्या अंतरंगाकडे पाहून लोक मान देतील तो त्यांचा खरा मान. त्याचाच खरा उपयोग समाजाला आहे. बाकीचा मान बाह्य डामडौलाचा. सज्जन पुरुषांनी त्याचा आता त्याग करावा.

भक्तांनी आणि शिष्यांनीही आपले गुरू, स्वामी, महाराज, इत्यादींच्या विचार-आचाराकडे पाहावे. बहिरंगावर भाळून जाऊ नये. चमत्कार म्हणजे अध्यात्म नव्हे हेही तत्त्व लक्षात ठेवावे. परमार्थाचा व नैतिकतेचा गंधही नसलेले लोक चमत्कार करू शकतात. ती एक निसर्गदत्त अथवा प्रयत्नसाध्य शक्ती आहे. बौद्धिक व शारीरिक शक्ती यासारखी ती एक मानसिक शक्ती आहे.

ज्यांना लिहितावाचता येते त्यांनी तर अशा गुरु–बोवा–महाराजांच्या मागे लागण्यात काही अर्थ नाही. ते देत असलेली सर्व शिकवण गीतेत आणि ज्ञानेश्वरीत आहे. बौद्धिक स्वावलंबनाचा आश्रय घेऊन स्वतः ही पुस्तके वाचा म्हणजे 'गमतील मग निरर्थक श्रवणाचे अधिक व्यर्थ ते कष्ट' ॥ (तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ गीता २.५२) कै. मामा वरेरकरांच्या 'संन्याशाचा संसार' या नाटकात आधुनिक बुवाबाजीचे छान वर्णन एका पदात केले आहे.

(राग–शंकरा)

शिरि धरि मुकुटाला । श्री तोचि झाला । काषाय वसनधारि ॥ त्यागी त्यागा ।
धरि अनुरागा । विषयि जो वाकला । बांधव धनहरि ॥ ध्रु०

साधुसंतांच्या उपदेशाविरुद्ध मी नाही. त्यांच्या अलौकिक बाह्य नाटकाविरुद्ध आहे. ज्ञानेश्वरांनी सर्व संतांना बजावून ठेवले आहे—

'अलौकिक न व्हावे लोकांप्रती ॥'

[१०–४–७३

११. मुलांचा जगप्रवेश

अनुकरण हा मनुष्यस्वभाव आहे. प्रौढ माणसे विचारपूर्वक अनुकरण करतात. त्यांच्यामागे अनुभवांची, नैतिक मूल्यांची आणि विचारांची पार्श्वभूमी असते. परंतु अपरिपक्व बुद्धीच्या मुलांची इतकी पूर्वतयारी झालेली नसते. त्यामुळे जे दिसेल आणि मनाला बरे वाटेल त्याचे मुले अनुकरण करतात. आज लोकसंख्या, शहरे, गावे, वाहनसाधने, विचारसाधने, करमणुकी यांची खूप वाढ झाली आहे. नवीन भाषेत बोलायचे म्हणजे त्यांचा स्फोट (एक्सप्लोजन) झाला आहे. आपल्या मुलांना जगातल्या विचारप्रवाहापासून आपण अलिप्त ठेवू शकत नाही. चांगल्या आणि वाईट अशा दोन्हीही प्रकारच्या गोष्टी त्यांच्या कानावर येणार आणि त्यांची दृश्ये त्यांना मासिके, चित्रपट, चित्रवाणी, सामाजिक प्रसंग अशा मार्गांनी दिसणार: समवयस्क अथवा लहान-मोठ्या अशा सर्व प्रकारच्या चांगल्या आणि वाईट व्यक्तींशी

त्यांचे संबंध येणार. आपण मुलांना काही घरात कोंडून ठेवणार नाही, त्यांचे कान आणि डोळे झाकून ठेवणार नाही. पूर्वीच्या काळी पालकापुढे कधीच आली नव्हती अशी अभूतपूर्व परिस्थिती आजच्या पालक-वर्गापुढे आली आहे, याची त्यांनी नीट जाणीव करून घ्यावी. कारण परिस्थितीचे परिणाम मुलांवर होऊन राहिले आहेत. आज ना उद्या तुमच्याही मुलांवर ते होणारच. त्याकरता त्यांची पूर्वतयारी करा.

चित्रपटातील आणि चित्रवाणीवरील गुन्हेगारीची तंत्रे पाहून त्यांचे प्रत्यक्ष जीवनात केवळ गंमत म्हणून अनुकरण करणारी मुले अमेरिकेत आहेत असे आपण वाचीत होतो. परंतु आता तसेच अनुकरण भारतातील मुलेही करू लागली आहेत अशा बातम्या वर्तमानपत्रातून नित्य येत आहेत. चोऱ्या, घरफोडी, वाहने पळवणे, मद्यपान, बलात्कार, पैशाची अफरातफर, अमली पदार्थ सेवन इत्यादी गुन्हे करणाऱ्या अपराध्यांची नावे आणि वये यांचे काळजीपूर्वक निरीक्षण करा. त्यात बहुतेक विशीच्या आतबाहेरचे तरुण गुंतलेले असतात. त्यात विशिष्ट धर्म-जात-गोत असे काही नाही. एकाच टोळीत हिंदू, शीख, ख्रिस्ती इत्यादी सर्व वर्गातले तरुण असतात. गुन्हेगारीत धर्म–जात–गोत नाही, ही मानली तर एक समाधानाची पण विनोदाची बाजू आहे. हे सर्व वाचायला ठीक वाटते, पण कल्पना करा की या गुन्हेगारीत तुमचीच मुले सापडली आहेत! किंवा या गुन्हेगारीला तुम्हीच बळी पडलेले आहात. मग याचे गांभीर्य लक्षात येईल.

या परिस्थितीत आपण काय करू शकू? आपण जग सुधारू शकत नाही, पण आपले घर आणि शेजार सुधारू शकू. आज वस्तुस्थिती अशी आहे की चांगले काय आणि वाईट काय, नैतिक काय आणि विपरीत काय, सदाचार काय आणि दुराचार काय, सत्कृत्य काय आणि दुष्कृत्य काय, सद्वर्तन कोणते आणि गुन्हेगारीचे वर्तन कोणते याची शिकवणच मुलांना दिली जात नाही. या शिक्षणा-करता आपण आणि शाळांनीही मुलांना वाऱ्यावर सोडून दिले आहे. निसर्गाला पोकळी आवडत नाही. 'नेचर अॅभॉर्स व्हॅक्युअम्' या न्यायाने मुलांच्या मनातली ही पोकळी भरून काढण्याचे काम व्यापारी वृत्तीचे, गल्लाशरू लोक, त्यांच्या हातात जी जी करमणुकीची साधने आहेत ती वापरून करीत आहेत. सर्वसामान्य लोकांना मारामारी, गुन्हेगारी आणि लैंगिक प्रसंग आवडतात म्हणून त्यांचा अधिकाधिक उपयोग या साधनांतून केला जातो. या वातावरणापासून आपण मुलांना फार अलिप्त ठेवू शकत नाही. पण हे सर्व ऐकून–पाहूनही कशाचे अनुकरण करावे आणि कशाचे करू नये यांचे शिक्षण आपण देऊ शकू की नाही याचा विचार करा.

आज अशी स्थिती आहे की हे चांगले आणि हे वाईट हे ठरवण्याचे मोज-माप, कसोटी, फूटपट्टी, तराजू मुलांच्या जवळ नाही. त्यांची संस्कारक्षम मने रिकामी आहेत. जे सहज मिळेल ते घ्यायला ती तयार आहेत. त्यांना तुम्ही

घरातच चांगले विचार द्या. जगात चांगल्या व वाईट सर्व गोष्टी आहेत. चांगल्या कोणत्या आणि वाईट कोणत्या याची निवड करण्याची बुद्धी त्यांना द्या. हे काही फार मोठ्या अभ्यासक्रमाचे शिक्षण नाही. नैतिक विचार आणि कल्पना अशा थोड्या आहेत. त्या तुमच्या जवळ आहेत काय ? वैयक्तिक शुद्ध आचरण म्हणजे कोणते गुण ? नीती काय आणि अनीती काय ? याविषयीच्या तुमच्या कल्पना निश्चित करा आणि त्या प्रसंगाप्रसंगाने मुलांना द्या. कौटुंबिक व सार्वजनिक जीवनात जे प्रसंग किंवा अनुभव येतात त्यांच्या निमित्ताने, वृत्तपत्रात-चित्रपटात-चित्रवाणीवर जे प्रसंग दाखवले जातात त्यांच्या निमित्ताने, हे इष्ट आणि हे अनिष्ट, हे भूषणावह आणि हे दूषणावह, असे मुलांना सांगा. अशा संवादातून, श्रवणातून, वाचनातून, त्यांची जग पाहण्याची नैतिक पूर्वतयारी होईल. समरभूमीवर जाणाऱ्याच्या अंगावर शस्त्रप्रहार होणारच. त्याने चिलखत घातले पाहिजे. जीवनातील बऱ्या वाईट प्रसंगातून आपले चारित्र्य आणि शील सांभाळण्याकरता मुला-मुलींच्या जवळ नैतिक श्रद्धांचे चिलखत पाहिजे. ते आपण द्यायचे असते.

[१३-५-७३

१२. कसोटीच्या क्षणी किंमत ठरते

जो तो माणूस आपली किंमत ठरवीत असतो. त्याची त्याला जाणीव नसते. ज्या गोष्टीला तो शरण जातो त्या गोष्टीपेक्षा त्याची किंमत थोडी कमीच असते. हा विचार मनात ठेवला तर माणूस अधिक स्वाभिमानी राहील. 'मी मी आहे. हा मी मोठा आहे. हा क्षुल्लक गोष्टींना बळी पडणार नाही. मी स्वामी आहे, गुलाम नाही. माझी किंमत फार मोठी आहे.' हा स्वाभिमानाचा तेजस्वी विचार जागृत ठेवा.

मनुष्य कोणत्या गोष्टींना बळी पडतो ? वित्त, काम आणि जिव्हा. या तीन इच्छा तृप्त करण्याकरता जगातले बहुसंख्य गुन्हे आणि पातके होत असतात. माणूस स्वतःला विसरतो आणि या मोहांना बळी पडून स्वतःला विकून टाकतो. आपली किंमत कमी करतो.

वित्त, संपत्ती, पैसा, धनसंचय हा मानवाच्या पुरुषार्थातला प्रमुख घटक आहे. वित्ताने जगातली अनेक सुखे प्राप्त करून घेता येतात. सत्ता मिळवता येते. त्यामुळे वाटेल त्या मार्गाने त्याचा संचय करण्याची हाव माणसाला सुटते. न्यायनीतीने व सामाजिक संकेत पाळून धनप्राप्ती व धनसंचय करण्यात काही वावगे नाही. पण माणूस ज्या वेळी तेवढ्यावर तृप्त राहात नाही त्या वेळी तो अनीतीने, भ्रष्टाचाराने, पापे करून द्रव्यसंचय करू लागतो. ते करताना तो इतरांची सुखे आणि माणुसकी यांना पायाखाली तुडवतो. अन्यायाने मिळणाऱ्या पहिल्याच प्रसंगी त्याने असा विचार करावा

—या इतक्या रकमेने मला, माझ्या व्यक्तित्वाला, शीलाला, चारित्र्याला, स्वाभिमानाला इतर लोक विकत घेऊ शकतात का ? पहिल्याच प्रसंगी तुम्ही श्रेष्ठ का धनाची रक्कम श्रेष्ठ, हे तुम्ही ठरवता. तुम्ही ठरवता तीच तुमची किंमत इतर लोक जाणून तुमच्याशी व्यवहार करतात. तुम्हाला विकत घेणारे तुमच्या व्यक्तिमत्त्वाला तुच्छ समजतात.

काम हा एक प्रबळ विकार प्राणिमात्रात आहे. अग्नीसारखा आहे. तो योग्य रीतीने वापरल्यास उपकारक, अयोग्य उपयोग केल्यास विनाशक. माणसाची किंमत ठरवून त्याला विकत घेण्याचे हे दुसरे एक अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. राजकारणात, व्यापारात, अन्य व्यवहारात मोठमोठ्या आदमींना विकत घेण्याच्या कामी या साधनाचा उपयोग केला जातो. या विकाराचा योग्य रीतीने उपयोग करून घेणारी माणसे सुखी होतात. ते त्या वृत्तीला ताब्यात ठेवतात, तिचे गुलाम होत नाहीत. तिच्या आहारी जाणारी माणसे इतरांचे जीवन, इतरांचे संसार, स्वतःचा संसार या सर्वांवर निखारे ठेवतात आणि स्वतःचा अधःपात करून घेतात. क्षणिक सुखाकरता माणूस स्वतःला विकतो, स्वतःची किंमत मातीमोल करतो. सत्तेच्या, कीर्तीच्या, अध्यात्माच्याही शिखरावर पोचलेली माणसे या विकाराचे गुलाम झाल्यामुळे धुळीला मिळाली आहेत.

तिसरा मोह जिभेचा आहे. खाणे आणि पिणे. पिणे या शब्दात पाण्याव्यतिरिक्त पिण्याचे पदार्थ लोक धरूनच चालतात. 'तो पाणी पितो' आणि 'तो पितो' या दोन वाक्यांतील भेद सर्वांना कळतो. शरीरपोषणार्थ खाणे आवश्यक आहे, त्यात काही दोष नाही. पण केवळ जिव्हासौख्याकरता माणूस खाण्याला बळी पडतो तेव्हा तो चार घासाइतकी आपली किंमत कमी करून घेतो. माणसांना विकत घेण्याकरता चांगला खाना-पिना देणे हे एक शिष्टसंमत साधन समजले जाते. माणसे राजरोस स्वतःला, स्वतःच्या स्वाभिमानाला, एक वेळच्या खाण्यापिण्याकरिता स्वतःला विकून टाकतात. माणूस आपली किंमत एका बाटलीइतकी समजतो. अन्नाच्या आणि मद्याच्या मोहापायीच माणूस अनेक रोगांना बळी पडतो. भोजनातील आवश्यक भागाचे अमृत होते; नंतरच्या भागाचा मल होतो. आणि शेवटी घतलेल्या अनावश्यक भागाचे वीष होते. हे वीष अनेक रोगांना जन्म देते. मद्यपी माणूस स्वतःचा आणि इतरांचाही नाश करतो.

धन, काम, अन्न या तीनही गोष्टी जीवनाला आवश्यक आहेत. परंतु त्यांचा साधन म्हणून उपयोग न करता त्यांनाच देव मानणारी माणसे स्वतः गुलाम होऊन आपले स्वाभिमानी व्यक्तित्व हरवून बसतात. आपली किंमत मातीमोल करून घेतात. त्यांचा मोह जो ताब्यात ठेवू शकतो तोच खरा माणूस; तो सुखी होतो. या मोहांना बळी पडणारी माणसे राक्षस आणि पशूसारखी वागतात. त्यांची माणुसकी ठार होते.

[१७-६-७३ .

१३. सवयी आणि जाणीव

सवय आणि जाणीव या जीवनातील अत्यंत प्रभावी अशा दोन शक्ती आहेत. त्या आपल्याशी इतक्या एकरूप झालेल्या असतात की आपण त्यांचा कधी विचारच करीत नाही. मला ही गोष्ट वारंवार अनुभवाला येते. वीज गेली आहे हे एकदा ऐकून, वाचून, पाहून माहीत असते. तरी पण बात्म्यांची वेळ झाली की रेडिओचे बटन मी चालू करतो. स्वयंपाक घरात गेलो की शेगडी सुरू करतो. दोन तीन वेळा फसगत झाल्याशिवाय लक्षात राहात नाही. ठराविक दिवशी नळाला पाणी नसते हे माहीत असते; पण हातपाय धुण्याची वेळ आली की एकदम नळ सुरू करतो, अन मग लक्षात येते. दुपारी झोपायची सवय आहे. दीडदोन वाजले की जांभया येऊन डोळे मिटू लागतात. बरोबर तास झाला की आपोआप जाग येते. रात्री जागरण झाले तरी सकाळी सहा वाजले की उठावेसेच वाटते. सवयींचा जीवनावर इतका प्रभाव पडलेला असतो.

सवयींवर मात करणारी जाणीवही तितकीच प्रभावी असते. पण ती सवयीइतकी अंगवळणी पडत नाही. जाणीव ही बुद्धिपुरःसर जागृत ठेवावी लागते. जाणीवेची पुनरावृत्ती करावी लागते. मनात ती पुन्हापुन्हा घोळवावी लागते. प्रयत्नपूर्वक लक्षात ठेवावी लागते. मग मात्र ती आपले काम आपोआप करते. प्रवासाचे तिकिट पूर्ण पैसे भरून ठेवले आहे, पहाटे तीन वाजता उठून जायचे आहे, अशी मनाला पुन्हा पुन्हा जोराची ताकीद देऊन ठेवली की अडीच वाजता आपोआप जाग येते. प्रवासात अपरात्री एखाद्या स्टेशनवर उतरायचे असेल तर आधीच जाग येते.

सवय आणी जाणीव यांच्या क्रिया अगदी परस्पर विरुद्ध आहेत. सवय आपले काम लक्ष नसतानाही करीत असते तर जाणीवेचे काम होण्याकरता विचाराचे, स्मरणाचे प्रयत्न करावे लागतात. पण या दोन्ही शक्ती जीवनात कार्यक्षमतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आपण त्यांचा प्रयत्नपूर्वक उपयोग केला तर जीवनातील सुख आणि यश यांना त्या सहाय्यक होतील.

सवयीमुळे पुन्हा पुन्हा विचाराचा व स्मरणाचा वेळ आणि श्रम यांची बचत होते. लक्ष द्या अथवा नका देऊ, गोष्टी घडत असतात. त्याचा फायदा घेऊन बुद्धिपुरःसर विचारपूर्वक चांगल्या सवयींना दैनंदिन जीवनाचा एक भाग करा. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, वाचिक, सामाजिक जीवनाच्या अनेक चांगल्या सवयी लावून घेतल्या तर आपले व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न, आकर्षक, प्रसन्न आणि लोकप्रिय होईल. शारीरिक सवयीत अंतर्बाह्य स्वच्छता ही फार महत्त्वाची आहे. प्रातरुत्थान, नियमित व्यायाम, मिताहार, श्रमाची कामे, अशासारख्या सवयी आरोग्य व दीर्घायुष्याचे दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहेत. मानसिक सवयींमध्ये ठराविक वेळी चिंतन,

विकारनियंत्रण, सात्त्विक मनोरंजन, अशा सवयींचे संगोपन करता येईल. खुंटलेल्या बुद्धीची सतत वाढ बौद्धिक सवयीमुळें होत राहील. त्याकरिता पहाटे अथवा रात्री आपल्या आवडीच्या विषयाचे दीडदोन तास सतत असे वाचन; जीवनात प्रसंगा-प्रसंगानुसार आलेल्या घटनांवर विचार करून त्यांची वहीत क्रमवार नोंद; दररोज काही तरी नियमित लेखन, अशा सवयी लावून घेतल्यास कालांतराने आपला पुष्कळ फायदा झाल्याचे लक्षात येईल. एक विचारवंत माणूस म्हणून लोक तुमच्याकडे आदराने पाहातील. असा मान कोणाला नको ? पण ही बौद्धिक गोष्टीची आवडही कमी आणि त्याकरिता प्रयत्नपूर्वक श्रम घेण्याची प्रवृत्ती त्याहीपेक्षा कमी, ही वस्तुस्थिती आहे. शाळा–महाविद्यालयात पहिल्या श्रेणीत आलेली माणसे उत्तर आयुष्यात तृतीय श्रेणीत समाविष्ट होतात. बौद्धिक सवयी ते टिकवीत नाहीत.

जीवनात उपयोगी पडणाऱ्या इतरही अनेक सवयींचा संग्रह प्रत्येकाला विचारपूर्वक करता येईल. वाचिक सवयींच्या दृष्टीने आपण कसे बोलतो व कसे बोलावे याचा विचार करून इष्ट सवयी लावून घ्याव्यात. मर्मभेदक, तिखट, ग्राम्य, उद्वेगकारक अशा भाषणापेक्षा आर्जवी, विनयशील, मधुर, आपुलकीदर्शक, सौम्य अशा बोलण्याची सवय करता येईल. एकच वाक्य निराळ्या शब्दात आणि निराळ्या आवाजात उच्चारून पहा, म्हणजे त्याचा परिणाम लक्षात येईल. 'हे कर' आणि 'हे करशील का' यांत विचार एकच, पण शब्द आणि आवाज यांमुळे ऐकणारावर होणारे परिणाम भिन्न आहेत. म्हणून जिभेलाही चांगल्या सवयी लावा. रोज जमाखर्च लिहिण्याची आणि प्रासंगिक समालोचन करण्याची सवय संसारात फार उपयोगी आहे. बाजारात गेल्यानंतर तेथे काटकसरीची सवय उपकारक आहे.

अशा अनंत सवयींनी आपले जीवन परिपूर्ण केल्यास विधायक कामाला अधिक वेळ, शक्ती आणि उत्साह मिळेल. आपले जीवन सुख, शांती, कर्तृत्व यांनी संपन्न होऊन कृतकृत्य व्हाल.

[८–७–७३

१४. प्राणघातक अज्ञान

पुराणात अशा अनेक कथा आहेत की ज्यांत उग्र तपश्चर्या करून इष्ट देवतेकडून मानवांनी शक्तिशाली अशा अस्त्रांची प्राप्ती करून घेतली. या अस्त्रांचा उपयोग करण्यापूर्वी काही मंत्र म्हणावे लागत व विधी करावे लागत. नंतर अस्त्रांचा प्रयोग करायचा. असे केले नाही तर प्रयोग करणारावरच अस्त्राचा प्रहार व्हायचा. या पौराणिक कथांमधील काही तत्त्वे आजही उपयोगात आणण्यासारखी आहेत.

आपण आज अत्यंत शक्तिशाली अशा यंत्रांचा उपयोग करतो. अतिशय मोठ्या दाब असलेल्या वीज प्रवाहावर चालणारी यंत्रसामग्री घराघरातून व ग्रामीण भागात उपयोगिली जात आहे. ज्या प्रमाणात या यंत्रांचा व विजेचा उपयोग आपण करतो त्या प्रमाणात यंत्रांच्या रचनेचा व वीज वापरण्याच्या नियमांच्या ज्ञानाचा प्रसार होत नाही. या अज्ञानामुळे अनेक व्यक्तींना अत्यंत गैरसोयी सोसाव्या लागतात व कधी कधी त्यांना प्राणालाही मुकावे लागते.

नदीच्या पाण्यावर एका शेतकऱ्याने विजेची मोटार बसवली होती. ती नादुरुस्त झाल्यावर त्याने जुजबी दुरुस्ती करून तार कशी तरी जोडून दिली. विजेचा प्रवाह नदीच्या पाण्यात शिरला. मासे मरून पाण्यावर तरंगू लागले. ते उचलून घ्यायला एक माणूस गेला तर पाण्याचा शॉक बसून लगेच मेला ! एकदा एक स्टोन-क्रशर साफ करण्याकरता क्लीनर यंत्राच्या आत गेला. ते माहीत नसल्याने बाहेरच्या माणसाने क्रशर सुरू केला. आतून एकच किंचाळी आली. क्रशरने आपले काम केले. त्या माणसाच्या शरीराचे शतशः तुकडे झाले. एकदा विजेचा पंप दुरुस्त करण्याकरता एक माणूस विहिरीत उतरला. पंपाचा प्लॅटफॉर्म ओला झाला होता त्यावर उभा होता. वरच्याने बटन दाबून प्रवाह सुरू केला. खालचा माणूस पटकन शॉकने मरून पडला

सार्वजनिक वाहनाने प्रवासाला निघावे. गाडी गाव सोडून पुढे जाते तोच बंद पडते. दुसरी गाडी घ्यावी तर ती पुढच्या एखाद्या मुक्कामात बंद पडते. एकदा मला एका तासाच्या प्रवासाला सहा तास लागले आणि तेवढ्यात तीन गाड्या झाल्या. पॉवरहौसमधील बिघाडामुळे सर्व शहरभर अंधाराचे साम्राज्य होण्याचे प्रसंग तर अनेक वेळा येतात. या सर्वांचे कारण एकच आहे. यांत्रिक ज्ञानाचा प्रसार व यंत्र वापरण्याच्या नियमांचे ज्ञान पुरेशा प्रमाणात झालेले नाही. हे अज्ञान अनेक वेळा प्राणघातक ठरते.

आपल्या घरातील विजेची व अन्य यंत्रे किंवा साधने यांचे ज्ञान घरातल्या सर्व माणसांना झाले पाहिजे. जाणत्या मुला-मुलींना आणि गडीमाणसांना ही माहिती पाहिजे. विजेचे यंत्र सुरू करण्यापूर्वी किंवा त्या यंत्राला हात लावण्यापूर्वी त्या यंत्राची प्रार्थना केली पाहिजे की तू मला शॉक देऊन मारू नकोस. मग ते म्हणेल, माझे सर्व नियम पाळलेस की नाही ते पहा, आणि मग मला सुरू कर. त्या नियमांचे मनात स्मरण हाच मंत्र. हे मंत्राचे स्मरण अगदी जरूर आहे. मोटार सायकल, स्कूटर आणि मोटार सुरू करण्यापूर्वी तिचे ब्रेक इ. सर्व पाहिले पाहिजेत. पण मनात मंत्राचे स्मरण केले पाहिजे की, हे यंत्र श्रम वाचवण्याकरता आहे, फाजील वेग देऊन वेळ वाचवण्या-करता नाही. स्पीड वाढवला तर पाचदहा मिनिटे वाचतील पण पाचदहा महिने

हॉस्पिटलमधे काढावे लागतील आणि जन्मभर अधूपण काढावे लागेल. हे स्मरण प्रत्येक वेळी हवे.

यांत्रिक युग ही एक इष्ट घटना आहे. पण यंत्रांच्या वाढीबरोबर यंत्रसंचालनाचे तंत्राचा व शास्त्राच्या ज्ञानाचाही प्रसार घराघरातून व सामान्य माणसापर्यंत झाला पाहिजे. नाहीतर हे अज्ञान एकाच नव्हे, अनेक व्यक्तींना प्राणघातक ठरण्याचा धोका सतत आहे.

यंत्रांच्या वेगानेच यंत्र-ज्ञानाचाही प्रसार झाला पाहिजे.

[३-९-७३

१५. आहार आणि आकार

मलेरिया, नवज्वर, प्लेग, देवी, फ्ल्यू, इत्यादी रोगांचे प्रमाण आधुनिक वैद्यक शास्त्राने पुष्कळ कमी केले आहे. पण त्यामुळे एकूण रोगांचे व आजारांचे प्रमाण कमी झाले नसून वाढले आहे. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, वाताचे प्रकार, अल्सर्स, थकवा, अग्निमांद्य, बद्धकोष्ठ, ग्रॅस्ट्रायटीस, कोलायटीस, कॅन्सर इत्यादी रोगांचे प्रमाण वाढत आहे. ही आधुनिक संस्कृतीमुळे उत्पन्न झालेली जागतिक प्रक्रिया आहे. तिच्यावर यथाकाल संशोधन होऊन उपाय निघतील तेव्हा निघोत--आपल्याला स्वतःपुरते काय करता येईल व रोगांपासून अलिप्त किंवा मुक्त कसे राहाता येईल याचा प्रत्येक व्यक्तीने विचार केला पाहिजे. स्वतःकरता आणि कुटुंबाकरता रोगमुक्त असणे आणि दीर्घायुषी होण्याचा प्रयत्न करणे ज्याच्या त्याच्या स्वाधीन आहे.

आपला सदोष आहार हे रोगाचे प्रमुख कारण आहे हे सर्वांना माहीत असते, त्यात नवीन काहीं नाही. सदोष आहाराने पचनाचे विविध रोग होतातच पण पुढे पुढे त्याच्याही पेक्षा गंभीर असे कष्टसाध्य व आजन्म टिकणारेही रोग होतात. मधुमेह, रक्तदाब इत्यादी काही रोग दीर्घकाल टिकणारे आणि कर्तृत्वात कमीपणा आणणारे आहेत. काही रोगांमुळे माणूस आत्मविश्वास गमावून बसतो व पूर्वीसारखे मुक्त मनाने जीवन जगू शकत नाही.

मेदाची वृद्धी आणि वजनवाढ हे अनेक रोगांचे एक कारण आहे असे वारंवार वाचनात येते त्यातही पुष्कळ सत्य आहे. लठ्ठ देहाच्या व्यक्ती आणि काही विशिष्ट रोग यांचे साहचर्य समाजात दिसून येते. मेदवृद्धी व जादा वजनवाढ टाळणे काही अंशी व्यक्तीच्या हातात आहे. चोवीस पंचविशीच्या सुमारास ज्या व्यक्ती देखण्या आणि प्रमाणबद्ध देहाच्या दिसतात त्याच दहापंधरा वर्षांनी बेढब आणि प्रमाणबाह्य आकार धारण करू लागतात. हे कटाक्षाने टाळणे ज्याच्या त्याच्या हातात आहे. केवळ चांगले दिसण्याकरताच नव्हे, तर आरोग्याकरता आणि रोगमुक्त राहण्याकरताही मेदवृद्धी आणि वजनवाढ टाळणे आवश्यक आहे.

पंचविशीच्या पुढे स्त्री-पुरुषांना संसारात स्थाईकपणा येतो. हळूहळू कष्ट कमी करणारी साधने घरात येतात. वाहनांच्या सोयी होतात. गडी माणसांची संख्याही वाढते. या सर्व गोष्टींची भर इतकी हळू हळू पडते की ते आपल्या लक्षात येत नाही. पण त्यामुळे शारीरिक कष्ट करण्याची गरज कमी होते. चालण्याने, कामे करण्याने शरीराच्या ज्या हालचाली व्हायच्या त्यांचे प्रमाण कमी होऊ लागते. हालचाल कमी असलेल्या देहाला जरूर असलेल्या आहाराचे प्रमाणही तात्त्विक दृष्टीने कमी होते. पण प्रत्यक्ष व्यवहारात मात्र तो कमी न होता वाढत राहतो. या वाढलेल्या आहाराची रोजच्या हालचालींना तितकीशी गरज नसल्याने तो मेदाच्या स्वरूपात शरीरात साठविला जातो. त्यामुळे व्यक्तीचे वजन वाढू लागते. मानेचा, पोटाचा, कमरेचा, मांड्यांचा घेर वाढू लागतो. देहाची प्रमाणबद्धता नाहीशी होते, आणि वजनवाढ व मेदवृद्धी यामुळे उत्पन्न होणाऱ्या रोगांचे प्रमाण वाढते.

ज्या प्रमाणात श्रमाची कपात झाली त्या प्रमाणात आहाराची कपात होत नाही. नेहमीसारखे पोट भरल्याशिवाय तृप्ती होत नाही. शिवाय आहारशास्त्रातील नवनवीन पदार्थांच्या संशोधनामुळे व प्रयोगांमुळे, स्वागतसमारंभामुळे, पाहुण्यांच्या आदरसत्कारार्थ होणाऱ्या मिष्टान्नामुळे, सभासंमेलनातील खाण्यापिण्याच्या कार्यक्रमामुळे आपल्या प्रासंगिक आहाराचे प्रमाण पूर्वापेक्षा पुष्कळच वाढले आहे. हा वाढलेला आहार पचनेंद्रियांवर अनिष्ट परिणाम करतो; मेदाच्या स्वरूपात त्वचेखाली व हृदयावर राहून देहाचा आकार वाढतो; आणि मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, वातविकार असले दीर्घकाल टिकणारे व्याधी उत्पन्न करितो.

यावर घरगुती उपाय काय? दोन मार्ग दिसतात. एक आहार तरी कापला पाहिजे किंवा जादा घेतलेला आहार जाळण्याकरता श्रमाचे प्रमाण तरी वाढवले पाहिजे. दोन्हीही मार्गांनी प्रयत्न करणे हिताचे आहे. सध्या आहारशास्त्राचे गणित फार प्रगत झाले आहे. कोणत्या प्रकारच्या कामाकरिता किती कॅलरी (उष्मांक) आहार लागेल हे आहारतज्ज्ञ सांगू शकतात; आपण ते ग्रंथ वाचून काढू शकतो. त्या मर्यादेत आहार ठेवणे हा एक मार्ग. दुसरा मार्ग श्रमात वाढ करण्याचा. घरातली व बाहेरची शारीरिक हालचालीची शक्य तितकी कामे आपली आपणच करावीत. मध्यमवर्गीयांना ही जरूर म्हणून करावीच लागतात, तसेच इतरांनीही करावे. निरनिराळ्या स्वरूपातील व्यायाम हा दुसरा अत्यंत इष्ट आणि आवश्यक असा मार्ग आहे. यात फिरणे, टेकड्या चढणे, निरनिराळे खेळ, नमस्कार, जोर-बैठका, योगासने, बागकाम, इत्यादींचा समावेश होईल. पुरुषांनी फिरणे, जोर-बैठका, योगासने आणि स्त्रियांनी फिरणे, सूर्यनमस्कार व योगासने – हे व्यायाम पूर्ववयात सुरू करून ते वृद्धापकालापर्यंत चालू ठेवावेत. साठीनंतर प्रमाण कमी करावे इतकेच. पण व्यायाम हा शेवटपर्यंत जीवनाला

हितकारक आहे. त्यामुळे शरीर डौलदार राहील, रोगांचे प्रमाण कमी होईल, कर्तृत्व टिकेल आणि दीर्घायुष्य लाभेल.

शरीरम् आद्यम् खलु धर्म-साधनम्। निरोगी सुदृढ शरीर हे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारीही पुरुषार्थांच्या साधनेकरता आवश्यक आहे.

[७–१०–७३

१६. जवळची माणसे दुरवू नका

माणूस प्रेमावर जगत असतो. प्रेमाची नाती अनेक असतात. पति-पत्नी, माय-लेक, बाप-लेक, भाऊ-बहीण, चुलत भावंडे, मामे भावंडे, आते भावंडे, आजोबा-नातवंडे, चुलते-पुतणे, मामे-भाचे इत्यादी सर्व नात्यातील मंडळी. यांतील काही जणांचे आपल्याशी प्रेमाचे आपुलकीचे संबंध असतात. अडीअडचणीत एकमेकांना उपयोग होतो. जिवाला जीव देतात. सर्वच नाती अशी असतात असे नाही. पण काही नाती तरी अशी असतात. याशिवाय मित्र-मित्र, गुरु-शिष्य, नोकर-मालक, शेजारी-शेजारी, यांच्यापैकीही काही नाती केवळ कामापुरती न राहाता त्यापेक्षा थोडी अधिक म्हणजे प्रेमाची असतात. अशा या प्रेमळ माणसांचे मोठे वर्तुळ असणे हे एक भाग्याचे लक्षण आहे.

सर्वच नातेवाईक व परिचित आपल्या स्नेहाला प्रतिसाद देतील असे नाही. काहींचा स्वभाव स्वार्थी, तुसट, अलिप्त प्रवृत्तीचा असतो. अशांना विसरून जा. पण तुमच्या स्नेहाला प्रतिसाद देतील अशा माणसांचे, मग ती थोडी का असेनात, वर्तुळ निर्माण करा आणि त्यांच्याशी चांगले आपुलकीचे संबंध ठेवा. अडचणीत त्यांच्या उपयोगी पडा.

अशा स्नेहाच्या वर्तुळाचा घेर, टिकाऊपणा आणि स्नेहाची उत्कटता पन्नास-टक्क्यांनी तुमच्यावर व बाकीची इतरांच्यावर अवलंबून आहे. प्रसंगाप्रसंगाने माणसे एकत्र येतात तशीच ती प्रसंगा-प्रसंगाने दुरावतातही. स्नेहात आणि प्रेमात वितुष्ट येण्याची दोन मुख्य कारणे असतात, त्याबरोबर इतरही अनेक गौण कारणे असतात. लग्नकारणात अथवा अन्य प्रसंगी गोतावळ्याची माणसे एकत्र येतात तेव्हा त्यांच्यापैकी जिवश्च कंठश्च अशा व्यक्ती एकमेकांजवळ अंतःकरणातल्या ज्या गोष्टी बोलतात, त्यांचे विषय काय असतात त्याचे सूक्ष्म श्रवण व अवलोकन करा. देणे-घेणे आणि कटू बोलणे यावरून बिघडलेल्या संबंधाची गाऱ्हाणी माणसे एकमेकांजवळ सांगत असतात. देणे-घेणे आणि बोलणे यावरून प्रेमाचे संबंध टिकतात किंवा दुरावतात. हे लक्षात घेऊन या दोन व्यवहारांबाबत तुमच्या स्वतःच्या स्वभावाची काळजी घ्या.

देण्याघेण्यामुळे जे टिकते किंवा कमजास्त होते ते प्रेम नसून तो निव्वळ स्वार्थ असतो. तो तुमच्या ठिकाणी असेल किंवा अन्य व्यक्तीच्या ठिकाणी असेल. तुमच्या बाबतीत तुम्ही सुधारणा करू शकाल. इतरांबद्दल आपण काही करू शकत नाही. इतरांवरील तुमचे प्रेम देण्याघेण्यावर अवलंबून ठेवू नका. तुमच्याकडूनही जी माणसे अशी अपेक्षा करीत नाहीत, त्यांचे प्रेम तुम्ही सांभाळून ठेवा. आर्थिक दृष्टीने परस्परावलंबी नाती असतात त्यांची गोष्ट निराळी. आई-बाप व मुले, पति-पत्नी इत्यादी अगदी जवळच्या नात्यांतील माणसे आर्थिक दृष्टीने परस्परावलंबी असणारच. त्या ठिकाणी काही व्यक्तींचे पालणपोषण हा प्रेमापेक्षाही कर्तव्याचा भाग ठरतो. कर्तव्य-बुद्धीच्या जोडीला प्रेमाचा ओलावा असणे हे अधिक इष्ट आहे.

आर्थिक बाबीव्यतिरिक्त ज्या व्यवहारामुळे माणसे जवळ येतात किंवा दुरावतात तो व्यवहार परस्परांशी बोलण्याचा असतो. या बोलण्यामुळे अनेक वेळा माणसा-माणसांचे संबंध तुटतात हे लक्षात ठेवले पाहिजे. अनेक वर्षे जतन केलेले प्रेम एखाद्या प्रसंगातील वाक्याने अथवा शब्दाने नष्ट होऊन जाते. आपली भाषा माणसांना जोडते तशीच ती माणसांना तोडतेही. थोडी सावधानता, जाणीव आणि संयम या गुणांची सवय केली तर अशा प्रसंगी तुमच्याकडून चूक होण्याचा संभव कमी.

बोलण्याच्या भरात माणूस अहंकाराला बळी पडतो. माझेच खरे असा आग्रह बळावतो. कधी आपल्या तोंडून एखादे मर्मभेदक असे वाक्य बाहेर पडते. कधी माणूस रागाला बळी पडून तापटपणाने तुसटपणाने बोलतो. एक घटकाभर, त्या प्रसंगापुरता, आपला अहंकार तृप्त होतो; खोचक बोलून योग्य उत्तर दिल्याचे थोडा वेळ समाधान मिळते; आपल्या बुद्धीची आणि चाणाक्षपणाची चमक आपण दाखविली असा क्षणमात्र अभिमान वाटतो. पण या सर्वाची किंमत किती दिली याचाही विचार करा. एका माणसाचे मन दुखावले, तो तुम्हांला कायमचा अंतरला. लांबचा नातेवाईक असेल तर तो संबंध तोडील, फारसे बिघडणार नाही. पण पति-पत्नी, बापलेक, भाऊ-बहीण अशा कुटुंबातल्या जवळच्या माणसांत असे प्रसंग आले तर काय परिणाम होईल याचा विचार करा. माणसे एकत्र राहातील पण त्यांची मने विभक्त असतील.

प्रेमी माणसांचे प्रेम टिकवण्याकरिता आपणही थोडा त्याग केला पाहिजे. अहंकाराचा त्याग केला पाहिजे. मीपणा सोडला पाहिजे. उतावीळपणाचा, लहरी-स्वभावाचा त्याग करून आत्मसंयमनाची साधना करायला पाहिजे. वेळप्रसगी कमीपणा आणि अपमानही सोसण्याची तयारी ठेवली पाहिजे. ही प्रेमाची किंमत आहे. ती मोजल्याशिवाय ते मिळणार नाही.

कुटुंबात व संसारात प्रेम, सुख, शांती, सहकार्य या गोष्टी हव्या असतील तर अहंकाराचा आणि मीपणाचा त्याग करायला शिका. राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।। असा समर्थांचा उपदेश अगदी सार्थ आहे. या सूत्राचा उपयोग मला जन्मभर झाला तसा तुम्हांलाही होवो.

[१९-९-७३

१७. ग्रामीण जीवनात ध्येयवाद

ग्राम म्हणजे गाव; पण आज हा शब्द खेडेगाव या अर्थानेच वापरला जातो. खेडेगाव म्हटल्यानंतर कवीच्या स्वप्नातील एक गाव डोळ्यापुढे उभे राहाते. लगेच स्वप्नसृष्टीतून माणूस जमिनीवर येतो आणि खेड्यातील वास्तविकतेची त्यास प्रखर जाणीव होते. एक चित्र विलोभनीय व मनोहर, तेही खरे आहे. दुसरे रुक्ष आणि विदारक, तेही खरे आहे. ज्याला निसर्गाची, साधेपणाची, शांत वातावरणाची, ग्रामीण संस्कृतीची आवड आहे त्याचे दृष्टीने चार दिवस राहायला खेडे चांगले आहे. पण ज्याला त्या ठिकाणी आयुष्य कंठायचे आहे व संसार करावयाचा आहे त्याच्या दृष्टीने खेडे फारसे सुखावह नाही, म्हणून खेड्यातील माणसांचा ओघ एकसारखा शहराकडे वाहात आहे. खेड्यातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिली म्हणजे सुसंस्कृत माणसाला तेथे राहण्यात रस वाटत नाही. इतरांना पोटापाण्याकरता गाव सोडून शहराकडे धाव घ्यावी लागते. विकसनशील अशा सर्वच देशात हा फार मोठा प्रश्न आहे.

खेड्यात प्रवेश करतानाच एका असह्य अशा दुर्गंधीच्या वातावरणातून जावे लागते. मग खाच-खळग्याच्या रस्त्यामधून तोल सावरीत गावात फिरावे लागते. जोराचा पाऊस पडून गेलेला असेल तर ठायी ठायी पाण्याची डबकी, अन्यत्र चिखल अशा स्थितीत सरळ रेषेत तोल सावरून चालणे म्हणजे एक कसरतच होते. मग घरे पाहायला सापडतात. त्यांत पंचवीस तीस टक्के घरे पडलेली असतात, काहींना कुलपे असतात; आणि काही पार धुळीला मिळून तेथे लहानशा बखळी झालेल्या असतात. त्या जागा शेजारीपाजारी देहधर्म करण्याकरता उपयोगात आणीत असतात. घरातल्या जमिनी समपातळीत नसायच्या. भिंतींची पडझड झालेली असायची. काही भाग दुरुस्तीअभावी पडझड झालेल्या स्थितीत असायचा. कोपऱ्यात सर्व जळमटे लागलेली. स्नानाला आडोशाची जागा नाही. एखाददुसऱ्या घरातच संडास असायचा. त्याचीही स्वच्छता यथातथाच असते. पाण्याची सोय, घरातच विहीर असल्यास नशीब. नाहीतर लांब असलेल्या नदी-ओढ्यावरून किंवा सार्वजनिक विहिरीवरून पाणी आणायचे. चुली पूर्वापार पद्धतीच्या, त्यांत काही सुधारणा नाही. घरात वाचनीय पुस्तकांचा अभाव. शाळेची इमारत हीच कदाचित त्यातले त्यात

चांगली जागा असणार. गावातील राजकारण त्या गावातील पुढारी आणि म्होरके असतील त्यांच्या स्वभावाप्रमाणे चालायचे. त्यात सामान्य व्यक्तीला फारसे स्थान नाही.

खेडेगावांची ही स्थिती सुधारण्याकरता लागणारी नैसर्गिक साधने पुष्कळ आहेत. रस्ते सुधारण्याकरता दगड भरपूर आहे. घर बांधणीकरता लागणाऱ्या विटा पाडायची शक्यता आहे. लाकडाकरता झाडे लावण्याची शक्यता आहे. भरपूर पाणी उपलब्ध करून घेण्याची शक्यता आहे. पण प्रेरणेचा, उत्साहाचा, ज्ञानाचा, योजनेचा, संघटनेचा आणि नेतृत्वाचा अभाव आहे. कर्तृत्ववान, उत्साही, जनताप्रेमी, आधुनिक ज्ञानसंपन्न अशा व्यक्तींचा आणि नेत्यांचा अभाव आहे. हजारो खेड्यांना लागणारे हे नेतृत्व बाहेरून आणणे अशक्य आहे. ते त्या त्या गावातूनच निर्माण झाले पाहिजे. खेडेगावातील अनेक लोक आज शहरांत येऊन उच्च शिक्षण घेत आहेत. कृषितज्ज्ञ, इंजिनियर्स, डॉक्टर्स, कॉंट्रॅक्टर्स, कारखानदार, प्राध्यापक या व्यवसायाचे अनेक लोक आपापली खेडी सोडून शहरात येऊन स्थायिक झाले आहेत. हेच खेड्याचे मुख्य दुखणे आहे. बुद्धीचा आणि श्रमाचा ओघ खेड्याकडून शहराकडे वाहात आहे. बुद्धिमान लोक आपली बुद्धी, आणि श्रमिक वर्ग आपले शारीरिक कष्ट शहरांना देत आहेत. त्यांच्या त्यांच्या जन्मभूमीला त्यांच्या बुद्धीचा आणि श्रमाचा उपयोग होत नाही. तो कसा होईल हा खरा प्रश्न आहे.

ग्रामीण भागात प्रवास करताना ठिकठिकाणी 'कला वाणिज्य महाविद्यालय' असे फलक दिसतात. अनेक गावांत आता माध्यमिक विद्यालयेही स्थापन झाली आहेत. या संस्थांत सर्वत्र शहरी वातावरण व शहरी कल्पना असतात. शहरातून आलेले शिक्षक आणि प्राध्यापक कामापुरते त्या त्या गावात वस्ती करतात. सुटी झाली की शहरात येऊन राहातात. ग्रामीण भागातील मुलांना ग्रामीण जीवनाचे पुनरुज्जीवन करण्याचा ध्येयवाद देणारी माणसे या संस्थांतून नाहीत. आपापल्या गावाचा, आपण तेथे राहून कायापालट करावा हा ध्येयवाद तरुण पिढीला ग्रामीण भागातील संस्थाचालकांनी व अध्यापकांनी दिला पाहिजे. तो दिला जात नाही. शंभर विद्यार्थ्यांपैकी निदान पाच विद्यार्थी असे निघावेत की त्यांनी शिक्षण झाल्यावर आपापल्या गावाची सुधारणा करण्याकरता आपले जीवन द्यावे. प्रत्येक गावातील तरुणांत असे प्राचसहा ध्येयवादी तरुण निघावेत की ज्यांनी उच्च शिक्षण घेऊन त्याचा उपयोग आपल्या गावाच्या उन्नतीकरता करावा. त्यात एखादा इंजिनियर, एखादा कृषितज्ज्ञ, एखादा डॉक्टर, एखादा समाजशास्त्रज्ञ, एखादा अर्थशास्त्रज्ञ असे विविध प्रकारचे आधुनिक ज्ञान घेतलेले तरुण असावेत. त्यांनी आपल्या दशक्रोशीतील ग्रामसमूहाची सुधारणा करण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवावे. अशा ध्येयवादी तरुणांना सर्वतोपरी सहाय्य करणारी शासनसंस्था आज

देशात आहे. ग्रामीण तरुणाची दृष्टी शहराकडे लागली आहे ती त्यांच्या त्यांच्या गावाकडे वळवण्याची फार मोठी गरज आहे. ग्रामीण विद्यालये, महाविद्यालये, जिल्हा परिषदा, विधिमंडळाचे सभासद इत्यादी सर्वांनी या दृष्टीने योजना आखून काम करावे असे मला फार वाटते. ग्रामीण भागातून प्रवास करताना हा विचार मनात वारंवार उचंबळून येतो.

[२-१०-७३

१८. तीच तत्त्वे पण भाषा नवी

मानवी जीवनाला उपयोगी पडणारी काही तत्त्वे शाश्वत स्वरूपाची असतात. ती कोणत्याही कालखंडात, कोणत्याही देशात, कोणत्याही समाजाला उपयोगी पडतात. या तत्त्वांत काही मानवाच्या वैयक्तिक जीवनात उपयोगी पडणारी असतात आणि काही सामाजिक जीवनाला उपकारक असतात. त्यांना देशकालाच्या मर्यादा नसल्यामुळे अनेक देशांत अनेक कालखंडांत एकेका धर्माचा प्रसार झाला. तत्त्वज्ञानाच्या विचारांना काळाची मर्यादा नसते. रवींद्रनाथ टागोर, सर्वपल्ली राधाकृष्णन्, विवेकानंद यांसारख्या विचारवंतांना जगातील सर्व देशांतून व्याख्यानांकरता निमंत्रणे येत असत. त्यांनी जगाला भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप विषद करून सांगितले. भिन्न धर्मविचारांच्या भीतीची भिंत आड येऊ न देता, ख्रिस्ती धर्मानुयायांनीही त्यांची भाषणे मोठ्या जिज्ञासेने,कुतूहलाने व रसिकतेने ऐकली. या श्रोत्यांनी आजच्या सुधारणेच्या युगात, विज्ञानाच्या कालखंडांत ही व्याख्याने का ऐकली? त्याला दोन कारणे असावीत. पहिले, आजचे जीवनविषयक प्रश्न सोडवण्याला या व्याख्यानातील विचार प्राचीन असले तरी उपयुक्त वाटले. पण त्यापेक्षा महत्त्वाचे कारण, त्यांनी प्राचीन विचार आजच्या परिभाषेत मांडले. श्रोत्यांना परिचित अशा आधुनिक भाषेत त्यांनी वेद, उपनिषदे, महाभारत, गीता, स्मृती इत्यादी वाङ्मयातील चिरंतन व सर्वकाली उपयुक्त असे विचार सांगीतले.

वरील पद्धती अत्यंत महत्त्वाची आहे. आजचे कीर्तनकार, प्रवचनकार, शास्त्रीपंडित, प्रचारक, लेखक आणि व्याख्याते यांनी तिचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. टागोर व राधाकृष्णन यांचे काम सोपे होते. कारण भारतीय प्राचीन कल्पनांना इंग्लिश भाषेत मांडणे आणि आजच्या काळाला त्यांची प्रस्तुतता दाखविणे एवढेच त्यांचे काम होते. त्यांच्या श्रोत्यांना हे सर्वच विचार नवीनच होते. भारतातील श्रोत्यांचा प्रश्न थोडा निराळा आहे.

या देशातील श्रोते वर्षानुवर्षे, शतकानुशतके आणि पिढ्यान्-पिढ्या तेच तेच विचार त्याच त्याच परिभाषेत ऐकत आलेले आहेत. विचार सांगणारे लोक, त्यांचे

आचरण, त्यांच्या सांगण्याच्या पद्धती, त्यांनी शब्दांना दिलेले अर्थ इत्यादी अनेक कारणांमुळे अनेक शब्द झिजून गुळगुळीत होतात आणि त्यांच्या अर्थातील नावीन्य नाहीसे होते. त्यांच्यात नवाच अर्थ भरला जातो. त्यामुळे त्या त्या परिभाषेविषयी एक पूर्वग्रह श्रोत्यांच्या मनात निर्माण होतो. ते शब्द आणि ती परिभाषा ऐकण्याचा लोक कंटाळा करतात. साधा ब्रह्म हा शब्दच पहा. विश्वाचे आदितत्त्व काय असावे, याचा वैचारिक शोध घेता घेता अनेक कल्पना निघाल्या व शेवटी ब्रह्म आणि आत्मा या कल्पना सर्वमान्य झाल्या. हा एक तत्त्वज्ञानातला नवा शोधच होता, म्हणून त्याच्यावर संस्कृतमध्ये त्या काळी विपुल वाङ्मय निर्माण झाले. पुढे ज्ञानेश्वरांनी तेच वाङ्मय मराठी भाषेत आणले. मराठी भाषेला हे तत्त्व नवीन होते. म्हणुन ज्ञानेश्वरांनी प्रतिज्ञाच केली की ––

या मराठीच्या नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी ।
घेणे देणे सुखचि वेऱ्ही । होय जगा ।।

पुढे कीर्तनकार, प्रवचनकार, शास्त्रीपंडित यांनी या ब्रह्म–विद्येचा इतका अतिरेक केला की श्रोत्यांना वाटले, हे आता फार झाले! त्यांच्या मनातला ब्रह्म या शब्दाचा अर्थच बदलला. ब्रह्म हे काही तरी न कळणारे अव्यवहार्य अनावश्यक शब्दाघडंबर आहे असा समाजात ग्रह झाला आणि तसा निराळाच अर्थाने ब्रह्म शब्दाचा उपयोग होऊ लागला. 'मी तुला ब्र काढू देणार नाही', 'तो सगळा ब्रह्मघोटाळा आहे', 'ब्रह्म तेथे माया-बुवा तेथे बाया' हे सगळे वाक्यप्रयोग काय सुचवतात? अशा या मराठी भाषिकांत पुन्हा आज कोणी ब्रह्मतत्त्वाचे विवरण करू लागला तर कितपत श्रोते मिळतील आणि ते विवरण कितपत लोकप्रिय होईल? वैराग्य या शब्दाचा मूळ अर्थ असाच बदलला आहे. विरागपासून वैराग्य हे भाववाचक नाम आले. 'वि-राग' म्हणजे 'लोभ नसलेला' हा साधा अर्थ आहे. पण संत वाङ्मयात त्याचा अर्थ पार बदलून गेला, आणि शेवटी वैराग्यशील माणूस 'बैरागी' झाला! अशीच अनेक शब्दांची गत झालेली आहे. अर्थ बदलले, मूळ अर्थ लुप्त झाले, अतिपरिचयामुळे लोकांत प्रतिकूल ग्रह निर्माण झाले. नको ते श्रवण असे झाले. ब्रह्म, अध्यात्म, वैराग्य, उदासीन, मोक्ष, पाप-पुण्य, आत्मज्ञान, निष्काम कर्म, संन्यास, स्वर्ग-नरक इत्यादी शब्दांची आज ही स्थिती झाली आहे. आज त्यांची 'चर्पट पंजरी' झाली आहे. 'चर्पट पंजरी' हा आद्य श्री शंकराचार्यांचा तत्त्वज्ञानात्मक श्लोकसंग्रह, पण त्याचा मराठीत काय अनर्थ झाला आहे पहा!

समर्थ रामदासांनी प्राचीन तत्त्वज्ञान आपल्या काळच्या शब्दात सांगितले. त्यांनी उत्तम पुरुष, यत्नदेव, असे नवे शब्द निर्माण केले. आपल्या पिढीतील विचार-प्रसारकांनी हे काम केले पाहिजे. लोकांना चांगले विचार हवे आहेत, पण ते त्यांना समजतील अशा परिचित व अर्थवाही भाषेत हवेत. परप्रांतातल्या स्वामींची इंग्रजी

प्रवचने सुशिक्षित श्रोते मोठ्या आवडीने ऐकतात. कारण ती आजच्या इंग्रजी भाषेत प्राचीन तत्त्वज्ञान सांगतात आणि त्यांचा आजच्या जीवनात होणारा उपयोगही सांगतात. मराठी कीर्तनकार, प्रवचनकार, शास्त्रीपंडित, धर्मप्रसारक यांनी अंतर्मुख होऊन विचार करावा व आपली भाषा अद्ययावत करावी. आजच्या भाषेत तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेले तत्त्वज्ञानाचे विचारही लोक उत्साहाने ऐकतात असा माझा अनुभव आहे.

१९. 'माझे' विश्व केवढे आहे ?

श्री ज्ञानेशांची व ज्ञानेश्वरीची लोकप्रियता महाराष्ट्रात अभूतपूर्व आहे. ज्ञानेश्वरांचे कार्य एका वाक्यात सांगायचे झाले तर ते असे, त्यांनी महाराष्ट्रीय जनतेला सुसंस्कृत केले. अगदी खेड्यापाड्यात जरी आपण गेलो तरी तेथे ज्ञानेश्वरीचे वाचक आणि एखादे भजनीमंडळ हे सापडणारच. ज्ञानेश्वरांपासून भागवत सांप्रदाय व वारकरी पंथ वाढीस लागला. त्याने आपल्या अनुयायांना काही नैतिक व सामाजिक आचाराची पथ्ये दिली. त्याचबरोबर काही ब्रीदवाक्येही दिली. 'हे विश्वचि माझे घर' हे ज्ञानेशांचे वाक्य पासष्ट वर्षांपूर्वी अजाण वयात माझ्या कानावर प्रथम आले.

हे विश्वचि माझे घर ! सुंदर व उदात्त विचार आहे ! खरच आपले विश्व, माझे असे ज्याला मी म्हणतो ते विश्व, ते केवढे आहे याचा विचार प्रत्येकाने करून पहावा. माझे यात दोन अर्थ आहेत. एक द्रव्यदृष्टीने आणि दुसरा माणुसकीचे दृष्टीने. द्रव्य दृष्टीने ज्याला माझे असे म्हणू शकाल अशी काही संपत्ती तुमच्या जवळ असेल. 'माझी माणसे' असे ज्यांना तुम्ही मानता अशांचे एक वर्तुळ असू शकेल. तुमच्या संपत्तीचा ज्यांच्याकरता तुम्ही त्याग करू शकाल अशी माणसे किती आहेत ? तेच खरे तुमचे विश्व. संपत्तीचा, श्रमाचा, वेळेचा, विचाराचा, ज्ञानाचा उपयोगही ज्यांच्याकरता आपण करतो तेही आपले विश्व आहे. हे विश्व जीवनात हळूहळू व्यापक करीत न्यायचे आहे. अखेरचा टप्पा 'हे विश्वचि माझे घर' हे आहे. सर्व मानव, सर्व प्राणिमात्र याकरता ज्याचे जीवन तो पूर्ण मानव.

जन्माला आलेल्या बालकांतही, स्वार्थवृत्तीच्या प्रमाणाचा विचार करता तीन प्रकार पडतात. काही स्वार्थी, काही निःस्वार्थी, काही मध्यम अशी विभागणी जन्मसिद्ध आहे. स्वार्थ-परार्थ वृत्तीच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्ती निरनिराळ्या पातळीवर जन्माला येते. हा 'स्व-भाव' झाला. जाणीव निर्माण झाल्या नंतरया स्वभावात आपण किती बदल करू शकतो हा खरा प्रश्न आहे. जन्मतः स्वार्थी वृत्ती असणे-नसणे आपल्या हातात नाही, पण जाणीव आल्यानंतर स्वार्थवृत्तीत बदल झाला नाही

तर माणूस वयाने वाढला, पण मनाने पोरच राहिला असे होईल. अशा पोरवृत्तीची व थोरवयाची माणसे ज्या समाजात अधिक प्रमाणात असतात त्याचे नैतिक अधःपतन होते. स्वार्थाच्या पोटी हिंसा, असत्य, चोरी, साठेबाजी, काळाबाजार, चोर-व्यापार इत्यादी अनेक गुन्ह्यांची मालिका निर्माण होते.

काही व्यक्तींचा स्वभाव आपल्या चर्मसीमेपुरताच मर्यादित असतो. स्वतःच्या सुखाशिवाय त्यांना काही दिसत नाही. काही आपल्या कुटुंबापुरतेच पाहतात. स्वची व्याख्या विचारी माणसाने व्यापक करीत करीत न्यावी आणि समाजहिताशी एकरूप व्हावे. आपण ज्या समाजात राहातो, काम करतो, सुखदुःखे भोगतो, त्याच्या हिताशी समरस होण्याचा प्रयत्न करावा. स्वार्थ कोणाला सुटला नाही हे खरेच. पण स्वार्थ साधताना मी इतरांचे नुकसान करीत नाही ना, इतरांना दुःख देऊन माझे सुख मिळवीत नाही ना, इतरांचे शोषण करून माझा द्रव्यसंचय वाढवीत नाही ना, इतरांना फसवून माझा फायदा साधीत नाही ना, हा साधा विचार प्रत्येकाने करायलाच हवा. अखेरपक्षी ज्या समाजात आपण राहातो त्याचे जे हित तेच आपलेही हित असते. इतरांना दुःखी करून खरे सुख कोणी मिळवू शकत नाही. अशा पापी सुखामागेही दुःख दडलेले असते. पापाची बोचणी विलक्षण असते. ती मनाला सतत बेचैन करीत राहाते. तुमचा व्यवसाय कोणताही असो. तो चालवताना ही विचारसरणी मनात ठेवली तर तुमच्या हातून भ्रष्टाचार होणार नाही.

केवळ स्वार्थ वृत्तीने जगणाऱ्या माणसाचा इतर लोक तिरस्कार करतात. तो आपल्या कुटुंबात, गावात, समाजात अप्रिय होतो. ही मानवाची नैसर्गिक वृत्ती आहे. स्वार्थाविषयी घृणा आणि स्वार्थत्यागी वृत्तीविषयी आदर या वृत्ती न शिकवताच मानवाच्या ठिकाणी आल्या आहेत. स्वार्थपरायण व्यक्तीलाही स्वार्थत्यागाविषयी आदर आणि कौतुक वाटते. त्याचे अनुकरण व्हावे असे वाटते पण स्वार्थवृत्ती बलवत्तर असते, ती तोडणे फार कठीण जाते.

'हे विश्वचि माझे घर' हा पल्ला फार दूरचा आहे. पण तुम्ही तुमच्या माणसांचे घ समाजाचे जे विश्व माझे म्हणून मानता त्याचा घेर हळूहळू वाढता ठेवा. त्या समाजापुरता तरी तुमचा वैयक्तिक स्वार्थ आकुंचित करून तो सर्वांच्या हितात, सर्वांच्या सुखात, सर्वांच्या उत्कर्षात बुडवून टाका. हाच तुमच्या व्यवसायाचा वेदांत आहे असे समजा. व्यावसायिक नीती म्हणतात ती हीच आहे. जीवनात कोणाकरता तरी स्वार्थ सोडायला शिका, आणि अशा वर्तुळाचा व्याप हळूहळू विशाल होऊ द्या. स्वार्थात जो आनंद आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने मोठा आनंद स्वार्थाच्या त्यागात आहे याचा अनुभव घ्या. स्वार्थ हा स्व-भाव आहे, स्वार्थत्याग ही संस्कृती आहे. सुसंस्कृत व्हा, इतरांनाही तसे कराल.

२०. मातृ-पितृ वाणीचे सामर्थ्य

काही आई-बाप मुलांना जन्म देतात आणि वाढवतात. काही आईबाप मुलांचे जीवन घडवतात. आपण स्वत: जीवनाच्या पूर्व काळात अज्ञान मुले असतो. जीवनांच्या उत्तर अवस्थत आपण मुलांचे आईबाप होतो. आपण घेतलेले संस्कार अधिक संपन्न करून ते पुढल्या पिढीला आपण द्यावेत, याकरता कुटुंब संस्थेची योजना आहे. संस्कार देणाऱ्या इतर साधनात गुरू, ग्रंथ, थोरांची व्याख्याने-प्रवचने, चित्रपट नाटके इत्यादी अनेक गोष्टी आहेत. पण त्या सर्वात आईबापांचा अधिकार फार निराळा आहे. आईबाप आपल्या मुलांना आधी प्रेम देतात. निर्हेतुक प्रेम देतात. त्याबरोबर कळत न कळत, प्रसंगा-प्रसंगाने चांगले विचार व संस्कार देत असतात. या संस्कारामुळे व्यक्तीच्या जीवनाला एक निराळे वैशिष्ट्य प्राप्त होते.

आपल्या मातेने किंवा पित्याने विशेष प्रसंगी दिलेल्या उपदेशाच्या एका वाक्याने आपल्या जीवनाला विशेष दिशा कशी मिळाली असे सांगणारी अनेक थोर माणसे आपणाला दिसतील. एका सेवानिवृत्त न्यायाधिशाने, आपल्या जीवनावर आईच्या एका वाक्याने कसा प्रभाव पाडला तें सांगितले. अंतकाली मुलाला बोलावून आईने सांगितले–खोटे बोलू नकोस अन् अनीतीने वागू नकोस. आपल्या उभ्या आयुष्यावर आणि व्यवसायावर या एका वाक्याचा सतत परिणाम होत राहिला असे त्यांनी सांगितले. दुसऱ्या एका सार्वजनिक कार्यकर्त्याने, आपल्या जीवनावर वडिलांनी अंतकाली केलेल्या उपदेशाचा किती दीर्घकाल व खोल परिणाम झाला, ते सांगितले. ज्या गोष्टीचे महत्त्व जन्मभर वाटत असते तीच गोष्ट अंतकाली सुचते. वारंवार केलेल्या उपदेशाचे सार त्या प्रसंगी जिभेवर येते, हा त्याचा अर्थ आहे.

तुमचे तुमच्या अपत्यांवर प्रेम आहे का, असे विचारणे म्हणजे आई-बापांची यट्टा केल्यासारखे होईल. प्रेम असतेच, पण ते कधी आंधळे असते, कधी डोळस असते. आंधळे प्रेम मुलाला खाऊ पिऊ घालणे, चांगले कपडे देणे आणि त्याच्या हौशी पुरवणे येवढ्यापुरतेच मर्यादित असते. डोळस प्रेम त्याच्या पलीकडे जाते. मुलांनी आपल्या गुणांनी, कर्तृत्वाने आणि मोठेपणाने आपल्या कुळाची अब्रू वाढवावी, कुळाचे नाव मोठे करावे असे त्यांना वाटते. त्या दृष्टीने डोळस प्रेम करणारे आईबाप आपल्या मुलांना प्रसंगा-प्रसंगाने मार्गदर्शन करीत असतात. ही प्रक्रिया कशी होते ते साने-गुरुजींनी 'शामची आई' या पुस्तकात अत्यंत सहृदयतेने वर्णन केले आहे. आई-बापांनी हे पुस्तक या दृष्टिकोनातून अवश्य वाचावे.

मुलांच्या जीवनावर प्रामुख्याने कोणत्या गोष्टींचा संस्कार व्हावा असे तुम्हाला वाटते याचा शांतपणे कधी तरी विचार करा. असे बुद्धिपूर्वक, जाणूनबुजून आपण

करीत नाही, ते करणे जरूर आहे. हे संस्कार तुमच्या आचरणात आणण्याचा तुम्ही प्रयत्न करा, म्हणजे त्यातले खाचखळगे व अनुभव कळतील. मग प्रसंगाप्रसंगाने मुलांना ते संस्कार व विचार द्या. माझ्या आईला जीवनात या चारपाच गोष्टी महत्त्वाच्या वाटतात, असे मुलांना सांगता यावे. माझ्या वडिलांचा या चार गोष्टींवर फार कटाक्ष आहे, असे मुलांना सतत जाणवावे. या चांगल्या संस्कारांचे आईबापांचे उदाहरण आणि त्यांचे वातावरण कुटुंबात असले म्हणजे मुलामुलींच्या मनावर त्यांची मुद्रा उमटल्याशिवाय कशी राहील ? पण याला एक पुरवणी जोडायला पाहिजे.

मुलांचे तुमच्यावर प्रेम आहे का ? आईबाप मुलांवर प्रेम करतात हे नैसर्गिक आहे. ते पशुपक्ष्यांतही दिसते. पण मुलांनी आईबापांवर प्रेम करणे हा संस्कार आहे. तोही मुलांना मिळाला पाहिजे. आई-बापांच्या सुखदुःखांचा विचार करायला मुलांनाही शिकवावे लागते, नाही तर मुले स्वार्थी होतात. आईबापांचे प्रेम ते गृहीत धरून चालतात. आपणही मातापित्यांवर प्रेम केले पाहिजे ही जाणीव फार थोड्या अपत्यांत असते. ती निर्माण करणे अवश्य आहे.

मुलांचे तुमच्यावर प्रेम असेल तर त्या प्रेमाखातर मुले तुम्ही दिलेले संस्कार जीवनात जपून ठेवतील व पुढल्या पिढीला देतील.

२१. प्रथम द्या–मग अपेक्षा करा

माणूस केवळ अन्नावर जगत नाही आणि केवळ पैशाने सुख मिळत नाही. घरात अन्नकोट असून दुःखी राहाणारी अनेक माणसे आहेत, आणि संपत्तीत लोळणारे लोक रात्री झोप येत नाही म्हणून बिछान्यावर तळमळत असतात. शरीराच्या काही गरजा आहेत तशा मनाच्याही अनेक गरजा आहेत. देहाच्या गरजा आणि त्यांचा अपुरेपणा डोळ्यांना दिसतो. मनाच्या गरजा दिसत नाहीत. ज्याच्या त्यालाही त्या कळत नाहीत. त्या त्या प्रसंगामुळे त्यांची उणीव भासते. पण सोकल्याने आपण फारसा विचार करीत नाही. पण आपल्या मनाच्या अनेक भुका असतात, गरजा असतात. त्याही आपल्या जीवनाला फार मोठा आधार, आनंद आणि उत्साह देत असतात, बालांपासून थोरापर्यंत त्या त्या वयोमानाप्रमाणे या गरजा वाढत व बदलत असतात. काही बाल्यापासून प्रौढ वयापर्यंत कायमच असतात.

या गरजांच्या किंवा अपेक्षांच्या तृप्तीकरता आपण इतरांवर, भोवतालच्या माणसांवर अवलंबून असतो. माणसाचे व्यक्तिमत्त्व समाजात वाढत असते. आपली कृती पाहाणारा समाज भोवताली नसता तर जीवनातील पन्नाससाठ टक्के गोष्टी

करण्याची गरजच पडली नसती. पशूंचे कळप राहातात तशी माणसे राहिली असती. केवळ आपल्या देहप्रधान गरजा भागवण्याकरता एकत्र राहिली असती. मानव-समाज आणि पशुपक्षी-कीटक समाज यांत हा मोठा फरक आहे. व्यक्तीला समाधान, प्रोत्साहन व धीर देणाऱ्या अशा कोणत्या गरजा आहेत?

स्तुती, कौतुक आणि गुणग्रहण, यांची अपेक्षा बालांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयाच्या व्यक्तींची असते. शारीरिक, वाचिक आणि मानसिक अशी इतरांना कळणारी कोणतीही कृती आपण केली तरी इतरांनी तिचे गुणग्रहण करावे, तिला चांगले म्हणावे, तिच्यातील विशेष गुणांचे वर्णन करावे असे वाटते. आईबापांच्या सान्निध्यात बसलेले मूल आपल्या बालक्रीडा करून दाखवते आणि उत्तेजन मिळाले की त्याच कृती पुन्हा पुन्हा करते. आपल्या स्वयंपाकाची प्रशंसा व्हावी असे गृहिणीला वाटते. कष्टाचे कौतुक व्हावे असे पुरुषाला वाटते. "वन्स मोअर" मिळावा असे नटाला वाटते. टाळ्यांचा कडकडाट ऐकायला पुढारी उत्सुक असतो. स्तुती ऐकायला वक्ता उत्सुक असतो. कर्तृत्वाची प्रशंसा वृद्धाला हवी असते. बाल्यापासून वार्धक्यापर्यंत माणसे इतरांच्या प्रशंसेची अपेक्षा करीत असतात. त्यांना ती ज्या प्रमाणात हवी असते त्या प्रमाणात ते स्वतः मात्र इतरांना देत नाहीत. घेण्यास तयार, देण्यात कंजूष.

सेवा, साहाय्य, सहकार्य, मदत, ही माणसाची प्रासंगिक पण महत्त्वाची गरज असते. दोन व्यक्तींच्या नात्यावर किंवा संबंधावर या गरजेला निरनिराळी रूपे प्राप्त होतात. आपल्या कामात किंवा जीवनात इतरांचे सहाय्य ही महत्त्वाची गोष्ट सर्व गरजांच्या मुळाशी आहे. कोणाला आर्थिक सहाय्य, कोणाला शिफारसपत्रे, कोणाला सल्लामसलत, कोणाला वशिला, कोणाला शुश्रूषा इ. कष्टाची मदत–असे अनंत प्रकार आहेत. यात गरीब श्रीमंत असा भेद नाही. एखाद्या श्रीमंताची मोटार आडरानात बंद पडली तर ती ढकलायला त्याला चार गरीब माणसांची गरज असते. इतरांनी आपल्याला सहाय्य करावे अशी अपेक्षा वाटण्याचे प्रत्येकावर अनेक प्रसंग येतात. पण इतरांवर तसे प्रसंग आले तर आपण मदत करतो का, तशी आपली नैसर्गिक वृत्ती आहे का याचा विचार आपण करावा.

मानसन्मान, आदर, मोठेपणा याची माणसाला फार भूक असते. इतरांनी तो दिला की अंगावर मूठभर मास चढते. गोंद्याला गोविंदराव म्हटले की बरे वाटते. धाकट्यांनी मोठ्याला लवून नमस्कार केला म्हणजे मन प्रसन्न होऊन आशीर्वाद द्यावासा वाटतो. भोजनाच्या पंक्तीत मुख्य पाहुण्याजवळ नेऊन बसवले की चार घास अधिक जातात. सभेमध्ये अध्यक्षांच्या जवळपास नेऊन बसवले की बरे वाटते. हारगुच्छाचा स्वीकार करताना आनंद होतो. मानसन्मान आणि आदर देण्याघेण्याचे जीवनात शेकडो प्रसंग येत जात असतात. पण काही माणसे आपल्याच गुर्मीत असतात. त्यांनी फक्त सन्मान घ्यायचा असतो; द्यायचा नसतो ! दुसऱ्याचा सन्मान

केल्यामुळे आपलाही सन्मान होतो हे आपण विसरतो. इतरांना त्यांचा योग्य तो आदर, निरनिराळ्या मार्गांनी दाखवा. आईबाप, वडील माणसे, गुरू, अध्यापक, पाहुणे, गरजू माणसे, कोणी का असेना, तुच्छतेने वागवू नका. अहो जाहो म्हणा, सौजन्य दाखवा, आदरसत्कार करा इतरांना आनंद देण्यात आपला काही तोटा होत नाही. पण अलीकडे अनादराची आणि तुच्छतेची फॅशन वाढत आहे. आपणच तिला बळी पडणार आहोत ही जाणीव ठेवली तर सुधारणा होईल.

समाजात दुर्मिळ होत चाललेला एक गुण म्हणजे कृतज्ञता. या गुणाचे प्रमाण मानवजातीत आधीच कमी. त्याला आज अधिकच ओहोटी लागली आहे. इतरांनी आपल्याकरता जे केले ते त्यांचे कर्तव्यच होते, त्यात काय विशेष केले, अशी तुच्छतेची भावना वाढत आहे. आई-बाप, गुरुजी, शिक्षणसंस्था, आश्रयदाते, नातेवाईक, मित्र यांनी आपल्याकरता घेतलेल्या श्रमाची जाणीव आणि तिची अंशतः परतफेड करण्याची वृत्ती नष्ट होत चालली आहे. समाजातील शेकडा दहापंधरा माणसे कृतज्ञता वृत्तीची असतात. बाकीची स्वार्थनिष्ठ असतात. तुम्ही ज्यांना थोडेफार सहाय्य केले त्यांच्याकडून तुम्ही काय अपेक्षा करता ? तीच अपेक्षा तुमचे सहाय्यक तुमच्याकडून करतात. इतरांनी आपल्याकरता घेतलेल्या श्रमांची जाणीव ठेवणारे फार थोडे. आपल्या आजच्या स्थितीला कोण कारणीभूत आहे आणि त्यांच्या त्या सहाय्याबद्दल आपण काय कृतज्ञता दाखवली याचा आपल्या मनाशी विचार करा.

जीवनातील आनंद व उत्साह वृद्धिगत करणाऱ्या या चार महत्त्वाच्या गरजा व अपेक्षा आहेत. इतरांच्या बाबतीत त्या आधी आपण पार पाडाव्यात. मगच त्यांच्याकडून त्या गुणांची अपेक्षा करावी.

२२. भौतिक संस्कृती–मानसिक विकृती

एका फ्रेंच तत्त्वज्ञान्याने अमेरिका आणि यूरोप यांची तुलना करताना एक मार्मिक विधान केले होते. 'दि अमेरिकन्स आर इंटरेस्टेड इन दि आयडिया ऑफ प्रोग्रेस; बट दि फ्रेंच आर इंटरेस्टेड इन दि प्रोग्रेस ऑफ आयडियाज.' अमेरिकनांना भौतिक आणि वैज्ञानिक प्रगतीमध्ये अधिक गोडी वाटते, तर फ्रेंच लोकांना विचारांच्या प्रगतीमध्ये, बौद्धिक आणि तत्त्वज्ञानाच्या प्रगतीमध्ये अधिक औत्सुक्य वाटते. या विधानातील अतिशयोक्ती सोडून देऊ. कारण अशी देशांची किंवा समाजांची काटेकोर विभागणी करता येत नाही. प्रत्येक समाजात या दोन प्रवृत्ती असतात हे सत्य त्यातून घ्यावे. काही व्यक्तींना भौतिक सुधारणेने मानवाची उन्नती होईल असा विश्वास

आहे. उलट वैचारिक, आंतरिक विकासाने मानवाची प्रगती होईल असे या दुसऱ्या टोकाच्या विचारवंतांना वाटते. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीकरिता भौतिक बाह्य प्रगतीची आवश्यकता आहे, तर या प्रगतीबरोबर मानसिक व बौद्धिक उन्नती होणे हीदेखील तितकीच महत्त्वाची गरज आहे. पण आज जगाचे चित्र असे दिसते की मानवाचा अधिक भर बाह्य सुधारणेवर आहे.

वैज्ञानिक प्रगतीमुळे आज बाह्य जीवन पुष्कळ सुखाचे झाले आहे. अन्न, वस्त्र, घरे, वाहातूक साधने, ज्ञानसाधने, रंजन साधने यांत खूप प्रगती झाली आहे. काही समाजांनी या प्रगतीत पुष्कळच आघाडी गाठलेली आहे; काही मध्यावर आहेत, काही देश मागे आहेत. पण विज्ञानाच्या साहाय्याने सर्व समाजांना ऐहिक उन्नतीची साधने नजीकच्या काळात उपलब्ध होतील अशी आशा बाळगायला जागा आहे. मुबलक अन्नधान्य-दूधदुभते-मांसमच्छी; राजवाड्यासारखी घरे; श्रीमंती कपडे-लत्ते; श्रम वाचवणारी सर्व यंत्रे; माणसागणिक मोटारी-टेलीफोन; ज्ञानाच्या मुबलक संस्था व सोयी; असे चित्र अमेरिकेसारख्या काही देशात दिसते. तो आदर्श ठेवून इतर देशही वाटचाल करू पाहात आहेत.

अमेरिकन जनतेतही आत्मनिरीक्षण करून आपल्या गुणदोषांकडे धीटपणे पाहाणारा, स्वतःच्या कमीपणावर बोट ठेवणारा एक विचारवंतांचा वर्ग आहे. या लोकांना असे वाटते की आपली प्रगती एककल्ली झालेली आहे. भौतिक प्रगतीबरोबर बौद्धिक, मानसिक आणि नैतिक प्रगती झालेली नाही. त्यामुळे आधुनिक सुधारणेतून जी सुखाची अपेक्षा होती, ते सुख जवळ न येता अद्याप लांबच आहे. माणसांच्या मनात स्वार्थाची अनावर हाव निर्माण झाली आहे. पैसा हे दैवत झाले आहे. तो प्राप्त करून घेण्याकरता नीती-अनीती, दयामाया यांचा विचार होत नाही. मानवी जीवन किडामुंगीसारखे कस्पटासमान झाले आहे. माणूस माणसाचा शत्रू झाला आहे. शरीर-सुखाच्या, इंद्रिय सुखोपभोगांच्या इच्छा मर्यादेपलीकडे गेल्या आहेत. व्यसने वाढत आहेत. उच्च स्थानी असणाऱ्या नेत्यांमध्येही चारित्र्य आणि शील या शब्दांना महत्त्व राहिलेले नाही. अनेकांच्या व्यभिचारांच्या कथा प्रकाशात येत आहेत. या कथा प्रसिद्ध करून पैसा-प्रसिद्धी मिळवावी हा इतरांचा उद्देश आहे, नैतिक जागृती हा उद्देश नाही. या अनिष्ट गोष्टी अमेरिकेपुरत्याच मर्यादित नाहीत. त्यांची लागण जगातल्या सर्व देशात आणि सर्व समाजात झाली आहे. भारतातही ती आहे. लैंगिक रोग, मानसिक रोग आणि हृदयविकारासारखे रोग वाढत आहेत.

ऐहिक प्रगती अभूतपूर्व झाली पण आंतरिक प्रगतीत जगाचे पाऊल मागे पडले आहे. प्रामाणिकपणा, प्रेम, दया, शांती, आत्मसंयमन, सहिष्णुता, त्यागवृत्ती, माणुसकी हे नैतिक, सामाजिक आणि मानसिक गुण आहेत, त्यांत जग मागे पडत चालले

आहे. सुखाकरता सर्व खटपट करूनही मनाला शांती व समाधान वाटत नाही. या दृष्टीने जगातले विचारवंत आता आत्मनिरीक्षण करू लागले आहेत. ऐहिक उन्नती-बरोबर वैचारिक नैतिक उन्नती झाली नाही तर माणूस स्वार्थी, सुखलोलुप, अन्यायी, निर्दय, पशू बनतो हा अनुभव जगाला आला आहे.

माझे एक स्नेही आहेत. ग्रामीण भागातील जनतेची स्थिती सुधारावी म्हणून त्यांनी व त्यांच्या सुविद्य पत्नीनी स्वार्थत्याग करून आपले आयुष्य या कामाला वाहिले व एकाच भागावर लक्ष केंद्रित करून त्या भागाची स्थिती सुधारली. भूमी-हीनांना जमिनी मिळाल्या, त्या सुपीक झाल्या, धान्याचे प्रमाण वाढले, पैसा हातात आला, घरे सुधारली, पोषाख सुधारला, वाहने आली, आणि द्रव्यसंचय झाला त्या-बरोबर हेच लोक सावकारी करून इतर लोकांचे शोषण करू लागले ! इतर संपन्न समाजातील सर्व नैतिक गुणदोष या नवोदित समाजात आले. आता या कार्यकर्त्यांना आकलन झाले की भौतिक आणि नैतिक प्रगती एकाच वेळी झाली पाहिजे, नाहीतर खरी सुधारणा होत नाही.

मानवाची भावी काळातील संस्कृती व प्रगती सुखावह होण्याकरता ऐहिक आणि आंतरिक प्रगतीवर सारखाच भर दिला पाहिजे. वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रगती समांतर झाली पाहिजे. प्राचीन भाषेत सांगावयाचे म्हणजे अभ्युदय आणि निःश्रेयस यांची सांगड घातली पाहिजे. नीति-धर्मावर आधारलेला अर्थ आणि काम हेच पूर्णतेकडे नेईल.

[८–११–७३

२३. निष्काम कर्म का निष्कर्म काम !

लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य लिहून निष्काम कर्म हा शब्दप्रयोग रूढ केला. फलाची, फायद्याची, स्वार्थाची, कमिशनची अपेक्षा न ठेवता कर्तव्यबुद्धीने समाजातील आपापली नेमलेली कर्तव्ये करावीत. फलाची आसक्ती ठेवू नये, कारण ते मिळणे आपल्या अधिकारात नाही. मिळाले तर घ्यावे, न मिळाले तर निराश होऊ नये. १९१८ ते १९४८ च्या तीस वर्षांच्या काळात हे तत्त्वज्ञान समजणाऱ्या व यथाशक्य जीवनात आणणाऱ्या एकदोन पिढ्या होऊन गेल्या. स्वातंत्र्य आले. त्या घटनेपासून निराळेच तत्त्वज्ञान अस्तित्वात आले आहे. पूर्वीचे शब्द वापरून त्याचे वर्णन करायचे झाल्यास 'निष्कर्म काम' म्हणजे काम न करता फलाची इच्छा धरणारा समाज हळू हळू अस्तित्वात आला आहे. (काम = इच्छा, वासना) शक्य तितके कमी काम, शक्य झाले तर काम टाळणे, सावकाश करणे, मंदगतीने करणे, वेळ काढणे, कमीत

कमी तास काम करणे; आणि त्याचे फल म्हणजे मोबदला, वेतन, पगार, मजुरी, आर्थिक फायदे शक्य तितक्या वाढत्या प्रमाणात घेणे, त्यांचे प्रमाण वाढते ठेवण्याकरता सतत चळवळीचा तवा तापता ठेवणे हे नवे तत्त्वज्ञान अस्तित्वात आले.

देशातील गरिबी, दारिद्र्य, दैन्य कमी करावे हा एकीकडे राज्यकर्त्यांचा उद्देश तर दुसरीकडे कामात, कष्टात, मेहेनतीत कपात आणि मोबदल्यात वाढते प्रमाण हा काम करणारांचा व त्यांच्या पुढाऱ्यांचा आग्रह. म्हणजे मोटार सुरू करून एकीकडे वेग वाढवायचा आणि दुसरीकडे ब्रेक लावायचा अशासारखी देशाची स्थिती झाली. निष्कर्म कामाची म्हणजे काम न करण्याची अनेक रूपे निघाली. कामाचे तास कमी करून घेणे, सुट्ट्या वाढवून घेणे, काम वाढवायला विरोध करणे, अधिक उत्पादनाच्या यंत्रपद्धतीला विरोध करणे, मंद काम, बंद काम, संप अशासारखे अनेक प्रकार निर्माण झाले आहेत. या सर्वांना वृत्तपत्रांनी, व बातमीदारांनी प्रोत्साहन देण्याचे धोरण ठेवले. 'संप यशस्वी झाला', 'संप बारगळला' अशी मोठमोठी शीर्षके देऊन संपाला उत्तेजन देण्याचे धोरण वृत्तपत्र खपाचे दृष्टीने फायद्याचे असल्यामुळे ते स्वीकारले गेले संप व पगारवाढीचे खटले न्यायासनापुढे गेले तर वेतनवाढीचा फक्त विचार होऊ लागला. शासन कामगारांच्या बाजूने आहे हे दाखवण्याचा हा एक मार्ग आहे. कामाच्या प्रमाणाचा किंवा उत्पादनवाढीचा प्रश्न विचारात घेण्याची गरजच वाटेनाशी झाली. कामगारांचे पुढारी आणि कामगार म्हणू लागले की उत्पादनवाढीची जबाबदारी आमची नाही; हजर राहिल्याबद्दल आम्हांला वेतन मिळाले पाहिजे. या सर्वांचा परिणाम उत्पादन घटण्यात, कामाचे प्रमाण कमी होण्यात आणि कामाचा खर्च वाढण्यात झाले. ही साथ खाजगी कारखान्यात, मग सरकारी कारखान्यात, त्यानंतर कारकुनी स्वरूपाच्या सरकारी खात्यात, पुढे शिक्षणसंस्थात सर्वत्र सुरू झाली आहे. पसरत आहे. अधिक काम करायला पाहिजे व उत्पादन वाढवून संपत्ती वाढायला पाहिजे असे म्हणणारी माणसे जुनाट ठरू लागली. ते बहुजन समाजाचे, कामगार वर्गाचे, कष्ट करणारांचे, कारकुनांचे शत्रू ठरू लागले. काम करा, अधिक कष्ट करा, उत्पादन वाढवा व नंतर अधिक वेतन मागा असे उघडपणे म्हणण्याची चोरी झाली. असे म्हणणारा जणूं काही भांडवलदारांच्या बाजूचा, आणि संपाला प्रोत्साहन देणारा कामगारांच्या बाजूचा. अथांग देशाचा, सर्व समाजाच्या हिताचा, कामगार भांडवलदारांव्यतिरिक्त समाजात असलेल्या अन्य वर्गाचा विचार करणारा एक तटस्थ व सर्वहितरत वर्ग असू शकतो ही भावनाच नाहीशी झाली.

कमी काम करण्याचा, कामे न करण्याचा, चुकारपणा करण्याचा मार्ग देशाला उत्कर्षाला न नेता अधोगतीला नेईल. एकीकडे अधिक काम करून अधिक उत्पादन वाढवून देशाच्या संपत्तीत वाढ करावी आणि एकीकडे श्रमाच्या मोबदल्याचे न्याय्य वाटप व्हावे याकरता झगडत राहावे असे जपानमधील कामगारांचे धोरण असते.

ते केवळ स्ववर्गाचा, स्वार्थाचा विचार न करता सर्व समाजाचा व सर्व देशाचा विचार करतात. या देशातले अनुभवी कामगारपुढारी या मताचे आहेत. पण जहाल पुढाऱ्यांचे पुढे ते नेमस्त अन् मवाळ ठरतात. सुदैवाने कामगार वर्गातही आता विचारी आणि दूरदर्शी नेतृत्व निर्माण होत आहे ही शुभद घटना आहे.

निष्क्रिय समाजाला कामाचे तत्त्वज्ञान शिकवण्याकरता गीता सांगितली गेली. 'गीता ईज दि गॉस्पेल ऑफ वर्क' असे या ग्रंथाचे वर्णन करता येईल. हा कामाचा संदेश पुन्हा नव्याने आजच्या भाषेत सांगण्याची वेळ आली आहे. हे विद्वान तरुणांचे कार्य आहे, मिशन आहे.

[२९-१२-७३

२४. वाईट माणसाची चांगली कृती

जगात चांगली आणि वाईट दोन प्रकारची माणसे असतात हे स्थूलमानाने खरे आहे. पण वाईट माणूस सर्वस्वी वाईट नसतो आणि चांगल्या माणसाचेही कधी तरी वाकडे पाऊल पडते. माणसाचा वर्ग पाहण्यापेक्षा त्याची कृती पहावी. विशेषतः वाईट माणसाने चांगली कृती केली तरी तिची थोडी अधिकच स्तुती करून उत्तेजन द्यावे.

वाईट माणसातही सात्त्विकतेचा अंश असतो. आधुनिक मानसशास्त्रापेक्षा प्राचीन सांख्यशास्त्राने मनुष्यस्वभावाची विभागणी अधिक शास्त्रशुद्ध केली आहे. प्रत्येक माणसात सत्त्व, रज आणि तम हे तीनही गुण असतात. निरनिराळ्या प्रसंगी यातला एखादा गुण प्रभावी होतो आणि इतर दोन गुणांवर तो मात करतो.

होतो सत्त्व प्रभावी रजस्तमावरि कधी करी मात
इतरांवरी रजोगुण, तमो-गुणाची कधी असे जीत ॥ गीता १४.१०

सात्त्विक माणूसही कधी क्रोधाविष्ट होऊन, किंवा कामवासनेला अथवा अन्य मोहाला बळी पडून तामसवृत्तीमध्ये जातो. उलट तामसी माणसाच्या ठिकाणी एखाद्या ऐन प्रसंगी सत्त्वगुण उफाळून वर येतो. खल पुरुषात सज्जनता असते आणि चोर-दरोडेखोरातही सात्त्विक माणसाबद्दल आदर, दया इ. भावना असतात.

कै. राम गणेश गडकरी यांच्या पुण्यप्रभाव नाटकात हे तत्त्व फार सुंदर रीतीने व्यक्त केले आहे. त्यातील खलनायक वृन्दावन हा वसुंधरा या परस्त्रीला आपल्याशी विवाहबद्ध होण्याकरता जंग जंग पछाडतो. तिने होकार द्यावा म्हणून तिचा बालक दीनार याचाही मुडदा पाडतो. शेवटी ईश्वरावर भरंवसा ठेवून ती पतिव्रता हातात

हार घेऊन त्याला म्हणते धीर असेल तर मान पुढे कर; एका क्षणात वृन्दावनच्या अंत:करणात परिवर्तन होते, सत्त्वगुण जागा होतो आणि हार घेण्याऐवजी हार खाऊन तिच्या पायावर हात ठेवून म्हणतो :—

तुझा दीनार मेला नाही.

अशीच एक दुसरी गोष्ट. एकदा बाजारहाट करून एक माणूस रात्रीच्या वेळी आपल्या गावाकडे चालला होता, वाटेत तीन चार चोरांनी गराडा घालून त्याचे सगळे सामान सोडले. त्यात तुकारामाची गाथा दिसली. त्याबरोबर त्यातल्या म्होरक्याने आपल्या गालावर तर चापटचा मारून घेतल्याच शिवाय त्याचे सामान परत बांधून दिले आणि त्या माणसाला वाटेला लावून दिले.

माणसातले चांगले गुण बाहेर काढण्याचे, त्याला उत्तेजन देण्याचे आपले धोरण असावे. अलगुजामध्ये कोमल आणि तीव्र दोन्ही स्वर असतात. ते वाजवणाऱ्याच्या ठिकाणी कौशल्य असेल तर तो हवे ते स्वर काढू शकेल. असेच माणसातल्या चांगल्या गुणांचे आहे. बिघडलेली आणि नापास होणारी अनेक मुले माझ्या शाळेत येऊन सुधारून यशस्वी होऊन बाहेर पडली आहेत आणि जीवनात यशस्वी झाली आहेत.

वाईट माणसाने एखादे जरी सत्कृत्य केले तरी असे समजा की त्याच्या ठिकाणी सात्त्विकतेचा, चांगुलपणाचा, सद्गुणांचा अंकुर आहे. त्याला उत्तेजन देऊन जोपासना केली पाहिजे. त्याच्या चांगल्या कृतीला चांगले म्हणा. त्याच्यावर विश्वास टाका. त्याच्या दुर्गुणांची जाणीव त्याला द्या. सुधारण्याची बलवत्तर महत्त्वाकांक्षा त्याच्या ठिकाणी निर्माण करा. तो माणूस सुधारण्याचा पुष्कळ संभव आहे. त्याला संधी द्या. न सुधारला तर त्याचे नशीब.

मी आशावादी आहे. माणसे सुधारू शकतात असा माझा विश्वास आहे. त्या दृष्टीने मी इतरांकडे पाहातो. सत्कृत्य जेथे जेथे दिसेल तेथे त्याची तोंड भरून स्तुती करतो. खवचट आणि मर्मभेदक बोलणारी आणि आपल्याच चाणाक्षपणाचे कौतुक करणारी माणसे पुष्कळ आहेत. त्यांचा अहंकार तृप्त होतो पण इतरांच्या ठिकाणी सूडाची भावना निर्माण होते. माणसाचे चांगुलपण शोधून, त्याच्या ठिकाणचे सद्गुण शोधून ते वाढण्याकरता त्याला प्रोत्साहन द्या.

घरी तुमच्या मुलांशी वागताना, नातेवाईकांशी व्यवहार करताना, शेजाऱ्यांशी संबंध ठेवताना, कारखान्यात, कचेरीत कामे करताना, सर्व पातळीवर सर्वत्र तुम्हांला बरी वाईट दोन्ही प्रकारची माणसे भेटतील. माझ्या अनुभवाचा उपयोग तुम्हांला होत असल्यास पहा आणि तो अनुभव इतरांनाही सांगा.

[१-१-७४

२५. पुतळे शिवाजीचे अन् चाळे संभाजीचे !

महाराष्ट्र भूमी भाग्यवान आहे. तिला मधून मधून बौद्धिक चैतन्य, नैतिक ध्येयवाद आणि कर्तव्यवृत्तीची प्रेरणा देण्याकरता अलौकिक पुरुष या भूमीत जन्म घेतात. अगदी अलीकडे होऊन गेलेल्या पुरुषांचीच मालिका पहाना. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास ही संतश्रेष्ठांची मालिकाच होऊन गेली. शिवाजी, पहिला बाजीराव, नाना फडणीस हे इतिहास घडवणारे पुरुष झाले. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर, स्वा. सावरकर हे कृतिशील विचारवंत झाले. या महापुरुषांनी महाराष्ट्राच्या बुद्धीचा, मनाचा आणि आचाराचा पिंड बनवला. शिवाजीराजे हे या सर्वांच्या अग्रभागी आहेत. त्यांनी विचार, वैभव आणि वैराग्य या तिन्ही गुणांचा परिपाक करून जीवनाचा एक आदर्श महाराष्ट्रापुढे ठेवला. म्हणून महाराष्ट्र राज्याने व जनतेने ठिकठिकाणी त्यांचे पुतळे उभारले आहेत. कोणत्याही गावात जा, तेथे शिवाजी पुतळा आणि शिवाजी चौक आहेतच.

पण या पुतळ्यांच्या दृष्टीदेखत, त्यांच्या सावलीत आज काय चालले आहे हे त्या पुण्यपुरुषाला खरोखरीच दिसले तर ते पुतळे शरमेने मान खाली घालतील. ते म्हणतील, संभाजीने माझ्या हयातीतच मी जोपासलेली मूल्ये पायाखाली तुडवली, तसेच आज येथे, हे माझे नाव सांगणारे वारसदार करीत आहेत. पुतळे माझे आहेत पण त्यांचे सर्व चाळे संभाजीसारखे आहेत. त्या माझ्या पुत्राने माझ्या जीवनाची शेवटची वर्षे मला दुःख, विवंचना आणि यातना दिल्या, तसेच हे लोक करतीत आहेत. पुतळे माझे आणि चाळे संभाजीचे ! शिवरायांना असे वाटले तर त्यात काही आश्चर्य नाही. आपण आत्मनिरीक्षण करायला हवे.

शिवबाने स्त्रियांबाबत एक उच्च आदर्श महाराष्ट्राला घालून दिला. कल्याणच्या सुभेदाराची सौंदर्यसंपन्न खाण मातेसमान मानली. युद्धात आणि अन्य प्रसंगी शत्रूच्याही स्त्रियांना संरक्षण देऊन सौजन्याने वागवा, असा त्यांचा सैन्याला आदेश होता. संभाजीने शुद्ध चारित्र्याचे हे व्रत कसोशीने पाळले नाही. बखरकारांनी वर्णन केलेले त्याचे व्यभिचार, नाटककादंबरीकारांचेही आवडते विषय बनले ! आजही आपल्या समाजात संभाजीचा कित्ता गिरवला जात आहे, शिवाजीचा नव्हे. शिक्षिका आणि नर्स यांना लहान गावात अब्रूने राहाणे अशक्य झाले आहे. गोरगरीब, असहाय्य स्त्रियांवर राजरोस अत्याचार होत आहेत. ज्यांनी स्त्रियांना माता-भगिनीसमान मानून संरक्षण द्यायला हवे, तेच त्यांच्याकडे वाकड्या नजरेने पाहून अब्रू घ्यायची संधी शोधीत असतात. शिवजयंतीला एक दिवस शिवबांच्या पुतळ्याला हार घातला म्हणजे या पापाचे परिमार्जन होते काय ?

मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याकरता शिवबाने अनेक वेळा आपले प्राण धोक्यात घातले. त्या ध्येयाकरता बाजी प्रभूसारख्या अनेक नररत्नांचे बळी

दिले. प्राणाचाही त्याग करायला जो सिद्ध होता त्याला संपत्ती, सत्ता आणि सुखोपभोग यांचा लोभ कोठून असणार ? कष्टाने मिळविलेल्या राज्याचाही त्याला लोभ नव्हता. समर्थ रामदास भिक्षेला आले तर त्यांच्या झोळीत त्याने सर्व राज्य टाकले. त्या महापुरुषाने ते राज्यही परत दिले आणि महाराष्ट्राला भगवा झेंडा दिला. दोन योगी आणि त्यागी यांचे हे आदर्श ! एक संत योगी, दुसरा श्रीमान योगी. बापाने मिळवलेले संपूर्ण राज्य आपल्याला मिळावे म्हणून संभाजी मोगलाकडे आश्रयाकरता गेला आणि परत आला तो स्वराज्यातील किल्ले जिंकण्याकरता. राज्य, सत्ता आणि सुखोपभोग यांच्या लोभापायी संभाजीने शिवबांना मानसिक यातना दिल्या. बापाने जोपासलेला त्यागाचा ध्येयवाद त्याला पुढे चालवता आला नाही. गेल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात नव्हे तर सर्व देशात काय चालले आहे ? स्वातंत्र्यवीरांनी हाल-अपेष्टा भोगून, त्याग करून, बलिदान देऊन स्वातंत्र्य मिळवले. उद्देश हा की हरामराज्य जाऊन या भूमीत रामराज्य व्हावे. प्रत्यक्ष काय दिसते ? त्यागाचा आणि सेवेचा ध्येयवाद नष्ट झाला आहे. मिनिस्टरपासून पोर्टरपर्यंत, ग्रामपंचायतीच्या सभासदापासून लोकसभेच्या सभासदापर्यंत, शिपायापासून उच्च अधिकाऱ्यापर्यंत सर्वजण स्वार्थ, सत्ता आणि द्रव्यसंचय करण्यात मग्न झालेले आहेत. त्याग आणि सेवा यांचा उपदेश करणारा माणूस कालबाह्य आणि वेडा समजला जात आहे. शिवबांचे पुतळे अश्रू ढाळीत आहेत.

शिवबाने कर्तबगार माणसांचा संग्रह केला. जातगोत, धंदा, पंथ या गोष्टी गौण मानल्या. मराठे, न्हावी, कायस्थ, ब्राह्मण, मुसलमान अशा सर्व कर्तबगार माणसांचा स्वराज्याकरता उपयोग करून घेतला. संभाजीला या कर्तबगार माणसांचे मोल आकलन झाले नाही. तो त्यांना नष्ट करायला प्रवृत्त झाला. आज आपल्या समाजातील लोकांची दृष्टीही आकुंचित झाली आहे. जात, पक्ष आणि युनियन यांच्या हितापुढे समाजाच्या हिताचा होम करायला पुढारी कचरत नाहीत. ही शिवबांची परंपरा नाही.

शिवबाने कितीतरी सद्‌गुणांचा वारसा आपल्याला दिला आहे. पुतळ्यांची जोपासना अवश्य करा; पण या सद्‌गुणांचे अनुकरण केले नाही तर पुतळे उभे करून काय उपयोग ? या दगडाच्या पुतळ्यात आपण सद्‌गुणांची मूल्ये भरू या. पुतळे पाहून सद्‌गुणांचे स्मरण करू या. त्याग, चारित्र्य, सेवा हा ध्येयवाद जोपासू या. नाही तर शिवबा म्हणतील, "पुतळे माझे अन् चाळे संभाजीचे !"

आपण संभाजीचे पूर्वजीवनातील दुर्गुण विसरून त्याच्या उत्तर जीवनातील सद्‌गुण पाहून त्यांचे अनुकरण करू या. पराक्रम, निर्भयता, देशप्रेम, न्यायबुद्धी हे सद्‌गुणही संभाजीच्या जीवनात शिवबांच्या मृत्यूनंतर दिसून आले म्हणून गुणग्राही

महाराष्ट्र त्यांचीही पुण्यतिथी तितक्याच प्रेमाने साजरी करतो. संभाजीचे चाळे विसरा आणि त्याच्याही सदगुणांचे अनुकरण करा, हा संदेश शिवबांचे पुतळे देत आहेत.

[२२-३-७४

२६. भ्रष्टाचार : कारणे व उपाय

प्राचीन काळी पाप आणि पुण्य, धर्म आणि अधर्म हे शब्द ज्या आचाराकरता वापरले जात होते त्यांनाच आजच्या चालू भाषेत आपण सदाचार व भ्रष्टाचार म्हणतो. भ्रष्टाचारावर एक उपाय म्हणून मध्यंतरी एका प्रसिद्ध नेत्याने सदाचार संघ किंवा मंडळ काढून साधूसंतांची एक संघटना स्थापन केली होती. त्याच्या फार पूर्वी आमच्या संस्थेतील एका नवीन वसतिगृहाला मी 'सदाचार वसतिगृह' असे नाव दिले होते. एकदा मा. यशवंतराव चव्हाण संस्थेत आले असता त्यांनी विचारले ' दिल्लीच्या सदाचार मंडळाचा या च्याशी काही संबंध आहे का ?' त्यावर मी म्हणालो 'आमची ही कल्पना फार जुनी आहे.' सदाचार हे आज साठपासष्ट वर्षे संस्थेचे मुख्य ध्येय आहे. माणूस ज्या कारणाकरता भ्रष्ट आचरण करतो ती व्यक्तीच्या जीवनातून नाहीशी करता आली, तशी पूर्वतयारी केली तर भ्रष्टाचाराला काही तरी आळा बसेल. या कारणांची थोडी चर्चा करू.

एकाद्या व्यवसायात पदार्पण केल्यानंतर अल्पकाळातच श्रीमंत होण्याची व द्रव्यसंचय करण्याची हाव मनात निर्माण झाली की माणूस तो व्यवसाय अनीतीने करू लागतो. व्यापारी, डॉक्टर, वकील, सरकारी अधिकारी, रेल्वे-पोस्ट-बँकातील नोकरवर्ग इत्यादी सर्वांना हे विधान लागू आहे. ज्या गोष्टीला काही काळ लागायचा ती घाईने लवकर साध्य होण्याकरता माणूस वाममार्गाने आपले उद्योग करू लागतो, हा काळाचा विचार.

आता कष्टाचा व श्रमाचा विचार करू. प्रामाणिकपणाने संपन्नता व द्रव्य-प्राप्ती करायची झाली तर श्रम करावे लागतात, सकाळपासून सायंकाळपर्यंत काम करावे लागते. त्याला अंग मोडून काम करण्याची सवय बाळपणापासून लागायला हवी. ती ज्यांना नसते ते द्रव्याजनाचे जवळचे मार्ग (शॉर्ट कटस्), कमी श्रमाचे असे शोधण्याच्या प्रयत्नात असतात. या आळशी, ऐतखाऊ, कामचुकार माणसांच्या हातून दुराचार होतो.

व्यसनांची गुलामगिरी हे एक भ्रष्टाचाराचे प्रमुख कारण आहे. व्यसनांचे प्रकार आज वाढत आहेत. त्यांत मादक पदार्थांचे सेवन, फाजील मद्यपान, धुम्रपान इत्यादी श्रीमंती व्यसने आहेतच. त्याव्यतिरिक्त चित्रपट, नाटके, हॉटेलमधले खाणे

या एरवी साध्या दिसणाऱ्या गोष्टी मर्यादेबाहेर करणे हेही व्यसनांतच जमा होते. या गोष्टींना लागणारा अमाप पैसा प्रामाणिकपणाने मिळेनासा झाला की लबाडीचे व चोरीचे मार्ग दिसू लागतात. चांगल्या मुला-मुलींना ही व्यसने लागली तर तो भ्रष्टाचाराचा पाया घातल्यासारखे होते. या व्यसनापायी अनीतीच्या मार्गाला अनेक तरुण तरुणी लागतात. गुन्हेगारीत सापडलेल्या मुला-मुलींची वये वीस ते पंचवीस या सुमाराची असतात असे वृत्तपत्रातील बातम्यांवरून सहज लक्षात येते.

वाईट संगती हेही भ्रष्टाचाराचे मूळ आहे. गुन्ह्याचे, चोरीचे, लबाडीचे मार्गाला माणूस आपण होऊन सहसा जात नाही. पण व्यसनाधीन व गुन्हेगार माणसे भोळ्याभाबड्या लोकांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांना दुराचाराच्या मार्गाला लावतात. बालपण आणि तारुण्य हे वाईट संगती लावण्याला अनुकूल वय असते. त्या वयात काळजी घेतली पाहिजे.

उधळेपणाची सवय अनीतीकडे नेते. कपडे-लत्ते, खाणे-पिणे व इतर षोक करण्याची सवय पूर्वीपासून ज्यांना आहे त्यांना नंतरच्या काळात पैसा कमी पडला की ते वाममार्गानी पैसा मिळवून आपला षोक पुरा करायच्या मागे लागतात.

शारीरिक सुखांच्या इच्छेवर संयम नसणे हे तर सर्व पापाच्या मुळाशी असलेले बलवत्तर कारण आहे. या संयमाच्या अभावी सर्व प्रकारची आर्थिक आणि लैंगिक गुन्हेगारी समाजात वाढत राहाते.

गरिबी उपासमारी आणि बेकारी यांमुळे गुन्हेगारी वाढते हे सर्वस्वी खरे नाही. अत्यंत गरिबीत पण अब्रूने दिवस काढणारी अनेक कुटुंबे आहेत. गरिबी नष्ट करायला पाहिजे यात शंकाच नाही. पण वर सांगितलेल्या कारणांचा गरिबीशी फारसा संबंध पोचत नाही. म्हणून आपण स्वतः व आपली मुले-मुली आणि कुटुंबातली माणसे भ्रष्टाचारात सापडायला नको असली तर आधीपासून तसे वातावरण घरात निर्माण केले पाहिजे. गरीब, मध्यम आणि श्रीमंत अशा सर्व थरांवरील कुटुंबानी ही काळजी घेतली पाहिजे.

न्याय, सचोटी आणि सदाचार यांना सांभाळून जी द्रव्यप्राप्ती होईल व जी सुखे मिळतील त्यावर संतोष मानायचे वळण मनाला लावणे अवश्य आहे. अन्यायाच्या आणि काळ्या पैशाबद्दल घृणा वाटली पाहिजे. काटकसरीच्या किंबहुना गरिबीच्याही राहणीची सवय केली पाहिजे. श्रीमंतीत राहाणे शिकवावे लागत नाही. काटकसर व स्वावलंबन शिकावे लागते, त्याची सवय अंगवळणी पडावी लगते. कोणत्याही व्यसनापासून अलिप्त राहाणे अवश्य आहे. 'एकच' व 'एकदाच' हा व्यसनाचा प्रारंभ आहे. मग तो मद्याचा असो वा अन्य व्यसनाचा असो. चरकातल्या

उसासारखा माणूस व्यसनात ओढला जातो. पहाडासारखी विद्वान माणसे व्यसनापायी धुळीला मिळाली आहेत. 'एकदाच' म्हणता म्हणता जन्माच्या व्यसनात माणसे अडकतात. संयम राखणारी माणसे विरळा. घरातल्या सर्वांना कामाची, कष्टाची, स्वावलंबनाची, काटकसरीची सवय लावा. ती लागली म्हणजे पृथ्वीच्या पाठीवर कोठेही माणसाचे अडणार नाही. मुला-मुलींना मित्र मैत्रिणी कोण आहेत, सहवास कोणाचा आहे यावर लक्ष ठेवा. वाईट सहवासाने मुले बिघडल्याची अनेक उदाहरणे आहेत. वाचन व करमणुकी यातूनही चांगल्या किंवा वाईट कल्पना मिळत असतात त्यावरही लक्ष हवे.

सदाचाराची सवय लावावी लागते. भ्रष्टाचार सहज आत्मसात होतो. तो कायद्याने कमी होणार नाही. व्यक्तींचे जीवन घडवायला हवे.

[१६–५–७४

२७. स्वतंत्रते भगवती !
निराशा येई मम चित्ती !

. वरील ओळ स्व. सावरकरांच्या जुन्या भूपाळीतील नाही. तिच्यात ही सापडणार नाही. प्रातःकाळी आकाशवाणीवर मी ही भूपाळी ऐकतो आणि थोड्या वेळात दैनिक वाचतो. भूपाळीमधील कवीच्या अपेक्षा आणि देशात चाललेली भारतीय नागरिकांची वर्तणूक यांतील तफावत जाणवून माझ्या तोंडून वरील समस्यापूर्ती सहज बाहेर पडली.

सत्तर वर्षापूर्वी बालवयातच समजायला लागल्यापासून आम्ही स्वातंत्र्याच्या चळवळीकडे मोठ्या अपेक्षेने आणि आस्थेने पहात होतो. आम्ही टिळक पक्षाचे. स्वदेशीच्या शपथा घेतल्या. परदेशी कापड वापरायचे नाही हे व्रत आजपर्यंत पाळले. नेत्यांची भाषणे वारंवार ऐकली. स्वातंत्र्याचे प्रयोजन लो. टिळक, महात्मा गांधी, लालालजपतराय, ॲनी बेझंट, बिपीनचंद्र पाल यांच्या तोंडून ऐकले. ब्रिटिश साम्राज्यामुळे झालेली भारताची दुःस्थिती वारंवार ऐकली व पाहिली. खरोखर स्वातंत्र्य आमच्या हयातीत येईल अशी कल्पनाही आली नाही. पण अभूतपूर्व अशी घटना घडून स्वातंत्र्य आले. स्वातंत्र्यापूर्वी आमच्या अपेक्षा अशा होत्या की, त्या काळातील देशप्रेम, त्याग, कष्टाची तयारी या गुणांचा विकास सर्वसामान्य नागरिकात अधिक प्रमाणावर होईल. प्रत्यक्ष वस्तुस्थिती अगदी उलट घडून आली.

एके काळी परदेशी मालाच्या होळ्या झाल्या. आता परदेशी कापडाला व 'इंपोर्टेड'लाच अधिक मागणी येऊ लागली. समाजसेवा, देशसेवा याकरता स्वार्थत्याग करून कामे करणारांची त्या वेळी परंपरा निर्माण झाली. आता त्यागपूर्वक सार्वजनिक कामे करायला माणसे मिळत नाहीत. त्याग हा शब्दच प्रचारबाह्य आणि उपहास-पात्र झाला. दारूच्या दुकानावर पिकेटिंग करून मार खाऊन तुरुंगात जणारे स्वयं-सेवक त्या काळात होते. आता तुम्हाला तुमचे घर, शाळा, महाविद्यालय, देवळे यांच्या सांनिध्यात मद्यपानाच्या मुबलक सोयी झाल्या आहेत. त्यावेळी ब्रिटिशांच्या बंदुकी-तून सुटणाऱ्या गोळघांना लोक बळी पडत. आज गुंडांच्या व चोरदरोडेखोरांच्या चाकूला लोक बळी पडू लागले आहेत. राजकारण म्हणजे सुळावरची पोळी असे त्या काळात समीकरण होते. आज राजकारण म्हणजे गुळाची पोळी झाली आहे. सार्वजनिक काम करणारे त्या वेळी घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजल्यासारखे निर्वेतन काम करीत. आज नगरपालिका, कायदामंडळे इत्यादी ठिकाणी आपापली सन्मानवेतने आणि भत्ते वाढवून कसे घेता येतील यांची चुरस लागली आहे. काळा-बाजार वाढत आहे, चोरबाजार वाढते आहे, गुन्हेगारीत वाढ होत आहे. तरुणांच्या मध्ये व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. स्वार्थ, फायदा, कमिशन, द्रव्यसंचय, वेतनवाढ, भत्तेवाढ, साठेबाजी, खोटा व्यापार या दुर्गणांचे प्रमाण वाढत आहे. या सर्वाचा सारांश असा की देशाची उन्नती आणि समाजहित यांपेक्षा स्वार्थसंपादनाला या देशातले लोक अधिक महत्त्व देऊ लागले. देशाला व समाजाला दुय्यम स्थान मिळाले आहे. माझे हित प्रथम, समाजहिताची मला पर्वा नाही, ही वृत्ती वाढली. स्व. सावरकरांना वाटले होते की जे जे उदात्त, उच्च, सुंदर, उज्ज्वल त्याची या देशात वाढ होईल. त्याऐवजी जे जे माझ्या फायद्याचे, माझ्या सुखाचे त्यांच्या विचाराला प्राध्यान्य मिळत आहे.

ही देशाची स्थिती पाहून कवी म्हणेल— माझी पहिली भूपाळी मी परत घेतो आणि तिच्यात आता सुधारणा करतो.

स्वतंत्रते भगवती ! काय ही आली दैवगती
नष्ट होउनी स्वप्न येतसे दुःखाची भरती ।।
जरी होतसे रोज सकाळी देशभक्ति-गान
स्वतंत्रते ! हे बघुनि विडंबन होते मन खिन्न ।।

पण स्व. सावरकरांना आपण आपल्या देशाची दुसरी उज्ज्वल बाजूही दाखव शकू. व्यक्ती या दृष्टीने आमची सद्‌गुणात पीछेहाट झाली असली तरी सामुदायिक रीतीने विचार करता भारताने गेल्या पंचवीस वर्षात बरीच प्रगती केली आहे. आपले लष्करी सामर्थ्य वाढले आहे. संरक्षणक्षमता कसोटीला लागली आहे. उद्योग-धंद्यांचा पसारा मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अर्थकारण आणि संरक्षण या दोन

आघाडयांवर देशाची धोडदौड चालू आहे. वैयक्तिक नागरिकत्वाची जाणीव समाजहितबुद्धी, देशसेवावृत्ती, त्यागवृत्ती यांत बरीच घट झाली आहे हे खरे आहे. पण आमच्यातील कांही जणांना त्याची जाणीव झाली आहे. ती जाणीव समाजाला करून देऊन त्याच्यात जागृती आणण्याचा प्रयत्न चालू आहे. त्याला यश यावे असा आशीर्वाद द्यावा.

[१८–५–७४

२८. आनंदाला विरजण

संसार चालवण्याकरता आणि पोट भरण्याकरता माणसे वर्षभर काबाडकष्ट रीत असतात. हे कष्टमय जीवनही सुसह्य व्हावे म्हणून पूर्वजांनी सण-समारंभांची योजना करून ठेवली. महिन्या दोन महिन्यातून एखादा तरी सणवार येतो आणि त्या दिवशी कामे बाजूला ठेवून कुटुंबातील आबालवृद्ध आनंदात दिवस घालवतात. पाडवा, गौरी-गणपती, दसरा, मकर संक्रांत, दिवाळी, होळी, नाताळ इत्यादी सणांची योजना जीवनातील आनंदात भर टाकण्याकरता आहे. त्याशिवाय मग प्रासंगिक समारंभ घरात होतच असतात. बारसे, वास्तुशांत, लग्न, उपनयन, वाढदिवस, प्रासंगिक सत्यनारायण इत्यादी समारंभ हे सामुदायिक आनंद लुटण्याकरता योजलेले आहेत. वालुकामय प्रदेशात जशी सरोवरे असतात तसे आपल्या रुक्ष जीवनाला ओलावा देण्याकरता हे सण-समारंभ आहेत. जीवनात त्यांची आवश्यकता आहे. आबालवृद्ध अशा आनंदाच्या प्रसंगांची वाट पहात असतात. वाट पाहण्याचे सुख प्रथम मिळते आणि प्रत्यक्ष आनंदाचा अनुभव नंतर मिळतो. असे हे चक्र जीवनात चालू असते.

अशा आनंदाच्या समारंभात कधी कधी एखादी विषादाची घटना घडते आणि दुधात मिठाचा खडा पडावा, तसे आनंदाच्या प्रसंगाला विरजण लागून रंगाचा बेरंग आणि आनंदाचा विरस होतो. एखादी दुःखाची वार्ता अचानक कानावर येते. समारंभात भाग घेणारी एखादी व्यक्ती आजारी पडते. कोणी महत्त्वाच्या व्यक्ती नाराज होऊन आपल्या असंतोषाचे खूप प्रदर्शन करतात. देणे-घेणे, मान-अपमान, उलट सुलट बोलणे, कामे करणे न करणे इत्यादी अनेक कारणांवरून एखादी व्यक्ती नाराज होते आणि आपल्या नाखुषीचे प्रदर्शन करून सर्व समारंभाला गालबोट लावते. अशा वेळी घरातल्या इतर माणसांची मोठी चमत्कारिक स्थिती होते. समारंभावर विषण्णतेची छाया पसरते.

वाचकांच्या अनुभवाला असे काही प्रसंग आले असतील. एकदा एका समारंभात घरातली कर्ती बाई बर्फाचे पाणी पिताना बर्फ घशात अडकून दिवंगत झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

एका लग्नसमारंभात वधूची नालस्ती पत्राने व इतर मार्गांनी करण्याचा प्रयत्न झाला. एका समारंभात सर्व मंगलकार्य आनंदाने पार पडल्यावर वरमाईने वधूपक्षावर यथेच्छ तोंडसुख घेतले. मानापमान आणि बोलण्याचालण्यावरून नाराजीचे प्रसंग सर वारंवार येतात. अशा प्रसंगी आपली मनोवृत्ती शांत कशी राहाणार ?

मला गीतेतले एक वाक्य फार महत्त्याचे वाटते. तस्मात् अपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि ॥ २.२७

(घटना अटळ अशा ज्या, नसती शोकासि त्या कधी उचित ॥)

ज्या. गोष्टी आपल्या हातात नाहीत त्यांबद्दल विषाद मानू नये, दुःख करू नये. शांत मनाने त्या स्वीकाराव्यात. जी अप्रिय, किंवा अनिष्ट, घटना घडली तिला आपण जबाबदार नाही. ती होणार याची आपल्याला कल्पनाही नसते. ती टाळणे आपल्या हातात असून टाळली नाही असेही नसते. अशा स्थितीत समाधानाकरता एकच विचार करावा. सर्व समारंभात आनंदाचा भाग अधिक आहे, विषादाचा भाग थोडा आहे. आनंदाला थोडी दुःखाची झालर आहे एवढेच. निर्भेळ आनंद नेहमी मिळतोच असे नाही. जेवढा मिळाला तेवढा आपला.

अशा प्रसंगी एका इंग्लिश कवीचे वचन मला नेहमी आठवते—
'अवर सिन्सिअरेस्ट् लाफ्टर, वुइथ् सम पेन् इज फ्रॉट्'.

हास्याच्या क्षणि ही विषाद हलके चित्तात ठोकावतो ।

[६-६-७४

२९. मुलांची भांडणे, थोरांचे वैर

आपल्या अपत्यांवर प्रेम करणे हा मातृधर्म पशुपक्षात आणि मानवात निसर्गानेच त्यांच्या हृदयात ठेवला आहे. तो आहे म्हणून अनादी कालापासून जीवन चालू राहिले आहे. पण मानवाच्या ठिकाणचे अपत्यप्रेम आणि इतर प्राण्यांचे अपत्यप्रेम यांत जो फरक आहे तो मानवी संस्कृतीमुळे निर्माण झाला आहे. लहान मुलांचे आणि प्रौढांचे मानसशास्त्र जसे जसे लक्षात आले तसतसे अपत्यप्रेम व्यक्त करण्याचे स्वरूप बदलत गेले आहे.

मानवी अपत्यप्रेमातही दोन प्रकार असतात. एक प्रेम आंधळे असते. मुलांच्या स्वभावाचे ज्ञान त्याला नसते. दुसरे प्रेम डोळस असते. मुलांचा नैसर्गिक स्वभाव लक्षात घेऊन त्याचे स्वरूप प्रसंगाप्रसंगाने आणि वयोमानाप्रमाणे बदलत जाते.

अडाणी आईबापांचे अपत्यप्रेम दोन ठोकाला जाते. कधी मुलाचे अती लाड

करून त्याला डोक्यावर बसवून ठेवतील. गमतीखातर मुलाला विडी-सिगारेट आणि दारू देणारेही पालक असतात. दुसऱ्या टोकाला ते मुलावर रागावले म्हणजे मार मार मारतील. मग दया माया काही नाही. अशी मुले पुढे बिघडण्याचा फार संभव असतो.

विचारी आईबापांचे प्रेम डोळस असते. योग्य प्रमाणात ते मुलांचे लाड करतील त्याचबरोबर त्याला योग्य शिस्तीचे वळणही लावतील. त्यामुळे कोणत्या गोष्टी योग्य आणि कोणत्या अयोग्य याची हळूहळू मुलांना कल्पना येते. लाड आणि शिस्त यांचे योग्य मिश्रण डोळस अपत्यप्रेमात असते.

निरनिराळ्या कुटंबातली मुले आपापसात खेळू लागली म्हणजे कधी कधी त्यांच्यात भांडाभांडी व मारामारी होते. अशा प्रसंगी आईबापांच्या अपत्यप्रेमाचे दोन प्रकार दिसून येतात.

सुजाण पालकांनी अशा वेळी कसे वागावे हा एक प्रौढ शिक्षणातील महत्त्वाचा प्रश्न आहे. अडाणी समाजात मुलांच्या भांडणावरून त्या मुलांच्या पालकांची भांडणे होऊन त्यात मोठे दंगे झाल्याची व खून पडल्याची उदाहरणे आहेत. एकदा सकाळ-मध्ये बातमी आली होती (१०–७–७५) ती लक्षात ठेवण्यासारखी आहे. सासवड-जवळ एक खेडे आहे. तेथे सरूबाई आणि कोंडाबाई यांच्या मुलांची भांडणे झाली आणि त्यावरून मोठ्या माणसांचीही भांडणे जुंपली. त्यात कोंडाबाईला मृत्यू आला आणि सरूबाईला सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. आता या मृत्यूचा आणि शिक्षेचा सूड घेण्याची भावना दोन कुटुंबात किती पिढ्या चालत राहणार, ईश्वर जाणे! दोन्ही पालक स्वस्थ बसले असते तर दुसऱ्या दिवशी तीच मुले पुन्हां आनंदाने खेळताना दिसली असती. गंमत हीच आहे. ज्यांची मारामारी भांडणे होतात ती मुले एका दिवसात आपली भांडणे विसरून सलोख्याने एकत्र खेळतात. त्यांचे पालक मात्र भांडणाचे शल्य मनात ठेवून शत्रुत्वाची भावना जोपासत राहातात.

अशा प्रसंगी सुजाण समजूतदार पालकांनी काय करावे ? काही करू नये. मुलामुलांचे भांडण म्हणून दुर्लक्ष करावे व आपल्या मुलाला तेवढ्यापुरते वाजूला न्यावे. त्यातूनही भांडण व मारामारी फार गंभीर स्वरूपाची व सहनशीलतेपली-कडची वाटली तर दुसऱ्या मुलाला त्याच्या पालकाच्या स्वाधीन करावे, घडलेली हकीकत सांगावी अन् आपल्या घरी जावे. त्या पालकाला वाटल्यास त्याने शिक्षा करावी. तुम्ही दुसऱ्याच्या मुलाला मारू नका. तुम्ही साधी चापटी मारली तरी आईबाप (अडाणी) आकाशपातळ एक करतील. पण ते स्वतः मात्र मुलाला वाटेल तितके मारतील. दुसऱ्याने हात लावता कामा नये. तुम्हाला वाटेल यात काही तर्कशुद्धता नाही. ती आहे, कशी ते पहा.

आईबापानी जरी मारले तरी दुसऱ्याच क्षणी ते मुलाला गोडधड खायला देतील, चांगले कपडेलत्ते घेऊन देतील, महागाचा एखादा खेळ घेऊन देतील; ते मुलाची हौसही पुरवतात आणि शिक्षाही करतात. पोरे शिक्षेकडे दुर्लक्ष करतात, प्रेम तेवढे लक्षात ठेवतात. तुम्ही नुसतेच माराल आणि वाजूला व्हाल. असा फरक आहे.

हे सर्व शहाणपण मी अनुभवाने शिकलो. एकदा बागेतल्या फुलांची चोरी केली म्हणून त्या चोर मुलाला मारले. त्याच्या आईने घरापुढे येऊन तमाशा केला. आणि 'पब्लिक' आईच्या अन् मुलाच्या बाजूचे ! मी कानाला खडा लावला. पुन्हा एकदा एका मुलाने झाडावरचे पंचवीसतीस कच्चे पेरू तोडले. कलमी पेरू. त्या मुलाचा पत्ता काढून त्याच्या घरी जाऊन झालेली घटना आईला सांगितली अन् पेरू तिच्या दारात ठेवून दिले.

मुलाला अमानुषपणे मारल्याबद्दल एकदा एका बापाला न्यायाधीशाने शिक्षा सांगितली. गुन्हा शाबीत झाला होता. बाहेर आल्याबरोबर पोर जाऊन बापाला बिलगले! असे आहे हे अपत्यप्रेम आणि मातृपितृभक्ती. येथे तर्कशास्त्र आणि पीनल-कोडही व्यर्थ आहेत.

जैसे भ्रमर तरी भेदी कोडे । भले तैसे काष्ट रोकडे ।
परि कलिके–माजी सापडे । कोवलिये ॥
तेथ उत्तीर्ण होय प्राणे । परि ते कमलदल चिरू नेणे ।
ऐसे कठिन कोवलेपणे । स्नेह देखा ॥ ज्ञानेश्वरी.

[१०–६–७४

३०. कष्ट, काटकसर व काटकपणा

यापुढच्या काळात सुखाने राहायचे असेल तर हे तीन गुण सपादन करा आणि आपल्या मुलाबाळांनाही त्यांची शिकवण द्या. आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि वैज्ञानिक परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहे. यापेक्षाही अधिक वेगाने परिवर्तन भविष्यकाळात होणार आहे. भावी काळातील चित्र दृष्टीपुढे ठेवून जे आपल्या जीवनाची योजना करतील आणि त्याला अनुसरून आपल्या कुटंबातील माणसांना जाणीव देतील ते सुखी होतील. इतरांना दुःख, चिंता, विवंचना, अनिश्चितता, अडीअडचणी यांना सतत तोंड द्यावे लागेल.

१९६० पूर्वीचा काळ आणि त्यानंतरचा काळ यांत किती फरक पडलेला आहे त्याचे चित्र डोळ्यापुढे आणा. पंचविशीच्या आणि त्यापुढील वयाच्या लोकांना हे सहज शक्य आहे. त्यापेक्षा लहान वयाच्या व्यक्तींना हे शक्य होणार नाही. पण त्यांना माहिती देता येईल व आठवणी सांगता येतील. मला १९३० पूर्वीचा काळ आणि १९३० ते १९६० यामधील काळ यांची आठवण होते. ६०-७० वर्षांपूर्वीचा काळ आणि आजचा काळ यांतील अंतराची तरुण पिढीला कल्पना करता येणार नाही.

१९६० पूर्वीच्या तीस वर्षांत कशी स्थिती होती ते आठवा. संसाराला लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती बेताच्या होत्या. वस्तूंचे वैपुल्य होते. पैसे टाकले की त्या मिळवता येत. भाड्याची घरे उपलब्ध होती. नोकरचाकर मिळत व ते प्रामाणिकपणाने आणि कृतज्ञ वृत्तीने काम करीत. सरपण, दिवाबत्ती, वाहन, दूध, भाजीपाला, पाणी इत्यादी बाबतीत स्वस्ताई आणि उपलब्धता होती. आज सारीच क्रांती झाली आहे.

गरजेच्या वस्तूंची महागाई झाली आहे आणि टंचाईमुळे बाजारात आज अमुक एक गोष्ट मिळेल किंवा लुप्त होईल याची शाश्वती नाही. राहण्याच्या जागा दुर्मिळ झाल्या आहेत. एकेका खोलीला ५०-६० रुपयांपेक्षा अधिक भाडे पडू लागले आहे. सिलिंडर गॅस, बीज, रॉकेल, पाणी, दूध, वाहने या बाबतीत केंद्रीकरण झाले आहे. बंद म्हणजे सर्व गावाला एकदम बंद. विश्वास टाकण्यासारखे नोकरचाकर मिळत नाहीत. मालक-मालकिणीवर ते केव्हा हात टाकतील याचा नेम नाही.

पूर्वीची साधी राहणी आज नष्ट झाली आहे. यांत्रिक युगामुळे गरजेच्या आणि चैनीच्या वस्तूंचे अमाप उत्पादन होत आहे. त्यामुळे घरातील सुखसोयी कपडेलत्ते, करमणुकी, खाणेपिणे, व्यसने यांत विलासीपणा, चैनबाजी, बिनहिशेबी खर्च आणि आकुंचित स्वार्थ यांची वाढ झाली आहे. हप्तेबंदीने म्हणजेच कर्ज काढून किंवा वाढवून राहणीचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न व्यापाऱ्यांच्या उत्तेजनामुळे आणि ग्राहकांच्या दुबळेणामुळे होत आहे.

या वातावरणात आपण आणि आपली मुलेबाळे वाढत आहेत. परावलंबन, पोषाखीपणा, चैनबाजी, व्यसनाधीनता व दुबळेपणा यांच्या वाढीमुळे खर्च वाढत आहे. तो भागवण्याकरता प्रामाणिक मार्ग पुरे पडत नाहीत. म्हणून भ्रष्टाचाराने, अनीतीने, अप्रामाणिकपणाने, गुन्हेगारीने पैसे मिळविण्याकडे समाजाची वृत्ती वळली आहे. यावर उपाय ? कष्ट, काटकसर आणि काटकपणा.

आपली कामे हातांनी करायला लागा. नोकरचाकरावर विसंबू नका. मुलामुलींना कष्टाची सवय लावा. यापुढे घरात आणि व्यवसायात कष्ट केले तरच सुखाने राहता येईल. पोषाखी वृत्तीमुळे दुःख आणि अधोगती होईल.

महागाई-टंचाई वाढत आहे. अनावश्यक खर्च कमी करा. अंदाजपत्रक तयार करून खर्चात तारतम्य ठेवा. चैनबाजीत, व्यसनात, अमर्याद करमणुकीत वायफळ खर्च करू नका. तुमच्या सवयी तुमच्या मुलांना लागतात. त्यांना पैसे मिळाले नाहीत की, ती भ्रष्टाचाराकडे वळतील, गुन्हेगार होतील.

रोजच्या जीवनात साधेपणा आणि काटकपणा वाढवा. भावी काळात कोणावर कसा प्रसंग येईल सांगता येत नाही. दर पाचसहा वर्षांनी एखादे युद्ध येणारच.

त्यात सर्वांना काही ना काही तरी भाग घ्यावा लागणारच. संप, बंद, घेराव, हरताळ, अपघात हे प्रसंग नित्याचे आहेत. त्या काळात होणारे सर्व प्रकारचे हाल सोसण्याकरता काटकपणा वाढला पाहिजे. उपास काढणे, ऊन-पाऊस-थंडीत पायी प्रवास करणे, स्वतःचे ओझे नेणे या गोष्टीची सवय झाली पाहिजे. भांडी घासणे, कपडे धुणे ही घरातील कामे आणि संपकाळात आपल्या आळीतला रस्ता झाडणे, उकीरडा साफ करणे, रात्री गस्त वालणे अशा प्रकारच्या कामांची सवय आणि तयारी ठेवायला पाहिजे.

सारांश, कष्ट, काटकसर आणि काटकपणा हे तुमच्या भावी जीवनाचे ब्रीदवाक्य करा. त्या गुणांच्या वातावरणात तरुण पिढी वाढू द्या. हे स्वानुभवाचे बोल आहेत. पुस्तकातले नाहीत.

[१५-६-७४

३१. व्यासांचा मानवाला संदेश

तुम्ही संपूर्ण महाभारत वाचले आहे काय ? त्यातील फुटकळ कथा किंवा चरित्रे वाचली असतील. परंतु संपूर्ण महाभारत वाचले नसल्यास वेळ काढून अवश्य वाचा. एकदा वाचायला घेतले की ते पुरे झाल्याशिवाय तुम्ही खाली ठेवणार नाही.

आधुनिक वाङ्मयाचे सर्व प्रकार एका महाभारतात आहेत. त्यात लहान कादंबऱ्या आहेत, लघुकथा आहेत, काल्पनिक गोष्टी, साहसकथा, रहस्यकथा आहेत, नाट्यपूर्ण प्रसंग आहेत, तत्त्वज्ञानपर निबंध आहेत, पशुपक्ष्यांच्या गोष्टी आहेत—सारांश आबालवृद्धांचे मनोरंजन करणारे सर्व घटक या महाग्रंथात आहेत.

साहित्याचे अनेक प्रकार महाभारतात आहेत, त्याचप्रमाणे भावनांचे विविध रसही आहेत. शृंगार, वीर, करुण, रौद्र, हास्य व भयानक हे साहित्यातील षड्रस त्यात आहेत. विषयाप्रमाणे भाषा कधी मृदू, कधी ओजस्वी, साध्या अलंकारांनी नटलेली, सुबोध, ओघवती अशी आहे.

गेली दोन हजार वर्षे महाभारताने संस्कृत व मराठी लेखकांना नाटके, कादंबऱ्या, निबंध इ. लेखनाकरता विषय पुरविले आहेत. प्रत्येक पिढीत महाभारतातील एकेक विषय घेऊन त्यावर लेखन करणारे प्रतिभावान लेखक झाले आहेत. गेल्या १५-२० वर्षांत मराठी भाषेत निर्माण झालेल्या वाङ्मयात व्यास, कर्ण, भीम इ. व्यक्तींवर कादंबरीवजा चरित्रे लिहिली गेली आहेत. 'युगान्त' सारखे संपूर्ण महाभारताचे सार काढणारे अनेक ग्रंथ झाले आहेत. महाभारत आणि त्यात अंतर्भूत असलेली गीता यावर काही ना काही तरी अभ्यासपूर्वक लिहावे अशी इच्छा प्रत्येक

प्रथितयश लेखकाला होत असते. प्रत्येक पिढीला महाभारताचे व गीतेचे आकर्षण वाटत असते.

हे महाभारत प्रारंभी आठ हजार श्लोकांचे होते, मग ते चोवीस हजार श्लोकांचे झाले व शेवटी एक लाख श्लोकांचे होऊन आपल्या पिढीपर्यंत आले आहे. एवढा मोठा ग्रंथ-लिहिण्याचा उद्देश काय होता आणि या विराट ग्रंथाचे सार तरी काय आहे? केवळ कलाविलासाकरता हा ग्रंथ लिहिला, का त्यातून काही बोध, उपदेश, शिकवण देण्याचा व्यासांचा उद्देश आहे? कला आणि बोध, सौंदर्य आणि उपदेश, साहित्य आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर संगम महाभारतात झाला आहे.

मानवाचे मूलभूत प्रश्न या ग्रंथात विविध स्वरूपात आपल्यापुढे मांडले असून त्यांतून जीवनाचे तत्त्वज्ञान काय निघते ते सांगितले. जीवनाकडे कसे पहावे हे महाभारताने मानवाला शिकवले आहे. जीवनातील सुख-दुःखे कशी अनुभवावीत हा मानसशास्त्राचा प्रश्न प्रत्येक व्यक्तीपुढे असतो. सुखे आणि दुःखे अनेक रूपे धारण करतात. यश-अपयश, मान-अपमान, लाभ-हानी, श्रीमंती-गरीबी, सत्ता-दास्य, आरोग्य-आजार, उत्कर्ष-अपकर्ष हे सर्व सुखांचे व दुःखांचे प्रकार आहेत.

दुसरा प्रश्न नैतिक स्वरूपाचा असतो. चांगले काय आणि वाईट काय याची चिकित्सा करून चांगल्या मार्गाने किंवा वाईट मार्गाने गेल्याचे काय परिणाम होतात तेही मानवाला महाभारताने शिकवले आहे. धर्म-अधर्म, सत्कृत्य-दुष्कृत्य, सज्जनता-दुष्टपणा, सदाचार-भ्रष्टाचार अशा अनेक स्वरूपात हे प्रश्न मानवापुढे येतात. त्यांची उत्तरे या ग्रंथात आहेत.

संपूर्ण महाभारत आकलनानंतर आपल्या मनातला उद्देश वाचकांच्या मनात खोलवर ठसावा म्हणून अगदी शेवटच्या पर्वाच्या शेवटच्या परिच्छेदात जे चार श्लोक आले आहेत त्यांत महाभारताचे सर्व सार आले आहे. अगदी सोपे आहेत हे श्लोक. संस्कृत न येणारांनाही त्यांचा अर्थ सहज कळेल.

माता-पितृसहस्राणि, पुत्रदार-शतानि च। संसारेष्वनुभूतानि, यान्ति यास्यन्ति चापरे ॥५९॥ हर्षस्थान-सहस्राणि, शोकस्थान-शतानि च। दिवसे-दिवसे मूढम् आविशन्ति, न तु पण्डितम् ॥६०॥ ऊर्ध्वबाहुः विरोम्येषः न च कश्चित् शृणोति मे। धर्मात् अर्थश्च कामश्च, स किमर्थम् न सेव्यते? ॥६१॥ न जातु कामात्, न भयात्, न लोभात्। धर्मं त्यजेत् जीवितस्यापि हेतोः। धर्मो नित्यः, सुखदुःखे तु अनित्ये। जीवो नित्यः, हेतुरस्य तु अनित्यः ॥६२॥ भारत-सावित्री

या श्लोकांचा मथितार्थ असा आहे —

आईबाप-बायकापोरे यांच्या अनेक पिढ्या जन्माला आल्या, येतील आणि जातील (५९), त्यांच्या सहवासामुळे सुखाचे व दुःखाचे अनेक प्रसंग येतात. त्यांचा

परिणाम मूढावर होतो. विचारवंतावर होत नाही (६०). वासना, भीती, लोभ यांना बळी पडून किंवा प्राण वाचवण्याकरता (धर्म) सदाचार मोडून भ्रष्टाचाराला प्रवृत्त होऊ नका (६१). (धर्म) सदाचार हा शाश्वत आहे. सुख-दुःखे क्षणैक आहेत. आत्मा नित्य आहे. जीवनातील हेतू हे तात्कालिक असतात (६२).

हे श्लोक पाठ करा व त्यांवर सतत चिंतन करा. इतरांना सांगा.

व्यास-पौर्णिमा [४-७-७४

३२. तुमचा स्वभाव कसा आहे ?

निसर्गाच्या आणि मानवाच्या जगात कल्पनातीत विविधता आहे. झाडांची पाने, फुले, फळे यांचे रंग, आकार, रुची यांच्या विविधतेचे निरीक्षण करा. मन थक्क होऊन जाते. पशू आणि पक्षी यांच्या रूपात, आकारात, स्वभावात किती तरी भिन्नता दिसते. तीच वस्तुस्थिती मानवी सृष्टीत आहे. सारख्या स्वभावाची दोन माणसे सापडायची नाहीत. काही तरी भिन्नता असतेच.

मानवी स्वभावात भिन्नता असते इतकेच नव्हे तर अगदी परस्पर विरोधी गुण असतात. रागीट-शांत, स्वार्थी-उदार, लोभी-त्यागी, हट्टी-समजूतदार, एककल्ली-मनमिळाऊ, भित्रा-धीट, कुढा-मनमोकळा, गर्विष्ठ-निगर्वी, स्वाभिमानी-लाचार, प्रामाणिक-लबाड, भोगवादी-आत्मसंयमी अशा विरोधाच्या जोड्या किती-तरी वाढविता येतील. मनुष्य-स्वभावांची पारख करून त्यांच्याशी व्यवहारात कसे वागावे हे समजण्याकरता या परस्पर-विरोधी गुणांची माहिती व त्यांचा विचार तुम्हांला फार उपयोगी पडेल.

आपल्या कुटुंबातल्या, शेजारच्या, मित्रमंडळीतल्या, व्यवसायातल्या माणसांचे असे निरीक्षण करीत जा. त्याचबरोबर आपण स्वतः वरील विरोधी गुणांत कोठे बसतो हे पाहण्यातही तुम्हाला गंमत वाटेल. जो दुर्गुण इतरांच्या ठिकाणी आहे म्हणून आपण नावे ठेवतो तोच आपल्या ठिकाणीही आहे याचा शोध तुम्हांला लागेल. मग काय कराल ? स्वभाव बदलाल का आहे तसाच ठेवाल ? स्वभाव बदलू शकतो का ? केव्हा ?

स्वभावो दुरतिक्रमः, जो गुण बाळा तो जन्मकाळा, या म्हणी प्रचारात आहेत पण त्या सर्वस्वी खऱ्या नाहीत. स्वभाव बदलता येतो. बाळपणीच्या स्वभावात क्रांती होऊ शकते. पण हे काम दुसरा कोणी करू शकत नाही. 'स्व'भाव म्हणजे आपली वृत्ती. ही 'स्व'ने म्हणजे आपली आपण, ज्याची त्यानेच बदलायला पाहिजे. उपदेशाने, वाचनाने, चिंतनाने, निरीक्षणाने, कायद्याने, शिक्षेने फार तर दोषांची

जाणीव करून देता येईल. पण जाणीव करून देणे, बदलायचा निश्चय करणे, तो प्रयत्नपूर्वक चिकाटीने व्यवहारात आणणे हे काम स्वतःच ज्याचे त्याने केले पाहिजे.

तुमच्या ठिकाणी जन्मसिद्ध, स्वभावतःच, काही सद्गुणही आहेत व काही दुर्गुणही आहेत. एकाच कुटुंबात जन्माला आलेल्या मुलामुलींच्या स्वभावात कितीतरी भिन्नता असते. त्यात व्यक्तीचा दोष नाही. दोष केव्हा ? दुर्गणांची जाणीव झाल्यानंतरही त्यांचे निराकरण केले नाही तर माणूस दोषी ठरेल. पशू-पक्षी आपल्या मूळ स्वभावात बदल करू शकत नाहीत, माणूस बदल करू शकतो. हा फार मोठा फरक आहे. स्वतःच्या स्वभावात सुधारणा करू शकत नाही ती व्यक्ती पशूच्याच पायरीवर आहे असे म्हणायला पाहिजे. मनुष्यरूपेण मृगाः चरन्ति । दोन पायांची जनावरे हेच त्यांचे वर्णन !

" मी कसा आहे ? " हा प्रथम विचार करा. " आदर्श मी कसा असावा ? " हा नंतर विचार करा. या दोन प्रश्नांतले अंतर तोडणे हीच तुमची उत्क्रांती. हेच तुमचे अंतिम ध्येय असावे. त्याची सतत जाणीव ठेवून प्रयत्न केला की आपोआप ते साध्य होईल. सामान्य माणसेही अशी सुधारणा करू शकतात.

प्रारंभी तुमच्या स्वभावातला एकच दुर्गुण घ्या. कडू आणि कठोर बोलण्याची सवय काहींना असते. त्यांनी निश्चय करायचा की सौम्य आणि सौजन्य-युक्त भाषेत आणि आवाजात इतरांशी बोलायचे. ही जाणीव सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत मनात जागृत ठेवा. प्रथम-प्रथम निश्चय विसरेल, पुन्हा लक्षात ठेवा, पुन्हा प्रयत्न करा. काही दिवसांनी लोकच सांगतील की तुमच्या स्वभावात फार बदल झाला आहे. अशा एका दुर्गुणावर विजय मिळवता आला तर तुम्हाला आत्मविश्वास येईल, सुधारणेची पद्धत आत्मसात होईल आणि " आदर्श मी ची " तुमची कल्पना हळूहळू साकार होईल. तुम्ही मिळविलेली खरी संपत्ती ही आहे.

" मी हा असा आहे " अशी बढाई मारून जागचे जागी एक-दो एक-दो (मार्क टाईम) करू नका. आगे बढो (फॉरवर्ड मार्च) चे धोरण ठेवा. 'नर करील तर नराचा नारायण होईल' हे सत्य अनेकांनी अनुभवले आहे. तीच संधी तुम्हाला आहे.

[१०–८–७४

३३. प्रगतीचे चार पैलू

आज जगात जे अनेक देश आहेत त्यांत काही प्रगत, काही अर्धप्रगत आणि काही अप्रगत अशी वर्गवारी केली जाते; पुढारलेले, सुधारत असलेले आणि मागासलेले.

या वर्गवारीला कोणती कसोटी लावली जाते आणि ती कितपत परिपूर्ण आहे याचा विचार करणे अवश्य आहे. देशाच्या, समाजाच्या व कुटुंबाच्याही प्रगतीचे चार पैलू (डायमेन्शन्स) आहेत.

तात्त्विक ज्ञानाची प्रगती हा एक भाग आहे. तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भाषाशास्त्र, मानसशास्त्र, गणित, नीतीशास्त्र इत्यादी तात्त्विक विचारांच्या विषयांत त्या समाजाने किती प्रगती केली हा एक महत्त्वाचा विचार आहे. प्राचीन भारतीय, ग्रीक, रोमन, चीन इत्यादी समाजांनी अडीच तीन हजार वर्षांपूर्वी या क्षेत्रात बरीच प्रगती केली होती. तिचे अध्ययन आजही महत्त्वाचे मानले जाते.

दुसरा पैलू वैज्ञानिक किंवा शास्त्रीय ज्ञानाचा आहे. यात सर्व भौतिक शास्त्रे व प्रयोग-निरीक्षण-प्रधान ज्ञान येते. यांत ज्योतिष, वैद्यक शास्त्र, रसायन, भौतिकी, प्राणीशास्त्र इत्यादी आधुनिक प्रायोगिक ज्ञानाची क्षेत्रे येतात. सागराच्या तळात काय आहे, पृथ्वीवर काय आहे आणि चंद्र-सूर्य-मंगळावर काय आहे अशी दशदिशांना व्यापून टाकणारी जिज्ञासा विज्ञानाला आहे. कपिल मुनी, न्यूटन आणि आईनस्टाईन हे शास्त्रज्ञ वैज्ञानिक ज्ञानाच्या प्रगतीचे प्रतिनिधी आहेत.

वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग करून ऐहिक जीवन सुखसंपन्न करण्याकडे त्याचा उपयोग करणे हा प्रगतीचा तिसरा पैलू आहे. वास्तुशास्त्र, यंत्रशास्त्र, जीवनशास्त्र, आहारशास्त्र इत्यादी क्षेत्रात विज्ञानाचा उपयोग करून मोठमोठ्या इमारती, दळण-वळणाची साधने, व्यापार, अन्नधान्याचे उत्पादन, कापड इ. जीवनविषयक वस्तूंचे उत्पादन करून आज अनेक देश पुढे आले आहेत. त्यांचे भौतिक जीवन सुखी आहे.

चौथा पैलू आहे मानवाच्या आंतरिक प्रगतीचा, त्याच्या मानसिक विकासाचा. त्यांच्या मनातील भावना कितपत सुसंस्कृत झाल्या हा महत्त्वाचा विषय या विभागात येतो. प्रत्येक व्यक्तीचे कुटुंबात, शेजारी, व्यवसायात, समाजात, इतर व्यक्तींशी जे संबंध येतात त्यात माणुसकी, प्रेम, सहिष्णुता, सहकार्य, भूतदया, त्याग, क्षमाशीलता, प्रामाणिकपणा, शुद्ध चारित्र्य, इत्यादि गुणांची वाढ किती झाली आहे हा महत्त्वाचा विचार आहे. गुन्हेगारीची प्रवृत्ती कमी होणे, व्यसनाधीनतेपासून समाज मुक्त असणे, जीवित सुरक्षित राहाणे, स्त्रियांचे शील सुरक्षित राहाणे इत्यादी गुण सामाजिक प्रगतीचे निदर्शक आहेत. समाजा-समाजातील व देशा-देशातील मतभेदांचे व हिताहितांचे प्रश्न हिंसा, हत्या, मनुष्यहानी न होता शांतपणे सोडवता येणे हे मानसिक प्रगतीचे लक्षण आहे. हा प्रगतीचा चौथा पैलू आहे.

आदर्श समाजाची प्रगती या चारही भागात व्हायला हवी. परंतु आज पृथ्वीच्या पाठीवर असा सर्वांगीण चौरस प्रगती केलेला देश नाही. पुढारलेले देश आंतरिक

मानसिक प्रगतीत मागासलेले व पीछेहाटीच्या अवस्थेत आहेत. मागासलेले देश सर्वच विभागात मागे आहेत. मानवाची प्रगती अपूर्णावस्थेत आहे.

जगातील विचारवंतांना मानवाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने या कमतरतेची जाणीव झाली आहे. एकांगी विषम तोलाच्या प्रगतीचा काही उपयोग नाही. बौद्धिक, वैज्ञानिक आणि आर्थिक प्रगती मानसिक प्रगतीशिवाय सुख-शांती देणार नाही. त्या जीवन-मार्गाकडे शिक्षणाने, राजकारणाने, विचारवंतांनी, आणि समाजहितार्थ कार्य करणारांनी लक्ष दिले पाहिजे.

प्रगतीच्या देहलीवर उभ्या असलेल्या भारताने या चारही आघाड्यांवर प्रगती करून जगापुढे एक नवा आदर्श ठेवावा. हे आपल्या देशाला व देशातील तरुणांना एक आवाहन आहे.

[१५–९–७४

३४. व्यसनांच्या सार्वत्रिक सोयी !

व्यसने आली दारा । जागृत ठेवी संस्कारा ॥

पुण्यात फिरताना एका नवीन संस्थांचे जाळे शहरभर पसरत चालल्याचे जाणवते. सुशिक्षित आणि अशिक्षित सर्वच वस्त्यांमधून मद्यपानगृहांच्या सोयी (!) वाढत आहेत. माझ्या घरापासून पाचदहा मिनिटांच्या अंतरावर दोन चार मद्यगृहे सहज उपलब्ध आहेत.

जी गोष्ट मद्याची, तीच इतर व्यसनांच्याही बाबतीत घडून येत आहे. विडी-सिगारेट-तंबाखूचा प्रसार पूर्वीपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात झाला आहे, होत आहे, होण्याची धास्ती आहे. अमेरिकन तरुणांत प्रिय झालेली एल. एस. डी. सारखी मादक द्रव्ये आपल्याकडेही विद्यार्थी वर्गात प्रसृत व्हायला आता फारसा काळ लागणार नाही. "निरोध" चा प्रसार तर उजळ माथ्याने राजरोसपणे सर्वत्र होत आहे, पण त्याच्या दुरुपयोगाबद्दल कोणी फारशी फिकीर करीत असल्याचे दिसत नाही.

व्यसनांचा प्रसार होणे हे त्या त्या वस्तूंचे कारखानदार, उत्पादक, दलाल आणि व्यापारी यांच्या द्रव्यप्राप्तीचे व फायद्याचे दृष्टीने हिताचे आहे. ते समाजाच्या हिताकडे किंवा कल्याणाकडे पाहाणार नाहीत. सर्व प्रकारच्या इष्ट आणि अनिष्ट गोष्टींच्या भडक, आकर्षक, असत्य जाहिराती करतील आणि त्या वस्तू तुमच्या दाराशी आणून ठेवतील. शेवटी सर्व खर्च तुमच्याच खिशातून काढायचा असतो. तर काटकसर कशाला ? वृत्तपत्रात व नाक्यावर प्रमुख जागी असणाऱ्या सगळ्यात मोठ्या जाहिराती पहा म्हणजे लक्षात येईल. सिगारेट, दारू, तंबाखू, विड्या यांच्या

जाहिरातीवर जितका पैसा खर्च होतो त्याच्या शतांशानेही चांगल्या ग्रंथांच्या किंवा पौष्टिक अन्नांच्या जाहिरातीवर खर्च करता येत नाही. सुंदर स्त्रीचे चित्र घातले की वाटेल त्या मालाची जाहिरात लोक वाचतात आणि त्यांतले बावळट भाळतात, हा वाचकांचा दुबळेपणा जाहिरात लेखकाला ठाऊक असतो.

अनेक व्यसने आज सुसंस्कृत नावाखाली उजळ माथ्याने वावरू शकतात. दारूचा गुत्ता म्हणजे मद्यपानगृह, तमाशा म्हणजे लोकनाट्य, वेश्यागृह म्हणजे डान्सिंग हॉल अथवा मसाज क्लिनिक इत्यादी इत्यादी. ज्या गोष्टींना व्यसने मानून सुसंस्कृत माणसे अलिप्त राहात आणि आपल्या मुला-मुलींना अलिप्त ठेवीत, त्या आता प्रतिष्ठा पावत आहेत. त्यांच्यापासून होणाऱ्या अनिष्ट परिणामांचा विचार कोणी फारसा करीत नाही. लघुकथा लेखक, कादंबरीकार इ. साहित्यिक आपले नायक-नायिका यांची वर्णने करताना व त्यांची चित्रे चितारताना त्यात व्यसनांचा उल्लेख इतका सहजपणे करतात की त्यांत काही अनिष्ट आहे याचा वास देखील वाचकाला येत नाही.

चांगल्या संस्कृतीत ही व्यसने निषिद्ध मानली गेली कारण त्यांच्यापासून माणसाच्या प्रकृतीला, बुद्धीला, शीलाला, कुटुंबाला आणि आर्थिक स्थितीला अपाय आहे. आकडेवारीने ही गोष्ट सिद्ध झालेली आहे की अपघातांचे मोठे प्रमाण मद्यपानी लोकांच्याकडून होते. ते स्वतः मरतात आणि आपल्या बरोबर इतरांना खड्ड्यात पाडून मारतात किंवा जायबंदी करतात. विडी-सिगरेटमुळे कॅन्सर होतो ही गोष्ट वैद्यक-शास्त्रज्ञांनी मान्य केली आहे. हा धोका सिगारेटच्या पाकिटावर छापण्याची अमेरिका-इंग्लंडमध्ये सक्ती आहे. तरीही या व्यसनाचा प्रसार कमी झाला नाही, यावरून माणसाला एकदा लागलेल्या व्यसनाचा जोर आणि त्याच्या मनाचा दुबळेपणा सिद्ध होतो. तंबाखू तोंडात धरल्यामुळे गालात आणि घशात कॅन्सर झाल्याची आणि त्यामुळे माणसे मेल्याची अनेक उदाहरणे आहेत. 'निरोधा'च्या गैरसावध प्रसारामुळे गरमी आणि परमा या दुःसाध्य रोगांचा फैलाव होईल याची जाणीव कोणी करून देत असल्याचे दिसत नाही.

अशा स्थितीत आपले आणि आपल्या मुला-मुलींचे संरक्षण करणारे एकच साधन आहे. चांगले संस्कार. मनावर झालेले चांगले संस्कार सांभाळून ठेवा आणि ते आपल्या मुला-मुलींना द्या. दारू, तंबाखू, विडी, सिगारेट, व्यभिचार या गोष्टी जीवनाला हानिकारक, अपायकारक आणि अधःपाताकडे नेणाऱ्या आहेत, ही जाणीव जागृत ठेवा आणि ती आपल्या भावी पिढीला द्या. चांगले संस्कार हे व्यसनांपासून संरक्षण करणारे मनाचे कवच आहे. त्यांची जोपासना करा आणि कुटुंबात, समाजात, सर्वत्र त्यांचा प्रसार करा. चांगल्या संस्कारांच्या व्यक्तींमुळे समाज सुसंस्कृत होतो. केवळ ज्ञानामुळे माणूस व्यसनापासून मुक्त राहू शकत नाही.

व्यसने वाईट, त्याज्य, सभ्य माणसाला न शोभणारी व कमीपणा आणणारी आहेत, हा संस्कार बालपणापासून झाला तर त्याचा परिणाम दीर्घकाल राहण्याचा संभव असतो. पालक, शिक्षक, लेखक, संपादक, प्रचारक इ. सर्वांनीच या विषयाचा विचार करावा.

[१५-९-७४

३५. विश्वासघात केव्हा होतो ?

समाजातले शेकडा नव्याण्णव व्यवहार विश्वासावर चाललेले असतात. संसारात व सार्वजनिक जीवनात आपणांला इतरांकडून अनेक कामे करून घ्यावी लागतात. त्या प्रत्येक कामात आपण बारकाव्याने लक्ष घालू शकत नाही.ते घालण्याला लागणारा वेळ व विशिष्ट ज्ञान आपल्याजवळ असत नाही. म्हणून त्या त्या माणसावर आपण विश्वास टाकतो. आपणांकडून जी माणसे निरनिराळी कामे करून घेतात ती आपल्यावर विश्वास ठेवतात. समाजात आपण इतरांशी व इतर लोक आपणाशी अनेक नात्यांनी बांधलेले असतात. या नात्यांचे संकेत उभयपक्षी पाळले जातील असा उभयतांचा विश्वास असतो.

परस्परांविषयी जोपर्यंत विश्वास असतो तोपर्यंत मनाला निश्चितता, सुख, स्वास्थ्य व सुरक्षितता वाटते. या विश्वासाला तडा गेला की चिंता, दुःख, अस्वास्थ्य आणि फसगत झाल्याचा विषाद मनाला वाटतो. म्हणून आपण स्वतः विश्वासाला पुरे पडावे आणि मग इतरांकडून विश्वास-पालनाची अपेक्षा करावी. हा दुहेरी देव-घेवीचा व्यवहार आहे.

आईबाप आणि मुले, पत्नी आणि पती, मित्र आणि मित्र, ही नाती प्रेमावर आधारलेली असतात व त्या प्रेमापोटी परस्परांकडून काही संकेतपालन होईल अशी अपेक्षा असते. ते न झाल्यास विश्वासघात होतो. इतर काही संबंध आर्थिक व्यवहारावर आधारलेले असतात, पण त्यांत परस्परांकडून विश्वासपालनाची अपेक्षा असते. नोकर आणि मालक, दुकानदार आणि गिऱ्हाईक, ड्रायव्हर आणि पॅसेंजर, प्रवासी व कुली, डॉक्टर आणि पेशंट, वकील आणि अशील, कंत्राटदार आणि घर-बांधणारा मालक, अशा हजारो नात्यांनी समाजातले व्यवहार चालू असतात. हे सर्व विश्वासावर चाललेले आहेत; पण एखाद्या व्यक्तीच्या व व्यवहाराच्या बाबतीत या विश्वासाला तडा गेला म्हणजे मग इतर व्यवहारांतही माणूस साशंकपणाने आणि अविश्वासाने वागू लागतो.

माणूस विश्वासघात का करतो? स्वतःच्या तात्कालिक, क्षुद्र, आर्थिक फायद्या-करता किंवा सुखाकरता यापेक्षा अन्य कारणे संभवत नाहीत. आपल्या क्षणभंगी-

पेक्षा, अब्रूपेक्षा, स्वाभिमानापेक्षा, शीलापेक्षा क्षणिक सुख आणि अल्पसा फायदा यांचा लाभ झाल्यासारखा वाटला तरी जीवनात शांती आणि समाधान देण्याला त्याचा उपयोग होणार नाही. पापाच्या, विश्वासघाताच्या स्मृती चिरंतन राहातात. जीवनातील समाधान त्या नष्ट करतात. विश्वासघात करू नका. विश्वासाला पात्र ठरा. विश्वासाला पुरे पडा.

[१६-१०-७४

३६. अनेक भ्रष्टाचार--एक उपाय

समाजामध्ये अनेक प्रकारचे भ्रष्टाचार अनेक क्षेत्रांत चालू आहेत. या दुराचारात समाजातले अनेक वर्ग भाग घेत आहेत. मधून मधून एखाद्या भ्रष्टाचाराचा गाजावाजा होतो. त्याविरुद्ध लोक आणि वृत्तपत्रे थोडा वेळ आरडाओरड करतात की पुन्हा सर्वत्र सामसूम होते.

निवडणुका जवळ आल्या की धनिक वर्ग, राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदार यांच्या भ्रष्टाचाराला उधाण येते. निवडणुकीत द्रव्याचे बळ असलेले उमेदवार बहुधा निवडून येतात. द्रव्याचे प्रयोग वरपासून खालपर्यंत कोठे कसे झाले हे सर्वांना माहीत असते. पण कोणी काही करू शकत नाही. काही करण्याची सत्ता ज्यांच्या हातात असते तेच ती सत्ता मिळवण्याकरता व राखण्याकरता सर्व मार्गांचा अवलंब करीत असतात. मतदारही व्यक्तिशः व सामुदायिक रीतीने भ्रष्टाचारात भाग घेतात. काही वृत्तपत्रेही आपला हात धुऊन घेतात. सदसद्विवेक बुद्धीचे मूठभर विवेकी लोक या गोष्टी पाहून उद्विग्न होतात, पण काही करू शकत नाहीत.

व्यापारी वर्गाचा भ्रष्टाचार जगजाहीरच आहे. वस्तूंची चणचण व जनतेची अडचण म्हणजे व्यापाऱ्यांची पर्वणी. ही पर्वणी साधण्यासाठी त्यांचे सारे डावपेच चालू असतात. लोकांना बाजारात धान्य मिळत नाही आणि बडधा व्यापाऱ्यांनी मागविलेली धान्याची पोती रेल्वेच्या वाघिणीत ठिकठिकाणी पडून असतात.

सरकारी नोकर फार मोठ्या प्रमाणात या भ्रष्टाचार क्षेत्रात सामील झाले आहेत. कोर्टकचेरीतला साधा नोकर पाचदहा रुपये घेतल्याशिवाय काम करीत नाही, तर काही मोठे अधिकारी त्यांच्या हातातल्या अधिकाराप्रमाणे बक्षिशी घेतल्याशिवाय कागदपत्रे पहात नाहीत. रेल्वेतल्या राखीव जागा म्हणजे खाबूपणाचे एक स्वतंत्र क्षेत्रच आहे.

निवडून आलेले काही आमदार खासदार आपापल्या हातातल्या सत्तेचा व वशिल्याचा स्वार्थाकरिता उपयोग करीत असतात. लोकसभेत गेल्या महिन्यात

आयात परवान्याविषयी जी चर्चा झाली तिच्यामुळे या पद्धतीवर स्पष्ट प्रकाश पडला व तिच्याविषयी जनमनात घृणा उत्पन्न झाली.

सध्या चोरून परदेशी माल आयात करणाऱ्या स्मगलर व्यापाऱ्यांविरुद्ध सरकारी मोहीम सुरू आहे. पण लोकांच्या मनात असा प्रश्न उत्पन्न होतो की या क्षेत्रातील अपराधी लोकांची नांवे, पत्ते, पद्धती, लागेबांधे या सर्व गोष्टींची सरकारला माहिती असून आणि शिवाय अधिक माहिती लोकांनी पुरवली असून आजपर्यंत कारवाई का नाही केली ? कोणतीही विषवल्ली वाढण्यापूर्वीच तोडून टाकायला हवी. ती वाढू दिल्यावर तिचे बी इतके पसरते की त्याचे रुजणे आणि वाढणे अटळ आणि अनावर होऊन बसते. गाजर वनस्पती किंवा काँग्रेस गवताचा प्रसार झाला तसे होऊन बसते !

हा स्मगलिंगचा माल खुशीने घेणारात आपणही किती प्रमाणात सामील आहोत याचा प्रत्येकाने विचार करावा. मनगटी घड्याळ, ट्रान्झिस्टर, टेपरेकॉर्डर, टी. व्ही., मिक्सर, वूलन पँटस्, नॉयलॉन साड्या इत्यादी स्मगलिंगच्या मार्गाने आलेल्या वस्तू आपल्या घरात किती आहेत याचा शोध घ्या.

सारांश, समाजातला कोणताच वर्ग व व्यवसाय भ्रष्टाचारापासून अलिप्त राहिलेला नाही. शिक्षण, सहकार, आरोग्य इत्यादी सेवाप्रधान क्षेत्रातही तो शिरला आहे. त्याचे निर्मूलन करायला राष्ट्रव्यापी चळवळ पाहिजे. पण भ्रष्टाचाराचे मूळ नाहीसे केल्याशिवाय त्याचा कृती नष्ट होणार नाही. भ्रष्टाचाराचे मूळ आहे लोभ, स्वार्थ, तृष्णा, हाव इत्यादी शब्दांनी व्यक्त होणाऱ्या प्रवृत्तीत. हा लोभ द्रव्याचा, संपत्तीचा, प्रसिद्धीचा, अधिकाराचा अशा अनेक गोष्टींचा असू शकतो. राजकारणी व्यक्ती, सरकारी नोकरशाही, व्यापारी, मतदार, सर्व लोभाचे गुलाम बनतात आणि त्यामुळे भ्रष्टाचाराला, पापाला, दुराचाराला प्रवृत्त होतात. द्रव्यसंचय करावा, सत्ता संपादन करावी, अधिकार मिळवावा, प्रसिद्धी मिळवावी, सर्व ऐहिक सुखसाधने मिळवावीत अशी हाव निर्माण झाली की माणूस नीतीचे व सदाचाराचे मार्ग सोडून अनीतीने आणि भ्रष्टाचाराने वागू लागतो.

या लोभापासून समाजाला निवृत्त करण्याची किल्ली राजकीय पक्षांच्या व पुढाऱ्यांच्या हाती आहे. हे लोक त्या पक्षातील सामान्य लोकांचे आदर्श आहेत. अनीतीने, दुराचाराने व भ्रष्टाचाराने मिळविलेला पैसा आणि सत्ता यांचा स्वीकार करण्यास नाही असे कोड (म्हणजे तत्त्व, श्रद्धा, शर्त) सर्व राजकीय पक्षांनी स्वीकारले आणि त्याचे पालन केले तरच त्याचा समाजावर काही परिणाम होईल. अन्यथा

हा राष्ट्रव्यापी महारोग आवरणारा धन्वंतरी मला तरी कोणी दिसत नाही. या नैतिक भूमिकेवर तरी सर्व पुढाऱ्यांनी एकत्र यावयास पाहिजे. त्यांची राजकीय मते काही का असेनात. हा ऐतिहासिक क्षण आहे. यावेळी काही उपाय न केल्यास समाजाची अधोगती आटोक्याबाहेर जाईल.

घटस्थापना दिन

[१६-१०-७४

३७. कीड मारण्याचे दोन प्रकार

माणसाची वस्ती आली की तेथे कीड आलीच. दोन अर्थांनी. निसर्गसृष्टीतली कीड आणि नैतिक जीवनातील कीड.

कीड मारण्याचे पूर्वीचे आणि आजचे मार्ग निराळे आहेत. ढेकूण, डास, झुरळे माशा, चिलटे, इत्यादी प्राणी हजारो वर्षे मानवाचे रक्त शोषीत आणि अन्न व वातावरण दूषित करीत आलेले आहेत. पूर्वीची पद्धत म्हणजे एकेक ढेकूण पकडून तो मारणे. डास अंगावर बसला की तेवढाच मारणे. माशा दिसतील व सापडतील तेवढ्याच एकेक मारणे. या पद्धतीत एक गोष्ट कीटकांचे दृष्टीने सुखाची होती. फक्त अपराध्याला शासन होत असे! जो ढेकूण किंवा डास चावला, किंवा जी माशी अन्नावर बसली, त्यांनाच माणूस "मौतकी सजा' देत असे. निरपराधी किंवा अपराध करून नामानिराळे राहाणारे कीटक सुरक्षित असत.

या कीटकांना मारण्याचे आपले आजचे मार्ग निराळे आहेत. आज एकेक ढेकूण-डास-माशी मारण्याच्या भानगडीत आपण पडत नाही. सर्व वातावरणच निर्जंतुक करून टाकतो. डी. डी. टी. चा फवारा किंवा अशाच अन्य औषधांचे फवारे मारून अपराधात सापडलेले आणि गुन्हा करून लपलेले सर्वच कीटक आपण नष्ट करून टाकतो. ही पद्धत अधिक यशस्वी ठरली आहे.

समाजाला जी नैतिक कीड लागली आहे तिला नष्ट करण्याच्या बाबतीत याच पद्धतीचा अवलंब करायला पाहिजे. सध्या जुन्या पद्धतीने एकेक साठेबाज, करचुकार, चोरबाजारवाला, भेसळ करणारा, प्रवासभाडे चुकवणारा आणि अन्य मार्गाने असेच समाजविरोधी गुन्हे, पापे, दुराचार किंवा भ्रष्टाचार करणारा, यांना पकडून शिक्षा केली जाते. पण एकेक गुन्हा शोधायला केवढी यंत्रणा, किती मनुष्यबळ आणि किती खर्च लागतो! आणि हे पुन्हा रक्तदूषित झालेल्या रोग्याच्या गळवासारखे होते. एक गळू बरे केले की दुसरे तयार. यांना 'दिल्ली बॉईल्स' असे नाव आहे, हे मला १९२३ साली डॉ. जी. एस. सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले. मीच या गळवांचा पेशंट होतो! अशा रोग्याची रक्तशुद्धीच केलेली चांगली. तसे, समाजाला जी

नैतिक गळवे होतात त्यांना वरवर इलाज करण्यापेक्षा समाजात नैतिकतेचे वातावरण निर्माण करणे, त्याकरता मोहीम काढणे, त्याचे आदर्श असे अधिकारी, मंत्री इ. नेमणे हे अधिक टिकाऊ स्वरूपाचे होणार नाही का ? सरसकट लहान मोठी सर्व माणसे, पोर्टर, कंडक्टर, डायरेक्टर ते मिनिस्टरपर्यंत सर्व थरातील माणसे चोरून लपून गुन्हेगारी करीत असलेली, लहान मुलांना, तरुणांना आणि सामान्य जनाना दिसतात तेथे किती गुन्हेगार पकडणार आणि किती पोलीस ठेवणार ? ज्यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक म्हणून नेमायचे तेच दुराचारी असल्यावर हे गुन्हे नष्ट व्हायचे कसे ? असा हा सर्वव्यापी प्रश्न आहे. राष्ट्रसंघाचे दिवंगत नेते कै. हॅमरशूल्ड म्हणाले होते–" युद्धे ही मानवाच्या मनात प्रथम सुरू होतात ! " तसाच भ्रष्टाचार हा माणसाच्या मनात जन्म घेतो. ती मने शुद्ध करण्याचे तंत्र शासनाने अंगीकारावे.

[१९–१०–७४

३८. राक्षस--पौराणिक व आधुनिक

पुराणातील गोष्टींत आपण राक्षसांची वर्णने वाचतो. ते अक्राळविक्राळ अवाढव्य देहाचे, वाटेल ते रूप धारण करणारे, मानवांना खाणारे असे असत. काही राक्षसांना माणसाचा देहच भोजनाकरता लागत असे. पांडव वनवासात असताना एका कुटुंबात उतरले होते. ते ज्या गावात होते त्याच्या बाहेरच्या परिसरात एक राक्षस राहात असे. बकासूर त्याचे नाव. त्याला रोज माणूस खाण्याकरता पाठवायचा, असे गावकऱ्यांवर बंधन होते. शिवाय मुखशुद्धी करता एक गाडाभर अन्न पाठवायला लागे ! पांडव ज्या कुटुंबात उतरले होते त्यातला एक माणूस बळी जायचा दिवस होता. तेव्हा सर्व कुटुंबात एकच आकांत सुरू झाला. कुंतीमातेच्या सांगण्यावरून भीम त्या राक्षसाकडे जायला तयार झाला. त्या राक्षसाशी मल्लयुद्ध खेळून त्याचा भीमाने वध केला व सर्व गावावरची आपत्ती दूर केली. पांडव अतिथि-कर्तव्याला जागले. कुटुंबाच्या दुःखाशी एकरूप झाले. शिवाय एक राक्षस नष्ट केला. आबाल-वृद्धांचे मनोरंजन करून बोध देणाऱ्या अशा अनेक गोष्टी पुराणात आहेत. राक्षसांपुरते बोलायचे झाल्यास त्या राक्षसांचे सुधारलेले वंशज आजही जगात आणि आपल्या समाजातही आहेत.

पूर्वीच्या राक्षसांशी आधुनिक राक्षसांचे काही साम्य आहे, पण काही वेगळेपण आहे. हे राक्षस बाहेरून तुमच्यासारखेच दिसतात. पण मनाने आणि व्यवसायाने ते राक्षस आहेत. माणसे मारणे हे क्रीद पौराणिक राक्षसांप्रमाणे आधुनिक राक्षसांचेही आहे. पण ही मानवहत्या गुप्तपणे, आपल्याला कळू न देता हलके हलके चालते.

आपल्या अन्नात दगडाचा चूर मिसळणारे, विषारी रंग वापरणारे, खोटी अपायकारक द्रव्ये वापरणारे हे सर्व लोक राक्षसच नव्हेत काय ? यांनी दूषित केलेले अन्न खाऊन आपण आजारी पडतो आणि औषधे घेतो. तेथेही पुन्हा हे राक्षस हजर ! औषधांऐवजी खडूची पूड, अर्काऐवजी साधे पाणी, असे विविध प्रकार करून हे लोक बनावट औषधे बेमालूमपणे तयार करून विकतात. आपण औषधाला दोष देतो. हे लोक माणसे खात नाहीत, माणसांना हळूहळू पोखरतात आणि त्यांचा पैसा मात्र खातात. पूर्वीचे राक्षस इच्छेप्रमाणे गुप्त अथवा प्रकट होत व वाटेल ते रूप धारण करीत. अन्नात व औषधात भेसळ करून माणसे मारणारे आधुनिक राक्षसही असे गुप्तपणे वावरतात की शासनाच्या हेर विभागालाही त्यांचा पत्ता लागू शकत नाही.

माणसे मारणारे इतरही अनेक राक्षस आहेत त्यातली ही एक जात सांगितली. या नीच नराधमांच्या हिंसात्मक कारवायांपासून सतत सावध राहाणे एवढेच आपल्या हातात आहे. त्यांनाही कधी कधी एकादा भीम किंवा राम भेटतो आणि त्यांचा निकाल लावतो. त्यांचे आपल्यावर उपकार आहेत. धन्यवाद त्यांना.

[१९–१०–७४

३१. चाकू––सर्जनचा आणि गुंडाचा

चाकू. सर्वच चाकू सारखे नसतात. काही प्राण घेतात, काही प्राण वाचवतात. सर्जनचा चाकू रोग्याचे प्राण वाचवतो. गुंडाचा चाकू दुसऱ्याचा खून करतो.

ऑपरेशन चालू असतानाची चित्रे आपण कधी कधी पहातो. एक ऑपरेशन करण्याकरता मुख्य सर्जन, भूल देणारा डॉक्टर, हृदय आणि नाडी पहाणारा डॉक्टर, इतर सहाय्यक, नर्स, गडीमाणसे सगळे जिवाचे रान करीत असतात. रोग्याची जखम दूषित होऊ नये म्हणून सर्वजण तोंडाला, नाकाला मुसक्या बांधून घेतात. सर्वांचे पोषाख गमतीदार असतात. ऑपरेशन झाल्यावर ड्रेसिंगकरता कित्येक दिवस डॉक्टर आणि नर्स रोग्याची सेवा करीत असतात. या सगळ्याला हजार रुपयापासून पाचदहा हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. इतके झाले म्हणजे एक प्राण वाचतो. एक मानव यमाच्या दारातून परत आणला जातो.

आणि चाकूमारी करणारे गुंड काय करतात ? पाच पन्नास रुपयाचे पाकीट लांबवण्याकरता, किंवा अशाच काही क्षुद्र कारणाकरता दुसऱ्याच्या छातीत किंवा पाठीत चाकू मारून एका क्षणात त्याचा प्राण घेतात ! प्राण न जाता तो नुसताच जखमी झाला तर जखमेला टाके घालण्याकरता हॉस्पिटलमधे पुन्हा डॉक्टर इ. हजर असतातच. तू मार, मी वाचवतो, असेच जणू काही त्यांचे ब्रीद असते.

आणि या रोग्यांना लागणारे रक्त देण्याकरता शेकडो लोक रक्तदानाकरता हिरीरीने, पुढे येतात. लोकांचे रक्त हे गुंड सांडतात, आणि सज्जन लोक आपले रक्त त्यांना देतात. किती विरोध आहे !

गुंडांच्या चाकूने एका वेळी एकाद-दुसरा माणूस मारला जातो. पण एकाच वेळी अनेक माणसांना मारणारा दुसरा एक वर्ग आहे—मोटारी, लॉरी आणि ट्रक चालवणारांचा. हे लोक दारू पिऊन त्या नशेत गाड्या हाकतात आणि अपघात करतात. या अपघातात पाच पंचवीस माणसे एकदम मरतात किंवा जखमी होतात. सर्वच ड्रायव्हर असे नाहीत पण बरेचसे असावेत. कारण रस्त्यावरील वाहनांच्या अपघातांची मुख्य कारणे मद्यपान आणि जागरण ही आहेत असे आकडेवारीने माहीत झाले आहे.

चाकूमारी आणि निष्काळजी वाहन हाकणे या अपराधात सापडलेल्या लोकांना इतर शिक्षेबरोबर, गुन्ह्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता आणि बौद्धिक-मानसिक जाणीव होण्याकरता, एक प्रयोग करून पाहाण्यासारखा आहे. एकेक प्राण वाचवण्याकरता डॉक्टर व रक्तदान करणारे लोक कसे प्रयत्न करतात हे त्यांना प्रत्यक्ष अथवा चित्रपट नाट्याचे रूपाने दाखवावे. एक प्राण वाचवायला लागणारे मनुष्यबळ, कष्ट, खर्च आणि प्राणिमात्राबद्दल प्रेम, जगात कसे, किती आहे हे त्यांना दाखवून त्यांची प्रतिक्रिया पहावी.

विचारात आणि भावनेत पालट झाल्याशिवाय अंतःकरणात व कृतीत सुधारणा होणार नाही. माणसात माणुसकी आली पाहिजे. त्याच्यातला सैतान गाडून टाकला पाहिजे.

[१-११-७४

४०. बदनाम नाती व वर्ग

माणूस चांगला किंवा वाईट हे ठरवण्याची समाजात एक ढोबळ रीत ठरून गेली आहे. त्याला कोणत्या तरी वर्गात वालायचा आणि त्या वर्गातली सगळीच माणसे वाईट असतात असे मानून या माणसालाही बदनाम करायचा. आपण माणसाकडे व्यक्ती म्हणून न पहाता तो एका वर्गातला माणूस या दृष्टीने त्याच्याकडे त्या त्या विशिष्ट प्रसंगी पहातो. हे वर्ग माणसा-माणसात जी नाती आहेत त्याप्रमाणे बदलत असतात.

कौटुंबिक संबंध किंवा नाती यांचा विचार करता काही नाती वाईट असणारच हे गृहीत धरले जाते. सवती सवती, सावत्र आई, सावत्र मुलगा, सावत्र भावंडे, सासू

सुना, वृद्ध आईबाप तरुण मुले, यांचे संबंध हे वैरभावाचे असणारच अशा दृष्टीने ती माणसे एकमेकांकडे पहातात आणि इतर लोकही त्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहातात.

कुटुंबात जशी ही बदनाम नाती आहेत तशीच सामाजिक जीवनातही आहेत. मालक-कामगार, घरमालक-भाडेकरी, अधिकारी-कारकून, मुख्याध्यापक-शिक्षक, भिन्न राजकीय पक्षांतली दोन माणसे, यांचे संबंध हे अहिनकुलम् न्यायाचे असणार असे गृहीत धरले जाते. दोन भिन्न धर्मांचे लोकही परस्परांकडे याच वर्गनिष्ठ दृष्टीने पहातात.

आपण व्यक्तीकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून न पहाता ती एका वर्गाची प्रातिनिधिक व्यक्ती मानून तिला काही सद्गुण-दुर्गुण चिकटवतो. सासवा एकत्र आल्या की सुनांची नालस्ती; सुना एकत्र आल्या की सासवांच्या कागाळ्या; घरमालक एकत्र आले की भाडेकरूंच्या विरुद्ध तक्रारी, आणि भाडेकरू एकत्र आले की घरमालकांच्या स्वार्थी वृत्तीवर टीका; शिक्षकवर्ग मुख्याध्यापकांवर टीका करतो आणि मुख्यअध्यापक शिक्षकांबद्दल तक्रारी करतो. आपल्या धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मातले लोक एकमेकांकडे अशाच संशयी वृत्तीने पहात असतात. असा हा कौटुंबिक आणि सामाजिक जीवनातील वर्गकलह चालू असतो.

खरोखर एकच माणूस दोन्हीही वर्गात पडतो किंवा पडू शकतो. सासू कोणाची तरी सून असते आणि सून भावी सुनेची सासू असते. आजचा कामगार उद्या मालक होण्याचाही संभव आहे. कर्तृत्व असेल तर घरमालक घर बांधण्यापूर्वी कोणाचा तरी भाडेकरू असतोच. याच विषयावर बिरबल-बादशहाची एक मजेदार गोष्ट प्रसिद्ध आहे. बादशहा आपल्या सासऱ्यावर नाराज झाला. सांकेतिक विचारसरणीप्रमाणे त्याने सगळ्या श्वशुरवर्गाला बदनाम ठरवून सर्वांना सुळावर द्यायचे ठरवले.हजारो सूळ करण्याचा हुकूम बिरबलला दिला गेला. तयार झालेले सूळ पाहाण्याकरता बादशहा गेला. तेथे त्याला काही लाकडी, काही लोखंडी, काही पितळेचे सूळ दिसले. त्यात एक सोन्याचा सूळ पाहून बादशहाला आश्चर्य वाटले. 'हा सोन्याचा सूळ कोणाकरता बिरबल ?' त्याने विचारले. 'खावंद, हा सुवर्ण सूळ खावंदाकरताच आहे, कारण तेही आपल्या जामातांचे श्वशूरच आहेत.' या गोष्टीत फार मोठा अर्थ भरला आहे. त्या गोष्टीतील तत्त्वाचा व्यापक विचार करा म्हणजे आपल्या लक्षात येईल.

माणूस एकाद्या विशिष्ट नात्यातला, धर्मातला, वर्गातला, पक्षातला, किंवा व्यवसायातला झाला म्हणून तो चांगला किंवा वाईट ठरत नाही. प्रत्येक नात्यात आणि संबंधात चांगली व वाईट दोन्ही प्रकारची माणसे असतात. माणूस कोणत्याही नात्यातला किंवा वर्गातला किंवा धर्मातला असो, त्याच्याकडे व्यक्ती या नात्याने पहा आणि त्याचे मूल्यमापन करून त्याच्याशी वागा. काही व्यक्तींमुळे सर्व वर्गाला बदनाम करू नका.

[४-११-७४

४१. हे जनते, तुझ्याकडून अपेक्षा--

आज जनता ही सार्वभौम झाली आहे. सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार मिळाल्यामुळे खेडेगावापासून राजधानीच्या शहरापर्यंत, आणि तालुक्यापासून संपूर्ण देशापर्यंत, शासनाची सत्ता कोणाच्या हातात द्यायची ते ठरवण्याचा अधिकार जनतेला मिळाला आहे. जनतेचा पत्ता काय ? कोणी स्वतःला जनता मानावयाचे ? जनता म्हणजे बहुजनसमाज, जे संख्येने सर्वाधिक आहेत ते लोक. यातून अगदी श्रीमंत आणि उच्च-मध्यम वर्ग आपोआप गळतात. मध्यम वर्गापैकी बेताच्या उत्पन्नाचे सामान्य लोक म्हणजे कारकून, शिक्षक, छोटे यंत्रज्ञ, लहान व्यापारी, शेतकरी इत्यादी पांढरपेशा वर्ग; आणि त्यापेक्षाही ज्यांची संख्या अधिक आहे असा खेड्यातील व शहरातील श्रमिक वर्ग, व हातावर ज्यांचे पोट आहे असा सर्व व्यवसाय करणारा वर्ग. हे सर्वजनता या वर्गाचे घटक आहेत. आज सर्व देशात या वर्गाला प्राधान्य आले आहे आणि त्याचे जीवनातील स्थान सुधारण्याचा इष्ट असा प्रयत्न चालला आहे. त्यांना अन्न, वस्त्र, घरे, शिक्षण, करमणुकीच्या सोयी आणि शासनाच्या सत्तेमधे अधिकार देण्याचा प्रयत्न चालू आहे. चालू युगाचे हे वैशिष्ट्य आहे.

आजपर्यंत आर्थिक दृष्टीने, राजकीय सत्तेच्या वाटपात आणि ज्ञानाच्या क्षेत्रात ज्या अल्पसंख्य वरच्या वर्गाला वरिष्ठ स्थान मिळाले होते त्याने या आपल्या स्थानाचा व सत्तेचा उपयोग स्वार्थाकडे, बहुजनसमाजाच्या शोषणाकडे आणि आपले उच्च स्थान टिकवण्याकडे केला. त्यामुळे बहुजनसमाजात जागृति होऊन ही नवीन क्रांती, हे सत्तेचे, संपत्तीचे आणि ऐहिक सुखसोयींचे विकेंद्रीकरण होत आहे. ते चालू असतानाच त्याला योग्य दिशा मिळाली तर वरिष्ठ वर्गाने केलेल्या चुका टळण्याची शक्यता आहे. नाहीतर जनतेतून निर्माण झालेला नवीन सत्ता-संपत्ती-विद्याधारी एक वरचा वर्ग अस्तित्वात येईल आणि पूर्वीच्या वरिष्ठ वर्गाप्रमाणे तोही स्वार्थी, शोषण प्रवृत्तीचा, आपल्याच भोगविलासात मग्न, ज्ञानाचा दुरूपयोग करणारा, बहुजन समाजाकडे दुर्लक्ष करणारा असा बनेल. थोड्या फार प्रमाणात आज असे होत असल्याची चिन्हे दिसत आहेत म्हणून बहुजन-समाजाच्या नेत्यांनी आणि विचारवंतांनी दूरदृष्टीने विचार करून मार्गदर्शन करायला हवे. आज ज्या प्रवृत्ती दिसतात त्यांचे स्थूल स्वरूप असे आहे.

कामगार वर्गातही भिन्न गट पडून जो तो गट आपल्याच बदरात अधिकाधिक वेतने, भत्ते, बोनस इत्यादि आर्थिक लाभ कसा पडेल याच्या प्रयत्नात आहे. संपूर्ण समाजाचा किंवा अन्य क्षेत्रातील श्रमजीवी लोकांचा विचार कामगारवर्गात व त्याच्या पुढाऱ्यांत नाही. आपल्या गटाचा स्वार्थ साधण्याकरता उद्योगधंदे बंद पडले

तरी चालतील, उत्पादन कमी झाले तरी चालेल, अशी आकुंचित दृष्टी बनत चालली आहे. हे धोक्याचे आहे. ही वृत्ती कामगारातीलच विचारवंतांनी बदलली पाहिजे.

आम जनतेला राजकीय मतदानाचा अधिकार मिळाला. पण त्याचा उपयोग करताना आपापली जात, पोटजात, आळी, गाव, जिल्हा यातलाच माणूस निवडण्याकडे प्रवृत्ती आहे. अखिल समाजाच्या हितापेक्षा आकुंचित हिताला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती कमी झाली पाहिजे.

गावाचा, जिल्ह्याचा, प्रांताचा अथवा देशाचा कारभार करण्याचा अधिकार ज्यांच्याकडे आला ते लोक आपल्या अधिकाराचा व सत्तेचा उपयोग आपापले आर्थिक फायदे अधिकाधिक कसे होतील, जनतेचा हा पैसा आहे हे विसरून, तो पैसा स्वतःकडे कसा येईल या विवंचनेत आहेत. मासिक वेतने, सभाभत्ते, वाहनभत्ते इत्यादी रूपाने जनतेच्या पैशाची स्वतःच्या स्वार्थाकरता उधळपट्टी करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. लोकांच्या निढळाच्या घामाचा पैसा आपण वापरतो आहोत ही जाणीव नाही.

गावापासून वरपर्यंत लहानमोठी सत्ता ज्यांच्या हातात आली ते लोक पूर्वीच्या राजेराजवाड्याप्रमाणे आणि सरदार नबाबाप्रमाणे वागू लागले आहेत. काही काही ठिकाणी सामान्य लोकांचे वित्त, जीवित आणि शीलही सुरक्षित नाही अशी स्थिती येत चालली आहे. शासकीय नोकरवर्गावर या सत्ताधाऱ्यांची हुकमत असल्याने लोकांना त्राता आणि वाली कोणी राहिला नाही असे वाटत आहे. पूर्वीच्या अमदानीत हेच होते मग फरक काय पडला असे लोकांना वाटू लागले आहे, ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. सत्ता आणि अधिकार जनतेच्या रक्षणाकरता आहे याची जाणीव नव्या सत्ताधाऱ्यांना कोणीतरी करून दिली पाहिजे.

शिक्षणाची संधी सर्वांना मिळाली व माध्यमिक-उच्च- उच्चतम शिक्षणाची दारे सर्वांना खुली झाली. पण बौद्धिक कष्ट करून या संधीचा फायदा करून घेण्याची प्रवृत्ती फार थोड्यांच्या ठिकाणी दिसते. जेमतेम अभ्यासावर पदव्या मिळवून राखीव नोकऱ्या कशा मिळतील इकडे बहुतेकांचे लक्ष आहे. विद्येची, ज्ञानाची, संशोधनांची विविध क्षेत्रें आपल्या नवीन विचारांनी व संशोधनाने संपन्न करून जगाच्या ज्ञानभांडारात भर घालावी ही महत्त्वाकांक्षा फार थोड्यांच्या ठिकाणी दिसते. स्वार्थ आणि नोकऱ्या या पलीकडेही पाहण्याची प्रवृत्ती निर्माण केली पाहिजे. ज्यांना केवळ वाचनाचे ज्ञान झाले ते त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या व्यवसायाचे किंवा अन्य भरीव ज्ञान संपादन करण्यापेक्षा हलके फुलके, केवळ करमणुकीचे वाचन करण्याकडे आपल्या शिक्षणाचा उपयोग करीत आहेत. सात्त्विक करमणुकीपेक्षा हिंसाप्रधान आणि कामोत्तेजक करमणुकीकडे अधिक प्रवृत्ती वाढत आहे. संपत्तीचा उपयोग आपली राहाणी-विचारसरणी उन्नत करण्यापेक्षा व्यसनाकडे केला जात आहे. सामा-

जिक प्रश्न सोडवताना न्याय-अन्याय, समाजहित-अनहित पाहण्यापेक्षा संख्येच्या जोरावर, बहुमताच्या जोरावर प्रश्नांचा निकाल लावण्याची प्रवृत्ती वाढत आहे. या सर्व अनिष्ट प्रवृत्ती वाढणे हे जनतेच्या हिताचे नाही.

जनतेचा खरा खरा उद्धार कसा होईल, पूर्वीच्या वरिष्ठ वर्गाने केलेल्या चुका कशा टाळल्या जातील, या दृष्टीने विचार होणे अवश्य आहे. सर्व विचारवंतांच्या चिंतेचा हा विषय असावा.

[११-११-७४

४२. असामान्य जीवनाचे रहस्य

असामान्य माणसे समाजात मानसन्मानाला व इतरांच्या आदराला पात्र होतात. कधी कधी द्रव्याच्या, बढतीच्या अथवा इतर ऐहिक लाभाच्या स्वरूपात त्यांना त्यांच्या विशेष गुणांचा मोबदलाही मिळतो. अशा वेळी आपणांला मनातून त्यांचा हेवा वाटतो. असे भाग्य मला मिळेल का असा विचारही मनात न कळता चमकून जातो. पण आपल्याकडून प्रयत्न होत नाही, आणि प्रयत्न करायचा झाला तरी योग्य दिशाही दिसत नाही.

असामान्य माणसे मोठी होतात, कारण त्यांच्या ठिकाणी सहज आणि संपादित असे काही अलौकिक सद्‌गुण असतात. अलौकिक म्हणजे सामान्य माणसाच्या ठिकाणी नाहीत असे. हा अलौकिकपणा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसून येतो. विद्यार्थी, लेखक, संशोधक, तंत्रज्ञ, व्यापारी, कारखानदार, अधिकारी, गृहिणी, गवई, चित्रकार, कलाकार, बागाईतदार, शेतकरी, कामगार, सैनिक अशा प्रत्येक क्षेत्रात असामान्य गुण दाखवणाऱ्या व्यक्ती असतात. त्यांच्या मोठेपणाचे वेळापत्रक त्यांनी कधी केले नव्हते. परंतु काही विशिष्ट गुणांचे संगोपन त्यांनी दीर्घकाळ केले आणि त्याचा परिपाक म्हणून त्यांना त्यांच्या क्षेत्रात मोठेपणा, पुरुषोत्तमता, असामान्यता किंवा अलौकिकता मिळली. अशा गुणांची तुम्ही जोपासना केली तर तुमच्या क्षेत्रात, तुमच्या बुद्धीच्या व पात्रतेच्या प्रमाणात तुम्हांलाही मोठेपणा मिळेल.

नेहमीची कामे करताना इतरांपेक्षा थोडी अधिक बुद्धी वापरून ती करा. मी करतो ते काम अधिक चांगले, अधिक प्रमाणात, कमी श्रमात, वेळात व खर्चात करो करता येईल याचा सतत विचार करीत राहा. थोडी संशोधन बुद्धी ठेवा. नव्या कल्पना लढवा. अशी सवय लागली तर अचानक एखादे अनपेक्षित संशोधन तुमच्याकडून होऊन जाईल. निदानपक्षी तुमच्या कामात इतरांपेक्षा काही वैशिष्ट्य असते याची इतरांना जाणीव होईल.

प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करा. आळसात, चकाट्या पिटण्यात, वायफळ गप्पात, वेळ-पैसा-शक्ती वाया घालवणाऱ्या व्यसनात, आपला काळ दवडू नका. झोपेचे प्रमाण आरोग्य राखण्यापुरतेच ठेवा. इतर लोक घोरत असतात त्या वेळी असामान्य माणसे जागून आपले उद्योग करीत असतात, त्यामुळे त्यांना अलौकिक यश मिळते.

प्रत्येक व्यवसायासंबंधी आज विपुल वाङ्मय उपलब्ध झालेले आहे. जे काम तुम्ही करता त्यासंबंधी मराठीत, हिंदीत व इंग्रजीत जेवढे वाङ्मय मिळेल त्याचा संग्रह करा. पुस्तके विकत घेऊन स्वतःचा संग्रह करा. तुमच्या व्यवसायासंबंधी रोज दीड-दोन तास तरी वाचन करा. त्यानंतर मग करमणुकीकरता नाटके-कथा-कादंबरी यासारखे हलकेफुलके वाङ्मय पहा; तेही मनाला विरंगुळा मिळण्यापुरतेच.

आपल्या ठिकाणी असलेल्या गुणांचा व अवगुणांचा, त्याचप्रमाणे आपल्या कामांचा दिवसातून एकदा तरी आढावा घ्या. त्याला निश्चित वेळ ठरवून द्या. झोपण्यापूर्वी, पहिली जाग आल्याबरोबर, भोजनापूर्वी अथवा कामाला प्रारंभ करण्यापूर्वी, असा कोणता तरी निश्चित वेळ या कामाकरता राखून ठेवा. हळूहळू तुमची दृष्टी अंतर्मुख होईल. मी कसा आहे याची जाणीव होईल. मग मी कसे वागावे असा विचार मनात येईल. विचाराने माणसाचे जीवन बनत असते. ज्या विचाराचा ध्यास घ्याल त्याचे प्रतिबिंब तुमच्या जीवनात आपोआप पडेल.

सामान्य माणसे रूढीप्रिय व अनुकरणशील असतात. भोवतालची चार माणसे वागतात तसे वागण्याची त्यांची प्रवृत्ती असते. नवनवीन फॅशन्स् याही परंपराच असतात की! त्या सोडायला व् मोडायला सामान्य माणसे भितात. असामान्य माणसे निर्भय असतात. योग्य त्या बाबतीत रूढी, परंपरा, प्रस्थापित मार्ग सोडायला भीत नाहीत. समाजाच्या इतराजीची भीती ते बाळगीत नाहीत. त्यांची तत्त्वावर व सत्यावर निष्ठा असते. कालांतराने त्यांची तत्त्वे इतरांना आपोआप पटतात व मान्य होतात.

ही पंच-सूत्री मला सुचली तशी दिली आहे. यात कमा-जास्त करून तुम्हीही आपली स्वतःची भर घालू शकाल. तेच अधिक चांगले. जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणतात ते अशाच रीतीने तयार होत असते. या तत्त्वाचे पालन केले तर निदान पक्षी व्यवसायातला आणि जीवनातला आनंद व समाधान तुम्हांला मिळेल. योगायोगाने कधी काळी तुम्हीही आपापल्या क्षेत्रात मोठे होऊन जाल. कोणी सांगावे!

[१४-११-७४

४३. आपण नाजूक मिजासखोर होत चाललो

संपत्ती वाढली, पैसे मिळू लागले की अनेक साधने उपलब्ध होतात. त्यांचा उपयोग किती, कुठे करायचा याचे तानमान आपल्याला राहात नाही. सायकल, स्कूटर, रिक्षा, मोटार, बस इत्यादी वाहने उपलब्ध झाली. त्यामुळे पायी चालण्याची आपली ताकद कमी होत चालली. चार-आठ आणे दिले की दोन तीन मल वसने जाता येते, मग पायी कोण चालतो! लहान सहान अंतरेही पायी जाण्यापेक्षा स्कूटर किंवा मोटार उपयोगात आणण्याची स्वाभाविक प्रवृत्ती होते. त्यामुळे आपली चालण्याची ताकद कमी होते हे लक्षात येत नाही. वेळ वाचवायचा असेल तेथे व आपल्या ताकदीच्यापलीकडे अधिक अंतर आहे तेथे वाहन अवश्य उपयोगात आणावे. पण दिवसातून काही मैल चालण्याची सवय ठेवणे अवश्य आहे. त्यामुळे आत्मविश्वास कायम राहातो.

१९१६ सालची गोष्ट. त्यावेळी बसेस नव्हत्या. बैलगाडीचा प्रवास असे. आम्ही दोघे बंधू एका खेडेगावी गेलो होतो. परत पुण्याला यायला निघालो. गाडीवाल्याने भाडे सहा सहा आणे सांगितले. आमच्याजवळ चार चार आणेच होते. आम्ही तेथून सायंकाळी सहाला निघून पंचवीस सव्वीस मैलांचा पायी प्रवास करून पुण्याला पहाटे चारपाच वाजता आलो. पुन्हा त्याच दिवशी सायंकाळी सहाला निघून सासवडमार्गे पुरंदरला, म्हणजे आणखी पंचवीस सव्वीस मैल, पहाटे जाऊन पोचलो. अशी पायी चालण्याची धमक कायम राहील इतक्या बेताने वाहनांचा उपयोग करा.

थंडीवारा, उन्हाळा, पावसाळा यांपासून रक्षण करण्याकरता गरम कोट, रेनकोट, पातळ कपडे इत्यादी सोयी मुबलक झाल्यामुळे हे निरनिराळे ऋतू सहन करण्यांची आपली कुवत कमी होत चालली. थंडी-वारा-उन्हाळा-पावसाळा सहन करण्याचा काटकपणा टिकेल अशा बेताने उपलब्ध साधनांचा उपयोग करा.

शारीरिक श्रम आणि व्यायाम यांच्या सवयी कमी झाल्यामुळे सकस अन्न पचवण्याची ताकद कमी होते. पण खाण्याचे प्रमाण मात्र तसेच राहाते, किंबहुना वाढते. परिणामी पचनाचे सर्व विकार निर्माण होतात व त्यांपासून इतर रोगांचा जन्म होतो. म्हणून व्यायामाची आणि शारीरिक कामे करण्याची सवय कायम ठेवा. घरातली अंगमेहेनतीची कामे शक्य तितकी घरातल्याच माणसात विभागून घ्या. सर्वांनाच कामाची सवय लागू द्या. आरोग्यालाही ती हितावह आहे.

शारीरिक कष्टाचे काम दीर्घकाळ करण्याचा सराव करा व कायम ठेवा. अशी कामे उपलब्ध नसल्यास त्यांना पर्यायी असे व्यायाम आठवड्यातून एक दोनदा घ्या. पोहणे, टेकडी चढणे, दौड करणे, मैदानी-मर्दानी खेळ खेळणे, शेतात किंवा बागेत खणणे, खुरपणे इ. कामे करण्याची अधून मधून सवय ठेवा.

शाळा-महाविद्यालयात असताना परीक्षेच्या मोसमांत रोज आठ दहा तास अभ्यास करण्याची सवय आपल्याला होती. परीक्षा संपल्यानंतर ती सवयही कमी झाली. अखंड बौद्धिक काम करण्याची सवय कायम राहण्याचे दृष्टीने दररोज दोन किंवा तीन तास तुमच्या विषयाच्या सखोल अभ्यासाचा उपक्रम सुरू करा. तुमचे ज्ञान वाढते राहील. बुद्धीची ताकद कायम राहील, बौद्धिक आनंद मिळेल, आणि तुमच्या ज्ञानसंचयामुळे तुमच्या वर्तुळात तुम्हांला मानसन्मान मिळेल. सतत हलके फुलके असेच वाचन केल्यामुळे बुद्धीची तीव्रता व ज्ञानाची सखोलता कमी होते. सकस वाचन एक दोन तास कराच. त्याकरता रात्रीचा किंवा प्रातःकाळचा वेळ राखून ठेवा.

मनाचा खंबीरपणा वाढवण्याचे दृष्टीने काही चांगले निश्चय करून ते जिद्दीने आचरणात आणा. कोठल्याही परिस्थितीत विकारांना शरण न जाता मन शांत ठेवण्याची, मनाचा तोल राखण्याची सतत जाणीव ठेवा. त्यामुळे मनाचा नाजूकपणा जाऊन स्वभावाला दृढता येईल.

शारीरिक, बौद्धिक व मानसिक अशा सर्वच दृष्टींनी आपले व्यक्तिमत्त्व संपन्न होण्याकरता हे निरनिराळे मार्ग सांगितले आहेत. त्यामुळे नाजूकपणा कमी होऊन कणखरपणा व काटकपणा वाढेल. आजच्या काळात त्याची फार गरज आहे.

[१७-११-७४

४४. केवळ पारायण नको, मननही हवे

महाराष्ट्रात गीता व ज्ञानेश्वरी हे ग्रंथ अत्यंत लोकप्रिय आहेत. परंतु ते पारायणाचे दृष्टीने वाचले जातात. त्यातील विचारांचा विचार आपण फारसा करीत नाही. ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी गीताच आहे. हे ग्रंथ कोणत्या दृष्टीने वाचावेत ते सुचवण्याकरता या लेखात ४१ मुद्दे सुचवले आहेत. त्यांचा व्यक्तिशः अथवा सामुदायिक विचार केल्यास हे दोन महान ग्रंथ आपणाला अधिक चांगल्या रीतीने समजतील. हे मुद्दे असे :—

गीता-अभ्यास :

१. अध्याय १ मधील समस्या काय आहेत त्या पहा. अर्जुनाचा हेतू व त्यात झालेले बदल. (लोभ, लोभत्याग) अपेक्षित फल व प्रत्यक्ष मिळणारे फळ (दुःख, पाप), कर्मत्यागाची कारणे, कर्म स्वीकारण्याचे कारण.

२. धृतराष्ट्र, दुर्योधन, अर्जुन, गुरुजन व श्रीकृष्ण यांच्या स्वभावात कोणते गुण व दोष दाखवले आहेत ते पाहा. (अहंकार, ममत्व, लोभ, आत्मनिरीक्षण, प्रसन्नता इ.)

३. युद्धाकरता प्रथम तयार व नंतर माघार, या अर्जुनाच्या वृत्तीत गीतेने काय बदल केला त्याचा विचार करा.

४. अर्जुनावरील युद्धप्रसंग घेण्यात गीतेचा उद्देश काय असावा, नंतरच्या पिढीला त्या प्रसंगातल्या कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत ते पहा.

५. गीतेचा मध्यवर्ती संदेश काय? (योग किंवा बुद्धियोग.) त्यामुळे अर्जुनाच्या समस्या कशा सुटतात ते पहा.

६. योग शब्दात कोणत्या गुणांचा अंतर्भाव होतो त्यांची नोंद करा.

७. स्थितप्रज्ञ (अ. २), ब्रह्मभूत (अ. ५), जितात्मा (अ. ६), भक्त (अ. १२), गुणातीत (अ. १४) यांच्या वर्णनांत समान गुण कोणते व प्रत्येकाचे विशेष गुण कोणते त्यांचे टिपण करा.

८. सांख्य तत्त्वज्ञानाची मुख्य तत्त्वे अ. २ ते ५ व अ. १३, १४ व १८ मध्ये आली आहेत. त्यांची स्पष्टपणे मांडणी करा.

९. योगवृत्ती साध्य करण्याची साधने कोणती? त्यांचे परस्परांशी संबंध काय आहेत ते दर्शविणारे श्लोक निराळे काढून वाचा.

१०. ज्ञानयोगातून अनासक्ती, निष्कामता, समत्व हो तत्त्वे कशी निष्पन्न होतात त्याचा विचार करा. (अ. १ ते १३ व १५)

११. त्यात सांख्य तत्त्वज्ञानाचा व ईश्वरप्रधान वेदान्त तत्वज्ञानाचा निरनिराळा विचार व त्यात समन्वय, यांची मांडणी कशी आहे ते पहा.

१२. ईश्वराचे व्यक्त व अव्यक्त स्वरूप याविषयीचे श्लोक निराळे काढून वाचा. गीताकारांना कोणत्या स्वरूपाची उपासना पसंत आहे? का? त्याचा विचार करा.

१३. ध्यानातून कोणत्या गोष्टी साध्य करावयाच्या आहेत? ध्यानाचे महत्त्व काय? ध्यानाचे प्रकार किती आहेत? अंतिम साध्य काय? (अ. ५, ६, ८, १२, १८).

१४. ध्यानाचा व भक्तीचा परस्पर संबंध काय आहे? भक्तीचा समावेश करण्याचा उद्देश मूळ प्रश्नाशी कसा निगडित आहे?

१५. संन्यासाची वारंवार चर्चा करण्याचे प्रयोजन काय असावे? गीताकालीन संन्याशाचे जीवन कसे होते?

१६. अध्याय २ ते ५ मध्ये सांख्य व योग यांची तुलना केली आहे. दोन तत्त्वज्ञानांत साम्य किती आणि भिन्नता किती आहे ? कोणती ?

१७. अ. २ ते ५ मध्ये आलेले कर्मयोगासंबंधीचे विचार एकत्र करून त्यांची व्यवस्थित मांडणी करा. (कर्म, कर्तृत्व, कर्मफल कोणाचे ?)

१८. ज्ञान, ध्यान, कर्म यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आलेले उल्लेख एकत्र करून परस्पर संबंध काय आहे तें समजावून घ्या.

१९. लोभ ही कल्पना कोणकोणत्या विविध शब्दांनी व्यक्त झाली आहे, हे अध्यायवार पहा. (संग, काम, क्रोध, राग, द्वेष इ. इ.)

२०. अहंकार आणि ममत्व या कल्पनांच्या जागा पहा. त्याविषयी गीता काय म्हणते ते पहा.

२१. विश्वाच्या उत्पत्ति-लयाच्या सर्व कल्पना एकत्र करा. त्यांत समन्वय घालता येतो काय ?

२२. देह, जीवात्मा, परमात्मा या कल्पनांकरता कोणती परिभाषा निरनिराळ्या अध्यायात आहे ते पहा. कल्पनांचा अर्थ जाणून घ्या.

२३. यज्ञविषयक विचार एकत्र करा व त्यांत क्रम लावा.

२४. विविध धर्म, देवता, उपासना यांचा समन्वय गीतेने कसा घातला ते पहा (अ. ४, ७ ते १२).

२५. स्थितप्रज्ञ योगी (अ. २, ४, ५, ६), सात्त्विक मानव (अ. १७, १८) आणि कर्मयोगी भक्त (अ. ९,१२, १८), यांच्या कृतीत आणि स्वभावात काय साम्यभेद आहेत ते पहा.

२६. १० ते ५० श्लोकांची संक्षिप्त गीता करायची झाल्यास कोणते श्लोक व विषय घ्यावेत ?

२७. अर्जुनाच्या समस्यांसारख्या समस्या निर्माण करणारे तुमच्या किंवा परिचितांच्या जीवनातील प्रसंग घेऊन, त्यांत गीता कशी उपयोगी पडते ते पहा.

२८. लोभामुळे दुःख व पाप निर्माण होतात हे तत्त्व सांगणारे आजच्या समाजिक-वैयक्तिक जीवनातील ४–५ प्रसंग नोंदवून ठेवा.

२९. समाजधारणा व समाजहित यांविषयी गीतेतील विचार एकत्र करून त्यांवर चिंतन करा.

३०. मनात येणारे विविध विकार, भावना आणि वृत्ती व्यक्त करणारे शब्द व कल्पना एकत्र करून त्यांची वर्गवारी करून पहा.

३१. गीतेतील नैतिक जीवनाविषयी (सदाचार-भ्रष्टाचार) विचार एकत्र करा.

३२. पहिल्या अध्यायात अर्जुनापुढे आलेल्या सर्व समस्या गीतेने सोडविल्या काय ? त्यावर मनन करा.

३३. जीवनात निर्माण होणारी कोणती द्वन्द्वे (कॉनफ्लिक्टस्) गीतेने सांगितली आहेत ? ती केव्हा निर्माण होतात ? कर्म करण्यापूर्वी (उद्देशांमध्ये) कर्म निवडताना, का कर्म केल्यानंतर (कर्मपरिणामामध्ये), का दोन्ही अवस्थांत ?

३४. हेतू, कर्म आणि कर्मफल यांचा विचार सदोष कर्म आणि निर्दोष कर्म अशा दोन्ही दृष्टींनी करून पहा.

३५. कठीण प्रसंगी कर्माची निवड करण्याकरता गीता काय मार्गदर्शन करते त्याचा विचार करा (अ. ४, १८).

३६. व्यक्तिमत्त्व (पर्सनॅलिटी) विकसित करण्याचे दृष्टीने शरीर, मन व बुद्धी यांचे शुद्धीकरण, नियमन व विकसन कसे करावे हे आपल्या तरुण मुला-मुलींना समजावून सांगा (गीतेच्या आधारे).

३७. विज्ञानवादी व भोगवादी अशा संस्कृतीत व समाजात वैयक्तिक व सामाजिक समस्या कोणत्या निर्माण झाल्या आहेत ? त्या सोडवण्याकरता गीता उपयोगी पडते का त्याचा विचार करा.

३८. चातुर्वर्ण्याची पूर्वीचीच कल्पना गीतेने स्वीकारली का काही परिवर्तन सूचित केले आहे ते पहा (अ. १, ४, १८).

३९. गीतेतील महत्त्वाची व नित्योपयोगी आज्ञार्थी व उपदेशार्थी वचने एकत्र नोंदून ठेवा व ती नित्य वाचा.

४०. दैवी व आसुरी गुण (अ. १६) किंवा सत्त्व-रज-तमोगुण (अ. १४, १७, १८) या दृष्टीने विचार करता "मी स्वतः कोणत्या वर्गात आहे व कोणत्या वर्गात जावे." यावर मनन करा.

४१. आजच्या जीवनात गीता उपयुक्त आहे काय ? असल्यास तुमच्या परिवारात तिचा प्रसार व प्रचार करण्याकरता तुम्हांला काय करता येईल त्याचा विचार करून दोन तीन मार्ग शोधून काढा.

यांतील कोणताही एक मुद्दा घेऊन त्यावर रोज विचार करा. तुमच्या जीवनात त्याचा उपयोग होईल.

संदर्भ ग्रंथ—१. मराठी गीता विवरण, २. गीता विकास-समतोल जीवनाचे दर्शन, ३. मूळ गीतेचा शोध, ४. सर्वबोध पद्य गीता, ५. गीतेतील मुख्य विचार.

[१४-१२-७४

४५. सत्संगी रती वाढो

नुकतीच जानेवारीची एक तारीख होऊन गेली. पाश्चात्यांच्या पद्धतीप्रमाणे नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी काही तरी चांगला संकल्प करायचा असतो (आणि वर्षभर तो विसरायचाही असतो!). तसा संकल्प काय करावा असा विचार करता करता मला ज्ञानेश्वरांचे पसायदान आठवले.

जे खलांची व्यंकटी सांडो ! तया सत्संगी रती वाढो ॥

यातील दुसरी ओळ मला, तुम्हाला, त्याला, तिला, याला, हिला, शेजाऱ्याला, पलीकडच्याला, जवळच्याला, लांबच्याला, सज्जनाला, दुर्जनाला—अशा सर्वांनाच उपयोगी आणि अभिप्रेत आहे.

मला तर चांगल्या संगतीची गरज आहेच. व्यसनी, लबाड, स्वार्थी, अहंकारी, समाजकंटक, देशद्रोही अशा माणसांची संगत मला नसावी. माझ्या मुला-मुलींनाही कोणाची संगत आहे ते पाहिले पाहिजे. उनाड, तास बुडवणारे, छानछोकीत मग्न असणारे, आई-बापांचा पैसा उधळणरे, शृंगारिक वाचनात-विचारात-व्यसनात डुंबणारे, व्यसनी, परीक्षेच्या वाऱ्या करणारे असे मित्र किंवा अशा मैत्रिणी यांच्या सहवासात माझी मुले, मुली, नातवंडे येतात की काय हे मी वर्षभर डोळ्यात तेल घालून पाहिले पाहिजे. नाही तर तोच आदर्श त्यांच्यापुढे राहील आणि सज्जन आई-बाप असले तरी ते महामूर्ख आणि बुरसटलेले आहेत अशी त्यांची त्यांच्याच मुलांमुलींकडून अवहेलना होईल.

चांगले मित्र, स्नेही, सहवासी कोणते ते नीट ओळखायला शिकले पाहिजे. त्यांच्या ठिकाणी प्रभावी असे चार पाच तरी गुण असायला हवेत. म्हणून आधी माणसाची पारख करायला काही कसोट्या आपल्याजवळ असणे जरुर आहे, नाही का? माणसाला शरीर, मन, आणि बुद्धी अशा तीन ईश्वरदत्त देणग्या आहेत. त्यांचा समतोल विकास करणारे मित्र व सहवासी निवडा. सतत उद्योग, अंगमेहनतीची सवय, स्वच्छता, निर्व्यसनीपणा, व्यायामाची आवड, नीटनेटकी राहाणी हे शरीराचे सद्गुण आहेत. मन म्हणजे अंतरंग, भावनांचे, श्रद्धेचे, ध्येयवादाचे हे ठिकाण. शांती, क्षमा, दया, सहिष्णुता, सौजन्य, समाजहितबुद्धी, विश्वासपालन, सदभिरुची, उपासना हे सर्व मनाचे गुण आहेत. आता बुद्धीचेही सद्गुण काय आहेत तेही नीट पहा. चांगल्या वाचनाची आवड, नवनवीन माहिती मिळविण्याची जिज्ञासा, विचारांना चालना व समाधान देणाऱ्या संभाषणाची कला, जीवनाला उपयुक्त विचारांचा व तत्त्वांचा संग्रह करण्याची सवय, हे सर्व बुद्धीचे गुण आहेत. या सर्व गुणांच्या उलट प्रवृत्ती ते सर्व दुर्गुण. हे सद्गुण आणि दुर्गुण पाहून आपले मित्र निवडा व तसेच मुलामुलींना व नातवंडांना शिकवा.

सज्जनांच्या संगतीत सज्जनही असतात आणि दुर्जनही असतात. केवळ सहवास उपयोगी पडत नाही. चांगल्या गुणांचे अनुकरण करायचासं कल्प केला पाहिजे. एका वेळी लहान घास घ्या. सर्वगुणसंपन्न होण्याचा एकदम प्रयत्न करू नका. सद्‌गुण संपादनाचा विचार एका क्षणात शिकता येतो. तो गुण आचरणात आणण्याचा प्रयत्न अनेक दिवस करावा लागतो. पण चिकाटी आणि सातत्य यांच्या जोरावर आपण चांगल्या गुणांची प्राप्ती करू शकतो.

मानवात आणि इतर प्राण्यांत हाच मोठा फरक आहे. मानव नवीन गोष्टी स्वतःच्या बुद्धीने व प्रयत्नाने शिकू शकतो. शिकण्याची जाणीव त्याला ठेवता येते. ही देणगी जनावरांना नाही. चांगल्या मालकाच्या संगतीत राहणारे मांजर चोरून दूध पिते आणि कुत्रा वाटेल त्याला चावतो. त्याच जातीची माणसेही असतात. पण जाणीव करून घेतली तर माणूस सुधारू शकतो.

चांगल्या माणसांच्या संगतीत राहूनही चांगले विचार, चांगले गुण व चांगल्या सवयी यांचा गंधही न लागलेली माणसे आपल्याला अनेक दिसतात. उलट निकटचा सहवास न येताही दुरूनच एखाद्या सज्जनाचे सद्‌गुण पाहून त्याचे अनुकरण करणारी अनेक माणसे आपल्याला आढळतील.

म्हणून माझा या वर्षाचा संकल्प असा की मला व माझ्या नातेवाईकांना,
सत्संगी रती वाढो ।

आणि चांगल्या गुणांचे अनुकरण व संपादन करण्याची त्यांना बुद्धी होवो.

[१–१–७५

४६. हे महिलांचे वर्ष आहे

संयुक्त राष्ट्रसंघाने असे सुचविले आहे की सर्व देशांनी १९७५ हे महिलांचे वर्ष म्हणून मानावे आणि सर्व प्रकारे व अनेक मार्गांनी त्यांचा विकास, उन्नती व उत्कर्ष घडून येईल अशी कामे करावीत व कार्यक्रम पार पाडावेत. जगातील निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे. पण हा वर्ग शिक्षण, स्वावलंबन, समानता इत्यादी मानवी हक्कांना पारखा झालेला आहे.

भारतीय जीवनात प्राचीन काळी समाजात स्त्रियांना समानतेचे व मानाचे स्थान असे. त्यामुळे विद्येच्या क्षेत्रात अनेक विदुषी निर्माण झाल्या. स्वयंवर पद्धतीत वधूला आपला वर निवडण्याचे स्वातंत्र्य असे. कैकेयीसारख्या स्त्रिया पतीबरोबर

रणांगणावरही गेल्याचे सूचित होते. पुढे परकीय आक्रमणे आल्यावर स्त्री जीवनाला अनेक बंधने आली. समाजात त्यांना असलेले स्वातंत्र्य, समानता व मुक्त संधी या गोष्टी केवळ पुराणात राहिल्या. निरक्षरता, पडदा, संचारबंदी, छळ व कष्टाची कामे यामुळे त्यांचे जीवन विकासहीन झाले. वैयक्तिक उन्नती आणि सामाजिक उपयुक्तता या दृष्टीने समाजातील निम्मा मानववर्ग कनिष्ठ स्थितीत जीवन कंठू लागला. आधुनिक सुधारणेत मागे राहिलेल्या राष्ट्रात ही स्थिती मोठ्या प्रमाणात आहे. ती नाहीशी करण्याकरता समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून हे वर्ष "महिलांचे वर्ष" मानावयाचे आहे. वर्ष संपले तरी जागृतीचा परिणाम अनेक वर्षे कायम राहावा हा उद्देश आहे.

पाश्चिमात्य देशांत स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या व समानतेच्या चळवळी स्त्रियांनीच केल्या. त्यांचा परिणाम काही भारतीय पुरुषांच्या मनावरही झाला आणि स्त्री-मुक्तीचा प्रयत्न कै. ज्योतिबा फुले, कै. अण्णासाहेब कर्वे यांसारख्या पुरुषांनी केला. आज तात्त्विक दृष्टीने शिक्षित समाजात तरी स्त्रियांच्या उन्नतिविषयक कार्यक्रमांना विरोध नाही. अशिक्षित पुरुषात व स्त्रियात अद्याप या विचारांचे वारे फारसे शिरलेले नाही. ते काम आता स्त्रियांनीच केले पाहिजे. पण त्याला झगडा, संघर्ष, युद्ध, आघाडी असली भडक भाषा वापरून स्त्री-पुरुषात वर्गयुद्ध सुरू करू नये असे सुचवावेसे वाटते. इंग्लंड अमेरिकेतील चळवळींची वृत्ते वाचून काही अनुभवी उत्साही स्त्रिया असली भाषा वापरू लागल्या आहेत. तिची भारतात जरूरी नाही. गेल्या पाऊणशे वर्षांत भारतीय समाजाने कर्तबगार स्त्रियांना जितक्या वरच्या जागा दिल्या आहेत तितक्या इंग्लंड-अमेरिका-रशिया इत्यादी देशांतील समाजानेही दिलेल्या नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे.

आता महिलांच्या उन्नतीच्या दृष्टीने महिला-समाजांनी व स्त्रियांच्या संघटनांनी या वर्षी पुढील दहा गोष्टींचा कार्यक्रम हाती घेऊन त्या दिशेने लोकजागृती करावी व हे काम पुढेही चालू ठेवावे.

(१) नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कुटुंब कारभार आणि नोकरी दोन्ही सांभाळणे कठीण जाते. त्यांना अर्धकाल नोकरीची सवलत कायद्याने दिली पाहिजे. त्या दृष्टीने वेतनश्रेणी इ. ठरवून द्याव्यात. सध्या अनेक शिकलेल्या स्त्रियांना घरकाम किंवा नोकरी असा पर्याय आहे, त्याऐवजी घरकाम करून नोकरी ही प्रथा पाडली तर अनेक शिक्षित स्त्रियांचा समाजाला उपयोग होईल.

(२) स्त्रीदेहाचे लज्जास्पद प्रदर्शन करून पैसा मिळवणारे चित्रकार, चित्रपट-निर्माते, चित्रपटगृह-मालक, जाहिरात लेखक, संपादक यांच्यावर वैचारिक आणि आक्रमक दडपण आणून भारतातील स्त्रीजीवनाची विटंबना थांबवावी.

(३) कुटुंबातील स्त्रियांना करावी लागणारी कष्टाची व वेळखाऊ कामे करणारी साधी व स्वस्त यंत्रे निर्माण करण्याकरता अनेक संशोधनप्रधान प्रयोगशाळा व वर्कशॉप सुरू करावीत.

(४) दोन ते सहा वयाच्या बालकांची काळजी घेऊन स्त्रियांना उसंत देणारी शिशुगृहे व बालक-मंदिरे मोठ्या प्रमाणावर काढावीत.

(५) घरकामात स्त्रियांना मदत करण्यात काही कमीपणा नाही ही भावना मुलांच्या, तरुणांच्या व पुरुषांच्या मनात निर्माण करावी.

(६) ग्रामीण भागातील स्त्रियांची साक्षरता वाढवण्याकरता मोहीम काढावी. साक्षरता टिकवण्याकरता योग्य वाङ्मय छापावे व वाचनालये काढावीत.

(७) दारू पिऊन स्त्रियांना मारहाण करणाऱ्या पुरुषांचा कायदेशीर बंदोबस्त करावा.

(८) अब्रू घेऊन मुलींचे व स्त्रियांचे जीवन कलंकित करणाऱ्या बदमाशांना दहशत बसवणारे कठोर शासन द्यावे. लैंगिक गुन्हे करण्याला ते असमर्थ होतील अशी योजना करावी.

(९) आडगावी नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्याकरता सरकारी वसतिगृहे काढावीत व त्यांना पुरेसे संरक्षण द्यावे.

(१०) घरातील कामांची वाटणी करताना अमुक कामे मुलींची व अमुक कामे मुलांची असा भेदभाव पालकांनी करू नये. सरसकट सर्व प्रकारची कष्टाची, बौद्धिक अथवा यांत्रिक कामे दोघांनाही करू द्यावीत. असमानतेचे बीज घरातच पेरले जाते ते होणार नाही अशी योजना करावी.

ही यादी अधिक लांबवता येईल. विचारांची व कार्यक्रमाची दिशा कळावी याकरता कार्यक्रम सुचवला आहे. त्यात स्त्रियांना व पुरुषांना दोघांनाही भाग घेता येईल, अशा रीतीने घरात, गावात व देशात वातावरण निर्माण झाले तर 'महिलांचे वर्ष' हे नाव १९७५ या वर्षाला सार्थ होईल.

[१८–२–७५

४७. तडजोड आणि मध्यस्थ

दोन व्यक्तींमध्ये, किंवा गटांमध्ये किंवा पक्षांमध्ये जेव्हा कलह निर्माण होतात तेव्हा त्यांच्या दोघांच्या हिताकरिता मधला मार्ग काढणारा कोणी तरी मध्यस्थ नेहेमी लागत असतो. असा मध्यस्थ कधी यशस्वी होतो, कधी अयशस्वी होतो. मध्यस्थाने कोणत्या दिशेने प्रयत्न करावेत आणि केव्हा सोडून द्यावेत याचा विचार

जीवनाच्या व्यवहारात उपयोगी पडेल. कारण कौटंबिक, सामाजिक, संघटनात्मक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये असे कलह नेहेमी होतात. कुटंबातील व्यक्ती सतत एकमेकांच्या सानिध्यात राहात असल्याने त्यांच्यातले बिघाड नित्याचेच असतात. अशावेळी तडजोडीचा प्रयत्न करणारी एखादी व्यक्ति असल्यास कुटूंब टिकते. नाहीतर ते फुटते. तसेच सामाजिक संस्थांत आणि संघटनांतही होते. राजकारणात तर नेहेमीच होते. एकाच कुरुकुळातल्या कौरव-पांडवांच्या दोन गटात श्रीकृष्णाने मध्यस्थीचा अयशस्वी प्रयत्न केल्याचा इतिहास भारतात प्रसिद्ध आहे.

ज्या व्यक्तींच्या किंवा गटांच्या दरम्यान मध्यस्थी शक्य असते त्यांच्या स्वभावांत व विचारांत काही तरी साम्य हवे. तसे असले तर समान भूमिका शोधून मार्ग दाखवता येतो. एक बाजू सामोपचारी वृत्तीची आणि दुसरी हट्टी असली तर तडजोड शक्य नाही. एकीकडे ध्येयनिष्ठ व्यक्ती आणि दुसरीकडे अहंकारी व्यक्ती असल्यास त्यांच्यात जमणे अशक्य आहे. एक बाजू त्यागवृत्तीची असली तरी दुसरी सत्ता-संपत्ती–स्वार्थाने प्रेरित असली तर मध्यस्थाचा उपयोग नाही. स्वभाव-भिन्नता आणि स्वार्थ यामुळे होणारी भांडणे मिटविणे कठिण जाते. दोन्ही बाजूचे स्वभाव हट्टी, स्वार्थी, अहंकारी असल्यास त्यांनी एकत्र न राहाणेच इष्ट असते.

तडजोडीचे किंवा संवादाचे मुद्दे काय आहेत यावरही यश-अपयश अवलंबून असते. एक बाजू तत्त्वाने चालणारी तर दुसरी तात्कालिक हित पाहणारी; सार्वजनिक हित हे एकाचे ध्येय तर स्वार्थ आणि स्वहित हे दुसऱ्याचे साध्य; एक बाजू त्यागाला तयार तर दुसरी सत्ता-संपत्ती-मोठेपणाच्या मागे लागलेली; अशा विषम परिस्थितीत तडजोड होणे कठिण आहे.

दोन्ही बाजूंचा मने वळवून विचार, हेतू आणि हित यांबाबत दोघांच्या मधे काही समान भूमिका निर्माण करणे शक्य असल्यास मध्यस्थाने प्रयत्न अवश्य करावा. कौटुंबिक व सामाजिक संघर्षाचे प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने निःस्वार्थी व वयस्थ वृत्तीने तडजोडीचे प्रयत्न करणाऱ्या मध्यस्थांची अतिशय गरज आहे. असे प्रयत्न सतत व्हायला पाहिजेत. मग त्यात यश येवो की अपयश येवो. तो मध्यस्थाचा दोष नसून संघर्षात गुंतलेल्या एका किंवा दोन्ही बाजूंचा आहे.

श्रीकृष्णाने कौरव व पांडव यांच्यात शिष्टाईचा प्रयत्न केला. पण सुईच्या अग्राएवढीही भूमी देणार नाही, अशी स्वार्थी वृत्ती दुर्योधनाची, आणि पाच गावे दिली तरी ती घेऊ, असे समाधान मानण्याची धर्मराजाची तयारी. यात शिष्टाईचे अपयश हे श्रीकृष्णाचे नसून दुर्योधनाचे आहे.

भिन्न जातीत मुलीने विवाह केल्यामुळे तिचे व जावयाचे तोंडही न पाहणारे माझे एक स्नेही होते. त्या गृहस्थांना मी सांगितले 'मुलीला पितृसुख देणे हे तुमचे

कर्तव्य आहे. तिची आवड तीच आपली आवड असे मानून तुम्ही मुलीला व जावयाला सन्मानाने घरी बोलावले पाहिजे.' त्या बापाचे मन बदलले आणि बाप-लेकीत सलोखा प्रस्थापित झाला. मध्यस्थाची गरज नेहेमीच असते. प्रयत्न करीत रहावा. अपयश आले तर इतरांचे दुर्दैव. आपण कर्तव्य-पूर्तीच्या समाधानांत राहावे. निराश होऊ नये, आणि दोन्ही बाजूशी आपला सलोखा कायम ठेवावा. त्यांचे परस्परांचे वैर आपण दत्तक घेऊ नये.

[४-३-७५

४८. पुरुषार्थ व दैव यांचे गणित

जीवनात माणसाला ज्यावेळी जसा अनुभव येतो त्याप्रमाणे तो दैववादी किंवा कर्तृत्ववादी होतो. वयोमान, सामाजिक परिस्थिती, तात्कालिक घटना यांचाही आपल्या विचारांवर परिणाम होतो. अशा प्रासंगिक आधारावर बनलेले विचार व्यक्तिनिष्ठ असतात. वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार केला तर दैवाचा भाग किती आणि प्रयत्न, कर्तृत्व, पुरुषार्थ यांचा भाग किती याविषयी तुमचे गणित काय आहे; प्रयत्नाला गुण किती व दैवाला किती ?

जीवनात जे यश-अपयश येते त्यांचे पृथक्करण केले तर प्रत्येक घटनेत पाच घटक असतात असे स्थूलमानाने म्हणता येईल. यातला पहिला घटक आपण स्वतः आपल्याला निसर्गाने दिलेली बुद्धी, भावना, शक्ती, परिस्थिती, संधी, साधने यांचा उपयोग आपण किती प्रमाणात करतो; आपला निश्चय किती बलवत्तर आहे; चिकाटी किती प्रमाणात आहे; योजनापूर्वक काम करण्याची सवय किती आहे, या गोष्टींवर यशापयश अवलंबून असते. पण सर्वस्वी नाही. आपण केवळ एक घटक आहोत. आपल्या प्रयत्ना-व्यतिरिक्त इतरही गोष्टींचा विचार करायला हवा. त्यांच्यावर अंतिम फल अवलंबून असते.

ज्या काळात, स्थानात आणि परिस्थितीत आपण राहातो त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर होतो. स्वातंत्र्यकाळात व्यक्तीला जी संधी मिळते ती १९४७ पूर्वीच्या पारतंत्र्याच्या काळात नव्हती. दुसरा घटक साधनांचा असतो. आपल्याला सहाय्य करणारी साधने ज्या स्वरूपाची असतील त्यांवर कर्तृत्व अवलंबून राहाते. साधने ही वस्तु, व्यक्ती आणि विचार या स्वरूपांची असतात. वस्तू आणि व्यक्ती ऐनवेळी कशा वागतील ते सांगता येत नाही. झाशीच्या राणीच्या घोड्याने तटावरून उडी मारली पण ओढा पाहुन अडला आणि राणी असहाय्य झाली. तिसरा विचार आपल्या क्रियांचा आहे. क्रिया आपल्या देहाच्या स्वाधीन आहेत. देहात अनेक इंद्रियें-गात्रे आहेत. एकाद्याची चूक झाली की यश दूर पळते. क्रिकेट खेळात

एकादा वाडेकर अठ्यांण्णव धावा काढतो आणि शंभर होण्यापूर्वीच बाद होतो. कां? हात-पाय-डोळे यांच्या क्रिया सर्वस्वी त्याच्या स्वाधीन नाहीत. चौथा घटक अज्ञात शक्तींचा आहे. समाजातली, निसर्गातली एकादी अकल्पित घटना आपल्या कामावर परिणाम करते. योगायोगाने एकादी व्यक्ती भेटणे, एकादी वस्तु मिळणे, एकादे पुस्तक व त्यातील विचार उपयोगी पडणे–यांचाही परिणाम आपल्या यशापयशावर होतो. असे चार घटक पराधीन आहेत. आपण स्वतः तेवढे अंशतः स्वाधीन आहोत. म्हणजे ८० टक्के पराधीनता व २० टक्के स्वाधीनता असे गणित होते. आता आणखी थोडा अधिक विचार करू.

पराधीन घटक म्हणून ज्यांना ८० गुण दिले ते सर्व घटक आपल्याला प्रतिकूलच असतील असे नाही. कधी अनुकूल असतील कधी प्रतिकूल असतील. त्याचे निम्मानिम प्रमाण धरले तरी निदान ($\frac{८०}{२} = ४०$) चाळीस टक्के भाग आपल्याला अनुकूल असण्याचा संभव आहे. आपल्या हातातील वीस टक्के भाग प्रयत्न इत्यादींचा आहे तो जमेस धरला की $(४० + २०) = ६०$ टक्के भाग आपल्याला अनुकूल होतो. चाळीस टक्के भाग प्रतिकूल असण्याचा संभव. मग यशप्राप्तीकरता आपण काय करावे ?

पराधीन घटक जे आहेत त्यांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांतील अनुकूल-प्रतिकूलतेचा विचार करून आपल्या कामाची आखणी आपण केली पाहिजे. स्थल, काल, परिस्थिती, साधने, सहाय्यक, आपल्या क्रियाशक्ती आणि यागायोगाने अचानक घडणाऱ्या संभाव्य घटना, या सर्वांचा सूक्ष्म विचार व अभ्यास करून आपल्या कामाची व प्रयत्नांची मांडणी केली तर साठ ते शंभर टक्के यशाची आशा बाळगायला काही हरकत नाही.

या सर्वांचे सार असे की दैवापेक्षाही प्रयत्नावर यश अधिक अवलंबून आहे. या तत्वज्ञानाचा आश्रय घेणारा मानव चंद्रावरही यशस्वी स्वारी करू शकतो हे आपण पाहतो. संतवाङ्मयातून भक्तांनी जो दैववाद घेतला त्यावर उतारा म्हणून समर्थांनी गर्जना करून सांगितले–

यत्न तो देव जाणावा ॥
केल्याने होत आहे रे । आधी केलेच पाहिजे ॥

हे प्रयत्नवादाचे तत्त्वज्ञान भारतीय जनतेच्या रक्तात भिनले पाहिजे. ते काल्पनिक नसून वस्तुस्थितीवर आधारलेले आहे.

[५-३-७५

४९. श्रीमंतांचाही उद्धार आवश्यक

गरीबांचा उद्धार, दलितांची सुधारणा, मागासलेल्यांना सहाय्य इत्यादी शब्द-प्रयोग ऐकण्याची आपणाला सवय आहे. पण 'श्रीमंतांचा उद्धार' हा शब्द प्रयोग फारसा कधी कोणी ऐकला नसेल. एका अर्थाने श्रीमंतांचा उद्धार म्हणजे त्यांना शिव्या देणे, हा काही लोकनेते करतात. हे श्रीमंत लोक रक्त-शोषक आहेत, बांडगुळे आहेत, इत्यादी निर्भर्त्सना त्यांची होते. पण हा निबंध लिहिताना तो व्यंगार्थ माझ्या मनात नाही. खरोखरीच त्यांचा उद्धार व्हायला पाहिजे असे मला वाटते. कारण श्रीमंत जरी झाले तरी तीही माणसेच आहेत. गरीब मध्यमवर्गीयांप्रमाणे त्यांनाही मने, आणि त्या मनात सुखे, दुःखे, चिंता, भीती, अशांती इत्यादी व्यथा आहेत.

श्रीमंतांच्याजवळ धनाचे वैपुल्य असल्याने पैशाने विकत घेणाऱ्या सर्व गोष्टी त्यांच्या सहज आटोक्यात असतात. सर्वप्रकारची शारीरिक सुखे ते मिळवू शकतात. समाजात मानमान्यता, कीर्ति, राजकीय व आर्थिक सत्ता ते संपादन करू शकतात. इच्छा आणि बुद्धी असल्यास विद्या, शिक्षण, पदव्या ते संपादन करू शकतात. देशात व जगात वाटेल तेथे ते प्रवास करू शकतात. वाटल्यास काम करू शकतात, वाटल्यास आळसात आणि व्यसनातही आयुष्य घालवू शकतात. पैशाच्या जोरावर भलीबुरी माणसे आणि स्तुतिपाठकांचा जमाव आपल्या भोवती ते जमवू शकतात. पण या सर्व गोष्टी पैशाने विकत घेता येत असल्या तरी मनाची शांति आणि समाधान त्यांच्या-जवळ असतेच असे नाही. काही थोडे विचारी श्रीमंत आपल्या विवेकाने तें मिळवू शकतात.

श्रीमंत, मध्यम, किंवा गरीब ही काही जात-धर्म-वंशावर आधारलेली विभागणी नाही. एक माणूस आपल्या जीवनात तीनही अवस्था भोगू शकतो. आजचा गरीब तो उद्याचा श्रीमंत असू शकतो. रस्त्यातून फेरीवाल्याचा धंदा करणारे लक्षाधीश नव्हे कोट्याधीश झालेले आहेत. आणि एकेकाळी लक्षाधीश असलेले, संपत्तीत लोळणारे, अन्नाला मोताद झालेले आहेत. समाजातील आर्थिक रचनेचा किंवा परंपरेचा तो एक दोष आहे इतकेच.

धनसंपत्ती कमावण्याच्या छंदात, आणि ती मिळवल्यानंतर तिचा स्वतःच उपभोग घतला पाहिजे, या कल्पनेमुळे, श्रीमंतांची अनेक दुःखे उद्भवतात. कित्येकांचे आरोग्य नष्ट होते. पचन मंदावल्यामुळे अन्न आहे पण भूक नाही, आणि मऊ मऊ बिछाने आहेत पण निद्रा नाही, अशी कित्येकांची स्थिती होते. कितीही संपत्ती मिळवली तरी त्यांचे समाधान होत नाही. त्यामुळे सतत असमाधानात ते असतात. संपत्ती मिळवण्याकरता अप्रामाणिकपणा, असत्य, भ्रष्टाचार, पातके, आर्थिक गुन्हेगारी केली असली तर शांत वेळी ही सर्व पापे डोळ्यापुढे उभी राहतात. राज-

संन्यास नाटकातील शेवटच्या प्रवेशात संभाजीला आपल्या पातकांची भुते दिसतात आणि —'ती पहा, ती पहा' म्हणून तो आपल्या जीवनाचा पाढा वाचतो, तसे आपल्या मनाशी आपल्या पापांचा पाढा काही श्रीमंतांना कधीतरी वाचावा लागतो. पण तो कोणाजवळ बोलता येत नाही. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार बसल्यासारखे त्यांना होते. जादा संपत्तीचा उपयोग आपल्या स्वतःच्याच उपभोगाकरता झाला पाहिजे या स्वार्थी विचारामुळे ते व्यसनांचा आश्रय घेतात, कारण त्या क्षेत्रात वाटेल तितका पैसा उधळता येतो. पण या व्यसनांमुळे शरीराचे आणि मनाचे आरोग्य अधिकच बिघडते, आणि विचारे अधिकच दुःखात पडतात. या लोकांचा उद्धार व्हायला हवा, कारण तेही आपल्या समाजाचे घटक आहेत, तीही माणसे आहेत. त्यांना योग्य मार्ग दिसला तर त्यांच्या संपत्तीचा उपयोग समाजालाही होऊ शकेल, आणि त्यांना शांती व समाधान लाभू शकेल.

गरीबांचा उद्धार आणि श्रीमंतांचा उद्धार यांत फरक असा आहे की गरीबांना मुख्यतः आर्थिक सहाय्य पाहिजे असते, ते देता येते. उलट श्रीमंतांना मानसिक, आध्यात्मिक आणि नैतिक मार्गदर्शन हवे असते. ते त्यांनी स्वप्रयत्नाने स्वतःच मिळवायचे असते. किंवा त्यांच्या भोवती जे सल्लागार व हितचिंतक असतात त्यांनी द्यायचे असते. या सल्लागारात त्यांचे वकील, डॉक्टर, आध्यात्मिक गुरू किंवा अन्य मार्गांनी त्यांच्या उपयोगी पडणारे व त्यांच्यावर उपकार करणारे लोक त्यांना मानसिक समाधानाचे मार्ग दाखवू शकतील. हे मार्ग कोणते ?

संचित धनाचा सदुपयोग समाजातील दुःखे व आपत्ती कमी करण्याकरिता केल्याने होतो हे महत्त्वाचे तत्त्व श्रीमंतांनी आकलन केले पाहिजे. न्यायाने व नीतीने मिळणारी संपत्ती आपली, तिच्यात समाधान मानण्याची प्रवृत्ती वाढवली पाहिजे. केवळ धनसंचय करण्यात सर्व वेळ घालवण्यापेक्षा समाजसेवा, चित्रकला, संगीत इ. कलांची साधना, सात्त्विक वाङ्मयाचे वाचन, धार्मिक अध्यात्मिक ग्रंथांचे वाचन यांत काही वेळ घालविल्याने मनाला नैतिक वळण व शांती मिळू शकते. श्रीमंतीमुळे शारीरिक कष्ट कमी होतात आणि आहार मात्र वाढतो. त्यामुळे मधुमेह, रक्तदाब, जठरक्षते, काळजीचे रोग इत्यादी व्यथा होतात. म्हणून शरीराला श्रम होतील अशा गोष्टी केल्या पाहिजेत. मुख्य म्हणजे समाधानी वृत्ती वाढवली पाहिजे. जीवनात सुख आणि शांती मिळवण्याचे हे मार्ग श्रीमंतांनी समजून घेतले पाहिजेत आणि त्यांच्या हितकर्त्यांनी त्यांना सांगितले पाहिजेत.

कोणतीही आर्थिक रचना स्वीकारली तरी गरीबी आणि श्रीमंती ही टोके कधी कमी होणार नाहीत. ती सापेक्ष आहेत. तोपर्यंत श्रीमंतांच्याही उद्धाराचा प्रश्न शिल्लक राहाणारच. आर्थिक प्रश्नाइतकाच तोही अवघड आहे.

[७-३-७५

५०. संस्कार टाळून पदवी

अलीकडे सुशिक्षित तरुण आणि उच्च व्यवसाय करणारे पदवीधर निरनिराळ्या प्रच्छन्न किंवा प्रकट अशा लहान मोठ्या गुन्हेगारीत पडलेले आढळून येतात. त्यामुळे असे वाटते की यांनी पदव्या घेतल्या पण संस्कार टाळले. चांगल्या विचारांची व यांची चुकामूक झाली. शिक्षणाचा उद्देश दुहेरी आहे. विद्यार्थ्याला आर्थिक क्षमता प्राप्त करून देणे हा एक; त्याचबरोबर त्याला चांगले बौद्धिक, मानसिक शारीरिक, व सामाजिक संस्कार देऊन त्याला पूर्ण माणूस करणे हा दुसरा. वाढत्या बेकारीकडे पहाता पहिला उद्देश पुरेपूर साध्य होतोसे वाटत नाही. झटपट वरवर तयारी करून, परीक्षेची तंत्रे हस्तगत करून पदवी मिळवण्याच्या प्रवृत्तीमुळे दुसराही उद्देश पुरेसा साध्य होत नाही.

पदवी परीक्षेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादन करावे, ज्ञान मिळवण्यात त्यांना आनंद वाटावा हा उद्देश साध्य व्हायला हवा. मूळ पुस्तके वर्षभर वाचण्यापेक्षा ऐन परीक्षेच्या वेळी नोटस्-अॅनोटेशन्स यांच्या सहाय्याने परीक्षेला जाण्याची अनेक विद्यार्थ्यांची प्रवृत्ती दिसते. त्यामुळे ज्ञानार्जनाची क्रिया अपेक्षेप्रमाणे होत नाही.

ज्ञान स्वतंत्रपणे संपादन करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्याला समजावी व पदवी-संपादनानंतरही त्याने स्वावलंबनाने आपल्या विषयाचा अभ्यास करून ज्ञान मिळवीत राहावे ही अपेक्षा. पदवीधर गृहस्थांच्या घरचा ग्रंथसंग्रह आणि त्यांची दिनचर्या पहाता हा उद्देशही फारसा सफल झाल्यासारखा दिसत नाही.

शिक्षणामुळे तर्कशुद्ध विचार करता यावा, स्वतंत्र विचाराची सवय व्हावी, पूर्वग्रह सोडून बुद्धिनिष्ट अशी विचारसरणी स्वीकारावी ही अपेक्षा. तीही फार थोड्या पदवीधरांच्या ठिकाणी दिसते.

भावनांचे संस्करण व्हावे. आकुंचित प्रवृत्ती सोडून उदार वृत्तीचा विकास करावा. समाजात वागताना स्वार्थाची प्रवृत्ती सोडून इतरांचेही हित, सोयी, भावना यांची कदर करून सुशिक्षितांनी वागावे ही अपेक्षा. तीही पुरी होतीसे दिसत नाही. बहुतेक सुशिक्षित स्वतःचे जीवन, आपले कुटुंब, आपल्या सुखसोयी, आपल्या हौशी आणि सुखविलास यांच्यापलीकडे पाहात नाहीत. स्वार्थी प्रवृत्ती कमी न होता वाढत आहेत. शिक्षणातून समाजहित बुद्धी त्यांना मिळाली नाही, त्यांनी घेतली नाही. त्यांच्या भावनांचे संस्करण झाले नाही. त्या खालच्या पातळीवरच राहिल्या.

सर्वच पदवीधर वरील वर्णनात बसतात असे नाही. अनेक अपवाद आहेत. पण बहुसंख्य सुशिक्षितांना वरील वर्णन लागू पडेल असे वाटते. ही स्थिती बदलण्याचा

त्यांनी प्रयत्न केला पाहिजे. संस्कार टाळून घेतलेले शिक्षण व्यवसायांना उपयोगी पडेल. पण माणुसकी व सुसंस्कृतता येणार नाही. ज्ञानाची आवड, ज्ञानसंपादनात आनंद, नवीन ज्ञान मिळवण्याची जिज्ञासा, तर्कशुद्ध विचार करण्याची सवय आणि आकुंचित भावनांचा त्याग करून उदार, सहिष्णू निःस्वार्थी वृत्तीची जोपासना हे संस्कार शिक्षणातून मिळावेत. शिक्षण संपल्यानंतरही आयुष्यभर या संस्कारांचा विकास करण्याची प्रवृत्ती व आवड निर्माण व्हावी हा उच्च शिक्षणाचा उद्देश आहे. त्याची जाणीव ठेवल्यास शिक्षण घेताना आणि नंतरही तो साध्य करता येईल.

[१६-३-७५

५१. औट घटकांचे राजे-आपण

गेल्या पंचवीस वर्षांचा कालखंड डोळ्यापुढे आणा. काय दिसते? अनेक मुख्य मंत्री आले, थोडा काळ राहिले अन् गेले. अनेक पंतप्रधान आले आणि गेले. अनेक अध्यक्ष आले व गेले. या सर्वांची नावे आठवायचे मनात आणले तर स्मरणशक्तीला किती ताण द्यावा लागतो ! एक दोन ठळक नावे डोळ्यापुढे येतात, बाकीचे विस्मृतीत लोप पावतात.

जी स्थिती राज्याच्या आणि देशाच्या अधिकारपदाविषयी तीच जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायती इत्यादी क्षेत्रात आहे. या संस्थांचे अनेक अध्यक्ष येतात आणि जातात. कोणाला फारसा पत्ताही नसतो. नगरपालिकांचे अध्यक्ष तर वर्षाला नवे नवे येणार. सर्व सार्वजनिक क्षेत्रात असेच आहे. कारखान्यांचे मॅनेजर, शिक्षणसंस्था प्रमुख किंवा प्राचार्य, संस्थांचे अध्यक्ष, सैन्यातील सरसेनापतीसारखे अधिकारी– यांची नावे लक्षात ठेवीपर्यंत त्या जागी इतर व्यक्ती आलेल्या असतात.

सगळेच औट घटकेचे राजे. आले अन् गेले ! काळाच्याअनंत अशा भूत काळातील आणि भविष्य काळातील ओघाकडे पाहिले म्हणजे आपण भोगलेल्या अधिकाराचा कालखंड कालपुरुषाच्या घड्याळाप्रमाणे एक सेकंदही भरणार नाही.

या थोड्या काळाच्या अधिकारप्राप्तीकरता माणसे किती आटापिटा करतात, युक्त्या लढवतात, जिवाचे रान करतात, सत्यअसत्य बाजूला ठेवतात, नियमांना फाटा देतात. ते पाहिले म्हणजे मनात विचार येतो—हे सर्व कशाकरता ? अल्पकाळाचा अधिकार, सत्ता, मानसन्मान. पण त्याकरता माणसे इतकी इरेला का पेटतात !

मला असे वाटते की अधिकार आणि सत्तास्थानाच्या प्राप्तीकरता माणसे प्रयत्न करतात, त्यात त्यांचे काही हेतू असतात. त्यात दोन वर्ग करता येतील.

एक---सामाजिक हिताच्या गोष्टी करण्याची अदम्य तळमळ, इच्छा आणि महत्त्वाकांक्षा.

दुसरा---अधिकारप्राप्तीपासून काही ऐहिक फायदे होतात त्यांचा लोभ. मान-धने, मोठेपणा, कीर्ती, प्रसिद्धी, ऐहिक सुखसाधनांच्या सवलती, इत्यादी.

काही व्यक्तींच्या ठिकाणी पहिला हेतू प्रमुख असतो. काहीच्या मनात दुसरा-उद्देश प्रामुख्याने असतो. बहुतेकांच्या दृष्टीपुढे दोन्हीही हेतू असतात. वरील दोन हेतूंपैकी एक किंवा दोन्हीही नजरेपुढे ठेवून प्रयत्न करण्यात बावगे असे काही नाही. कोठपर्यंत ? प्रयत्न करणारी व्यक्ती सरळ, विधिप्रणीत, न्याय्य, शिष्टसंमत मार्गाने अधिकार मिळवील आणि त्याच तत्त्वांच्या आश्रयाने आपली कारकीर्द पुरी करील तर. पण असे फार क्वचित होते. सत्तास्थानाचा लोभ आणि सत्तास्थानामुळे मिळणाऱ्या ऐहिक फायद्यांचा लोभ हा इतका जबरदस्त असतो की त्यापुढे न्याय, नीती, सदाचार, समाजहित, निःपक्षपातीपणा इ. सद्गुण नांगी टाकतात आणि स्वार्थ प्रभावी ठरतो. मी, माझे कुटुंब, माझी जात, माझा पक्ष, माझा प्रांत---यांना प्राधान्य दिले जाते; समाज आणि देश यांच्या हिताला गौण स्थान दिले जाते.

वर जी सर्वसामान्य प्रवृत्ती सांगितली आहे तिला काही अपवाद असतात. आणि हे अपवाद मात्र आपल्या चांगले लक्षात राहतात. इतिहासही त्यांची नोंद ठेवतो आणि ती पुढल्या पिढीला देतो.

सत्तेलाही सात्त्विक ध्येयवाद असेल तर अशा गुणांची व्यक्ती समाजाच्या आद राला प्राप्त होते. तिची कारकीर्द व स्मृती लोकप्रेमाने जपून ठवतात. शिवाजी महा-राजांनी सत्तास्थान निर्माण केले. ते भोगले, पण त्याचा देशाकरिता निःस्वार्थीपणाने उपयोग केला. राज्य मिळविले आणि 'जय जय रघुवीर समर्थ' म्हणून समोर आलेल्या समर्थांच्या झोळीत ते टाकून त्याचा त्याग करण्याची तयारीही दाखविली. शिवाजी राजे हे श्रीमान योगी होते. संभाजीला हे उमगायला फार उशीर लागला. कै. राम गणश गडकरी यांच्या "राजसंन्यास" नाटकात संभाजीला अगदी शेवटी आकलन होते की, "राजा हा राज्याचा उपभोगशून्य स्वामी आहे."

तुम्हाला शिराळशेटची गोष्ट माहित आहे का? तो समाजहिताच्या अनेक गोष्टी बोलायचा. त्याची परीक्षा पाहण्याकरता त्याला साडेतीन घटका राजपद दिले. पण त्या थोड्या अवधीत त्याने सामान्य जनतेच्या हिताची अनेक कामे केली. म्हणून श्रावण महिन्यात सर्वसामान्य जनता चौकाचौकात शिराळशेटाचे पुतळे करून त्याची स्मृती जिवंत ठेवते.

सत्ता आणि अधिकार यांची इच्छा अवश्य असावी, पण फाजील लोभ नसावा. लोभाच्या पाठोपाठ पापाचा, भ्रष्टाचाराचा, अनीतीचा, अधर्माचा, स्वार्थी वृत्तीचा जन्म होतो. सत्तेचा उपयोग समाजहिताकरता करावा. मग तुम्ही औट घटका सत्तेवर राहिलात तरी पुरे. दीर्घकाळ चिकटून राहण्याची जरूरी नाही.

चालू समाजात चाललेल्या घडामोडीमुळे हे शाश्वत स्वरूपाचे विचार सुचले. ते कोणत्याही काळी, कोणत्याही स्थळी, कोणत्याही प्रसंगी प्रत्येक व्यक्तीला उपयोगी पडतील. कुटुंबात, समाजात, गावात, देशात, राज्यकारभारात, सर्वत्र; सत्तेकरता स्पर्धा जेथे जेथे चालू आहे तेथे तेथे हे विचार उपयोगी पडतील.

[१२-४-७५

५२. माता-पिता-गुरु; उशीरा ओळख

बंधने आणि अधिकार यांपासून मुक्ततेचे हे युग आहे. पण या तत्त्वाचा अर्थ आणि त्याच्या मर्यादा अनेकांच्या लक्षात येत नाहीत. व्यक्तींची बंधने आणि अधिकार हा एक विभाग आहे. विचार, रूढी, परंपरा धर्म, पक्ष, इत्यादींची बंधने व अधिकार हा दुसरा निराळा विभाग आहे. आपण यांपैकी कोणत्या बंधनापासून स्वातंत्र्य घेऊ इच्छितो, व त्यांएवजी अन्य कोणती बंधने स्वीकारतो की खरोखर स्वतंत्र राहातो. याचा विचार ज्याचा त्याने करावा.

आईबाप आणि गुरुजी हे आपल्यावर प्रेम करतात म्हणून आपल्या हिताकरता कांही बंधने आपल्यावर घालतात. जीवनाचा दीर्घ काल अनुभव असल्यामुळे आपल्या मुलामुलींना अथवा शिष्यांना कोणत्या बंधनामुळे अथवा शिस्तीमुळे जीवनात फायदा होईल याचा कोहीएक हिशेब करून आडाखे बांधून, वडील माणसे आपल्याला वळण लावू पहातात. परंतु स्वातंत्र्याच्या व मुक्तीच्या चुकीच्या कल्पनांमुळे ही बंधने व ते घालणाऱ्या व्यक्ती यांविषयी कधी कधी अनादर वाटतो व बंडखोरीची वृत्ती वाढते.

जीवनाची काही वर्षे गेल्यानंतर जगाचा अनुभव आल्यामुळे दीर्घ कालानंतर या वडील माणसांचे व त्यांनी शिस्त व वळण लावण्याचा जो प्रयत्न केला, आपल्या करता जे कष्ट घेतले, त्याग केला, हाल सोसले त्याची जाणीव होऊ लागते. फार उशीरा माता-पिता-गुरू यांची दूरदृष्टी व मोठेपण यांचे आकलन होते. पर्वताची भव्यता जवळून कळत नाही. काही अंतरावरून ती कळते. वडील माणसांची सद्बुद्धीही दीर्घकालानंतर लक्षात येते. त्यांनी दिलेल्या विचारांचा, लावलेल्या शिस्तीचा अंगवळणी पाडलेल्या संवयीचा, जीवनात उपयोग होतो आणि त्यांच्या जोरावर मोठेपणा मिळतो, तेव्हा सिंहावलोकन करणारांना वडील व्यक्तींचे महत्त्व कळते. पण फार उशीरा. शहाण्या विद्वान माणसांचेही असे होते, तेथे सामान्यांची काय कथा !

प्रसिद्ध लेखक जॉनसन्‌ची गोष्ट. त्याचे वडील हातगाडीवर पुस्तके विकत. एक दिवस ताप आल्यामुळे जॉनसन्‌ला त्यांनी ते काम सांगितले. त्याने नाकारले. वडील अंगात ताप असताना उन्हात हातगाडी घेऊन उभे राहिले. त्यामुळे दुखणे वाढून त्यातच त्यांचा अंत झाला. ही गोष्ट मोठेपणी जॉनसनला आकलन झाली. त्याला या घटनेचा पश्चात्ताप झाला. म्हणून प्रायश्चित्त घेण्याकरता वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशी तो पूर्वीच्या ठिकाणी जाऊन उन्हात उभा राही.

वडील पिढीच्या या अनुभवाचा उपयोग तरुणांनी करून घ्यावा. वडिलांना सर्व प्रकारे मान द्या. तोटा होणार नाही. पुढे तुमचे तुम्हाला स्वातंत्र्य आहेच.

[२०–४–७५

५३. धन आणि साधन

व्यक्तीचे आणि देशाचे सामर्थ्य त्याच्याजवळ असलेल्या धनावर आणि साधनांवर अवलंबून आहे. धन द्रव्याच्या स्वरूपात असेल अथवा वस्तूंच्या स्वरूपात असेल. साधने ही यांत्रिक स्वरूपाची असतील किंवा वैज्ञानिक ज्ञानाच्या स्वरूपात असतील.

मूलतः धन चांगले किंवा वाईट नाही. साधने ही देखील तटस्थ (न्यूट्रल) आहेत. या दोहींचा चांगुलपणा अथवा वाईटपणा त्यांच्या मालकावर अवलंबून आहे. शहाणा मालक धनाचा आणि साधनांचा उपयोग स्वतःच्या व समाजाच्या कल्याणाकरिता करील. सुसंस्कृत देश आपल्या साधनांचा उपयोग स्वजनतेच्या आणि जगाच्या प्रगतीकरिता करील. उलट मूर्ख माणूस धनाच्या सहाय्याने व्यसनाधीन बनून आपली अधोगती करून घेईल. अदूरदर्शी देश आपल्या साधनांचा दुरुपयोग करून शेजारच्या देशांना उपद्रव देईल. सारांश, धनाचा आणि साधनांचा उपयोग मानवाच्या हिताकरता होईल तसाच तो त्याच्या नाशाकरताही होईल. विसाव्या शतकाच्या अंतिम काळात आणि एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी आपल्यापुढे हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपात उभा राहिला आहे, राहणार आहे.

आज समाजात अत्यंत दारिद्र्य आहे, त्याचप्रमाणे अत्यंत श्रीमंतीही आहे. श्रीमंत लोक आपल्या संपत्तीचा उपयोग तीन प्रकारांनी करू शकतात. धनवान माणूस विचार करतो की हे सर्व धन माझेच आहे, त्याचा मीच उपभोग घेतला पाहिजे. आता गरजेला लागणारे द्रव्य फार थोडे असते. जादा द्रव्याचा उपयोग मग व्यसनाकडे होऊ लागतो. दारू, रेसेस, व्यभिचार, सर्व प्रकारची इंद्रियसुखे व श्रीमंतीचे प्रदर्शन यांत वाटेल तितका पैसा खर्च होऊ शकतो. हा मूर्खांचा वर्ग झाला. मात्र हे लोक स्वतःला शहाणे आणि इतरांना मूर्ख समजतात, ही गंमत आहे. व्यसनी

माणसांच्या घोळक्यात निर्व्यसनी माणूस बावळट समजला जातो. भारतात ही स्थिती येत चालली आहे. निर्व्यसनता, सद्‌गुण आणि साधेपणा यांना लो. टिळक, म. गांधी, कै. राधाकृष्णन यांनी दिलेली प्रतिष्ठा नामशेष होत आहे, आणि व्यसनांना प्रतिष्ठा चढत आहे, हिंदीत एक म्हण आहे ती जरी शब्दांनी असभ्य वाटली तरी अर्थाने समर्थ आहे म्हणून वाचकांची क्षमा मागून येथे देतो—"नंगे भडवे हौदा चढे, मर्दों के है हाल। पतिव्रता तो भूखी रडे, पेढे खाय छिनाल॥" अशी स्थिती येत आहे.

धनवान लोकांतही विचारी, सूज्ञ लोकांचा वर्ग आहे. तो आपल्या गरजा भागवून शिल्लक राहणाऱ्या संपत्तीचा उपयोग समाजहितार्थ करतो. शिक्षणसंस्था, ग्रंथालये, दवाखाने, विश्रांतिस्थाने, धर्मशाळा, उद्याने, कलागृहे, वस्तुसंग्रहालये अशा उपयुक्त संस्थांचे संवर्धन करून आपल्या जादा धनाचा उपयोग करणारे अनेक लोक आहेत. शहाणपणाने प्रामाणिकपणे धन मिळवावे आणि उदार हस्ताने त्याचा समाजहिताकरता उपयोग करावा; वैभव मिळवावे आणि वैराग्य वृत्तीने त्याचा उपयोग करावा, अशा तत्त्वज्ञानाने वागणारी माणसे आहेत म्हणून समाजाची प्रगती होत आहे.

जसे धनाचे तसेच साधनांचे. साधने कोणाच्या हातात आहेत हा खरा प्रश्न आहे. सज्जन माणूस साधनांचा सदुपयोग करील, दुर्जन त्याचा दुष्ट उपयोग करून समाजाचा घात करील. अगदी प्राथमिक अवस्थेतील मानवाने शोधून काढलेली साधने तीन होती: अग्नी, चक्र आणि शस्त्र. या साधनांचा विकास होत होत आज त्यांनी अजस्र रूप धारण केले आहे. अग्नीचा विकास ॲटॉमिक शक्तीत झाला आहे. शस्त्रांचा पल्ला वाढून इंटरकाँटिनेंटल बॅलिस्टिक मिसाईल्स (लांब पल्ल्याचे अग्निबाण) मध्ये त्यांचे रूपांतर झाले आहे. चक्रांना गती देणाऱ्या शक्तीत खूप वाढ झाल्यामुळे मानवाच्या जीवनालाच एक अभूतपूर्व अशी गती प्राप्त झाली आहे.

अग्नी, शस्त्र आणि चक्र यांचा उपयोग व दुरुपयोग करणारी शहाणी आणि मूर्ख माणसे पूर्वीही होती; पण त्यांचा परिणाम जगाच्या फार थोड्या विभागावर व समाजाच्या अगदी लहान गटावर होत असे. याच साधनांची आज अजस्र वाढ झाल्याकारणाने त्यांचा चांगला किंवा वाईट परिणाम सर्व पृथ्वीवर होण्याइतकी ताकद त्यांना प्राप्त झाली आहे. एखाद्या दुष्ट शास्त्रज्ञाने व त्याच्यावर हुकमत गाजवणाऱ्या सत्ताधारी हुकूमशहाने मनात आणले तर सर्व जगातील हवा, पाणी आणि अन्न दूषित करून मानवजातीचा संहार करणे शक्य आहे. हे कोण कसे टाळणार? अविवेकी, मूर्ख, समाजद्वेषी, दुष्ट माणसांचा हात कोण धरणार? केव्हा? विवेकी, सूज्ञ, समाजहितदक्ष, सज्जन माणसांनी यापुढे स्वस्थ बसून भागणार नाही.

धनाची वृद्धी आणि साधनांची प्रगती यांच्या बरोबरीने नव्हे त्यांच्यापेक्षा

अधिक गतीने, समाजहितबुद्धी, नीती, सद्‌गुण, सज्जनता, मानवता यांची वाढ झाली तरच ऐहिक उत्कर्षाचा उपयोग आहे. नाहीतर हीच ऐहिक प्रगती व्यक्तीला, समाजाला आणि जगाला रसातळाला नेईल.

[१-५-७५

५४. दुराचारी आईबाप-बिचारी मुले

नवरा बदफैली म्हणून बायकोने वीष वालून मारले; बायको व्यभिचारी म्हणून नवऱ्याने तिचा गळा कापला; शेताच्या भांडणावरून मुलाने बापाचा खून केला; पती-पत्नीचे पटत नाही म्हणून दोघांनी घटस्फोट घेतला; अशाच प्रकारच्या बातम्या दररोज वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. त्या वेळी तुमच्या मनात काय विचार येतात ?

मला प्रथम विचार येतात ते या लोकांच्या मुला-मुलींचे. बिचाऱ्या मुलांना आपल्या आई-बापांबद्दल काय वाटत असेल ! आपले वडील, आपली माता अशी अशी होती याची बोचणी जन्मभर त्यांच्या मनात सलत राहील. कुटुंबाचा अभिमान व घराण्याचा लौकिक या गोष्टी व्यक्तीला स्फूर्तिदायक होतात. त्यांचा फायदा या मुलांना मिळणार नाही. आईबापांच्या आदर्श चारित्र्यापासून मुले आपल्या जीवनात मार्गदर्शन घेत असतात, त्यांचा लाभ या मुलांना होणार नाही. मातृदेवो भव, आणि पितृदेवो भव, हा उपदेश त्यांना पोकळ आणि निष्फळ वाटायला लागेल. जीवनात सदाचाराला प्रेरणा देणारा एक फार मोठा आधार आईबापांचा असतो, तो या मुलांना मिळणार नाही. ही मुले पुढे कशी निघतील ? हा विचार माझ्या मनात प्रामुख्याने येतो.

समाजात सदाचाराची व चारित्र्याची परंपरा कशी राहील हा प्रश्न विचारवंतांच्या व समाजशास्त्रज्ञांच्या डोळ्यापुढे सतत असतो. त्या दृष्टीने कुटुंबाची व्यवस्था स्थापन झाली व जगात ती प्रत्येक देशात दृढमूल झाली आहे. कुटुंबात आई-बाप व मुलेमुली हे प्रमुख घटक असतात. आईबापांनी आपल्या वर्तनाने, उपदेशाने व कौटुंबिक वातावरणाच्या सहाय्याने मुलामुलींना चांगला आचार शिकवावा व त्यांना सदाचारी नागरिक करावे, हा कुटुंब संस्थेचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. शिक्षणसंस्था, वसतिगृहे, संस्कारवर्ग, वाङ्मय इत्यादी कितीही इतर साधने निर्माण केली तरी ती कुटुंबाचे स्थान घेऊ शकत नाहीत.

आपले आईवडील कसे वागतात, कसे बोलतात, काय काय करतात, याकडे मुलांचे लक्ष असते. जे पाहिले जाते व ऐकले जाते त्याचे अनुकरण न कळत मुलां-

कडूनही होते. चांगल्या कौटुंबिक वातावरणात वाढलेली मुले सहसा वाईट निघत नाहीत. याकरता विवाह जुळवताना वधूच्या आणि वराच्या घरातले संस्कार कसे आहेत हे पाहाणे अगत्याचे असते. घरचे वातावरण शुद्ध असलेल्या कुटुंबातील मुलांचे संसार यशस्वी होण्याची पुष्कळ शक्यता असते.

मुले आपले अनुकरण करणार आहेत ही जाणीव पालकांनी सतत ठेवायला हवी. आपली मुले शीलवान, कर्तबगार, निर्व्यसनी, उद्योगप्रिय अशी निघावीत असे आईबापांना वाटते. पण ही इच्छा पूर्ण व्हायची असेल तर त्यांनी आपले स्वतःचे वर्तन चांगले ठेवायला हवे. ही जाणीव अनेक पालकांना नसते. धाकदपटशा दाखवून, मारून मुटकून, शिक्षा करून, केवळ उपदेश करून मुले चांगली निघत नाहीत. आपण जसे वागतो तसेच आपली मुलेही वागणार ही जाणीव आईबापांनी ठेवायला हवी.

तुम्ही तुमच्या मुलांना वारसा म्हणून काय देणार आहात ? संपत्ती कितीही दिली तरी ती पुरी पडणार नाही. असा वारसा देण्याइतकी संपत्तीही फार थोड्या पालकांजवळ असते. पण सदाचाराचा, शीलाचा, चारित्र्याचा, निर्व्यसनीपणाचा, उद्योगप्रियतेचा, विद्याव्यासंगाचा व सद्‌गुणांचा वारसा आपण आपल्या मुलांना देऊ शकाल. ही गोष्ट श्रीमंतांना आणि गरीबांना दोघांनाही शक्य आहे.

आई-बापच जर व्यभिचारी, दुराचारी, व्यसनी, गुन्हेगार, आळशी, विलासात डुंबणारे असे निघाले तर बिचाऱ्या मुलांनी आदर्श म्हणून कोणाकडे पाहावे ? मातृ-देव आणि पितृदेव म्हणून त्यांनी कोणाची पूजा करावी ? तुमच्या मुलांवर तुमचे प्रेम आहे का ? मग त्यांच्या कल्याणाकरता, उत्कर्षाकरता आणि सुखाकरता तरी आपले वागणे आईबापांना शोभेल असे ठेवा. तुमच्या हयातीत आणि हयातीनंतरही मुलांना तुमच्याविषयी आदर व प्रेम वाटेल असे वागा. मातृत्व आणि पितृत्व सहज मिळते; पण त्या स्थानाची पात्रता विचारपूर्वक संपादन करावी लागते.

[१०-६-७५

५५. संधी, श्रेय व कर्तबगारी

भारताच्या सर्वांगीण प्रगतीकरता प्रत्येक क्षेत्रात आणि घराघरात कर्तबगार, जबाबदार व एकनिष्ठ अशा व्यक्तींची गरज लागणार आहे. अशी माणसे सतत पुढे येत राहातील तरच अग्रेसर देशांत भारताचा क्रम लागेल. सध्या त्याचा समावेश मागासलेल्या अविकसित व अर्धविकसित अशा देशांच्या यादीत केला जातो. आपला इतिहास, वैचारिक परंपरा, देशाचा आकार व लोकसंख्येचे प्रमाण या गोष्टी हे आपले फार मोठे भांडवल आहे. त्याचा योग्य उपयोग करून देशाला अग्रेसर बनविणारी

कर्तबगार माणसे हवी आहेत. ही कशी तयार होतील याचा विचार शिक्षणतज्ज्ञ, पालक आणि समाजशास्त्रज्ञ यांनी केला पाहिजे.

कुटुंब आणि शाळा-कॉलेजे या ठिकाणी कर्तबगारीचा ओनामा शिकवला जातो. पण माणसे तयार करण्याच्या दूरदृष्टीच्या विचाराने या घटकांकडे पाहिले जात नाही. पालक आपल्या मुलांना अनेक वर्षे अज्ञान बालकासारखे वागवतात. त्याला स्वावलंबी व कर्तबगार होण्याची संधीच देत नाहीत. मुले सर्व प्रकारची कामे जबाबदारीने करायला तयार असतात. आपणच आडवे येतो. "तुला जमायचे नाही; तू लहान आहेस" हे आपले पालुपद असते. वय आणि शिक्षण वाढते तसे मुलांना जबाबदारीची कामे यायला हवीत. बाजारहाट, जमाखर्च, निरोप, पत्र-लेखन, शेतातील व बागेतील कामे, घरच्या उद्योगधंद्यातील कामे, ही मुलांच्या अंगावर सोपवली तर त्यांची जबाबदारीची जाणीव आणि कर्तबगारी वाढेल. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढचे शिक्षण, उमेदवारी, नोकरी इत्यादीबाबत मुलांची कामे त्यांना स्वतःलाच करू द्या. तुम्ही फक्त वाट दाखवा. अडचणी दूर करा. अशा वातावरणात वाढलेली मुले कर्तबगार होतात. त्यांचे जगात अडत नाही.

शिक्षकांनी आणि शाळा-कॉलेजच्या चालकांनी देखील हीच दृष्टी ठेवायला हवी. इंग्लंडमधील प्रसिद्ध अशा खाजगी पब्लिक स्कूल्सच्या शिक्षणाचे हे वैशिष्ट्य असे. ह्या कर्तबगारीच्या शाळा होत्या व आहेत. शाळेतील व्यवस्थापनाची अधिकाधिक कामे मुलांच्या अंगावर सोपवल्याने त्यांचे कर्तृत्व वाढते. जबाबदारीची जाणीव वाढते. माणसांशी कसे वागावे ते कळते. निरनिराळ्या प्रसंगांना सामोरे कसे जावे त्याचे अनुभव येतात. या शाळांतून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जीवनाच्या अनेक क्षेत्रांत उच्च दर्जाची कर्तबगारी दाखविली आहे.

कर्तबगारी व जबाबदारीची जाणीव दाखविण्याचे क्षेत्र प्रौढ नागरिकांनाही त्यांच्या त्यांच्या व्यवसायांत उपलब्ध करून दिले पाहिजे. संस्था, कार्यालये, कारखाने आणि संघटना यांच्या प्रमुखांनी देखील ही दृष्टी ठेवली पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना जबाबदारीच्या कामांची अधिकाधिक संधी दिली पाहिजे. जबाबदारी टाकल्याशिवाय कर्तृत्व दृष्टोत्पत्तीत येत नाही. सुप्त कर्तबगारीच्या प्रकटीकरणाला वाव देणे हे वरिष्ठांचे धोरण पाहिजे.

आपल्याला प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्ववान व्यक्तींची गरज आहे. खाजगी व सरकारी सर्व प्रकारच्या संस्था, शासकीय कार्यालये, उद्योगधंदे, व्यापारी संस्था, ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका इत्यादी सर्व क्षेत्रात जबाबदारीने काम

करणाऱ्या कर्तबगार व्यक्तींची वाण आहे. ही लवकर कशी भरून निघेल याचा त्या त्या क्षेत्रातील प्रमुखांनी विचार करून त्याप्रमाणे कामविभागणीचे धोरण ठेवले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी एखाद दुसरी कर्तबगार व्यक्ती असते. तिचे मोठेपण कशात आहे ? स्वतःचे कर्तृत्व दाखवायला हवेच. पण त्याचबरोबर चार कर्तबगार माणसे तयार करायला हवीत. पेशवाईच्या काळात श्रावण महिन्यात विद्वान ब्राह्मणांना त्यांच्या विद्वत्तेप्रमाणे दक्षिणा देण्यात येत असे. एका वर्षी समान दर्जाचे दोन विद्वान दक्षिणा घेण्यास पुढे आले. त्यांपैकी पहिल्याला एक ओगराळे दक्षणा घातली गेली आणि दुसऱ्याला चार ओगराळे दक्षिणा दिली गेली. पहिल्या विद्वानाने संतापून विचारले, " असा पक्षपात का करता ?" तेव्हा तेथील प्रमुखाने दोघांना एकच प्रश्न विचारला, " तुमच्या सारखे विद्वान ब्राह्मण तुम्ही किती तयार केले ?" पहिल्याने उत्तर दिले " कोणी नाही. " दुसऱ्याने उत्तर दिले " पंधरा वीस सहज आहेत." या प्रश्नोत्तराने वादाचा आपोआप निकाल लागला. परंपरेला महत्त्व फार आहे.

शेवटी एक महत्त्वाचा मुद्दा. कर्तबगारीचे चीज झाले पाहिजे. तिचे कौतुक केले गेले पाहिजे. कर्तृत्वाला त्याचे योग्य श्रेय मिळाले पाहिजे. आपल्या कामाचा मोठेपणा आपल्याला मिळतो याचे समाधान पैशापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. नाही तर कामे सहकाऱ्यानी करायची आणि सगळा मोठेपणा मात्र खातेप्रमुखाला ! असे झाल्यास माणसे नाराज होतात, खट्टू होतात, वैफल्यग्रस्त होतात. हेवा, मत्सर, द्वेष यांचा येथेच जन्म होतो.

माझ्या पन्नास वर्षांच्या कामाचे हे मार्गदर्शक तत्त्वज्ञान होते ते मला उपयोगी पडले. त्याचा उपयोग माझ्या ज्या माजी विद्यार्थ्यांनी केला त्यांनाही यश आले. तुम्हालाही तोच अनुभव येईल. दृष्टिकोन बदला.

[१३-७-१९७५

५६. पहिल्या श्रेणीतील विद्यार्थ्यांची स्वप्ने

परीक्षांचे निकाल लागले. प्रत्येक परीक्षेत पहिल्या श्रेणीत पहिल्या गटात आलेल्या विद्यार्थ्यांची नावे प्रकाशित झाली. फोटो झळकले. मुलाखती प्रसिद्ध झाल्या. कोणी महाराष्ट्रात पहिल्या दहाविसांत, कोणी जिल्ह्यात पहिला, कोणी तालुक्यात, तर कोणी आपापल्या गावात अथवा शाळेत पहिले आले. हे सर्व ठीक झाले. चांगले यश मिळाल्याबद्दल, बौद्धिक तपश्चर्या केल्याबद्दल, तिचे योग्य मूल्य-मापन व त्याची नोंद होऊन, जे जे पहिल्या श्रेणीत आणि पहिल्या पाचदहांत आले ते अभिनंदनाला पात्र आहेत. पण हे अभिनंदन स्वीकारताना त्यांनी आणखीही काही

नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तुमच्या पहिल्या श्रेणीत येण्याचा तुम्ही स्वतः-पुरताच उपयोग करून घेणार आहात का तुमच्या या बुद्धिमत्तेचा काही भाग समाजाला, देशाला व मानवाला देणार आहात ? इ. स. २०२५ मध्ये तुमचे नाव आणि फोटो प्रसिद्ध झा ले तर त्याखाली काय मजकूर यावा असे वाटते ? विद्यार्थी जीवनात प्रथमवर्ग मिळविणाऱ्या या व्यक्तीने देशाकरता व समाजाकरता महत्त्वाचे कार्य केले असा गौरव यावा, का या माणसाने केवळ द्रव्यसंचय करण्यात आणि सुखोपभोग मिळविण्यात आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग केला, असा उल्लेख यावा ?

वाचकांनी आपापल्या शैक्षणिक जीवनात जरा डोकावून पहावे. तुमच्या शालेय महाविद्यालयीन कालखंडात म्हणजे दहा, वीस किंवा तीस वर्षांपूर्वी जे विद्यार्थी पहिल्या श्रेणीत पहिल्या गटात आले, ते आज काय करीत आहेत ? या लोकांचा पाठलाग करून थोडी माहिती वृत्तपत्रांनी जमा करून तीही प्रसिद्ध करावी. किंवहुना माध्यमिक परीक्षा मंडळ आणि विद्यापीठे, शिक्षणसंस्था आणि महाविद्यालये यांनीच अशी माहिती जमा करून ती समाजापुढे मांडावी. काय चित्र दिसेल अशी कल्पना आहे ? मला वाटते काही अपवाद वगळल्यास बाकीचे लोक कुठे तरी कोनाकोपऱ्यात स्वार्थी वृत्तीने द्रव्यार्जन करीत, भल्याबुऱ्या मार्गाने धनसंचय वाढवीत, आपापल्या कुटंबांच्या सुखविलासात मशगूल असतील. आपला स्वार्थ, कुटुंब आणि ऐषआराम यांच्या पलीकडे पाहणारे किती असतील ? त्यांच्या बौद्धिक यशाचा आणि बुद्धिमत्तेचा समाजाला त्यांनी किती प्रमाणात उपयोग करून दिला असेल ?

विज्ञानशाखेकडे जाऊन वरच्या श्रेणीत येणारे बहुतेक लोक इंजिनियरिंग किंवा मेडिकल कोर्सेसकडे जातात. या क्षेत्रात द्रव्यसंपादनाचे दृष्टीने वाव अधिक आहे. तशाच प्रकारच्या इतर अभ्यासक्रमाकडे जाण्याचा कल बुद्धिमान विद्यार्थ्यांचा असतो. त्यातील मुख्य आकर्षण आहे द्रव्यप्राप्ती, आणि तिच्या अनुषंगाने मिळणारे सुखी, ऐषआरामी जीवन.

पहिल्या श्रेणीत येणारांचे मुख्य भांडवल असते बुद्धिमत्ता. श्रम घेणारे अनेक विद्यार्थी असतात. दुसऱ्या तिसऱ्या वर्गात येणारे विद्यार्थी बौद्धिक श्रम करूनच यशस्वी झालेले असतात. पण श्रमाच्या जोडीला अलौकिक बुद्धी असली तर पहिली श्रेणी आणि उच्च क्रमांक येऊ शकतो. बुद्धी ही ईश्वरी देणगी आहे. तेथे व्यक्तीच्या इच्छेचा किंवा प्रयत्नांचा भाग नाही. प्रत्येक मूल आपापला आय. क्यू. म्हणजे बुद्धिगुणांक घेऊन जन्माला येते. एकाच आईबापाच्या पोटी अनेक मुले जन्माला येतात, त्यांत एखादाच अधिक बुद्धिमान निघतो. हे ईश्वराचे देणे आहे. या ईश्वरी देणगीचा उपयोग जनताजनार्दनाला काय झाला हा खरा हिशेबाचा प्रश्न आहे.

त्याचे उत्तर द्यायची तयारी पहिल्या श्रेणीतल्या विद्यार्थ्यांनी केली पाहिजे. आज उदो-उदो झाला. पारितोषिके, अभिनंदने, प्रसिद्धी इत्यादी झाली. एवढ्यावर संतुष्ट राहू नका. मी समाजाकरता माझी बुद्धी वापरून काहीतरी अलौकिक करून दाखवीन अशी उमेद मनात जागृत ठेवा ! केवळ स्वार्थी, कुटुंबापुरती, आपल्याच सुखांची व ऐषआरामाची दृष्टी न ठेवता, आपण जेथून आलो त्या ग्रामीण भागाकरता, गावाकरता, समाजाकरता, ज्ञानाच्या क्षेत्रात भर टाकण्याकरता, काही तरी विशेष करण्याची जाणीव ठेवा.

मुख्य प्रश्न व्यापक दृष्टीचा आहे. मी, माझे कुटंब, माझा धंदा, माझे सुख यांच्या पलीकडे पाहण्याचा आहे. स्वार्थ आणि कुटंब यांच्यापलीकडे असलेल्या मोठ्या समाजहिताचा आहे. थोडी त्यागाची आणि सेवेची वृत्ती ठेवली तर आपापला व्यवसाय करून समाजाकरिताही पुष्कळ करता येईल. ते काय काय करता येईल याचे संशोधन करण्याकडे तुमच्या बुद्धिमत्तेचा उपयोग करा. श्रीशंकराचार्य, ज्ञानेश्वर, लो. टिळक, विवेकानंद, योगी अरविंद या व्यक्ती अलौकिक बुद्धीच्या होत्या. त्यांनी आपल्या बुद्धीचा उपयोग समाजहिताचे क्षेत्र हुडकून काढण्याकरता आणि त्यात त्यागवृत्तीने सेवा करण्याकरता केला. हे आदर्श तुमच्या दृष्टीपुढे ठेवा.

आज सेवेची अनंत क्षेत्रे उपलब्ध झालेली आहेत. एकेका व्यक्तीने एकेक गाव घेऊन त्याचा सर्वांगीण उत्कर्ष घडवून आणणे हे किती अवाढव्य काम आहे ? हजारो बुद्धिमान व्यक्तींना हे करता येईल. मेडिकल कोर्स घेणारांना जनतेचे आरोग्य सुधारणे, वैद्यकीय क्षेत्रात आजन्म संशोधन करणे हे काम आहे. एंजिनियर्सना तर सेवेचे केवढे मोठे क्षेत्र आहे ? स्वस्त घरांच्या योजनेकरता आवश्यक ते संशोधन, देशातील जलसंपत्ती, भूगर्भसंपत्ती, सागरसंपत्ती यांचे संशोधन व उपयोग, अशी किती तरी क्षेत्रे आहेत. अर्धविकसित अशा या भारतात त्याग व सेवावृत्ती ठेवून करण्यासारखी अनेक कामे बुद्धिमान कर्तबगार व्यक्तींची वाट पहात आहेत.

प्राचार्यांनो, अध्यापकांनो, नेत्यांनो—तरुण पिढीला या कल्पना द्या. तरुणांना आज नवा ध्येयवाद हवा आहे. तो त्यांना तुम्ही पुरवला पाहिजे. आडातच नसेल तर पोहोऱ्यात कसे येणार ? त्याग आणि सेवावृत्ती यांची तुम्ही जोपासना करा आणि देशाने तुमच्या हवाली केलेल्या तरुणांच्या ठिकाणीही तिचे बीजारोपण करा. इ. स. २००० चे भारताचे पालटलेले चित्र त्यांना आज स्वप्नांत पाहू द्या. तरुण पिढी हे स्वप्न साकार केल्याशिवाय राहाणार नाही.

स्वातंत्र्यदिन [१५-८-१९७५

५७. साहित्यातील पुरुषोत्तम


भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाच्या आसक्तिरहित आणि समत्ववृत्तीच्या मानवाचा आदर्श व्यासांनी आपल्यापुढे ठेवला. समर्थ रामदासांनी आपल्या कल्पनेतील आदर्श मानवाला उत्तम पुरुष असे संबोधले आहे आणि त्याची लक्षणे दासबोधात ठिकठिकाणी दिली आहेत. असे हे उत्तम पुरुष कल्पनेतच असतात असे वाटण्याचा संभव आहे. आपल्या समाजात डोळ्यापुढेही पुरुषोत्तम वावरत असतात, त्यांना पाहण्याची दृष्टी पाहिजे.

श्री. पु. ल. देशपांडे यांच्या बारशाला मातोश्रींनी पुरुषोत्तम हे नाव ठेवले. साहित्य, नाट्य, कला इत्यादी क्षेत्रांत त्यांच्या मुलाने आपले नाव सार्थ केले हे पाहून त्या मातेला किती आनंद होत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. आज हा पुरुषोत्तम आपल्या कर्तबगारीच्या, कलेच्या आणि लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. विद्वान लेखक, वाचक आणि सर्वसामान्य लोक या सर्वांच्या मनामध्ये त्यांच्याविषयी आपुलकी व प्रेम आहे. त्यांचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व पाहून आश्चर्य वाटते. अभिजात संगीततज्ज्ञ, अप्रतिम नट, प्रतिभावान लेखक, प्रभावशाली वक्ता अशा अनेक दृष्टींनी त्यांनी कीर्ती संपादन केली आहे. रसिक आणि उदार मनाच्या मराठी माणसाने त्यांच्या गुणांचे मनसोक्त कौतुक केले आहे, करीत आहे. श्री, सरस्वती आणि कीर्ती या देवतांचा त्यांच्यावर वरदहस्त आहे, आणि या सर्वांचा पाया सुनीती आहे. सौ. सुनीतासारखी समानगुणांची, सात्त्विक स्वभावाची, साध्या राहणीची, उदार मनाची पत्नी त्यांना लाभलेली आहे गीतेचा अंतिम श्लोक असा आहे.—

यत्र योगेश्वरः कृष्णः यत्र पार्थः धनुर्धरः ।
तत्र श्रीः विजयः भूतिः ध्रुवा नीतिः मतिः मम ॥

जेथे योगेश्वर श्रीकृष्ण आहे आणि जेथे धनुर्धर पार्थ आहे तेथे लक्ष्मी, यश आणि वैभव यांना आधारभूत अशी शाश्वत नीतीही आहे. पुरुषोत्तम आणि सुनीताबाई यांनी ही फलश्रुती सार्थ केली आहे.

आसक्तिरहितता आणि समतोलवृत्ती या गुणसमुच्चयाला गीतेने योग असे म्हटले आहे. श्री. पु. ल. नी आपल्या जीवनातही आसक्तिरहितता प्रकर्षाने व्यक्त केलेली आहे. त्यांनी आपल्या कलेच्या गुणावर पैसा मिळवला पण द्रव्यसंचयाची आसक्ती ठेवली नाही. मुक्त हस्ताने सामाजिक कार्याकरता तो उदार हताने दिला, देत आहेत, देतीलही. मला असा अनुभव आहे की मराठी मनाला त्यागवृत्तीबद्दल अत्यंत प्रेम, आदर आणि कौतुक वाटते. महाराष्ट्र त्यांच्या साहित्य-कलेचे जितके गुणग्रहण करतो त्यापेक्षा अधिक त्यांच्या त्यागवृत्तीचे करतो ही गोष्ट विशेष आहे.



स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या पंचवीस वर्षांत सामाजिक जीवनाला एकसारखी उतरण लागल्यासारखी झाली आहे. समाजात बुद्धी, प्रतिभा व कर्तबगारी हे यशस्वी जीवनाला व समाजाच्या उत्कर्षाला उपयोगी पडणारे गुण आपल्यात आहेत. पण त्यांचा उपयोग स्वार्थाकडे, स्वतःच्या सुखोपभोगाकडे, द्रव्यसंचय वाढवण्याकडे कसा करता येईल इकडे प्रत्येकाचे लक्ष लागलेले असते. ज्या समाजात आपण वावरतो त्यातील सुखदुःखे, आपत्ती, गरजा, हालअपेष्ठा यांच्याकडे लक्ष देण्याची प्रवृत्ती नाही. अशा काळात श्री. पु. ल. यांच्या त्यागी वृत्तीचे उदाहरण दीपस्तंभाप्रमाणे उपयोगी पडेल यात शंका नाही.

श्री. पु. ल. नी आपल्या लेखनाने आणि नाट्याने लोकांना हसत ठेवले आहे. त्यांना आनंद देऊन दुःख, चिंता, व्याधी विसरायला लावले आहे. त्यांच्या विनोदात उच्च अभिरुची, सोज्ज्वळता आणि सात्त्विकता असते. एवढा एक गुणही त्यांना मोठेपणा देण्याला पुरेसा होता. पण त्यांच्या जोडीला सात्त्विक वृत्ती, साधी राहाणी, चारित्र्यसंपन्नता, आणि त्यागाची वृत्ती या गुणांनी त्यांच्या मोठेपणाला अधिक शोभा आली आहे.

श्री. पु. ल. यांच्या प्रतिभेला अधिकाधिक बहर येवो आणि त्यामुळे मराठी मनाला निरागस आनंद मिळत राहो. त्याचप्रमाणे त्यांच्या त्यागी वृत्तीचा आदर्शही म्हाराष्ट्रातील जुन्या-नव्या पिढ्यांना अनुकरणीय ठरून त्यागाच्या पूर्वपरंपरेला पुनरुज्जीवन मिळो अशी इच्छा आपण सर्वजण ठेवू या.

नीतीने संचय करा आणि संचयदानही करा.

गणेशचतुर्थी [८-९-१९७५

५८. कुटुंबातील दुरावा

आपली कुटुंबसंस्था टिकून राहिली आहे असे आपण म्हणतो. याचा नक्की अर्थ काय आहे? या विधानात सत्य किती आहे आणि कल्पना किंवा भ्रम किती आहे? हा काही फार विद्वत्तेचा आणि विद्वानांचा विषय नाही. प्रत्येक जणाला बालपणात, तारुण्यात आणि वार्धक्यात कुटंबजीवनाचा अनुभव येत असतो. त्या अनुभवाचे आधाराने प्रत्येकाला विचार करता येईल. आजच्या कुटुंबपद्धतीमधील गुण काय आहेत व दोष काय आहेत हे पाहाता येतील, आणि ज्या सुधारणा आपल्या हातात आहेत त्या त्वरित अमलात आणता येतील. हा काही विद्वत्तापूर्ण संशोधनाचा विषय म्हणून मी मांडीत नाही. तरी आपण प्रत्येकाने अंतर्मुख होऊन विचार करावा

म्हणून काही कल्पना सुचवीत आहे. प्रत्येकाचे अनुभव मर्यादित असतात. पण सर्वांच्या अनुभवांची देवघेव झाली तर या विषयाचा समग्र विचार झाल्यासारखे होईल.

कुटुंबसंस्थेचे दोन मुख्य उद्देश आहेत. प्रत्येक व्यक्तीचे बाह्य जीवन आणि आंतरिक जीवन सुखावह व्हावे म्हणून कुटुंबसंस्था निर्माण झाली, आणि सर्व जगात ती अस्तित्वात आहे. खाणेपिणे, निवारा, आजारपणात मदत, कामांची विभागणी इत्यादी गोष्टी या बाह्यजीवनविषयक आहेत. कुटुंबात चांगल्या संस्कारांची जोपासना करणे, विचारांची देवघेव करणे, नैतिक कल्पनांची नव्या पिढीला शिकवण देणे, समाजात कसे वागावे ते सांगणे, साहित्य–संगीत–कला यांची जोपासना करणे, धार्मिक–आध्यात्मिक कल्पनांचे वातावरण निर्माण करणे, स्वभावात तडजोड करणे, थोडक्यात सांगायचे म्हणजे आंतरिक, वैचारिक व सांस्कृतिक जीवनाची जोपासना करणे हा कुटुंबसंस्थेचा दुसरा उद्देश आहे. तुमच्या कुटुंबात हे दोन्ही उद्देश साध्य होतात का, झाले आहेत का याचा विचार करा. घरांत लहान मोठ्या सर्वांनीच या गोष्टीची चर्चा करावी असा हा विषय आहे.

बाह्यजीवनविषयक आणि आंतरिक जीवनविषयक असे जे दोन हेतू सांगितले त्यांतील पहिल्या म्हणजे बाह्यजीवन-विषयाकडे आपण अधिक लक्ष देतो. दुसरा उद्देश, आंतरिक जीवनाच्या संस्कारांचा. तो आपल्याला तितका निकडीचा आणि आवश्यक वाटत नाही. या संस्कारांकरिता पूर्वी ज्या परंपरांची योजना झालेली होती त्यांच्यावर आता आपली श्रद्धा राहिलेली नाही, आणि त्या परंपरांची जागा नव्या उपक्रमांनी भरून काढण्याची गरज आपल्याला वाटत नाही. याचा परिणाम काय झाला ?

आपण सर्व माणसे देहाने कुटुंबात एकत्र राहातो पण मनाने आणि विचाराने विभक्त राहातो. मन आणि विचार यांच्यात समानधर्मता येण्याचे प्रसंगच आपल्या कौटुंबिक जीवनात नाहीत. आपण जेवणखाण, विश्रांती, आपापली कामे यांच्यापुरते आपल्या कुटुंबात राहातो. परंतु विचारविनिमय, संस्कारात्मक कार्यक्रम, वाचन, करमणुकी इत्यादींकरिता प्रत्येक व्यक्तीने आपापले वर्तुळ घराबाहेर निर्माण करून ठेवलेले असते. आई, वडील, मुले, मुली, वृद्ध माता-पिता या सर्वांचे वैचारिक व सांस्कृतिक जीवन बाहेर असते किंवा व्यक्तिगत असते. त्यात आपण एकमेकांना भागीदार करीत नाही. त्यामुळे कुटुंबात वैचारिक व सांस्कृतिक दुरावा निर्माण होतो. वृद्धांचे विचार व संस्कार निराळे, त्यांच्या तरुण मुलामुलीचे व सुनांचे निराळे आणि विद्यार्थी अवस्थेतील त्यांच्याही किशोर-किशोरींचे जीवन निराळे, असा विभक्तपणा आलेला आहे. समान संस्कार, विचारांची देवघेव, एकमेकांची मने, मते, विचार समजून घेणे, या गोष्टींना आपल्या कौटुंबिक जीवनात वाव राहिलेला नाही. त्यामुळे कौटुंबिक ताण निर्माण झालेले आहेत. संघर्ष आणि चिंता यांचे वातावरण वाढत आहे.

वृद्धांचे व तरुणांचे पटत नाही. त्या तरुण आईवापाचे व किशोर वयातील त्यांच्या मुलामुलींचे पटत नाही. पति-पत्नीचे पटत नाही. भावाभावाचे, बहिणी-बहिणींचे, भाऊ-बहिणींचे, सासू-सुनांचे, थोडक्यात कोणाचेच कोणाशी वैचारिक नाते राहिलेले नाही. हा दुरावा कोठे कमी प्रमाणात असेल कोठे अधिक प्रमाणात असेल. पण काही प्रमाणात प्रत्येक कुटंबात आहे हे मान्य करावेच लागेल.

याचे दृष्टोत्पत्तीस येणारे परिणाम जाणवतात. कारणे बाहेरून दिसत नाहीत. मायलेकीत व बापलेकात भांडणे, इच्छेविरुद्ध विवाह, विवाहानंतर अल्पावधीत काडीमोड, शेती-संपत्तीवरून भांडणे, सामाजिक-राजकीय विषयांवर मतभेद, स्वभाव-भिन्नतेमुळे होणारे संघर्ष, आवडी-निवडीवरून निर्माण होणारी कटुता, इत्यादी किती तरी गोष्टींचा उगम कशात आहे ते शोधा. आपल्या लक्षात येईल की आपण शरीराने एकत्र राहातो पण आपली मने, विचार, भावना, स्वभाव, अभिरुची या भिन्न आहेत. त्यांत विचारविनिमय, चर्चा, मनमोकळा संवाद, सहजीवन इत्यादी उपायांनी आपण सुसंवाद निर्माण करीत नाही.

यावर उपाय ज्याने त्याने आपापल्या कुटंबापुरते तरी शोधून काढले पाहिजेत. कुटुंबातील सर्व व्यक्ती एकत्र येऊन खेळीमेळीने गप्पा मारतील, विचार-विनिमय करतील, कौटंबिक व सामाजिक घटनांवर चर्चा करतील, एकत्र वाचन करतील, करमणूक करतील, सारांश, केवळ शारीरिक गरजा भागवण्यापेक्षा मनाच्या, भावनांच्या आणि विचारांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने रोज, वारंवार, सुटीच्या दिवसांत, असे कार्यक्रम करतील तर हा कौटंबिक दुरावा हळूहळू कमी होत जाईल. जुन्या-नव्या पिढीतील रुंदावत जाणारी दरी अधिक रुंद व खोल होणार नाही. व्यक्ती व्यक्ती आंतरिक जीवनाच्या दृष्टीने एकमेकांच्या जवळ येतील, निदान परस्परांना ओळखतील. कुटंबसंस्थेचा सांस्कृतिक वैचारिक. नैतिक आणि भावनात्मक उद्देश आहे तो फल होईल. या सफलतेवर आपले आणि भावी पिढीचे सुख अवलंबून आहे. तुमच्या कुटुंबातील कोणी तरी या बाबतीत पुढाकार घेईल का ?

विजयादशमी [१४-१०-१९७५

५१. शुद्ध जीवनाचा तत्त्वे

वैयक्तिक आणि सामाजिक जीवन शुद्ध, उन्नत व कार्यक्षम ठेवणारी तत्त्वे सनातन आहेत. भारतीय तत्त्वचिंतकांनी, धर्मसुधारकांनी व थोर विभूतींनी ती पुन्हा पुन्हा सांगितली आहेत. मात्र प्रत्येक कालखंडात त्या त्या काळात प्रचलित व परिचित असलेल्या भाषेत ती सांगणे आवश्यक असते. जुने शब्द वापरून वापरून निरर्थक बनतात. नवे शब्द शोधावे लागतात.

आज योगशास्त्राची जिज्ञासा, लोकप्रियता आणि शास्त्रशुद्धता सर्वत्र अनुभवाला येत आहे. पण या शास्त्रातील आसन-प्राणायाम आणि ध्यान या दोन अंगांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. अष्टांगयोगात ज्या आठ गोष्टी आहेत त्यांत पायाभूत अशा दोन आहेत, यम आणि नियम. पुढील सर्व योगाचा पाया यम-नियमांत आहे. शुद्ध जीवनाचे ते व्याकरणच आहे.

यम आणि नियम, व त्या वर्गात येणारी तत्त्वे, यांचा या नव्या दृष्टिकोनातून विचार करून, नवी भाषा वापरून, ती तरुण पिढीपुढे मांडली पाहिजेत. असे केले असता त्यांचे स्वागत चांगले होते, असा माझा अनुभव आहे.

योगशास्त्रात नियम या वर्गात पाच गुण सांगितले आहेत; शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वर-प्रणिधान. वैयक्तिक खाजगी जीवन शुद्ध व सुखावह होण्याचे दृष्टीने हे नियम आहेत. नियम म्हणजे चांगल्या सवयी; गुड हॅबिटस्. शौच म्हणजे शुचिता, स्वच्छता, महात्मा गांधींनी उपदेशिलेली सफाई. संतोष म्हणजे समाधानी व शांत मन. मेंटल हायजिनमध्ये याला फार महत्त्व आहे. स्ट्रेस, कॉनफ्लिक्टस्, अँगझायटीज्, यांच्यापासून माणूस मुक्त झाला पाहिजे. जुन्या भाषेत आपण त्यांना अनिर्णय, चिंता, भय, द्वन्द्व इत्यादी शब्द वापरतो. तप म्हणजे शारीरिक, मानसिक व बौद्धिक कष्ट करण्याची सवय. स्वाध्याय म्हणजे प्रतिदिन चांगले वाचन, चिंतन, लेखन. ईश्वर-प्रणिधान म्हणजे इष्ट देवतेची आराधना. अशा साध्या भाषेत विद्यार्थ्यांना व तरुणांना ही तत्त्वे सांगितली तर ती लवकर पटतात.

आता यम व त्यातील गुण पहा. यम म्हणजे सामाजिक सद्गुण, सिव्हिल व्हर्च्यूज्, ते असे–अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य. आजच्या समाजात ज्या दुर्मिळ वस्तू झाल्या आहेत त्या या आहेत. सामाजिक व्यवस्था, शांतता, सुरक्षितता, चारित्र्य कायम ठेवण्याकरता या पाच गुणांची किती आवश्यकता आहे त्याचा विचार करा. अहिंसेच्या अभावी कोणाचेही जीवन सुरक्षित राहणार नाही. आज चाकू आणि सुरा यांचा शहरात मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ लागला आहे. सामोपचाराने व शांततेने आपले व्यवहार करा अशी शिकवण तरूणांना व बहुजनसमाजाला दिली पाहिजे. सत्य म्हणजे समाजातील सर्व व्यवहारात प्रामाणिकपणा. अस्तेय म्हणजे प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे इतरांच्या संपत्तीचा बेकायदेशीर अपहार न करणे. ब्रह्मचर्य म्हणजे स्त्री-पुरुष व्यवहारात सांकेतिक नीतीने वागणे. अपरिग्रह म्हणजे साठेबाजी व फाजील अन्याय्य अर्थसंचय न करणे – हे सर्व सामाजिक सद्गुण आहेत.

वैयक्तिक जीवनाला शिस्त लावून ते शांत, शुद्ध व अधिक कार्यक्षम करण्याला नियमांची जरूरी आहे. सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार कमी करून सदाचाराची प्रवृत्ती वाढावी याकरता यम म्हणजे संयमावर आधारलेल्या गुणांची गरज आहे. वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही दृष्टींनी माणूस शुद्ध व सदाचारी झाला तरच त्याला नंतर आसने, समाधी इत्यादी गोष्टींचा फायदा घेता येईल. योगशास्त्रात मानवी जीवनाचा किती सर्वांगीण विचार केला आहे ते पहा.

आदर्श भारतीय नागरिकांच्या ठिकाणी यम आणि नियम या वर्गात दिलेल्या दहाही सद्‌गुणांची आज फार गरज आहे. त्यांचा प्रचार सर्व मार्गांनी केला पाहिजे पण भाषा आजची हवी. दैनिक चिंतनार्थ आर्या--

शुचिता, संतोष, तपश्चर्या, स्वाध्याय, ईशप्रणिधान।
सत्य, अहिंसा, अपरिग्रह, अस्तेयादि शुद्ध आचरण॥

[१८-११-७५

६०. शताब्दी पचवून स्वार्थाचे ढेकर

आपल्या या देशात गेल्या चार पाच हजार वर्षांत अनेक थोर महात्मे होऊन गेले. ज्यांचे जन्मदिन अथवा मृत्युदिन उपलब्ध झाले त्यांच्या शताब्दी साजऱ्या केल्या जातात. या वर्षी ज्ञानेश्वरांची सप्तशताब्दी साजरी होत आहे. महावीरांची २५० वी शताब्दीही साजरी होत आहे. भगवान बुद्धांचीही २५० वी शताब्दी दहा-बारा वर्षांपूर्वी साजरी झाली. शिवाय तुकाराम, रामदास, नामदेव, चक्रधर, दयानंद इत्यादींच्या शताब्दी साजऱ्या होतच असतात. छत्रपती शिवाजी, लो. टिळक, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर इत्यादी अलीकडील थोर पुरुषांच्या शताब्दी मधून-मधून संपन्न होत आहेतच.

हे सर्व उत्सव व समारोह पाहून एखाद्याला वाटेल की हा देश आणि त्यातील समाज थोर पुरुषांनी व विभूतींनी आणि साधु-संतांनी किती तरी सदाचार संपन्न आणि अध्यात्मप्रेमी केला असला पाहिजे! प्रामाणिक व्यवहार, परस्पर प्रेम, भूत-दया, त्यागी वृत्ती, चारित्र्य, निर्व्यसनता, अहिंसा, दान-धर्म प्रवृत्ती इत्यादी सद्‌-गुणांनी हा समाज संपन्न असला पाहिजे. या देशात सकाळी उठल्याबरोबर आकाश-वाणीवर साधुसंतांची वचने व भजने लोक ऐकतात. त्यांच्या ग्रंथांच्या प्रती सर्व-सामान्य वाचकांना मिळाव्यात म्हणून स्वस्त आवृत्त्या काढल्या जातात. घरोघरी तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, गीतारहस्य, दासबोध इत्यादी ग्रंथ कपाटात आहेत. वर्षातून श्रीराम, श्रीकृष्ण, हनुमान इत्यादींच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात.,हा

किती सात्त्विक समाज असला पाहिजे. आमच्या या समाजाची ही काल्पनिक प्रतिमा उराशी बाळगून अनेक परदेशी प्रवासी स्फूर्ती घेण्याकरता इकडे येतात आणि निराश होऊन परत जातात. का असे होते ? विचार केला पाहिजे. मी, तुम्ही, याने, त्याने याचा विचार करायला हवा. कुटंबात, समाजात, कार्यालयात, कारखान्यात, गप्पा-गोष्टींच्या वेळात या प्रश्नाची आपण चर्चा करायला हवी. डोळ्यावर कातडे ओढून किती दिवस बसणार ? शिकवण आणि आचरण, उपदेश आणि व्यवहार, आदर्श आणि वस्तुस्थिती, स्वप्ने आणि सत्य, विचार आणि आचार, आमची आदर्श दैवते आणि आम्ही – यांच्यात इतकी रुंद दरी कशाने निर्माण झाली ?

आजची आपली समाजस्थिती काय आहे ? स्वार्थ, लाचलुचपत, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार, क्रौर्य, हिंसा, व्यभिचार, सत्ता-संपत्तीचा हव्यास, मानवी जीवनाबद्दल बेफिकिरी, लाचारी, हेवा, मत्सर, अहंकार, भोगाची लालसा, आत्मसंयमाचा अभाव-किती दुर्गुणांची यादी करावी ! ज्याने त्याने आपली भर घालून यादी अद्यावत् करावी. शताब्दी, जयंती, पुण्यतिथी, धर्मग्रंथपारायणे करून जो समाज धर्मनिष्ठ आणि चारित्र्यसंपन्न असावा अशी कोणाचीही अपेक्षा असावी तोच समाज नीतिभ्रष्ट आणि नष्टचारित्र्य असावा हा विरोधाभास, आभास नव्हे सत्य, हा विरोध का असावा ? ध्येयवाद आणि प्रत्यक्ष आचरण यांची सांगड कशी घालायची ?

जे चित्र भारतीय समाजात दिसते तेच जगातील इतर समाजातही थोड्याफार प्रमाणात दिसते. तेथेही धर्माची व थोर पुरुषांची शिकवण धाब्यावर बसवणारा समाज आहे. ही जागतिक समस्या आहे. एकाची कारणमीमांसा सर्वांनाच लागू पडेल. या बाबतीत माझे चिंतन काय आहे ते सांगतो. तुम्ही त्यात भर घाला.

आपण सर्व पारायणप्रधान आहोत. ज्ञानेश्वर सप्तशताब्दी आली की ज्ञानेश्वरीचे पारायण, दासनवमीला दासबोधपारायण, गीताजयंतीला गीतापारायण, फार तर व्याख्याने, प्रवचने, चर्चा, खास अंक, यांची त्यात भर घालायची म्हणजे सर्व मामला मौखिक आणि शाब्दिक कसरतीचा; कागद आणि शाई यांचा अधिकाधिक वापर, पारायणावर व पाठांतरावर सारा भर. संख्येकडे सारे लक्ष, गुणाकडे व सखोलतेकडे दुर्लक्ष. एकेक विचार व तत्त्व घेऊन त्याचा समाजात आणि वैयक्तिक जीवनात व्यवहार कसा करता येईल याकडे आपले लक्ष नाही. काही तरी नवीन पद्धती आपण निर्माण केल्या पाहिजेत की, त्यामुळे समाजात एका तरी सद्गुणाची वृद्धी होईल. व्यक्तीने एखाद्या तरी सद्गुणावर आपल्या जीवनाचे लक्ष केंद्रीभूत करून तो संपादन करून दाखवावा. असे काही केले तरच ध्येयवाद आणि प्रत्यक्ष आचरण यांतील अंतर हळूहळू भरून निघेल.

आज तरी वस्तुस्थिती अशी आहे की, सर्व शताब्दी, जयंत्या, स्मृतिदिन, सर्व धार्मिक-नैतिक-आध्यात्मिक वाङ्मय पचवून आम्ही भ्रष्टाचाराचे ढेकर देत आहोत.

आजच्या या परिस्थितीत आशेची ज्योत एकच आहे. कोणती आणि कोठे ? तुमच्या आणि माझ्या अंतःकरणात आहे. हे वाईट आहे, ते सुधारायला पाहिजे असे वाटणाऱ्या व्यक्तीही अनंत आहेत. त्याच समाजाचे, देशाचे, मानवजातीचे एकमेव आशास्थान आहेत. अशा व्यक्तींनी चांगले विचार जीवनात उतरवले पाहिजेत, आणि जीवन शुद्ध केले पाहिजे. हे तंत्र त्यांनी हळूहळू आपल्या भोवतालच्या लहान मोठ्या समाजाला शिकवले पाहिजे. भ्रष्टाचार जसा चोरपावलाने आला तसा तो एकेक पाऊल मागे घेतल्याशिवाय राहाणार नाही. आशावाद ठेवा आणि विचारांचा प्रसार करा. सदाचार संपादनाची नवी तंत्रे शोधून काढा.

गीता-जयंती [१४-१२-७५

६१. हे नवे गुरू ! पारखून घ्या

आपण ज्यांचेकडून शिक्षण घेतो ते गुरू, ही सामान्य व्याख्या आहे. पण व्यवहारात आपण तिचा अर्थ फार आकुंचित करतो. शाळेत, महाविद्यालयात, वर्गात, घरी, बुद्धीपुरःसर आपण ज्यांच्याकडून शिकलो त्यांना गुरू असे आपण मानतो.

गुरू याचा मूळ अर्थ मोठी व्यक्ती, श्रेष्ठ माणूस किंवा व्यक्ती. वस्तू, तत्त्व अथवा भावना यांत जे जे मोठे त्याला गुरू ही संज्ञा आहे. या दृष्टीने गुरूचा अर्थ व्यापक स्वरूपाने घेतला पाहिजे. कळत अथवा न कळत ज्यांना श्रेष्ठ मानून आपण त्यांचे जीवनात अनुकरण करतो ते सर्वच गुरू आहेत. आज आपल्या जीवनात अशा गुरूंची संख्या, स्वरूप व प्रकार यांची पुष्कळच वाढ झालेली आहे.

सकाळी उठल्यावर आपण रेडिओवर काही तरी ऐकतो. ते ऐकवणारे आपले गुरूच. कारण न कळत आपण ते विचार घेतो. ती पदे गुणगुणतो. वर्तमानपत्र वाचून आपल्या मनावर परिणाम करणारे संपादकीय लेख व वातमीपत्रे यांचे लेखक आपल्या विचारात बदल करीत असतात किंवा भर घालतात. तेही आपले गुरूच. शाळा-महाविद्यालयात शिक्षण देणारे गुरू आहेतच. पण ते केवळ त्या त्या विषयांचे गुरू असतात असे नाही. त्यांचा पोषाख, वर्तन, सवयी, आवडीनिवडी, भाषणपद्धती, उद्योग या सर्वांपासून विद्यार्थी न कळत बरे वाईट शिकत असतात. कार्यालयात, कारखान्यात अथवा कामाच्या ठिकाणी आपले वरिष्ठ-कनिष्ठ यांच्यापासूनही आपण शिकत असतो. सायंकाळी खेळाच्या व करमणुकीच्या वेळी तर अनेक गोष्टी शिकवणारे अनेक गुरू भेटतात. तुम्ही सिनेमा-नाटक पाहिल्यानंतर ज्या नट-नटयांचा बरा वाईट संस्कार मनावर करून घेता ते तुमचे गुरू होतात. सिनेमाचे लेखक, वितरक, दर्शक हे तुम्हांला त्यांचे विचार व अभिरूची न कळत देत असतात. ते सर्व तुमचे गुरूच आहेत. रात्री करमणुकीकरता तुम्ही मासिके, साप्ताहिके, पुस्तके वगैरे वाचता

त्यांचे संपादक व लेखक हेही तुमचे गुरूच आहेत. या वाङ्मयातील विचार व आचार त्यांचे संपादक व लेखक हेही तुमचे गुरूच आहेत. या वाङ मयातील विचार व आचार यांचे तुम्ही ग्रहण करता, त्यांचा जीवनावर परिणाम होतो. आपले व्यक्तिमत्व घडते, म्हणून ते संस्कार देणारे गुरूच होतात.

ही जी गुरूंची खानेसुमारी मी केली आणि गुरूंचा (गुरांचा नव्हे) बाजार तुमच्यापुढे मांडला तो काल्पनिक आहे की वास्तविक आहे हे आत्मनिरीक्षण करून तुम्हीच ठरवा. मी तरी या सर्वांना गुरू मानतो. शिक्षक मानतो. माझ्या जीवनातील दृष्टीवर, विचारावर, नैतिक ध्येयवादावर, पोषाखावर, भाषेवर, माणसाशी वागण्यावर, देवधर्म–विज्ञान इत्यादी कल्पनांवर, ते परिणाम करीत असतात. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, व्यावहारिक जीवनात कसे वागावे या विषयी इष्ट व अनिष्ट, खऱ्या व खोट्या,हिताच्या आणि अहिताच्या अशा कल्पना ते देत असतात. पण त्यांनी दिलेले सर्वच मी डोळे झाकून घेतले असे नव्हे. देणाऱ्याने कितीही दिले तरी त्यातले घ्यायचे काय आणि नाकारायचे काय हा विवेक ठेवला पाहिजे. या अनेक गुरूंनी अनेक बरेवाईट घडे दिले तरी आपण कोणते घ्यावयाचे हे तुम्ही, ज्याचे त्याने, चिकित्सापूर्वक ठरवले पाहिजे. हे चिकित्सेचे, बुद्धिवादाचे, विचारांचे युग आहे, अंधश्रद्धेचे नाही. कोणाकडून काय घ्यावे व टाकावे याचा विवेक आपण ठेवला नाही तर विसंगत कल्पनांचे व आचारांचे मिश्रण आपल्या जीवनात घडून येईल. त्यामुळे जीवनात आपण अयशस्वी, दुःखी व निराश होऊ.

ज्यांच्या विचारांचा, आचाराचा, भाषेचा, अभिरूचीचा, सवयींचा प्रभाव आपल्या जीवनावर पडतो त्या त्या व्यक्तीची पात्रता काय आहे ते पहा. त्या व्यक्तींची शैक्षणिक, वैचारिक व सांस्कृतिक पातळी काय आहे ते पहात जा. ज्यांचे अनुकरण आपण करतो, ज्यांची शिकवण आपण घेतो त्यांची पातळी आपल्यापेक्षा वरच्या दर्जाची असावी. आपले गुरू होण्याचा मान तुम्ही त्यांना द्यावी इतकी त्यांची पात्रता असावी. यात वयाचा प्रश्न येत नाही. पातळीचा प्रश्न येतो. बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्. सु म्हणजे सत्, चांगले, इष्ट, हितकारक. हे कोणाकडूनही घ्यावे. पण ज्याचे-कडून आपण घेतो त्याची पातळी व पात्रता अवश्य पहा.

दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की या सर्व गुरूंना आपण समाजाचे गुरू आहोत याची जाणीवच नाही. आपल्या विचारांचा, वागण्याचा, व्यसनांचा, पोषाखाचा, भाषेचा, अभिरुचीचा परिणाम अज्ञ, अडाणी समाजावर व आबाल-तरुणांवर होणार आहे, त्या जबाबदारीने आपण वागले पाहिजे, ही वृत्ती या गुरूंच्या ठिकाणी नाही. आपल्याला द्रव्यप्राप्ती, लोकप्रियता आणि प्रसिद्धी कशी मिळेल याकडेच त्यांचे लक्ष असते. थोडक्यात, या गुरूंची बाजारी , पोटभरू, स्वार्थी, व्यापारी, वैश्यवृत्ती असते. ते स्वतःला विकतात आणि वाटेल ते करून पैसा मिळवतात. हा पैसा देणारे आपण

आहोत. पैसा द्या पण त्यांनी दिलेले वाईट संस्कार घेऊ नका, चांगले संस्कार अवश्य द्या.

गुरू कितीही आदर्श असला तरी त्यात दोष असणारच. ही जाणीव ज्याला आहे तो खरा गुरू. बाकीचे आपले गुरूच ! म्हणून उपनिषदात प्राचीन आचार्यांनी शिष्यांना सांगितले की—

यानि अस्माकम् सुचिरतानि, तानि सेव्यानि, न इतराणि।
आमुचे सद्‌गुण जे जे, ते ते घ्या, दुर्गणांसि टाकुनि द्या ॥

मकरसंक्रांत [१५-१-७६

६२. कलमी कार्यक्रमाची व्यापक कल्पना

वीस कलमी कार्यक्रमाची घोषणा व कार्यवाही झाल्यामुळे मला अतिशय आनंद झाला. असा आनंद पंचवीस वर्षापूर्वी झाला होता. त्यावेळी भारताची पहिली पंचवार्षिक योजना घोषित झाली होती. जीवनात संख्येला फार महत्त्व आहे हे प्राचीन काळी,तीन हजार वर्षापूर्वी,सांख्य तत्त्वज्ञानाचा प्रणेता जो कपिलमुनी त्याने ओळखले. त्याने सर्व तत्त्वज्ञानाचा तपशील संख्येमध्ये बांधून दिला. संख्येमुळे स्मरणाला मदत होते हा फार मोठा फायदा आहे. करावयाच्या गोष्टी लक्षात राहिल्या तरच त्या पार पडतील. विस्मरणात गेल्या की काळाच्या पोटात गेल्याच. दुसरा फायदा निश्चिततेचा व एकाग्रतेचा. कार्यक्रम संख्येत मांडल्यामुळे सर्वांचे लक्ष त्याच कार्यक्रमावर एकाग्र किंवा केंद्रित करता येते आणि प्रत्येक व्यक्तीला आपली सर्व शक्ती त्या विशिष्ट कार्यक्रमाकडे लावता येते. १९०८ च्या राष्ट्रीय आंदोलनात लोकमान्य टिळकांनी 'स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य' अशी चार कलमी घोषणा देऊन कार्याला निश्चित दिशा दिली होती. १९२० मध्ये महात्मा गांधींनी 'एक वर्षात स्वराज्य' हा कालखंडाने मर्यादित व निःशस्त्र सत्याग्रह, बहिष्कार, खादी इत्यादी कार्याचे दृष्टीने निश्चित असा कार्यक्रम दिला होता.

या वीस कलमी कार्यक्रमात एक उणीव आहे ती आपण भरून काढली पाहिजे. तिच्यात व्यक्ती, कुटुंब आणि संघटित संस्था (यात कारखाने कार्यालये इ. सर्व धरू या) यांना काही कार्यक्रम दिलेला नाही. १९५० च्या पंचवार्षिक योजनेवर मी हाच अभिप्राय दिला होता व तो त्या वेळच्या समाचारमध्येही छापला होता; तो असा की या योजनेत 'मला' म्हणजे व्यक्तीला, माझ्या कुटुंबाला व माझ्या संस्थेला काहीच कार्यक्रम दिलेला नाही. सर्व शासकीय मामला आहे. (समाचार, डिसेंबर १९५२. सदाचार चिंतनी भाग २ पान १७; २१ तुमची पंचवार्षिक योजना)

दहा वर्षांपूर्वी शिक्षणात 'संस्था प्रधान योजना' (इंस्टिट्यूशनल प्लॅनिंग) अशी योजना निघाली, तेव्हा भोपाळ येथे एका परिसंवादात मी तिला उत्साहपूर्वक उचलून धरले व पाठिंबा दिला. पण ती कल्पना विस्मृतीत गडप झाली. तिला कालाच्या व कार्यक्रमाच्या संख्येत बसवले गेले नाही हा मोठा दोष होता.

वीस कलमी कार्यक्रम अंमलात आणणाऱ्या सर्व व्यक्तीच आहेत, त्या मुख्यतः शासकीय; आणि त्याचा फायदा टिकवणाऱ्या पण व्यक्तीच आहेत; ते मुख्यतः सामान्य निर्धन लोक. या दोन्ही गटांतील व्यक्तींच्या स्वभावात सुधारणा झाल्याखेरीज वीस कलमी कार्यक्रम कलमी म्हणजे बाहेरून लादलेला ठरेल आणि लवकरच विसावी गोष्ट पुरी होण्यापूर्वी विसावाही घेईल. ही आपली माझी भिती आहे, भविष्य नाही. तसे होऊ नये म्हणून प्रयत्न व्हायला हवेत.

व्यक्ती, कुटुंब आणि संस्था हे समाजाचे मुख्य घटक आहेत. या घटकांच्या स्वभावात आणि कार्यपद्धतीत बदल घडवून आणला पाहिजे. आज प्रत्येक व्यक्ती आपल्या कामाकडे स्वार्थाचे दृष्टीने पहाते. 'मला यातून अधिकाधिक फायदा कसा मिळेल' ही प्रत्येकाची दृष्टी असते. या स्वार्थापायी लाचलुचपत, भ्रष्टाचार, काळा पैसा, काळा बाजार, चोरटा व्यापार, कर चुकवणे, लबाडी इत्यादी पापे घडतात. ही पापे करणारे लोक वरपासून खालच्या सर्व वर्गात आहेत. पोर्टर, कंडक्टर, डायरेक्टर आणि मिनिस्टर अशा सर्व थरात असे लोक सापडतात की नाही ते पहा म्हणजे सर्व समाजाला स्वार्थाची कीड किती मोठ्या प्रमाणात लागली आहे ते कळेल.

शासकीय सेवेतले कर्मचारी पब्लिक सर्व्हिस कमिशन मार्फत निवडले जातात, म्हणजे हा निवडक बुद्धिवान वर्ग. पण एकदा नोकरीत शिरल्यावर बहुतेक लोक 'पब्लिक सर्व्हिस' विसरतात आणि 'कमिशन' तेवढे लक्षात ठेवतात ! आपले काम हे आपले सामाजिक 'मिशन' आहे, ते 'कमिशन' करिता नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे. 'काम' म्हणजे कर्तव्य, धर्म, ईश्वरपूजा, जनतेची पूजा. काम म्हणजे 'वासना' पूर्ती नव्हे. आपल्या व्यवसायाचा हाच अर्थ गीतेने शिकवला आहे. गीतेत प्रामाणिक कर्तव्याला स्वधर्म व ईश्वरपूजा म्हटले आहे. त्यालाच इंग्रजी प्रतिशब्द मिशन हा आहे.

व्यक्तीची दृष्टी, विचारसरणी, तत्त्वज्ञान, प्रेरणा यात आमूलाग्र बदल झाल्याशिवाय समाज व देश सुधारणार नाही. नैतिक आणि वैचारिक सुधारणेचा भाग दृष्टिआड झालेला आहे. तो आपण व्यक्तींनी, कुटुंबांनी आणि संस्थांनी घेतला. पाहिजे. माझे कर्तव्य मी समाजहिताचे दृष्टीने करीन, स्वार्थी दृष्टी ठेवणार नाही.' अशा प्रकारची-प्रतिज्ञा करा. अशा सामुदायिक प्रतिज्ञा सर्वत्र होऊ द्या. नीतीने मिळालेला मोबदला अवश्य घ्यावा. अनैतिक लाभाचा लोभ ठेवू नये हे मुख्य तत्त्व आहे. अशा प्रकारच्या व्रतग्रहणाचे कार्यक्रम सर्वत्र मोठ्या प्रमाणावर.

झाले पाहिजेत. या व्रतात इतर अनेक कार्यक्रमांचाही समावेश करता येईल. व्यक्तीच्या स्मरणात अहर्निश राहातील अशी निदान आठ व्रते तिला दिली पाहिजेत. १ समाजहितार्थ कर्तव्य, २ संपूर्ण वेळ काम, ३ बिनचूक काम, ४ अंग मोडून काम, ५ त्वरित काम, ६ अनैतिक लाभ (लाच) न घेता काम, ७ बुद्धी वापरून काम आणि ८ नुकसान न करता काम, अशा आठ निश्चित गोष्टी मी सुचवतो. सर्वज्ञ या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची व्रते घेणारे लाक पुढे येऊ द्यात.

असाच कार्यक्रम प्रत्येक कुटुंबाला आणि संस्थेला त्यांच्या त्याच्या प्रगतीच्या आणि सुधारणेच्या दृष्टीने घेता येईल. त्याला कामाचे आणि काळाचे संख्यात्मक बंधन घालून घेतले पाहिजे. या वर्षात या पाच गोष्टींची कार्यवाही, या पाच वर्षात दहा गोष्टींची कार्यवाही, अशी बंधने स्वतःवर घालून घेणे हे महत्त्वाचे आहे. कुटुंबात आणि संस्थेत हा कलमी कार्यक्रम सर्वांच्या मताने व विचाराने ठरवा. एका व्यक्तीने तो वरून लादला तर तिला खूष करणे हा मुख्य कार्यक्रम राहील आणि मूळ कार्यक्रम बाजूला पडेल. राजा बोले दळ हाले असे नसावे. राजाच्या भोवताली त्याचा शब्द उचलून धरणारे काही स्वार्थी, काही तोंडपूजक आणि काही प्रामाणिक असे सर्व प्रकारचे लोक असतात. व्यक्तिप्रेरित कार्यक्रम अल्पजीवी असतात, सर्वजनप्रेरित कार्यक्रम खोलवर व्यक्तीच्या मनामनांत रुजतात, ते प्रत्येकाचे होतात. प्रत्येकाने ते ठरवण्यात भाग घेतलेला असतो म्हणून त्याला तो आपलाच कार्यक्रम वाटतो. अशा कार्यक्रमात आठच गोष्टी असल्या तरी त्या आठवणीत राहतात, विसावा घेत नाहीत. अठ्ठावीस घातल्या तर आठ पुऱ्या होण्यापूर्वीच विसावा घेतील. व्यक्तींनी, कुटुंबांनी आणि संस्थांनी ही कलमी कार्यक्रमाची कल्पना सर्वव्यापी करावी. ही आपल्याला फार मोठी संधी आहे. आज भीष्म द्वादशी. या कायक्रमाच्या भीष्मप्रतिज्ञेला हा छान मुहूर्त आहे.

भीष्म द्वादशी [१२-२-१९७६

६३. जीवनातील आणीबाणीचा क्षण

शासनाने या वर्षी आणीबाणीची परिस्थिती जाहीर करून सामाजिक वातावरण बदलून टाकले असा भास होतो हे खरे आहे. अनेक आज्ञापत्रके, कायदे, बंधने इत्यादी निर्माण करून आर्थिक, व्यापारी, औद्योगिक, शैक्षणिक इत्यादी काही क्षेत्रात काही शिस्त आंणली आहे. त्याचा समाजाला थोडाफार फायदाही झाला आहे. त्याकरिता अनेक बंधने स्वीकारावी लागत आहेत. ते अपरिहार्य आहे. बंधनापासून स्वातंत्र्य का भौतिक जीवनातील सुख-सोयी, असे पेच-प्रसंग अनेक देशात व समाजात कधी कधी निर्माण होतात. दुसरा प्रश्न मनात येतो तो असा की, शास-

नाच्या, कायद्यांच्या व हुकमांच्या दडपणामुळे माणसे सुधारलेली दिसतात. ही सुधारणा तात्कालिक आहे की, चिरकालिक आहे ? ती बाह्य दबावामुळे आली आहे का मने सुधारल्यामुळे, नीतिमत्ता सुधारल्यामुळे आली आहे ? आणीबाणीची अंमलबजावणी करणाऱ्या लहान-मोठ्या अधिकाऱ्यांच्या मनात आणि विचारात परिवर्तन झाले आहे का ? आणीबाणीची परिस्थिती मागे घेतली तर ही सामाजिक शिस्त टिकेल का ? ती टिकण्याकरिता काय केले पाहिजे ? आणीबाणी हा जीवनाचा नित्याचा मार्ग होऊ शकत नाही. या दृष्टीने आजच विचार केला पाहिजे.

१९३३ च्या ऑगस्ट महिन्यातील प्रसंग. मी दोन वर्षे अमेरिकेत राहून इंग्लंडमध्ये गेलो होतो. तेथील शिक्षणसंस्था पहात होतो. त्या कालखंडात इटलीत फॅसिझमचा उदय होऊन मुसोलिनीचा, आणि जर्मनीत नाझीझमचा उदय होऊन हिटलरचा बोलबाला सर्वत्र होत होता. त्या दोन पुढाऱ्यांनी आपापल्या देशात शिस्त आणली होती. त्याकरिता शिक्षणावरही बरीच बंधने घातली होती. त्या-संबंधी एका मुख्याध्यापकांशी मी बोलत होतो. त्यांचे एक वाक्य माझ्या चिरकाल स्मरणात राहिले. 'यू कान्ट कीप ए पोलीसमन् वुईथ् एव्हरी इंडिव्हिज्युअल !' (प्रत्येक माणसामागे एक पोलीस ठेवणे शक्य नाही.) याचा अर्थ काय ? विचार करा. याचा अर्थ तुमच्याशी व माझ्याशी पोचतो. शिस्त प्रथम आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे. आपली मने, आपले विचार, आपली जीवनाची दृष्टी, आपले व्यवहाराचे तत्त्वज्ञान यात परिवर्तन झाले पाहिजे. सामान्य नागरिक आणि सार्वजनिक नोकर, सगळ्यांचीच मने सुधारली पाहिजेत. दृष्टी बदलली पाहिजे.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेल्या पंचवीस वर्षांत या देशातील ध्येयवादाचे आणि त्यागाचे वातावरण नाहीसे होऊन स्वार्थाचे आणि सत्ता-सुखोपभोगाचे वातावरण निर्माण झाले आहे. जो तो वैयक्तिक फायद्याचे दृष्टीने सत्ता-संपत्ती-सुखाचे मागे लागला आहे, आणि ते संपादन करण्याच्या धुंदीत माणसाने नैतिक मूल्ये खुंटीला टांगून ठेवली आहेत. ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका यांचे अध्यक्ष आणि सभासद हे विविध प्रकारच्या गुन्हेगारीत सापडतात, याचा अर्थ काय ? सुशिक्षित डॉक्टर, वकील, अध्यापक, कलावंत, अधिकारी, गुन्हेगारीत पडलेले पाहून आपला शिक्षणावरचा विश्वासच उडायला लागला आहे. वरचे लोक असे स्वार्थाच्या मागे लागलेले पाहून साधे पोर्टर आणि कंडक्टर म्हणतात, आम्हीही तुमचे अनुकरण करू शकतो ! समाजाचा नैतिक पाया ढासळला आहे. तो मजबूत करायला हवा. हे काम शासनाचे नाही. वैचारिक परिवर्तन करण्याची साधने ज्यांच्या हातात आहेत त्यांचे हे काम आहे. कुटुंबातले पालक, शाळा-कॉलेजातील अध्यापक, ग्रंथाचे लेखक, वृत्तपत्रांचे संपादक, सिनेमा-लोकनाट्ये यांना कथा पुरवणारे

कलावंत, आकाशवाणी, चित्रवाणी, सार्वजनिक वक्ते—या सर्वांचे हे काम आहे, नव्हे अपरिहार्य कर्तव्य आहे. दुर्दैवाने त्यांना या गोष्टीची जाणीव झालेली नाही ही आपल्या समाजाची मुख्य व्यथा आहे.

ती दूर करण्याचा एक प्रयत्न म्हणून मी श्री. मधुकर वैद्य यांच्या " सात्त्विक समर्थ " या त्रैमासिकाकडे पाहातो. समाजाचे वैचारिक परिवर्तन घडवून आणावे याकरिता त्यांनी, आपल्या औद्योगिक क्षेत्राचे बाहेर पाऊल टाकून, हा भाषा स्वरूपी विचारप्रधान उपक्रम हाती घेतला आहे. हा एका नवीन प्रवृत्तीचा उदयकाल मला दिसतो. पैसा पैसा आणि फायदा फायदा म्हणून इतर सर्व लोक चोवीस तास जप करीत असता महाराष्ट्राच्या उद्योगक्षेत्रातील काही माणसे वैचारिक परिवर्तनाकरिता प्रयत्न करीत आहेत हे महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत शुभलक्षण आहे.

या कामाचे स्वरूप आजच्या काळाला अनुरूप असे आहे. आजचे आणीबाणीचे वातावरण नाहीसे झाले तरी समाजातील नैतिक शिस्त ही सामाजिक सदसद्विवेक बुद्धीतून निर्माण कशी होईल या दृष्टीने होणाऱ्या या प्रयत्नांचे आपण सर्वांनी अंतःकरण पूर्वक स्वागत केले पाहिजे. असे शेकडो उपक्रम ठिकठिकाणी सुरू झाले पाहिजेत. श्री. मधुकर वैद्य यांच्या धाडशी उपक्रमाला मी सुयश चिंततो.

[१५-३-७६

६४. दृष्टि-रक्षणाचे वर्ष

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय संस्थेने १९७६ हे साल दृष्टिरक्षण वर्ष म्हणून मानावयाचे ठरवले आहे. ७ एप्रिल हा अंधदृष्टिदिन आणि संपूर्ण वर्ष 'फोरसाइट सेव्हज् साईट, दृष्टीची काळजी घ्या,' या विचारप्रसाराचे वर्ष ठरवले आहे. या संघटनेचा उद्देश लक्षात घेऊन व्यक्ती, कुटुंबप्रमुख, शिक्षणसंस्थाचालक यांनी यथाशक्य प्रयत्न करावेत व दृष्टिरक्षणाचे आणि सुधारणेचे सर्व मार्ग इतरांना समजावून सांगावेत. दृष्टी चांगली असेपर्यंत तिची किमत वाटत नाही. तिच्यात दोष निर्माण झाल्यावर तिचे महत्त्व कळते. वाचनप्रधान अशा आजच्या मानवी संस्कृतीत डोळ्यांना अतिशय महत्त्व आहे, हे तत्त्व आबालवृद्धांनी लक्षात ठेवावे.

बाहेरचे विश्व पाहण्याकरिता डोळ्यांची दृष्टी आहे, तसेच न दिसणारे मानवी मनाचे व बुद्धीचे विश्व पाहण्याची प्रत्येकाला एक आंतरिक दृष्टीही आहे. तिचे संगोपन करणेही अतिशय आवश्यक आहे. आपण आपले रूप आरशात पहातो व ते आकर्षक आणि नीटनेटके ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे बाह्यस्वरूपासंबंधी झाले. आपल्याला एक आंतरिक रूप आहे याचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे. हे अंतःस्वरूप आपल्या मनातील भावनांचे व बुद्धीतील विचारांचे आहे. हे स्वरूप देखील

रोजचे रोज पाहून ते स्वच्छ, शुद्ध आणि सुंदर ठेवण्याचा सतत प्रयत्न करायला हवा. आज आपण सर्वजण बहिर्मुख झालो आहोत. बाहेरचेच जग इतके महत्त्वाचे, आकर्षक आणि व्यापक झाले आहे की ते पाहण्यात आपला सारा दिवस, सारे वर्ष आणि सारे आयुष्य जाते. दृष्टी अंतर्मुख करण्याचा विचारच मनात येत नाही आणि आला तरी त्याला ठराविक वेळ, जागा आणि दैनिक कार्यक्रमात स्थान आपण देत नाही याचा परिणाम काय झाला ? आपले बाह्य जीवन संपन्न झाले आहे, परंतु भावनांचे आणि विचारांचे आंतरिक विश्व मागासलेले, दरिद्री, असंस्कृत आणि उपेक्षित असे राहिले आहे.

आपले दैनंदिन जीवन बाह्य गोष्टीतच फार अडकून पडले आहे. सकाळी उठल्याबरोबर वृत्तपत्रे आणि रेडिओ. दिवसाचे काम संपवून घरी आल्यावर करमणुका, फिरणे, रेडियो, टेलिव्हिजन आणि गप्पा. भोजन झाल्यावर शृंगारिक चित्रे आणि गोष्टी यांनी भरलेली मासिके यांचे चघळणे, ते झोपेपर्यंत. पुन्हा दुसरे दिवशी हाच कार्यक्रम. यात कधी मधी नाटके, लोकनाट्ये, सिनेमा, क्रिकेट मॅचेस, सभा यांची भर घातली म्हणजे आपल्या बाह्य जीवनाचे चित्र पूर्ण होते. यात आपल्याला आपल्या मनाकडे आणि विचारांकडे दृष्टी वळवायला कोठे सवडच नाही.

आपले जीवन परिपूर्ण व सुखी होण्याकरिता आंतरिक दृष्टीचेही फार महत्त्व आहे. आपल्या ठिकाणी कोणत्या भावना आहेत; त्यांचा जीवनावर काय परिणाम होतो; त्यांचा विकास कसा करता येईल; त्यांतील अनिष्ट भाग कसा कमी करता येईल; इष्ट भागाची साधना कशी करता येईल; भावना आणि विचार यांचे जे भांडवल व जी पात्रळी आपण घेऊन आलो तिच्यामध्ये काही वाढ झाली का आपण पूर्वी होतो तेथेच रखडत आहोत? शरीर प्रौढ माणसाचे पण भावना आणि विचार एखाद्या पोरासारखे, अशी तर आपली स्थिती नाही ना ? असे आत्मनिरीक्षण करण्याकरता दिवसाचा ठराविक वेळ द्या.दैनंदिन कार्यक्रमाचा तो एक भाग होऊ द्या. त्याकरता मासिके, रेडिओ, टेलिव्हिजन आणि गप्पा यांच्याकडे जाणारा थोडा वेळ दिला तरी काही नुकसान होणार नाही, फायदा होईल. हीच सवय आपल्या मुलामुलींनाही लावा.

आपल्या स्वत:जवळ जसे एक आंतरिक विश्व आहे तसेच ते आपल्या भोवतालच्या प्रत्येक व्यक्तीजवळ, प्रत्येक प्राण्याजवळ आहे. प्रत्येक व्यक्ती काही विचार आणि भावना यांचे एक मिश्रण असते. गाय, कुत्रा, घोडा, पोपट इत्यादी प्राण्यांनाही विचार आणि भावना असतात. आपण व्यक्तीच्या बाह्यस्वरूपाकडे, त्याच्या देखणेपणाकडे, वस्त्राकडे, अलंकाराकडे व बाह्य कृतींकडे पाहातो. पण या सर्वांचा उगम त्यांच्या भावनांत आणि विचारांत असतो तिकडे पाहात नाही. इतरांचे विचार

आणि त्यांच्या भावना जाणून घेण्याचा प्रयत्न करा म्हणजे व्यक्तीची खरी ओळख होईल. न दिसणाऱ्या गोष्टीही निरीक्षणाने आणि संवादाने जाणून घेता येतील.

घड्याळ, रेडिओ, मोटार, इत्यादी वस्तूंच्या बाह्य स्वरूपाकडे सामान्य लोक पाहतात. जो जाणकार असतो तो या वस्तूना चालना देणाऱ्या यंत्राच्या गुणांकडे पाहतो. आपल्या व इतर व्यक्तींच्या जीवनाला चालना देणारी शक्ती विचार आणि भावना यांत आहे. ही तत्त्वे नेत्रांना दिसू शकत नाहीत. त्यांना आंतरिक दृष्टी हवी. ती सवयीने वाढविता येते.

दृष्टिप्रधान अशा या वर्षाच्या निमित्ताने आंतरिक दृष्टीचाही परिचय करून घेऊ या आणि तिचा विकास करू या.

दृष्टि रक्षण दिन [७–४–७६

६५. संपत्ती येते, संस्कृती रेंगाळते

एकदा डेक्कन क्वीनने आम्ही प्रवास करीत होतो. आमच्या समोर डाव्या बाजूला तीन-चार उंची पोषाख केलेले प्रवासी बसलेले होते. पुणे सोडताना डबा आरशासारखा स्वच्छ होता. दादर आले तेव्हा ते लोक उतरू लागले. तीन तासांच्या प्रवासात त्यांनी आपल्या जागेचा उकीरडा करून टाकला होता. केळाच्या साली, शेंगाची फोलपटे, रद्दी कागद यांची, आपल्या प्रवासाची निशाणी गाडीत ठेवून ही माणसे खाली उतरली. आजकाल उंची पोषाख हे काही संस्कृतीचे लक्षण मानण्याची गरज नाही. गावगुंड आणि चोरव्यापार करणारेही अद्ययावत पोषाखात असतात. पोषाखावरून माणसाचे मन ओळखता येत नाही. अशा दुसऱ्या एका प्रसंगी मुंबईतील दोन कामगार आपल्या गावी चालले होते. त्यांच्या संभाषणात मराठी भाषेतील सर्व अपशब्द अथवा शिव्या मला ऐकालाय मिळाल्या. त्यांना कशाला दोष द्यायचा ! आजकालच्या पुरोगामी वाङ्मयात अपशब्द मुक्तपणाने बागडताना दिसतात. गंगेचा प्रवाह उलटा वाहतो आहे. अशिक्षितांकडून अपशब्दांची गंगा सुशिक्षितांकडे वाहात आहे.

कै. प्र. के. अत्रे आणि मी एकदा डेक्कन क्वीनमध्ये चहा घेत बसलो होतो. मी सहज म्हणालो " काय बाबुराव तुम्ही शिवराळ भाषा वापरता तुमच्या पेपरमध्ये ? एरवी तुमचे लिखाण एखाद्या बृहस्पतीसारखे असते.' ते म्हणाले, अहो तुम्ही ते लिखाण वाचता कशाला ? तुमच्याकरता नाही ते. ' या उत्तराने माझे समाधान झाले नाही. साहित्यिकांनी अशी शिवराळ परंपरा पाडू नये असे माझे स्पष्ट मत होते व आहे. त्यामुळे चांगल्या शिक्षणाला हरताळ फासल्यासारखे

होते. नवीन सुशिक्षित होणारांना सुसंस्कृत जीवन दाखवणे व शिकवणें हे लेखकांचे काम आहे.

आज भारतात आर्थिक संक्रमण होत आहे. सामान्यजनातून व मध्यम वर्गातून नवे नवे कारखानदार उदयाला येत आहेत. पूर्वीचा निर्धन वर्ग आता वेतन-श्रेणीच्या वाढीमुळे संपन्न होऊन मध्यम वर्गात येत आहे. पूर्वीचे गरीब शेतकरी व बागाईतदार ऊस, द्राक्षे, बागाईत, पाटाचे पाणी आणि साखर कारखाने यांमुळे संपन्न होत आहेत. आर्थिक दृष्टीने विचार करता मध्यम आणि श्रीमंत वर्ग यात हळू हळू भर पडत आहे ही समाधानाची आणि इष्ट अशी घटना आहे. निर्धन वर्ग कमी होऊन मध्यम वर्गाचे प्रमाण वाढावे हे सामाजिक क्रांतीचे उद्दिष्ट असावे. ते हळूहळू साध्य होईल पण केवळ आर्थिक स्थितीपुरतेच. या नवीन श्रीमंत वर्गाची सांस्कृतिक पातळी वाढविणे हे केवळ आर्थिक क्रांतीने होणार नाही. त्याकरता बुद्धिपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. अखेरपक्षी संपत्ती हे साधन आहे. अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या प्राथमिक गरजा भागविल्यानंतर समाजाची सांस्कृतिक पातळी वाढविणे हे अंतिम ध्येय असावे, त्याची जाणीव पुढाऱ्यांच्या ठिकाणी दिसत नाही. या नव श्रीमंत वर्गाला मार्गदर्शन करण्याच्या बाबतीत तिचा अभाव दिसतो.

१९३३ साली मी रशियात प्रवास करीत होतो. मॉस्कोमध्ये शिक्षण-संस्कृती विभागाचे प्रमुख प्रो. शाटस्की यांची मुलाखत घेत होतो. वाङ्मय, चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्य इत्यादी क्षेत्रात नवीन कामगार वर्गाला उच्च पातळीवर आणण्याचा प्रयत्न कसा चालला आहे याची त्यांनी मला माहिती दिली आणि शेवटी म्हणाले, एक दोन पिढ्यात रशियन समाज हा जगातील कोणत्याही देशापेक्षा सुसंस्कृत असा समाज होईल. शासनातर्फे तसा प्रयत्न योजनापूर्वक चालू होता. कोणत्याही समाजातील आर्थिक संक्रमणाचे हेच ध्येय असायला नको का ? या क्षेत्रात आपण रशियन दृष्टिकोनाचा अवश्य विचार केला पाहिजे.

एके काळी निर्धन असणाऱ्या लोकांच्या हातात आज मुबलक पैसा खेळत आहे. पण त्या जादा संपत्तीचा उपयोग कशा रीतीने केला जात आहे तेही पाहिले पाहिजे. कोणाच्या सुस्थितीचा हेवा, मत्सर करण्याचा हा प्रश्न नाही. हा आपल्या समाजाच्या भावी नागरिकांच्या, व भारताच्या संस्कृतीचा प्रश्न आहे. आज या जादा संपत्तीचा ओघ कुठे जात आहे ? मद्य, मादी, मोटारी, उंची विलायती कपडे, जुगार, रेसेस, सिनेमा, नाटके, लोकनाट्ये, मादक द्रव्ये अशा गोष्टीकडे द्रव्याचा विनियोग होत आहे. साखर कारखान्याचे संपन्न परिसर व तेथील नवीन जीवन पाहिले म्हणजे या नवीन प्रवृत्तीची थोडीशी कल्पना येते. जादा संपत्तीचा उपयोग करण्याचे सुसंस्कृत मार्ग नवश्रीमंतांना दिसले नाहीत, दाखविले नाहीत, तर अधिक मोठ्या

प्रमाणात त्यांच्या द्रव्याचा ओघ व्यसनांकडे वाहू लागेल, हा धोका आहे. समाज-शिक्षणाची साधने ज्यांच्या हातात आहेत त्यांनी, कामगारनेत्यांनी आणि बहुजनांच्या पुढाऱ्यांनी, या नवीन प्रवृत्तींचा व आव्हानांचा शांतपणे विचार करून सामान्य-जनांना मार्ग दाखविणे इष्ट आहे. भारतीय समाज, बहुजन समाज, सुसंस्कृत करणे हे आपले अंतिम ध्येय आहे.

चांगल्या संस्कृतीचे पहिले लक्षण स्वच्छता हे आहे. शुचिता या सद्गुणावर भारतीय संस्कृतीचा प्राचीन काळापासून कटाक्ष आहे. योगशास्त्रातील यम-नियमात शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर-प्रणिधान या सुसंस्कृत जीवनाच्या कसोट्या दिल्या आहेत. त्यात स्वच्छतेला (शौच-शुचिता) पहिला क्रमांक आहे. स्वच्छ रहाणी, ज्ञानसंवर्धन, सात्त्विक मनोरंजन, कलासंवर्धन, सात्त्विक छंद, वाङ्मय अभिरुची, बौद्धिक गोष्टींची आवड, शास्त्रीय संगीत, तत्त्वज्ञानाची आवड, मर्दानी मैदानी खेळ, दुर्मिळ वस्तुसंग्रह, बाग-बागायतीचा शोक, अशी उच्च संस्कृतीची अनेक अंगे आहेत. जादा संपत्तीचा, वेळेचा, बुद्धीचा व सामर्थ्याचा उपयोग अशा विविध प्रकारांनी व्हावा. केवळ उंची कपडे, व्यसने आणि इंद्रियसुखोपभोग यांत वाया जाणारा पैसा चांगल्या गोष्टींत खर्च व्हावा. त्यामुळे चांगल्या संस्कृतीचा वारा अथांग समाजात खेळेल.

ऐहिक ऐश्वर्य संपादन केलेल्या पाश्चिमात्य समाजात आज व्यसने, मादक द्रव्य सेवन, नैतिक गुन्हेगारी आणि मानसिक व्यथा यांचे प्रमाण वाढत आहे. तीच परिस्थिती भारतात येऊ नये. ऐहिक उत्कर्ष आणि उच्च संस्कृती एकत्र नांदू शकतात, हे भारताने दाखविले पाहिजे. ही आपली जबाबदारी आहे.

सर्वसामान्य समाजाकडे संपत्तीचा ओघ वळत आहे. पण संस्कृती रेंगाळत आहे. तिलाही गती मिळेल असे बुद्धिपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. लक्ष्मी आणि सरस्वती, संपत्ती आणि संस्कृती यांच्या संगमावर भारतीयांची श्रद्धा असावी.

[१५-६-७६

६६. वानर आहेत, राम हवेत.

अंगणात व बागेत चिखल फार होतो त्या वेळी सर्वत्र फिरता येत नाही, म्हणून मी दोन गाडगा फरशीचे तुकडे आणले होते. त्यांची रास रचून ठेवली होती. वेळ मिळाला की पायवाटेवर ते तुकडे टाकू असे म्हणता म्हणता दोन वर्षे झाली. फरशी तुकड्यांची रास पडूनच होती. तिच्यात पाली-किडे-मुंग्या-झुरळांनी वस्ती केली होती. एकदा निश्चयाने त्या कामाला लागलो. फरशा वाहून सर्वत्र नेणे आणि त्या जमिनीवर बसवणे ही दोन्ही कामे माझ्याकडून होणे शक्य नव्हते. म्हणून घरातल्या सहा ते बारा वर्षाच्या तीन नातवंडांना फरशांची ने-आण करण्याकरता

हाताशी धरले. आणि जे काम दोन वर्षे रेंगाळून पडले होते ते तीन दिवसांत रोज एक एक तास काम करून पूर्ण झाले.

आपल्या घरात सहज उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची कल्पना मला वरील प्रसंगाने आली. रामाने वानरांच्या मदतीने सेतू बांधला, या गोष्टीचे रहस्य मला प्रत्ययाला आले. आमच्या घरात वानरे, म्हणजे मनुष्यबळ होते. राम म्हणजे त्या मनुष्यबळाचा विधायक उपयोग करण्याची बुद्धी जागृत झाली नव्हती. हीच आज सर्व भारताची व्यथा आहे. मनुष्यबळ आहे, योजना करणारे राम नाहीत.

शाळांच्या आवारात गवत उगवलेले असते, केर पडलेला असतो, अंगण खाली वर असते, राडेरोडे पडलेले असतात, पण मजूर परवडत नाहीत म्हणून जागा साफसूफ होत नाही. शाळेत हजार पाचशे मुले असतात. त्यांचा उपयोग करून घेतला तर एक आठवड्यात शाळेच्या आवाराचे नंदनवन करता येईल. मोठमोठ्या चाळी किंवा वाड्यात किंवा वसाहतीत अशीच परिस्थिती असते. सर्वत्र अस्वच्छता गवत वाढलेले, खाचखड्डे. चार फुलझाडेही नाहीत. चाळीत लहान, तरुण मोठे सर्व वयाचे,लोक असतात. या मनुष्यबळाचा उपयोग केला तर चाळीचा परिसर शोभिवंत व आल्हादकारक होईल. सुंदर शिल्पकाम केलेली अनेक देवळे गावोगावी ठिकठिकाणी आहेत. मनःशांती मिळण्याकरता केलेली ही स्थाने. परंतु त्यांची डागडुजी नाही की स्वच्छता नाही. अलीकडे गावात सर्वत्र गाजर गवत उगवलेले दिसते. त्या त्या भागातील युवकदल आणि मनुष्यबळ उपयोगात आणले तर एका आठवड्यात गवताचे निर्मूलन होईल. सार्वजनिक उद्याने, नदीचे घाट, गावातली मैदाने, थोरांचे पुतळे, गावाजवळच्या टेकड्या, आंबराया, अशी अनेक ठिकाणे या पद्धतीने आदर्श करता येतील.

पाचपंचवीस मुलांनी, तरुणांनी किंवा प्रौढांनी रोज एक तासभर अंगमेहेनत करून आपापले विभाग स्वच्छ सुंदर, फुलझाडांनी, फळझाडांनी समृद्ध करायचे, ठरवले तर आपल्या जीवनात किती आनंद निर्माण होईल ! केवळ अंगमेहेनतीने व मनुष्यबळाने होण्यासारखी कितीतरी कामे ठिकठिकाणी पडली आहेत. कामे आहेत. मनुष्यबळ आहे. काम करण्याची धमक, ताकद आणि इच्छा आहे. पण संघटन करणारा नाही, स्फूर्ती देणारा नाही, योजना करणारा नाही, पुढाकार घेणारा नाही. थोडक्यात सांगायचे झाले तर—

समाजात राम नाहीत. वानर आहेत. रामाची ते वाट पहात आहेत. ग्रामीण भागात असे नेतृत्व निर्माण झाले तर गावातले रस्ते, देवळे, नद्यांचे घाट, तालमी, चावड्या, शाळा, वाचनालये इत्यादी सार्वजनिक ठिकाणे आकर्षक करता येतील. गावाची शोभा वाढेल. गावात राहावेसे वाटेल. शहरांकडे वाहणारा ओघ कमी होईल.

[११-७-७६

६७. चोरांच्या चालीरीती बदलल्या

चोर म्हटल्यावर त्याचे स्वरूप, पोषाख, चोरीच्या पद्धती, आयुधे, कृती इत्यादीविषयी आपल्या मनात ज्या कल्पना येतात त्यापेक्षा आधुनिक चोरांच्या चालीरीती इत्यादी सर्वच गोष्टी भिन्न झाल्या आहेत. पोषाखावरून व चालीरीतीवरून आता चोर ओळखता येणार नाहीत. कारण सभ्य प्रतिष्ठित पोषाखही आता विशिष्ट वर्गाची मक्तेदारी राहिली नाही. अत्यंत सुसंस्कृत दिसणाऱ्या पोषाखातला माणूस अत्यंत लबाड, क्रूर, उलटचा काळजाचाही असू शकेल. चोर पोटापाण्याकरता चोरी करतात ही कल्पनाही आता शिळी झाली आहे. एक चोरी केली की वर्षभर काम करायला नको, खुशाल आळसात व व्यसनांत वेळ काढावा अशा वृत्तीचे अनेक चोर आहेत. वर्षभर काबाडकष्ट करण्यापेक्षा वर्षातून दोनचार चोऱ्या करणे त्यांना अधिक सोपे वाटते.

सभ्य पोषाखातील शिकलेले, श्रीमंत तरुणही दिवसाढवळचा एखाद्या घरात शिरून, चाकूचा धाक दाखवून, चोरी करून गेल्याची उदाहरणे आहेत. एक पतीपत्नीचे जोडपे थाटाचा पोषाख करून एका घरी पुरुष नसताना लग्नाचे निमंत्रण देण्याकरता म्हणून गेले. घरात प्रवेश मिळाल्यावर नवऱ्याने दहशत घातली आणि त्याच्या बायकोने घरातल्या बाईच्या सोन्याच्या पाटल्या काढून घेतल्या. तांदूळ, गहू, रॉकेल, पुस्तके इत्यादी दुर्मिळ वस्तू मिळवून देतो म्हणून पैसे घेऊन पुन्हा तोंड न दाखवणारे नवे चोर आहेत.

सारांश, अपरिचित माणसांपासून सावध रहा. कोणाला घरात घ्यायचे, किती अंतरापर्यंत घ्यायचे, आणि काय द्यायचे, घ्यायचे, याबाबत ज्याने त्याने सावधानता राखणे अवश्य आहे. याबाबत नियम घालून देता येणार नाही. 'सावधपण असावे सर्वठायीं' हा समर्थांचा उपदेश अत्यंत व्यावहारिक आहे. तो आजही आपणाला उपयोगी पडेल. घरात मोठचा अक्षरात तो लिहून ठेवा.

[२–७–७६

६८. मंगळाचे मंगल

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील घडामोडी पाहणारी आपली पिढी अतिशय भाग्यवान आहे. अनेक घडामोडी आणि अभूतपूर्व घटना आपणाला पाहायला, वाचायला, व अनुभवायला मिळत आहेत. आठ वर्षांपूर्वी १९६८–६९ साली चंद्रावर माणूस उतरल्याचे व तेथील दगड माती आणल्याचे आपण वाचले. १९७१ साली रशियन

याने मंगळावर उतरली पण संदेश पाठवू शकली नाहीत. त्याच वर्षी अमेरिकेच्या मरीनर ९ यानाने मंगळाभोवती १२० दिवस संचार करून माहिती पाठवली. आता १९७६ मध्ये व्हायकिंग १ अमेरिकन यान २० जुलै रोजी सायं. ४-५३ वाजता मंगळावर उतरले. तो दिवसही मंगळवार असावा हा एक योगायोग. त्याचे काम चालू होते न होते तोच पुन्हा ६ ऑगस्ट रोजी अमेरिकेने व्हायकिंग २ हे अवकाशयान मंगळाच्या कक्षेत सोडले आहे. या घटनेत आश्चर्य वाटण्यासारख्या गोष्टी काय आहेत ते पहा.

पृथ्वीपासून मंगळापर्यन्त अंतर ३४८० लक्ष किलोमीटर इतके आहे. इतक्या अंतरावरून पृथ्वीवर संदेश पोचायलाच १९ मिनिटे लागतात ! इतक्या अंतरावर जाणारे हे यान पृथ्वीवरून नियंत्रित केले जाते. कॅलिफोर्नियात पासाडेना येथील संशोधन केन्द्रात त्याच्या नियंत्रणाची यंत्रे आहेत. यानाचे वजन १२६० पौण्ड आहे. ते तेथे ९० दिवस मुक्काम करणार आहे. एखाद्या माणसाप्रमाणे ते पृथ्वीवरचे आदेश घेऊन, तेथे आपले काम करते. उतरण्याची योग्य जागा पाहणे, उतरल्यावर संदेश व फोटो पाठविणे, पृष्ठभागावरील माती, दगड जमा करणे, यानातील प्रयोगशाळेत त्यांची पहाणी करून ती केन्द्राकडे पाठविणे, वातावरणातील घटक मोजणे, इत्यादी दुर्मिळ माहिती ते मानवाकडे पाठवीत आहे. मंगळावर उतरल्याबरोबर २५ सेकंदांच्या आत त्याने पहिले छायाचित्र पाठवले व ते टेलीव्हिजनवर अनेक देशांतील लाखो लोकांनी पाहिले ! या अवकाशयानाकरता अमेरिकेने १५३० लक्ष डॉलर म्हणजे १२,२४० लक्ष रुपये खर्च केले आहेत. या प्रकल्पाचे सूत्रधार आहेत —जेम्स् मार्टिन.

इतका हा खटाटोप अमेरिका व रशिया कशाकरिता करीत आहेत? अनेक प्रकट आणि अप्रकट उद्देश अशा प्रकल्पामागे असतात. वैज्ञानिक जिज्ञासा ही प्रमुख प्रेरणा. पृथ्वीवर सजीव व सचेतन सृष्टी आहे तशी विश्वात अन्य ग्रहावर आहे का ही शास्त्रज्ञांना फार जिज्ञासा आहे. हे प्राणी मानवापेक्षा अधिक प्रगत असण्याची शक्यता आहे काय? हा पुढचा प्रश्न. मग तेथील वातावरण, पृष्ठभाग, भूगर्भ द्रव्ये इत्यादीविषयी माहिती मिळवणे हाही महत्त्वाचा भाग. यातून पुढे आर्थिक व राजकीय हेतू निष्पन्न होतात. या ग्रहावर एखादे अलौकिक सामर्थ्य असलेले द्रव्य सापडले तर त्याच्या जोरावर सर्व जगाचे स्वामित्व मिळवता येईल ! हा ग्रह आणि हे द्रव्य कोणाच्या मालकीचे हा प्रश्न उत्पन्न होणारच. ज्याला दिसले व सापडले तो मालक ठरणार. या प्रकल्पाच्या निमित्ताने वैज्ञानिक क्षेत्रात संशोधन होऊन अनेक लहान सहान शोध लागतात व नवनवीन यंत्रे तयार होतात. त्यांचा वैज्ञानिक क्षेत्रात जसा उपयोग होतो तसाच तो उद्योगधंदे आणि युद्धोपयोगी साहित्य निर्मिती यांतही

करता येतो. या क्षेत्रात जो देश आघाडीवर, त्याच्या ठिकाणी जगाला जिंकण्याचे सामर्थ्य आलेच. सारांश, शुद्ध जिज्ञासा हा जसा सात्त्विक मंगल हेतू आहे, तसा आर्थिक, राजकीय आणि लष्करी वर्चस्व व सामर्थ्य हा राजस-तामस व अ-मंगल हेतूही या संशोधनात आहे. त्याची वाच्यता व बोलबाला होत नाही. हा पैसा अनेक पटींनी विविध स्वरूपात लाभ करून देईल अशी त्यांची अपेक्षा आहे. पण या सर्वांच्या मुळाशी जी संशोधन–वृत्ती आहे ती मला अतिशय महत्त्वाची व अनुकरणीय वाटते.

चंद्रावरचे आणि मंगळावरचे संशोधन करता येते तसे पृथ्वीवर प्रत्येक क्षेत्रात करण्यासारखे आहे. संशोधनाची अनेक क्षेत्रे आहेत, नवीन निर्माणही करता येतील. संशोधक वृत्तीची जोपासना, आणि संशोधनाला जीवन अर्पण करण्याची महत्त्वाकांक्षा ठेवणारे शास्त्रज्ञ भारताला हवे आहेत. तेच आपल्या संशोधनाच्या सहाय्याने या पृथ्वीवरच मंगल निर्माण करू शकतील. ऐहिक जीवनात मंगल, सामाजिक जीवनात मंगल आणि आंतरिक जीवनात मंगल आणण्याची इच्छा ठेवावी, म्हणजे या पृथ्वीवरच खरा मंगळ आल्यासारखे होईल.

[१५–८–७६

६९. आजचे शिक्षण आणि पालक

आजच्या शिक्षणावर टीका करण्याची फॅशन पडली आहे. मंत्र्यापासून सामान्य माणसापर्यंत जो तो शिक्षणाला, शिक्षणसंस्थांना आणि अभ्यासक्रमाला दोष देतो. त्यात तारतम्य असत नाही. सर्वच शिक्षण कुचकामी आहे, का त्यात काही चांगला व काही सदोष भाग आहे, अशी शहानिशा जबाबदार व्यक्तीही करीत नाहीत. सर्वच शिक्षण निरुपयोगी आहे असे विधान करणारे काय सुचवतात? गेल्या २५–३० वर्षात होऊन गेलेले मध्यवर्ती आणि राज्यातले शिक्षणमंत्री यांना शिक्षणातले काही कळत नव्हते; त्यांनी सगळा चुथडा करून ठेवला आहे आणि आता आम्ही तो सुधारणार आहोत, असेच जणू या वक्त्यांना सुचवायचे असते! तपशीलात विचार फार थोडे लोक करतात.

वस्तुस्थिती अशी आहे की गेल्या पंचवीस वर्षात शिक्षणात अनेक सुधारणा होत आलेल्या आहे. मी त्या सर्व पाहिल्या आहेत व त्यांत प्रत्यक्ष भाग घेतला आहे. माझ्यासारख्या इतर अनेकांनी या कामात आपले आयुष्य वेचले आहे. पण या सुधारणा अपुऱ्या आहेत. आमूलाग्र सुधारणा करण्याला लागणारे द्रव्यबळ व मनुष्यबळ शासनाजवळ नव्हते व नाही म्हणून काही दोष व उणीवा शिक्षणात राहिल्या आहेत. त्या सोडल्यास बाकीचा तीनचतुर्थांश शिक्षणाचा भाग उत्तम आहे.

आजच्या शिक्षणात ज्या विषयांचा अंतर्भाव आहे ते सर्व विषय विद्यार्थ्यांना भावी जीवनात आवश्यक आहेत. भाषा, इतिहास, भूगोल, समाजशास्त्रे,

शास्त्र, विज्ञान, गणित, शारीरिक शिक्षण इ. सर्व विषय आवश्यक आहेत. त्यांच्या अभ्यासक्रमात वारंवार सुधारणा करण्यात आलेल्या आहे. मुख्य उणीव आहे ती दोन गोष्टींची. आजच्या शिक्षणात औद्योगिक, धंदेविषयक आणि हस्तव्यवसायाची पुरेशी सोय नाही ही फार मोठी उणीव आहे. ती दूर करणे द्रव्यबळावर अवलंबून आहे. या विषयाकरता पुरेसे द्रव्य देण्याची शासनाची समर्थता नाही व जबरदस्त इच्छाही नाही. ही द्रव्याची सोय झाली असती तर महाराष्ट्रातल्या शिक्षणसंस्थांनी राज्यात औद्योगिक शिक्षणाचा कल्पनातीत विस्तार केला असता. भाषा–गणित यासारखा विषय शिकवण्याला जे द्रव्यबळ व मनुष्यबळ लागते त्यापेक्षा औद्योगिक शिक्षणाला त्या त्या विषयाप्रमाणे चौपट ते दसपट द्रव्य खर्च करावे लागते. यंत्रसामुग्री, भरपूर जागा, प्रशिक्षित मनुष्यबळ यांचा खर्च औद्योगिक शिक्षणात फार येतो. तो आपण करू शकलो नाही व शकत नाही ही ओरड गेली दीडशे वर्षे चालली आहे ! हा आजच्या शिक्षणातला अत्यंत दुर्बल असा भाग आहे.

दुसरा दोष नैतिक शिक्षणाचा अभाव हा आहे. पूर्वीचे ब्रिटिश राज्यकर्ते या क्षेत्रात उदासीन होते. आजचे शासन आणि घटना निधर्मी आहे म्हणून या विषयाकडे सर्वांचेच दुर्लक्ष आहे. गेल्या दोन हजार वर्षांत धर्म आणि नीतिशिक्षण यांची सांगड पडलेली असल्यामुळे नैतिक आणि धार्मिक शिक्षण ही समानार्थी व निगडीत मानली जातात. वास्तविक धर्मनिरपेक्ष व निधर्मी असेही नीति-शिक्षण देणे शक्य आहे. तशा सूचनाही राधाकृष्ण कमिशन, कोठारी कमिशन, श्रीप्रकाश समिती इत्यादी अनेकांनी केल्या आहेत. पण प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात शासनाने फार कुचराई केली आहे. अद्याप करीत आहे. या विषयाकडे शासनाचे पुरेसे लक्ष नाही. शिक्षण-संस्था चालविणाऱ्या संस्थाचालकांचे, प्राचार्यांचे, मुख्याध्यापकांचे, शिक्षकांचे, कोणाचेच लक्ष या गोष्टीकडे नाही. केवळ शासनच दोषी नाही. शिक्षण क्षेत्रातले सर्व घटक या बाबतीत गुन्हेगार आहेत.

यापासून पालकांनी बोध घेतला पाहिजे. शासनाला व संस्थाचालकांना या विषयाकडे लक्ष देण्याला सवड होईल तेव्हा होईल. तोपर्यंत तुमच्या मुलांचा शैक्षणिक काळ निघून जाईल. आपल्या स्वतःच्या प्रयत्नानेच या दोन विषयांचे बाबतीत ज्या त्या पालकाला जे जे करण्यासारखे असेल ते स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने त्यांनी करावे. शासक आणि संस्थाचालक यांच्यापेक्षा पालकांना आपल्या मुलांच्या सर्वांगीण शिक्षणाची अधिक काळजी पाहिजे. त्यांनीही दुर्लक्ष केले तर परमेश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ बसण्याकडे कोणाच्या हातात काय आहे ? जागे करणे शक्य आहे. हालचाली ज्याच्या त्याने केल्या पाहिजेत !

शिक्षकदिन [५–९–७६

जगाची दृष्टी

सकाळ (१५-६-१९७३) :-- दारिद्र्य, प्रकृती व मनोविकार या तीन शत्रूंशी सामना देत अण्णासाहेबांनी येथपर्यंत मजल मारली आहे.

अण्णासाहेबांच्या मातोश्री, मुलांना खायला प्यायला घालणे आणि शाळेत पाठविणे एवढ्यातच आपली इतिकर्तव्यता आहे असे मानणाऱ्यांपैकी सामान्य स्त्री नव्हत्या. बिकट परिस्थितीत धैर्याने दिवस काढीत असताना ह्या माऊलीने मुले सदाचारी कशी होतील याकडे कटाक्षाने लक्ष दिले. शिक्षण सोडू नका, हा आईने दिलेला मंत्र अण्णासाहेबांनी अनेक अडचणी सोसून पाळला.

सध्या गीतेचा सूक्ष्म अभ्यास व याच विषयावर संशोधन, ग्रंथप्रकाशन, व्याख्याने या रूपाने समाजात प्रसार करीत आहेत. याही वयात त्यांचे या निमित्त गावोगाव दौरे सुरूच आहेत.

--बापूसाहेब जाटदे, संपादक--कथालक्ष्मी

दैनिक केसरी (अग्रलेख १९-६-१९७३) :-- संशोधन, ग्रंथलेखन आणि संपादन या क्षेत्रातही त्यांनी नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. त्यांचे हे सारे लेखन संस्कारक्षम असेच आहे. दीर्घ व्यासंग आणि चिंतन करून जे मनाला पटेल तेच त्यांनी आपल्या विपुल वाङ्मयातून शब्दबद्ध केले. भगवद्गीतेवरही त्यांनी विचार-परिप्लुत असे बरेच लेखन केले. त्यांच्या या लेखनावर अनेक मतभेद व्यक्त झाले. टीका झाली. पण गीतेवरील विचार मांडताना त्यांनी जो प्रांजळपणा दाखविला होता तो कोणीही नाकारला नाही. आणि प्रांजळ मतभेदाबद्दल डॉ. खैर यांनीही कधी नाराजी व्यक्त केली नाही. आपल्या या प्रदीर्घ जीवनातील विविध कार्य करताना निर्धनांचे शिक्षण हे ध्येय मात्र त्यांनी कधीच दृष्टीआड केले नाही.

महाराष्ट्र टाईम्स (१५-६-१९७३) : -- डॉ. खैर यांनी केलेली कामगिरी संस्थेच्या व अप्रत्यक्षपणे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात आद्यक्रमांकाने नोंद करण्यासारखी आहे. पण डॉ. खैर यांनी केवळ संस्थेच्या कारभारापुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवले नाही. ज्या शिक्षणकार्यात ते पडले, त्याकरिता परदेशी भेटी देऊन व स्वतंत्र विचार करून त्यांनी विशेष हातभार लावला.

गीता हा त्यांचा खास चिंतनाचा विषय. आपल्या चिंतनाचे सार त्यांनी ग्रंथरुपाने सादर केले व गीताप्रसारासाठी महाराष्ट्रभर संचार केला. साधी राहणी,

काटकसर व निर्व्यसनीपणा यामुळे आयुष्यभर केलेला रु. ५०,००० चा द्रव्यसंचय त्यांनी विद्यार्थी गृहालाच अर्पण केला.

नवशक्ती, मुंबई (१५-६-१९७३) :— स्वातंत्र्योत्तर काळात त्यांच्या शैक्षणिक अनुभवाचा फायदा शिक्षणखात्याने चांगलाच करून घेतला. इंटिग्रेशन समितीचे सभासद या नात्याने शिक्षकाची नवी वेतनश्रेणी ठरवून दिली. विधान परिषदेतही त्यांच्या अनुभवी शब्दाची कदर करण्यात येत असे. संशोधनाच्या क्षेत्रात भगवद्गीतेवरील त्याचे संशोधन कार्य जागतिक दृष्टीने महत्त्वाचे ठरावे अशा तोडीचे झाले. माधुकरी मागून गरिबीत शिक्षण घेणारा हा थोर पुरुष, सेवानिवृत्त होताना अर्ध्या लाखाचे दान करून निवृत्त झाला, यांत मध्यमवर्गीयांनाही बरेच शिकण्यासारखे आहे. डॉक्टरांना दीर्घायुष्य लाभो.

तरुण भारत, पुणे (१८-६-१९७३):— प्रचंड ध्येयनिष्ठेने आणि निःस्वार्थी बुद्धीने अण्णांनी संस्थेच्या आर्थिक पायाचीही भरणी स्वकष्टाने केली. कधी नाटकाच्या प्रेक्षकांत पेटी फिरवून, कधी जमिनीवर सांडलेल्या मातेऱ्यातील धान्य निवडून, तर कधी दलालांचे पुढे झोळी पसरून, अण्णांनी संस्थेचा प्रपंच चालविला.

आश्रमाच्या प्रपंचाची पालखी समर्थपणे खांद्यावर झेलून दादासाहेब केतकरांचा वारसा अण्णांनी चालविला. ही मार्गक्रमणा करीत असतानाच अण्णांची अभ्यासू आणि तत्त्वचिंतक वृत्ती जागृत होती. वाचन, विचार, चिंतन आणि खूप काहीतरी चांगले देऊन जाणारे सात्त्विक, सुंदर, निर्मळ लिखाण हा अण्णांच्या उदात्त व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू आहे. अशा चिंतनशील मनोभूमिकेच्या विचारांच्या पवित्र खाणीतूनच 'सदाचार चिंतनी', 'गीतेतील मुख्य विचार' ह्यांसारखी अमूल्य रत्ने बाहेर पडतात.

-कि. रा. खात्रे

साधना साप्ताहिक (२३-६-१९७३) :— अण्णासाहेब खैर हे महाराष्ट्रातले एक नेमस्त अध्यापक आहेत. त्यांच्या जीवनात जो अहर्निश मोकळेपणा आहे, त्यातच त्यांच्या शिक्षणक्षेत्रातील यशाचे आणि दीर्घायुष्याचे रहस्य आहे. वयाची पंचाहत्तरी ओलांडतानाही यांचा उत्साह, उमेद आणि उद्योग कायम आहेत. किंबहुना आपल्या नित्याच्या शालेय व्यापातून निवृत्त झाल्यामुळे लोकप्रबोधनाची त्यांची तळमळ आणि उत्साह वाढलाच आहे असे म्हटले तरी चालेल. आपले गीतेसंबंधीचे संशोधन अण्णासाहेबांना इतके मूलभूत आणि महत्त्वाचे वाटते की लोकांना ते सांगण्याची त्यांना तळमळ लागली आहे, असे त्यांच्याशी बोलताना सहज जाणवते.

अध्यापक हा उत्तम विद्यार्थी असावा लागतो, याचे इतके जागते भान फार थोड्यांना असेल. नेमस्त वृत्तीमुळे त्यांच्या जीवनात समाधान दिसते.

दैनिक लोकमान्य, कोल्हापूर (१५-६-१९७३) :—डॉ. खैर गेली अनेक वर्षे शिक्षण क्षेत्रात दिसत आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी महाराष्ट्रात सर्वत्र विखुरले आहेत. विद्यार्थ्यांशी वागताना गुरु. अण्णा अतिशय मोकळेपणाने वागतात. कुणी विद्यार्थी दिसला की त्याच्या गुणांचा विकास कसा होत राहील हे ते पहात असतात.

डॉ. खैर हे आपल्या विद्यार्थ्यांना पुढे-पुढे बरोबरीच्या नात्याने वागवतात. ज्या विद्यार्थ्याशी संबंध आला तो त्या विद्यार्थ्याच्या पुरता मर्यादित न रहाता त्यांच्या कुटुंबापर्यंत त्यांचे लोण जावे, ही त्यांची इच्छा असते. त्याप्रमाणे जे संस्कार झाले ते एका पिढीपुरतेच मर्यादित न राहाता पुढच्या पिढीलाही त्यांचा फायदा मिळावा ही त्यांची मनीषा असते.

बहुश्रुतता आणि विनोदाची देणगी असल्याने आपले वास्तव्य ते अतिशय रंजक करतात. अण्णांच्या या आपुलकीने आम्हा विद्यार्थ्यांचे ते अक्षरशः कुटुंबीय झाले आहेत आणि इतर नातेवाईकाप्रमाणे ही कुटुंबीयता पुढल्या पिढ्यांपर्यंत टिकणार आहे.

—डॉ. दु. का. संत

दैनिक पुढारी, कोल्हापूर (२२-६-७३) :—डॉ. खैर यांच्याशी थोडा परिचय असणारांना त्यांच्या ठायीच्या ऋषि-मुनित्वाचा प्रत्यय येतो.

डॉ. अण्णासाहेब खैर हे व्यवसायाने व कार्यक्षेत्राने शिक्षणतज्ज्ञ असले तरी प्रवृत्तीने ते विचारवंत आणि लेखक आहेत. त्यांच्या व्यक्तित्वात अंतर्मुखता व बहिर्मुखता या दोन्ही प्रवृत्तींचे सुरेख मिश्रण झाले आहे. पहिल्या वृत्तीतून त्यांनी अलीकडे गीतेवर सुरेख ग्रंथ लिहिले आहेत, तर दुसऱ्या वृत्तीतून 'सदाचार चिंतनी' सारखे सुंदर लेखसंग्रह प्रसिद्ध केले आहेत.

डोळस, बहिर्मुख दृष्टी, सूक्ष्म अवलोकन, मानवी जीवनाचे व इतिहासाचे मार्मिक ज्ञान, मोठ्या लोकांचा मोठेपणा ओळखण्याचे अपूर्व कसब व तात्पुरत्या घटनेमधून जीवनाला मार्गदर्शन होईल असा रुचणारा व पटणारा तत्त्वबोध काढण्याची हातोटी, आणि हे सारे तेवढ्याच सुगमपणे मांडण्याचे कौशल्य, या गुणांमुळे 'सदाचार चिंतनी' चे हे खंड खरोखरीच सदाचार प्रबोधक असून संग्राह्य झालेले आहेत.

—डॉ. दु. का. संत

कुलाबा समाचार, पेण (२०-६-१९७३) :—आजच्या तरुण पिढीने श्रीमद्भगवद्गीतेकडे नवीन दृष्टिकोनातून पहावे यास्तव ह्या उतार वयातही डॉ.

खैर हे महाराष्ट्रात गीतेच्या प्रचाराकरिता व्याख्याने देत असून त्यातून गीतेचा नवीन अर्थ समजावून सांगत असतात. घरोघरी गीतेचा अभ्यास पुन्हा सुरू व्हावा अशी डॉ. खैर यांची मनीषा आहे.

विशाल सह्याद्री, पुणे (२४-६-१९७३) :— आजच्या तरुण पिढीविषयी अण्णासाहेब आशावादी आहेत. आजचा तरुण बहकलेला आहे असे त्यांना वाटत नाही. प्रथम पालक आणि शिक्षक बिघडतात व मग मुले. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांचेमध्ये दरी निर्माण झाली आहे. मुलांचे विषयी आपलेपणा वाटला पाहिजे, आपलेपणा वाढला पाहिजे. कर्तव्याची, व्यावसायिक पावित्र्याची भावना लोप पावत चालली आहे. आजच्या विद्यार्थ्यांना जीवनविषयक मार्गदर्शन करणारे शिक्षण नाही. ह्यामुळे नैतिक दृष्ट्या तरुण पिढीची उपासमार होत आहे. आजच्या बदलत्या समाजरचनेनुसार शिक्षण-संस्थांची धोरणे बदलायला हवीत.

—श्री. प्रभाकर सातपुते यांनी घेतलेल्या मुलाखतीच्या आधारे

साप्ताहिक स्वदेश, यवतमाळ (२०-६-१९७३) :—ते ग्रंथ-लेखन करतात, भाषणाच्या निमित्ताने विचार-प्रसार करतात आणि त्यांच्या सौभाग्यवती सौ. यमुनाबाई ह्या प्रवासात त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्याचे, सामान्य संसारी स्त्रीचे कार्य करतातच पण त्यांच्या पुस्तकांच्या विक्रीचेही कार्य करतात. लेखन-प्रकाशनाचे अर्धे कार्य अण्णासाहेब करतात तर प्रसाराचे उर्वरित कार्य सौ. यमुनाताई करतात. खऱ्या अर्थाने त्या अण्णांच्या अर्धांगी म्हणावयाच्या.

प्रा. गोविंद देशपांडे

साहित्य परिषदेत सत्कार (२४-६-१९७३) :—डॉ. खैरांना पंचाहत्तर-वर्षे पूर्ण होत असून त्यांच्या निर्मल चारित्र्याचा व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करताना आम्ही कृतार्थ झालो आहोत. **डॉ. रा. शं. वाळिंबे, अध्यक्ष**

समाचार, (जून १९७३) :—अण्णांच्या कार्याने संस्थेला एक वेगळेच महत्त्व आले. शिक्षणाच्या इतिहासात हे विद्याभवनाचे आदार महत्त्वपूर्ण झाले. संस्थेचा मोठेपणा अण्णांच्या मोठेपणावर चमकून दिसू लागला. परिणामी संस्था समाजाची आदरणीय वस्तू झाली व उत्तमोत्तम सहकाऱ्यांच्या सहकार्याने संस्थेची सर्व क्षेत्रात प्रगती झाली.

अण्णांनी भरपूर ग्रंथलेखन केले. वाटेल तसे लिखण करून पैसे जमविले नाहीत. सर्व लिखाण शिक्षणविषयक, संस्कारात्मक व गीताविषयक असे आहे. पाश्चिमात्य शिक्षण पद्धती, सदाचार चिंतनीचे भाग, मूळ गीतेचा शोध, गीता विकास, मराठी गीता विवरण इ. पुस्तके हेच दर्शवितात.

ह्या सर्व प्रवासात सौ. ताईंची सर्व तऱ्हेने उत्तम साथ मिळाली. असेल त्यात त्यांनी समाधान मानले, त्यामुळे अण्णांच्या कर्तृत्वाला समाजशिक्षणाला व सेवेला भरपूर वाव मिळाला.

त्यांनी आपल्या जीवनात भोग आणि त्याग, सत्ता आणि सेवा, संचय आणि दान, यांचा समन्वय साधला आहे. —श्री. म. वा. नाईक

श्रीमान शंतनुराव किर्लोस्कर :— लहानपणी मुलाची हौस पुरी करताना पालक म्हणून आपल्याला समाधान वाटते, पण ज्या लहान मुलाला स्वतःची हौस बाजूला ठेवून निकडीच्या गरजा भागविण्यासाठी कष्ट सोसावे लागतात, तो प्रत्येक गरज भागविण्यासाठीही स्वतः किंमत देत असतो. डॉ. खैर यांनी ही किंमत दिली आहे. अमेरिकेत डॉक्टरेट मिळविल्यावर पैसा कमावणे त्यांना शक्य होते, पण उलट भावी पिढी संपन्न व्हावी म्हणून आपल्या कष्टाचे, ज्ञानाचे आणि तसेच स्वतःचे पन्नास हजाराचे भांडवलही पुणे विद्यार्थी गृहाला त्यांनी दिले. ते पैसेवाले नाहीत, पण तरीही ते तरुण पिढीचे जीवन संपन्न करणारे संपन्न नागरिक व शिक्षक आहेत. **सत्कार समारंभ अध्यक्षीय भाषण (१८-६-१९७३)**

श्री. पु. ल. देशपांडे :— डॉ. खैर उत्तम गृहस्थ, शिक्षक आणि उत्तम नागरिक व कार्यकर्ते आहेत. जगात नमस्कारासाठी चार माणसे शोधायला लागतात त्या व्यक्तींमध्ये अण्णांचा समावेश होतो. १८ जून १९७३.


श्री. शं. रा. देवळे :— वृद्धापकालातही डॉ. खैर यांनी बुद्धी लखलखीत, प्रकृती निरोगी आणि मन ताजेतवाने राखले आहे त्यामुळे ते यापुढेही आपले कार्य चालू ठेवतील

सौ. कमल नातू अहिल्यादेवी हायस्कूल मुख्याध्यापिका :— अण्णा तपस्व्यांचे तपस्वी आहेत.

कै. वा. ब. गोगटे :— त्यांच्यासारख्या त्यागी कार्यकर्त्यामुळे पुणे विद्यार्थी गृहाची भरभराट झाली.

MIRA (August 1973):— Dr. Khair is a Jewel. His spiritual radiance and simplicity, coupled with his remarkable services, are to be written in letters of gold. In him is mirrored as in very few, the light of Indian Culture. Such souls are a great asset of the nation. We offer him our respectful salutations and breathe out an aspiratoin that God may continue to use this humble man in His service for many many years!

सारांश :— सदाचार चिंतनीतील विचार व्यवहार्य व आचरणीय आहेत.







REFBK-0024796

लेखक परिचय

डॉ. गजानन श्रीपत खैर

एम्. ए. (बॉबे व कोलंबिया युनि.),
पीएच्.डी. (न्यूयॉर्क युनि.)
जन्म : १५ जून १८९८
१९२० ते १९७० पुणे विद्यार्थी गृहाचे
आजीव सेवक व प्रमुख
महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक
मुख्य अध्यापक व मार्गदर्शक



संस्थेची ५० वर्षे सेवा आणि ५० हजारांचे संचयदान करून सेवानिवृत्त

- ☆ पूना, बॉबे व कर्नाटक युनि. मधील एम्. एड्. वर्गाकरिता कंपॅरेटिव्ह एज्यु. विषयाचे सन्मान्य प्राध्यापक व पीएच् डी. करता संशोधन-मार्गदर्शक
- ☆ १९५२ ते ५८ विधान परिषदेचे सभासद.
- ☆ बॉबे युनि. सेनेट, पूना युनि. कोर्ट, एस्. एस्. सी. बोर्ड, सेकंडरी एज्यु. बोर्ड, इंटिग्रेशन कमिटी, एज्युकेशन कमिशन टास्क फोर्स, इलाखा प्राथमिक शिक्षक संघ, टीचर्स व हेडमास्टर्स फेडरेशन, सरकारी टेक्स्ट बुक्स व करीक्युलम रिसर्च ब्युरो इ. मध्ये प्रमुखत्वाने शैक्षणिक कार्य.
- ☆ अमेरिका, इंग्लंड, रशिया, जर्मनी, जपान इ. देशांत प्रवास व शिक्षण पद्धतीचे निरीक्षण.
- ☆ प्रवास, शिक्षण, गीता इ. विषयांवर व्याख्याने, लेख, ग्रंथ व संशोधन.

गीतेवरील वाङ्मय व इतर ग्रंथ :

- ☐ सर्वबोध पद्यगीता रु. ३–५० ☐ मराठी गीता व विवरण रु. ६/–
- ☐ गीतेतील मुख्य विचार रु. ६/– ☐ गी. मु. विचार-पुरवणी मराठी श्लोक रु. २/–
- ☐ मूळ गीतेचा शोध रु. १०/– ☐ गीतेचा दृष्टिकोन रु. १०/–
- ☐ त्रिकाल गीता In Press ☐ गीताविकास २ री आवृत्ती मुद्रणावस्थेत
- ☐ बालगड In Press ☐ सदाचार चिंतनी भाग १ ते ४ प्रत्येकी रु. ६/–
- ☐ Quest for The Original Gita, Rs. 32/– (सोमैया प्रकाशन)
- ☐ जीवनात गीता रु. १२/–